# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०८/२००६.** **दिनांक १९.०८.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १९ ऑगस्ट, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१०८२१-२००६, दिनांक १०ऑगस्ट, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १९ ऑगस्ट, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे |
| ०३. | मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव |
| ०७. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | ०८. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ०९. | मा.डॉ.पी.एल.तिवारी | १०. | मा.श्री कैलास गोविंदराव कोते |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत श्री प्रकाश रामदास काळे,मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे,मा.श्री समि खतिब,मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक,मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डये यांनी पत्राव्दारे/दूरध्वनीद्वारे कळविले आहे,त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं. ०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.०३.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५३१.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.७.२००६ चे सभेतील निर्णय क्र.४१७ (८) अन्वये इतिवृत्त वाचून कायम होत असताना वेळेअभावी निर्णय क्र.४०५पासून पूढे चर्चा होऊ न शकल्याने याबाबत पुढील सभेत इतिवृत्त वाचून कायम करण्यात यावे असे ठरले होते.

त्यानुसार व्यवस्थापन समितीचे दि.३.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात घेंत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.३३९ मध्ये शेवटी-**

"याबाबत सविस्तर चर्चा होऊन, प्राथमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयासाठी जागेच्या किंमतीचा विचार करता, थोड्या दूर अंतरावर जमीन खरेदी करुन उपरोक्त बांधकाम प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरलें."

**याऐवजी-**

"याबाबत सविस्तर चर्चा होऊन, प्राथमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयासाठी जागेच्या किंमतीचा विचार करता, जवळच्या अंतरावर जमीन खरेदी करुन उपरोक्त बांधकाम प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरलें." (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०२) निर्णय क्र.४०५ मध्ये शेवटी-**

" तरी उपरोक्तप्रमाणे सल्लागार मे.टी.सी.ई. कन्सल्टींग इंजिनिअर्स, पुणे यांना १६ व्यक्ती महिन्यांसाठी (man month) त्यांचे मागणीप्रमाणे रु. ९२,०००/- प्रती व्यक्ती महिना + १२.२४% सर्व्हीस टॅक्स+वर नमुद केलेल्या सुविधा तसेच फर्निचर व संगणक इ. साहित्य सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयास देणेकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली "

**याऐवजी-**

" तरी उपरोक्तप्रमाणे सल्लागार मे.टी.सी.ई. कन्सल्टींग इंजिनिअर्स, पुणे यांना १६ व्यक्ती महिन्यांसाठी (man month) त्यांचे मागणीप्रमाणे रु. ९२,०००/- प्रती व्यक्ती महिना + १२.२४% सर्व्हीस टॅक्स+वर नमुद केलेल्या सुविधा तसेच फर्निचर व संगणक इ. साहित्य सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयास देणेकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी आर्किटेक्ट श्री शक्ती परमार व मे.टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स,लि.पुणे यांचेशी मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी चर्चा करुन निर्णय घ्यावा असे ठरले." (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं. ०२. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५३२.** व्यवस्थापन समितीचे दि.१५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात घेंत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.५२९ मध्ये शेवटचा परिच्छेद-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे रुग्णालयासाठी एम.आर.आय.मशीन खरेदीकामी निविदा मागविण्यात याव्यात याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३ कोटीचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**याऐवजी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे रुग्णालयासाठी एम.आर.आय.मशीन खरेदीकामी फिलीप्स, सिमेंन्स या नामांकित कंपन्यांकडून निविदा मागवाव्यात. आलेल्या निविंदांवर उपसमितीने अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३ कोटीचे खर्चास मान्यता देण्यात आली." (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं. ०३. व्यवस्थापन समितीचे दि.०५.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३३.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) संस्थान मालमत्तेचा विमा पॉलिसी नुतनीकरणाबाबत.**

**(अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै, २००५ ते ०९ जुलै, २००६ या कालावधीसाठी मे. युनायटेड इंडिया इन्श्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ७,६३,७६९/- इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक ०९ जुलै, २००६ रोजी पूर्ण होत आहे. त्यापुढील दिनांक ०९ जुलै, २००७ अखेर पर्यंन्तच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात आले होते.

**(ब)** यासाठी सार्वजनिक व खाजगी, अशा एकुण ०९ सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

०१) दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)
०२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)
०३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत)
०४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत)
०५) बजाज अलाइंन्झ कंपनी, शाखा नाशिक ( खाजगी)
०६) आय.सी.आय.सी.आय. लुम्बार्ड, शाखा पुणे ( खाजगी)
०७) रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कंपनी, शाखा पुणे ( खाजगी )
०८) चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा मुंबई ( खाजगी)
०९) इफको - टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा नाशिक ( खाजगी )

उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधींबरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत येऊन त्यांना याबाबत पुन्हा चर्चा-तथा-वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, त्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात आले.

त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कंपनीचे नांव | देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर | १०,३०,०१४/- |
| ०२. | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर | १०,८३,६१४ |
| ०३. | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर | ९,३४,२०९/- |

| | | |
|---|---|---|
| ०४. | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव | --- |
| ०५. | बजाज अलाइंन्झ कंपनी, शाखा नाशिक | १७,४८,४१०/- |
| ०६. | आय.सी.आय.सी.आय. लुम्बार्ड, शाखा पुणे | ९,८६,०१८/- |
| ०७ | रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कंपनी, शाखा पुणे | १४,८४,८५३/- |
| ०८ | चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा मुंबई | --- |
| ०९ | इफको - टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा नाशिक | १६,३२,१८८/- |

य़ावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०३ ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत आले. चालू विमा पॉलिसीजची मुदत ९ जूलै,२००६ अखेर संपत असल्याने मूदत संपणेपूर्वी तात्काळ कार्यादेश देऊन प्रिमियमची रक्कम आदा करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**०२) धर्मशाळा रुग्णालय लिफ्टचे सिव्हील कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदांबाबत**

श्रीसाईनाथ रुग्णालय दिनांक १२/०७/२००३ पासून धर्मशाळा क्रमांक ०२ इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. आता पूर्वीच्या श्री साईनाथ रुग्णालयाचे जागेवर श्रीसाईबाबा सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल सुरु आहे. त्यामुळे स्थलांतरीत करण्यात आलेले श्री साईनाथ रुग्णालय धर्मशाळा इमारत नं.०२ मध्ये ठेवण्यात आले आहे. सदर इमारतीला रॅम्प अथवा लिफ्टची सोय नसल्यामुळे रुग्णांना तळमजल्यावरुन पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर नेण्यासाठी स्ट्रेचरचा वापर करता येत नाही. रुग्णांना झोळीच्या स्ट्रेचर मधून वर नेण्यात येते यामध्ये झोळीचे कापड फाटून अथवा झोळी हातून निसटल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. त्याकरीता रुग्णांच्या सोयीसाठी धर्मशाळा नं.२ इमारतीत लिफ्टची व्यवस्था असणे आवश्यक असल्याचे वैद्यकिय अधिक्षिका यांना दिनांक २३/१२/२००५ चे टिपणीव्दारे कळविले होते.

सदर इमारतीला लिफ्टची व्यवस्था करण्यासाठी लिफ्टशाफ्ट व मशिनरुमचे बांधकाम करावे लागेल त्यासाठी मे निकम पाटील असो., श्रीरामपूर यांचेकडून एस्टीमेट करुन घेण्यात आले. त्यानुसार सदर बांधकामासाठी रुपये ३,१७,८८२.०० मात्र इतका खर्च तसेच लिफ्ट बसविणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रुपये ७,३०,०००.०० मात्र अशा एकूण १०,४७,८८२.०० इतक्या खर्चास वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास दिनांक २४/०४/२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ३०६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

सदर नियोजीत लीफ्टचे सिव्हील कामासाठी विद्युत विभाग यांनी कळविलेल्या गरजांनुसार आर्किटेक्ट निकम पा.असो. यांचेकडून निविदा तयार करुन घेण्यात आल्या. त्यासाठी आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या एस्टीमेटनुसार सदर कामासाठी अंदाजे रु.३,६०,९७१.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्री दिनांक २१/०६/२००६ ते दि. २७/०६/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दिनांक २९/०६/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार मे.साई कन्स्ट्रक्शन,कोल्हार ही एकच निविदा प्राप्त झालेली आहे. सदरहू निविदा आजचे सभेपुढे उघडणेत आली असता, मे.साई कन्स्ट्रक्शन कं.,कोल्हार बु।। यांनी निविदा दरापेक्षा ११.५०% अधिक असा देकार दिलेला आहे. त्यांचे दराने काम केल्यास रुपये४,०२,४८३.०० खर्च येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या धर्मशाळा परिसरात निवासस्थान इमारतीचे बांधकाम करीत असलेले ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांचेकडून उपरोक्त काम त्यांचे मंजूर निविदा दराने करुन घेतल्यास अंदाजे रुपये ३,६९,५६२/-मात्र इतका खर्च येईल. सदरहू अपेक्षित खर्च हा मे.साई कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे देकारापेक्षा कमी स्वरुपाचा असल्याने मे.गोलानी बिल्डर्स हे उपरोक्त काम मंजूर निविदा दराने करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून करुन घेण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०३) तिनचाकी सायकल खरेदीबाबत वाटाघाटीने निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२००६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.८७ नुसार संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० नग तिन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठीची नियमावली तयार करण्यात यावी असे ठरलेले आहे. त्यानुसार प्रशासन शाखेस दि.२२.०४.२००६ चे प्रस्तावाने सध्या १००० सायकली टप्प्याटप्याने खरेदी करणेस व त्याकामी रु.३५ लाख मात्रचे खर्चास मंजूरी मिळालेली आहे.

सदरील सायकली खरेदीकामी दि.११-१३.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१५.०५.२००६ ते दि.२४.०५.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२५.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून सदरील निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०६.२००६ चे सभेत उघडणेत आलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, पुणे |
| ०२. | जयहिंद सायकल मार्ट, कोपरगांव |
| ०३. | मिना एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०४. | कृषी मशिनरी, धुळे |
| ०५. | लक्ष्मी इंडस्ट्रीज, इंदौर |
| ०६. | मनिष स्टील वर्क्स, इंदौर |
| ०७. | डायनॅमिक स्टील क्राफ्टस, नाशिक |
| ०८. | शाह एंटरप्राईजेस, इंदौर |
| ०९. | महागुज स्टील कंपनी, औरंगाबाद |
| १०. | पाप्युलर सायकल अ‍ॅण्ड मोटर कंपनी, पुणे |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली असून त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते. चर्चा/वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव व गांव | मुळ दर (व्हॅटसह) रुपये | वाटाघाटीनंतरचे दर (व्हॅटसह) रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, पुणे | २,९७०/- | २,५९०/- |
| ०२. | जयहिंद सायकल मार्ट, कोपरगांव | ३,१११/- | ३,०८६/- |
| ०३. | मिना एंटरप्राईजेस, नाशिक | ३,४३०/- | अनुपस्थित |
| ०४. | कृषी मशिनरी, धुळे | ३,२०६/- | अनुपस्थित |
| ०५. | लक्ष्मी इंडस्ट्रीज, इंदौर | २,८३०/- | २,६००/- |
| ०६. | मनिष स्टील वर्क्स, इंदौर | २,८५३/- | २,८५३/- |
| ०७. | डायनॅमिक स्टील क्राफ्टस, नाशिक | ३,१४९/- | २,९५०/- |
| ०८. | शाह एंटरप्राईजेस, इंदौर | ३,१८०/- | २,८६५/- |
| ०९. | महागुज स्टील कंपनी, औरंगाबाद | २,७१८/- | अनुपस्थित |
| १०. | पाप्युलर सायकल अ‍ॅण्ड मोटर कंपनी, पुणे<br>अ) दिनेश इंडस्ट्रीयल कार्पोरेशन<br>ब) एम.बी.इंडस्ट्रीयल कार्पोरेशन | <br>३,३८०/-<br>३,१२०/- | <br>३,३३०/-<br>३,०७०/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन अ.नं.०१ चे निविदासादरकर्ते मे.हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, पुणे यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना मागणीप्रमाणे स्पेशिफिकेशनच्या सायकलला तीन ब्रेक असावेत अशी अट घालून कार्यादेश देण्यात यावा. तसेच आवश्यकतेनुसार मागणीप्रमाणे पुरवठा करावा असे स्पष्ट नमूद करावे, अशी शिफारस केली होती, परंतू व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.७.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२१७ (२) मध्ये १००० नग सायकली खरेदीकामी दिनांक ०५.०७.२००६ चे उपसमितीमध्ये संबंधितांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात येऊन निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू सदरील निर्णय रद्द करुन हिरो, अ‍ॅटलास,फिलीप्स,हरक्युलस इत्यादी नामांकित उत्पादक कंपन्यांकडून फेरनिवीदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०३/अधिक्षक,खरेदी विभाग)

**०४) विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, स्टेशनरी साहित्य,स्वच्छता व बगीचा साहित्य खरेदीकामी आलेल्या निविदांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ निर्णय क्र.२७१ नुसार सन २००६-०७ सालामध्ये विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम, स्वच्छता, बगीचा विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरीचे वार्षिक खरेदीस व त्याकामी येणारे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.१०-१२.०६.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१२.०६.२००६ ते दि.२२.०६.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२३.०६.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. सदरील निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. मुदतअंती प्राप्त झालेल्या निविदांचे दोन्ही लिफाफे दिनांक २४.०६.२००६ रोजी झालेल्या उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले आहेत.

निविदेतील शर्ती व अटीनुसार निविदेसोबत विद्युत साहित्यासाठी रुपये १५,००० ,स्टेशनरीसाठी रुपये १०,००० व स्वच्छता बगीचा साहित्यासाठी रुपये ५,०००/- बयाणा रकमेचा डी.डी. अथवा रोख रकमेची पावती व आवश्यक कागदपत्र जोडावयास सांगितले होते. उपसमितीमध्ये उघडण्यात आलेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

## अ) विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | काशिको ट्रेडींग प्रा. लि., कोपरगाव |
| ०२ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०३ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०४ | इंटरनॅशनल इलेक्ट्रिकल्स, अहमदनगर |
| ०५ | शहा ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०६ | सुरेंद्रकुमार ॲण्ड कंपनी, संगमनेर |
| ०७ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी |
| ०८ | आदित्य एंटरप्राईजेस, मुंबई |
| ०९ | पुजा इलेक्ट्रिकल्स, लोणी |

## ब) स्वच्छता व बगीचा विभाग

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | यशोदा एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०२ | अकबरखॉ. सांडेखॉ. पठाण, कोपरगाव |
| ०३ | कुलदीप केमिकल्स, कोपरगाव |
| ०४ | व्हिजी प्रॉडक्टस, औरंगाबाद |
| ०५ | गुरुकृपा सोप्स केमिकल्स, अहमदनगर |
| ०६ | आर. के. एन्टरनप्राईजेस, सिन्नर |
| ०७ | काशिको ट्रेडींग प्रा. लि., कोपरगाव |
| ०८ | सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद |
| ०९ | गुरुकेम एंटरप्राईजेस, भेर्डापूर |
| १० | व्ही. दुर्गा केमिकल उद्योग, नाशिक |
| ११ | स्पार्क केमिकल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद |
| १२ | विक्रांत एजन्सी, अहमदनगर |
| १३ | नरेंद्र एजन्सी, पुणे |
| १४ | साई राज, ठाणे |

## क) कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | यशोदा एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०२ | शिरोडे ॲण्ड सन्स, कोपरगाव |
| ०३ | ज्योती बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर, नाशिक |
| ०४ | श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर |
| ०५ | प्रविण एजन्सीज, नाशिक |
| ०६ | सखी इंडास्ट्रीएल इस्टेट, पुणे |
| ०७ | केयुर एन्टरप्राईजेस, मुंबई |
| ०८ | कॉम्प्युलिंक, मुंबई |
| ०९ | कॉम्प्युस्क्रोल (इंडिया) प्रा. लि., मुंबई |
| १० | माटेल सेल्स कार्पोरेशन, मुंबई |

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यानंतर त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दर स्वीकारणेत येऊन कार्यादेश देण्यात यावेत तसेच दिलेल्या पुरवठा आदेशाची माहिती व्यवस्थापन सभेस सादर करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

## ०५) पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर फेर निविदाबाबत वाटाघाटीने निर्णय घेणे

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० ड(०५) नुसार सन २००६-०७ मध्ये कॅन्टीनसाठी आवश्यक असणारे पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीकामी निविदा मागणी करणेस तत्वत: मान्यता मिळालेली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ चे सभेत चर्चेसाठी निमंत्रीत करणेत येऊन त्यांचेकडून मुळ दरावर सुट पत्र देणेबाबत सांगणेत आले होते. त्यानंतर मा.व्यवस्थापन उपसमितीच्या दि.०३.०५.२००६ सभेत पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, खरेदीबाबत स्टॅण्डर्ड कंपन्यांकडून फेर दर मागविण्यात येऊन, व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावे अशी शिफारस करण्यात आली. सदरचा निर्णय होईपर्यंत पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर तूर्त मे.नालकर, तिसगांव तसेच गुरुकपा सेल्स कोपरगांव यांचेकडून निम्नतम दराने खरेदी करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. त्यास

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.०५.२००६ मधील निर्णय क्र.३२७ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.१५.०६.२००६ अखेर पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खालीलप्रमाणे न्युनतम दराने खरेदी करणेत आलेले आहे.

| अ. नं. | तपशिल | वार्षिक मंजूर मागणी | खरेदी माल बाटली | शिल्लक | दर प्र.नग | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ लिटर बाटली | १ लाख | २४७६८ | ७५२३२ | रु.५.४० | ४,०६,२५३/- |
| ०२ | ५००मिली बाटली | ५० हजार | १७५२० | ३२४८० | रु.३.६५ | १,१८,५५२/- |
| | | | | | | ५,२४,८०५/- |

मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या निर्णयानुसार दि.१९-२१.०६.२००६ चे स्थानिक वर्तमापत्रात फेरजाहिरात देऊन आयएसआय प्रमाणित पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटर बाटली (७५ हजार बाटली) व ५०० मिली बाटली (३० हजार बाटली) साठी निविदाधारकांचेच लेटरहेडवर सर्व समावेशक दर मागविण्यात आलेले आहे. दरपत्रकासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे व १टक्का बयाणा रकमेची मागणी करणेत आलेली आहे. सिलबंद दरपत्रके सादर करण्याची अंतिम मुदत दि.२८.०६.२००६ अशी देण्यात आलेली आहे.या मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

०१. विराज केटरर्स, अहमदनगर
०२. सचिन एजन्सी, शिरडी
०३. जलराज ॲक्वॉ प्रोसेसर्स, अंमळनेर
०४. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव
०५. साई ॲग्रो इंडस्ट्री, कोपरगांव
०६. कोठारी एजन्सीज, श्रीरामपूर
०७. संगमनेर तालुका सह.दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या., संगमनेर

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव | तपशिल | कोटेशनमधील दर प्र.बाटली रुपये | वाटाघाटीनंतर दर प्र.बाटली रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | विराज केटरर्स, अहमदनगर | १ लि.बाटली | साईगंगा- ८.१० | अनुपस्थित |
| | | ५००मिली बाटली | साईगंगा- ४.३५ | अनुपस्थित |
| ०२ | सचिन एजन्सी, शिरडी | १ लि.बाटली | पार्ले-बिसलेरी ७.५० | पार्ले- ७.५० |
| | | ५००मिली बाटली | पार्ले-बिसलेरी ५.५० | पार्ले- ५.५० |
| ०३ | जलराज ॲक्वॉ प्रोसेसर्स, अंमळनेर | १ लि.बाटली | जलराज ५.२० | जलराज- ५.१० (फॅक्सव्दारे) |
| | | ५००मिली बाटली | जलराज ३.५० | जलराज- ३.४५ (फॅक्सव्दारे) |
| ०४ | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | १ लि.बाटली | राजहंस ५.७४ | राजहंस- ५.४० |
| | | ५००मिली बाटली | राजहंस ३.७७ | राजहंस- ३.६५ |
| ०५ | साईॲग्रो इंडस्ट्री, कोपरगांव | १ लि.बाटली | साईगंगा ५.७५ | साईगंगा- ५.७५ |
| | | ५००मिली बाटली | साईगंगा ३.६६ | साईगंगा- ३.६६ |
| ०६ | कोठारी एजन्सीज, श्रीरामपूर | १ लि.बाटली | ॲक्वारिच ६.९५ | ॲक्वारिच- ६.७५ |
| | | ५००मिली बाटली | ॲक्वारिच ४.६५ | ॲक्वारिच- ४.५० |
| ०७ | संगमनेर तालुका सह.दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या.,संगमनेर | १ लि.बाटली | राजहंस ५.४२ | राजहंस- ५.१६ |
| | | ५००मिली बाटली | राजहंस ३.७४ | राजहंस- ३.५४ |

मा.व्यवस्थापन उपसमितीच्या दि.०३.०५.२००६ सभेत पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर स्टॅण्डर्ड कंपन्यांकडून खरेदी करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मे.सचिन एजन्सी,शिर्डी यांनी दिलेले पार्ले या स्टॅण्डर्ड कंपनीचे बिसलेरीचे दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. तसेच ०१ लिटर बाटलीची विक्री किंमत रुपये १०/- व ५०० मि.ल. बाटलीची विक्री किंमत रुपये ६/- प्रति नग ठेवण्यात यावी, अशी शिफारस करण्यात होती, परंतू पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर तूर्त मे.नालकर, तिसगांव तसेच गुरुकपा सेल्स कोपरगांव यांचेकडून १ लिटरसाठी रुपये ५.४० व ५०० मि.लि. साठी रुपये ३.६५ या निम्नतम दराने खरेदी करण्यात यावे तसेच ०१ लिटर बाटलीची विक्री किंमत रुपये १०/- व ५०० मि.ल. बाटलीची विक्री किंमत रुपये ६/- प्रति नग ठेवण्यात यावी,अशी शिफारस करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**०६) दोन महिंद्रा मॅक्स वाहन खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

अ) नियोजित प्रसादालय, पाणी पुरवठा योजना (कनकुरीतळे), मुख्य भांडार व रुग्णालय दुर असलेने तसेच संस्थान उत्सव, संस्थानतर्फे वेळो-वेळी आयोजित केलेले कार्यक्रम इ. कामासाठी मालवाहतुक वाहने अपुरी पडत असलेने महिंद्रा कंपनीची दोन मॅक्स वाहने खरेदी करणेबाबत व वाहने खरेदी करतांना महिंद्रा कंपनीच्या अधिकृत डिलर्स कडून कोटेशन्स मागविणे व अंदाजे ८ ते १० लाख मात्रचा खर्च या बाबतचा प्रस्ताव मा.व्यव्स्थापन समितीचे दि. ०३.०६.२००६ चे सभेत सादर करण्यात आला होता. त्यास मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार जा.नं. एसएसएस/ वाहन/ ७७११/ २००६, दि. १३.०६.२००६ ने खालील प्रमाणे महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर कडून कोटेशन मागविण्यात आलेली होती.

०१. श्रीराम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर
०२. जितेंद्र मोटर्स, नाशिक
०३. एन.बी.एस. इंटरनॅशनल लि., मुंबई
०४. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी

उपरोक्त चार कोटेशनधारकांपैकी खालीलप्रमाणे तिन कोटेशनधारकांची कोटेशन प्राप्त झालेली आहे.

०१. श्रीराम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर - बंद कोटेशन
०२. जितेंद्र मोटर्स, नाशिक - फॅक्स कोटेशन
०३. एन.बी.एस. इंटरनॅशनल लि., मुंबई - खुले कोटेशन

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु एकही कोटेशन्ससादरकर्ते आजचे सभेस उपस्थित नव्हते.

कोटेशन्ससादरकर्त्यांनी कोटेशन्समध्ये खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.न. | निविदाधारक कंपनीचे नाव | वाहनांची मुळ किंमत (रु.) | इन्शुरन्स (रु.) | आर.टी. ओ. टॅक्स (रु.) | डिस्काऊंट (रु.) | डिस्काऊंट वजा जाता एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर | ४,२९,९००.०० | --- | --- | १५,०००.०० | ४,१४,९००.०० |
| ०२ | जितेंद्र मोटर्स, नाशिक | ४,३४,७२५.०० | --- | --- | --- | ४,३४,७२५.०० |
| ०३ | एन.बी.एस. इंटरनॅशनल लि., मुंबई | ४,१९,५००.०० | --- | ६००.०० | २०,०००.०० | ४,००,१००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, एन.बी.एस. इंटरनॅशनल लि., मुंबई यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**ब)** दि. ०३.०६.२००६ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३६० अन्वये ज्या वाहनांचे १ लाख कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त कि.मी. झालेले असेल अशा वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी व त्याऐवजी नवीन वाहने खरेदी करणेकामी मान्यता मिळालेली आहे.

विधी व न्याय विभाग शासन पत्र क्र. सासंवि-२००५/ ३८७/(११७)- का.सोळा, दि. २९.०६.२००६ नुसार जुनी वाहने निर्लेखित करणेसाठी असलेल्या शासनाच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

**०१.** शासनांच्या नियमाचे पालन करण्याच्या अटीस अधिन राहून ०५ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक जुनी असलेली किंवा ०१ लाख किलोमिटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांचे लिलाव विक्रीस शासन मान्यता देण्यात येत आहे.

**०२.** सदर लिलाव विक्री संस्थानच्या विहीत कार्यपध्दती नुसार व्हावीत.

**०३.** लिलाव विक्रीनंतर जमा झालेली रक्कम संस्थानच्या निधीत जमा करण्यात यावी.

०४. उपरोक्त नियमात न बसणाऱ्या वाहनांच्या लिलाव विक्रीबाबत सबळ कारण देऊन प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

०५. उपरोक्त वाहनांच्या विक्रीनंतर संस्थानचा नवीन वाहन खरेदीचा मानस असल्यास त्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय व शासनपत्र यानुसार खालीलप्रमाणे जुन्या वाहनांचा जाहिर लिलाव करता येईल.

| **अ.नं.** | **संगणक कोड नंबर** | **वाहन क्रमांक** | **वाहन प्रकार** | **खरेदी दिनांक** | **झालेले वर्ष-महिने** | **झालेले कि.मी.** |
|---|---|---|---|---|---|---|
| **कार्यालयीन वाहने (०४)** | | | | | | |
| १ | VEHM-001 | एच- ६०१ | हुन्डाई असेंट | ०१.०५.२००० | ०६-०० | १,२१,६८० |
| २ | VEH-6020 | एच- ११०१ | महिंद्रा बोलेरो | १६.०८.२००० | ०५-१० | २,५१,४२५ |
| ३ | VEH- 6017 | एच- ८०१ | ॲम्बेसॅडर कार | १९.०५.२००० | ०६-०० | २,३१,८१९ |
| ४ | VEH- 6023 | के- १८०१ | टाटा सुमो | ०२.०१.२००२ | ०४-०५ | २,०५,८०५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **टुव्हिलर (०३)** | | | | | | |
| ५ | VEH- 2202 | एल- ६०९७ | बजाज एम- ८० फोरस्ट्रोक | १३.०६.२००१ | ०५-०० | ४१,००० |
| ६ | VEH- 1001 | ई- ९१०० | राजदूत (संरक्षण वि. कडील) | १४.०२.१९९८ | ०७-०४ | २४,७९३ |
| ७ | VEH- 6012 | एच- ६८३८ | बजाज एम- ८० (रेकॉर्ड वि. कडील) | ०१.१२.१९९९ | ०६-०८ | २२,००० |
| **बसेस (०५)** | | | | | | |
| ८ | VEH- 404 | ए- ७५९३ | टाटा कं. स्कुल बस | ११.०६.१९९२ | १३-११ | १,१३,१२२ |
| ९ | VEH- 405 | ए- ७५९४ | टाटा कं. स्कुल बस | ०१.०६.१९९२ | १३-११ | १,८८,८०५ |
| १० | VEH- 6004 | ए- ७५९५ | टाटा कं. भक्तनिवास बस | ०१.०६.१९९२ | १३-११ | १,२५,८१२ |
| ११ | VEH- 6002 | सी- ९०१६ | टाटा कं. स्कुल बस | ०५.१२.१९९६ | ०६-०४ | १,३९,३७३ |
| १२ | VEH- 6001 | सी- ९०१७ | टाटा कं. भक्तनिवास बस | ०५.१२.१९९६ | ०६-०४ | १,५९,९०५ |
| **रुग्णवाहिका वाहने (०२)** | | | | | | |
| १३ | VEH- 6025 | के- ६२८१ | टाटा सुमो ॲम्ब्युलन्स | २९.०३.२००२ | ०४-०३ | २,५९,१४० |
| १४ | VEH- 6026 | के- ६६०१ | टेम्पो ट्रॅव्हलर ॲम्ब्युलन्स | ०२.०५.२००२ | ०४-०० | १,८१,६८२ |

वरील १४ वाहने जाहिर लिलावाने विक्री बाबतचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेत सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त जुन्या वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करण्याची तसेच त्या वाहनांऐवजी ॲम्बेसॅडर कार-०२, स्कॉर्पिओ-०१, महिंद्रा बोलेरो-०१, टाटा सुमो-०२, हिरो होन्डा-०२, टाटा बसेस-०५ अशी एकूण १३ वाहने खरेदी करणेस शिफारस करण्यात आली.

संस्थानकडे जाहिर लिलावाने विक्री करावयाचे वाहनांची जाहिरात दैनिक सार्वमत, दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या अहमदनगर आवृत्तीमध्ये जाहिरात देण्यात यावी असे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**०७)कॅंन्टीन हॉलमध्ये स्टेनलेस स्टीलचे बाक तयार करुन ठेवणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

कॅन्टीन हॉलमधील साईभक्तांना बसून चहा पिण्याकरीता फायबर खुर्च्या ठेवलेल्या आहेत. या खुर्च्यामध्ये साईभक्त जास्तवेळ बसून राहतात. त्यामुळे चहा, कॉफी घेणारे व पिणारे साईभक्त यांचा गोंधळ निर्माण होतो. मा.अध्यक्ष महोदय यांनी कॅन्टीन विभागात राऊंड घेऊन स्टेनलेस स्टील टॉपचे टेबल साधारणतः ४ ते ४.१/२ फुट उंच, २ फुट रुंद व ६ फुट लांब या मापाचे बसवावेत, जेणेकरुन साईभक्त गर्दीचे वेळी हॉलमध्ये जादा वेळ न बसता चहा पिऊन पटकन बाहेर पडतील अशी कॅन्टीन विभाग प्रमुखांना सुचना केली होती.

कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी विद्युत विभागाकडे कळविल्यानंतर उपरोक्त मापाचा एक टेबलाचा नमुना तयार करून तो कॅन्टीन विभाग प्रमुखांना दाखविण्यात आला होता, व हा टेबलाचा नमुना मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार असल्याचे त्यांनी सांगितले होते.

कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी वरीलप्रमाणे कळविलेल्या मापाचे स्टेनलेस स्टील टॉपचे ३० नग टेबल खरेदी करणेसाठी / बनवून घेणेसाठी प्रती टेबल रु.७,५००.०० प्रमाणे ३० टेबलसाठी रु. २,२५,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

यासाठी दिनांक २४-०४-२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. व या प्रस्तावास आयत्या वेळचा विषय क्र.२१ निर्णय क्र. २९५ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत या प्रस्तावावर चर्चा होऊन या टेबलसाठी वर्कशॉप-फॅब्रिकेटरकडून कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. संबंधित कामे करणाऱ्या पार्टीजना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. लक्ष्मी स्टील ॲंड इंजि. कंपनी,नासिक |
| ०२ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०३. | मे.साई इंजिनिअर्स. नासिक-१० |
| ०४ | मे. आशय मशिन्स प्रा.लि., नासिक |
| ०५. | मे.विग्नेश इंजिनिअरींग, नासिक |
| ०६ | मे.अंकुर फार्मा स्पेअर्स ॲंड सर्व्हिसेस, नासिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्स सादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे. लक्ष्मी स्टील ॲंड इंजि. कंपनी,नासिक | ०७,०८,७५०.०० | ६,९४,५७५.०० (फॅक्स पत्राव्दारे) |
| ०२ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ४,७६,५५०.०० | ४,७२,०००.०० |
| ०३. | मे.साई इंजिनिअर्स. नासिक-१० | ५,२६,५००.०० | ५,२६,५००.०० (फॅक्स पत्राव्दारे) |
| ०४ | मे. आशय मशिन्स प्रा.लि., नासिक | ५,५६,८७५.०० | ५,४५,७३८.०० |
| ०५. | मे.विग्नेश इंजिनिअरींग, नासिक | ६,४१,२५०.०० | ६,४१,२५०.०० (फॅक्स पत्राव्दारे) |
| ०६ | मे.अंकुर फार्मा स्पेअर्स ॲंड सर्व्हिसेस, नासिक | ५,७७,१२५.०० | ५,६५,५८३.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.आकार मशिन्स प्रा.लि. नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०८)साईबाबा हॉस्पिटलसाठी प्लॅस्टीक साहित्य खरेदी बाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लागणारे प्लॅस्टिक बादल्या, मग, डस्टबिन इत्यादी साहित्य खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर निविदा धारकांचे तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो दि. ०४/०३/२००६ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. परंतु सदर दिवशी सदर साहित्य खरेदीबाबत निर्णय होऊ शकला नव्हता. त्यामुळे ते अद्यापपर्यंत खरेदी केलेले नाही. सदरचे प्लॅस्टिक साहित्य खरेदीकामी निविदेमध्ये मे.जे.एस.पी.सर्जिकल,नाशिक यांचे दर निम्नत्तम आहेत म्हणून त्यांचेकडील प्लॅस्टिक साहित्याचा नमुना रुग्णालयात प्रत्यक्षात पाहणेसाठी मागविण्यात आला होता. परंतु तो समाधानकारक नसल्यामुळे नापसंत करणेत आला आहे. त्यामुळे मेडीकिट प्रॉडक्ट,मुंबई , राहूल ब्रदर्स,मुंबई, देवानशी एंटरप्रायजेस,मुंबई यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे-

| अ.नं. | वस्तुचे नाव | मागणी | मे. जे. एस. पी. सर्जि, नाशिक | मेडीकिट प्रॉडक्ट, मुंबई | राहूल ब्रदर्स, मुंबई | देवांनशी एंटर., मुंबई | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्लॅस्टिक बादली १८ लिटर | १५० | ९२.१५ | **७२.००** | ७५.३७ | ७४.२५ | १०८००.०० |
| ०२. | मग १ लिटर | २५० | १३.३० | **१०.१२** | १०.९६ | १०.४० | २५३०.०० |
| ०३. | ड्रम ५० लिटर | २४ | २७०.७५ | **१८०.००** (४० लिटर) | १९२.३७ (४० लिटर) | १९१.२५(४० लिटर) | ४३२०.०० |
| ०४. | ड्रम १०० लिटर | १२ | ५१७.७५ | **३६५.६२५** (७० लिटर) | ४२३.०० (७० लिटर) | ४२१.२७(७० लिटर) | ४३८७.५० |
| ०५. | वेस्ट पेपर बास्केट | ४८ | ४५.६० | **३१.५०** | ३४.८७ | ३३.७५ | १५१२.०० |
| ०६. | पेडेस्टल डस्टबीन १२ लिटर | १२० | १३९.६५ | **१०१.२५** | ७४.२५(Small | ७३.१२(Small | १२१५०.०० |
| | | | | | १२३.७५ (Big) | १२३.७५ (Big) | |
| ०७. | प्लॅस्टिक बेसीन २८ लिटर | ४८ | **२४१.३०** | N.Q. | N.Q. | N.Q. | ११५८२.४० |
| ०८. | डस्ट कलेक्टर | ४८ | १४.२५ | **१५.७५** | N.Q. | N.Q. | ७५६.०० |
| ०९. | कंटेनर (पॅथोलॉजी) | ५००० | ६.६५ | **३.७१** | N.Q. | N.Q. | १८५५०.०० |
| १०. | ब्रेड बॉक्स | ६५ | १४७.२५ | **२३.६२** (Small) | २५.८७ (Small) | २४.७५ (Small) | १५३५.३० |
| | | ६५ | N.Q. | **४७.२५** (Med.Large) | ५७.३७ (Big) | ५६.२५ (Big) | ३०७१.२५ |
| | | ७० | N.Q. | **३६.००** (Medium) | ४०.५० (Medi) | ३९.३७ (Medi) | २५२०.०० |
| | | | | | | **एकुण -** | **७३७१४.४५** |

वरीलप्रमाणे अ.नं. १ ते ६ व ८ ते १० या प्लॅस्टिक साहित्याकरीता मे. मेडीकिट प्रॉडक्ट, मुंबई यांचे दर निम्नत्तम आहेत तर अ.नं. ७ करीता मे. जे. एस. पी. सर्जिकल, नाशिक यांचेच दर प्राप्त झालेले आहेत. तेंव्हा त्या आयटमसाठी त्यांचे दर स्विकारले जावे असे मत आहे. अ.नं. १० करीता मे. मेडीकिट यांनी ३

प्रकारच्या साईजचे दर दिलेले आहेत, त्यामुळे मुळ २०० नगांची मागणी विभागून देण्यात आलेली आहे. वरील शिफारशीप्रमाणे सदरचे खरेदीकामी रु. ७३,७१४.४५ इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**०९)डेंटल मशिनरी/इक्वीपमेंटचे कोटेशन उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०६.२००६ चे सभेतील मंजुरी अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागासाठी डेंटल मशिनरी इक्वीपमेंटचे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.११,२१,०००/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ७८०८ दि.१४.०६.२००६ अन्वये एकुण १९ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.२४.०६.२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी १० कोटेशन प्राप्त झालेले आहेत. ते खालील प्रमाणे.

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. वसंत डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक |
| ०२. | मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद |
| ०३. | मे. न्यु स्माईल डिस्ट्रीब्युटर्स, लोणी |
| ०४. | मे. दोशी मार्केटीग कार्पो., मुंबई |
| ०५. | मे. क्रोमोडेंट डेंटल इक्वीपमेंट, मुंबई |
| ०६. | मे. श्रीशा डिस्ट्रीब्युटर्स, पुणे |
| ०७. | मे. श्रीरंग डिस्ट्रीब्युटर्स, लातूर |
| ०८. | मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद |
| ०९. | मे. जे.सी.गोडीवाला, मुंबई |
| १०. | मे. सर्फा ट्रेडर्स, मुंबई |

वरीलपैकी अ.नं. ६,७,८,९ हे कोटेशन प्रशासन शाखेमार्फत टपालातून उघडुन मिळाले आहे व अ.नं. १० हे कोटेशन ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहे. अ.नं.९ जे.सी. गोडीवाला, मुंबई यांना आपण कोटेशनचे पत्र पाठवले नव्हते. तथापी त्यांनी स्वतःहून कोटेशन दिलेले आहे

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले अ.नं.१,२,३,४,५ चे कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली होती. परंतू उपसमितीचे दिनांक २०.७.२००६ चे सभेत कोटेशसादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांबाबत डॉ.विखे व डॉ.पाटील यांनी तांत्रिक बाबी तपासून पाहून त्यांचे शिफारसीनुसार खरेदी करण्यात यावी असे ठरले आहे, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१०)पोर्टेबल अल्ट्रा साऊंड मशिन खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजीस्ट डॉ. सचिन आनंद यांनी असे कळविले आहे की, आपल्या रुग्णालयात सध्या एक अल्ट्रा साऊंड मशिन आहे. परंतु ते गंभीर रुग्णांचे तपासणीचे वेळेस तेथून हलविता येत नाही. त्यामुळे रुग्ण मशिन जवळ आणून तपासणी करणे अवघड होते. जर आपल्याकडे पोर्टेबल (फिरते) अल्ट्रा साउंड मशिन असेल तर ते संबंधीत गंभीर रुग्णाचे जवळ नेऊन तेथे तपासणी करता येईल. त्यासाठी त्यांनी सदर मशिनची मागणी केलेली आहे.

सदर मशिनचे टेक्नीकल स्पेसीफिकेशन हे रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनीअर व रेडीओलॉजीस्ट यांचेकडून निश्चित करुन घेतलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहे-

| B/W Portable USG Machine | |
|---|---|
| A) - | Technical Specification |
| 1 | Electronic convex probe 3.5MHz & Linear 7 MHz |
| 2 | Abdomen / Obstetrics / Gynaec - Software |
| 3 | Input 230 V / 5 Amp A.C. |
| 4 | Light Weight max. @ 9-10 Kg |
| 5 | Display Screen at least 7" – 10", non-interlaced |
| 6 | Image memory / Cine memory (32 frames) |
| 7 | Obstetrics / Gynaec Report Page (Optional) |
| 8 | TGC |
| 9 | B, B + B, B + M, M Mode |
| 10 | Gray Scale – 256 |
| 11 | Video Output |
| 12 | UPS |
| B) - | Make |
| | GE/Aloka/Toshiba/Siemens/L & T |
| C) – | Approximate Cost |
| | Rs. 4 Lacs |

उपरोक्तप्रमाणे मशिन खरेदीकामी रु. ४ लाख खर्च अपेक्षित असून सदरहू मशिन खरेदीकामी निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर चर्चा होऊन, नामांकित कंपन्या निश्चित करुन त्यांचेकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**११) साईनाथ रुग्णालय (धर्मशाळा) येथे हायड्रॉलिक लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून कोटेशनसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

माहे जुलै २००३ पासून श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मशाळा इमारत क्रमांक २ ( २०० रुम ) येथे कार्यरत असून सदर इमारतीचे बांधकाम हे साईभक्तांचे निवासस्थान या दृष्टीकोनातून करण्यात आलेले आहे. श्री साईनाथ रुग्णालयाचे जुन्या इमारतीचे नुतनीकरण व विस्तारीकरण करण्याच्या दृष्टीने सदर इमारतीत कार्यरत असलेले रुग्णालय तात्पुरत्या स्वरुपात धर्मशाळा इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले होते. परंतू सध्या धर्मशाळा येथे कार्यरत असलेले रुग्णालय हे कायम स्वरुपी धर्मशाळा येथेच चालू ठेवावयाचे असल्याने सदर इमारतीत रुग्णालयाला आवश्यक अशा सोई उपलब्ध नसल्याने तसेच साईनाथ रुग्णालयाची रोजची ओपीडी ८०० ते १००० चे आसपास असल्याने या इमारतीत रुग्णांना तळमजल्यावरुन पहीला व दुस-या मजल्यावर नेण्यासाठी स्ट्रेचरचा वापर करता येत नसून रुग्णांना झोळीच्या स्ट्रेचरमधून खालून वर न्यावे लागते. यामध्ये काही वेळेस झोळीचे कापड फाटून अथवा झोळीला धरलेल्या कर्मचा-यांच्या हातून झोळी निसटल्यास रुग्ण जमिनीवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मोठा अपघात होऊ शकतो. तसेच काही वयोवृद्ध रुग्ण रुग्णालयात येत असतात त्यांना उपचारासाठी खालून वरती यावयाचे झाल्यास वयोमानानुसार त्यांना ते शक्य होत नाही. त्यामुळे ते नाईलाजाने वरती येण्याचे टाळतात. रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णास सध्या असलेल्या पायऱ्यावरुन खाली वर येण्यास त्रास होतो.

रुग्णांचे सोयीसाठी सध्या कार्यरत असलेल्या श्री साईनाथ रुग्णालयाच्या इमारतीत लिफ्टची व्यवस्था असणे आवश्यक आहे. सदर व्यवस्था झाल्यास रुग्णालयातील रुग्णांना त्याचा फायदा होईल. भविष्यात रुग्णालय विभागाचे स्थलांतर झाल्यास त्या लिफ्टचा साईभक्तांनाही फायदा होईल.तरी श्री साईनाथ रुग्णालयात लिफ्ट बसवून मिळावी म्हणून वैद्यकिय अधिक्षिका, श्रीसाईनाथ रुग्णालय, शिरडी यांनी दि.२३.१२.२००५ च्या टिपणीन्वये कळविले आहे.

बांधकाम विभागामार्फत दिनांक २४-०४-२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत यासंबंधी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर लिफ्ट बसविणेबाबत चर्चा होऊन या लिफ्टसाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. संबंधित कामे करणाऱ्या पार्टीजना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक |
| ०२ | मे. थायसनकृप इलेव्हेटर, पुणे |
| ०३ | मे.प्राईम इलेव्हेटर, मुंबई |
| ०४ | मे.जयंत -ज्योती इलेव्हेटर्स, नासिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक | ९,५१,४८०.०० | ९,२२,९३६.०० |
| ०२ | मे. थायसनकृप इलेव्हेटर, पुणे | ११,७५,०००.०० | ११,७५,०००.०० (फॅक्सपत्राव्दारे) |
| ०३ | मे.प्राईम इलेव्हेटर, मुंबई | १०,६३,१२५.०० | १०,६३,१२५.०० |
| ०४ | मे.जयंत -ज्योती इलेव्हेटर्स, नासिक | १०,३८,०००.०० | १०,३८,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, आलेली कोटेशन्स रुपये ५ लाखाचे वर असल्याने याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**१२)इंजेक्शन ए.एस.व्ही खरेदी बाबत.**

(अ) श्री साईनाथ रुग्णालयात सर्पदंशाचे रुग्ण दाखल झालेनंतर सदरच्या रुग्णांना वरील इंजेक्शन दयावी लागतात. सदरची इंजेक्शन तयार करणाऱ्या मे. भारत सिरम-मुंबई, बायोलॉजीकल-ई-हैद्राबाद व हाफकीन बायोफार्मा-मुंबई, कामद मॅन्यु. कं-मुंबई या कंपन्या सध्या वरील इंजेक्शन तयार करतात.

वरीलपैकी बायोलॉजीकल-ई - हैद्राबाद हि कंपनी वगळता उर्वरीत तीनही कंपन्यांचे इंजेक्शन सध्या बाजारात उपलब्ध नाहीत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि.१७/०६/२००६ रोजी सर्पदंशाचे रुग्ण शांताबाई कुऱ्हाडे हया दाखल झाल्या होत्या. तेंव्हा त्यासाठी तातडीने वरील इंजेक्शनची आवश्यकता होती.

त्यासाठी मे. भारत सिरम-मुंबई या कंपनीचे संगमनेर येथील अधिकृत विक्रेते मे. विश्वेश एंटरप्रायजेस यांना दुरध्वनी करुन विचारणा केली असता त्यांचेकडे सदर कंपनीचे इंजेक्शन उपलब्ध नव्हती. तर त्यांचेकडे कामदा कंपनीचे फक्त ३३ व्हायल उपलब्ध होती. ती त्यांचेकडून तातडीने खरेदी केलेले आहेत. त्यासाठी रु. १२०९६/- इतका खर्च आलेला आहे.

(ब) तसेच दि. २७/०६/२००६ रोजी मे. भारत सिरम-मुंबई यांचे मार्केटींग मॅनेजर श्री. अदित घोष यांना दुरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यांनी माल उपलब्ध होण्यास अदयाप आठ दिवसांचा कालावधी लागेल असे सांगितले. त्यानंतर मे. विश्वेश एंटरप्रायजेस, संगमनेर यांना दुरध्वनी केला असता त्यांचेकडे सध्या दोन्हीही कंपनीचे (कामद व भारत सिरम) उपलब्ध नाही व केंव्हा उपलब्ध होतील याबाबत काहीच सांगता येणार नाही असे सांगितले. बी ई कंपनीचे इंजेक्शन यापुर्वी आपण खरेदी करुन रुग्णांस वापरली होती. परंतु त्यांची रुग्णास Reaction येते त्यामुळे ते वापरता येत नाही.

मे. हाफकीन बायोफार्मा कार्पोरेशन- मुंबई या सरकारी उत्पादक कंपनीस दुरध्वनी केला असता तेथील श्री.कुलकर्णी साहेब,मार्केटींग मॅनेजर यांनी असे सांगितले की, आजच इंजेक्शन आमचेकडे उपलब्ध झालेली आहेत. जर आपण आज आम्हाला ऑर्डर पाठविली तर आम्ही त्वरीत पुरवठा करु शकतो. त्यांचे एका इंजेक्शनची किंमत रु. २९६.४० अशी आहे. सध्या पावसाळयाचा हंगाम आहे व या हंगामात सर्पदंशाचे रुग्ण जास्त दाखल होतात. तातडीचे सेवेसाठी सदर इंजेक्शन आपणाकडे उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. तेंव्हा २०० इंजेक्शन खरेदीचा प्रस्ताव असून याकामी रु. ५९,२८०/- इतका खर्च येईल. मे. हाफकीन बायोफार्मा - मुंबई हि सरकारी उत्पादक कंपनी आहे. तेंव्हा त्यांचेकडून २०० इंजेक्शन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१३)औषधे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

दिनांक १५.५.२००६ रोजी साईबाबा हॉस्पिटल कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी,कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॉस्टीक सर्जरी, जनरल क्यॅज्युलिटी चे वॉर्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आले आहे. सन २००६-२००७ या वर्षामध्ये सर्व प्रकारच्या औषधांची मागणी करण्यात आलेली आहे. परंतू ती औषधे उपलब्ध होण्यास अद्याप ६० दिवसाचा कालावधी लागणार आहे. सर्व वॉर्डमध्ये लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य जी आपल्याकडे उपलब्ध नसल्यामूळे ती नाशिक, मुंबई, कोपरगांव,संगमनेर,पुणे,औरंगाबाद, दिल्ली इत्यादी ठिकाणांहून तातडीने खरेदी करावी लागली आहे.

सदरची खरेदी ही माहे मे व जून,२००६ मधील असून ती वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा रुपये १ लाख चे तरतूदी व्यतिरिक्त केलेली आहे. दिनांक २४.६.२००६ रोजी झालेल्या उपसमितीचे सभेत दिनांक २४.०६.२००६ अखेर केलेल खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तथापि तातडीचे खरेदीबाबत चर्चा होऊन येथून पूढे अशा प्रकारची तातडीची खरेदी करु नये अशी सक्त सूचना देण्यात आलेली आहे. अशा प्रकारची खरेदी करावयाची झाल्यास ती सिलबंद पाकीटात कोटेशन्स मागवून नंतरच खरेदी करण्यात यावी असे ठरले आहे. दिनांक २४.०६.२००६ पर्यन्त खालीलप्रमाणे एकूण रुपये १,१९,५०९.०० ची औषधे खरेदी करण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यानी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| Sr. no. | Name of Party | Bill No & Date | Total Amount |
|---|---|---|---|
| 1. | Meena Agencies, Nashik | 1737/ 31.05.2006 | 14246.00 |
| 2. | Lifeline Surgical, Kopargaon | 162/ 31.05.2006 | 6543.00 |
| 3. | Lifeline Surgical, Kopargaon | 183/ 08.06.2006 | 666.00 |
| 4. | Lifeline Surgical, Kopargaon | 199/ 15.06.2006 | 6900.00 |
| 5. | Lifeline Surgical, Kopargaon | 185/ 08.06.2006 | 4140.00 |
| 6. | Kaustabh Enterprises, Mumbai | 752/ 26.05.2006 | 4894.00 |
| 7. | Kaustabh Enterprises, Mumbai | 736/ 15.05.2006 | 7369.00 |
| 8. | Universal Chemical, Nashik | 4420/ 13.05.2006 | 729.00 |
| 9. | Universal Chemical, Nashik | 4832/ 20.06.2006 | 31.50 |
| 10. | Centenial Surgical, Thane | 289/ 19.06.2006 | 6301.00 |
| 11. | Centenial Surgical, Thane | 240/ 09.06.2006 | 4329.00 |
| 12. | Rajebahadur Medical, Nashik | 87/ 26.06.2006 | 6167.00 |
| 13. | Alpha Enterprises, Mumbai | 1817/ 09.06.2006 | 10572.00 |
| 14. | Alpha Enterprises, Mumbai | 1834/ 14.06.2006 | 10449.00 |
| 15. | Alpha Enterprises, Mumbai | 1844/ 16.06.2006 | 3378.00 |
| 16. | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 2687/ 15.06.2006 | 4356.00 |
| 17. | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 2688/ 15.06.2006 | 3991.00 |
| 18. | B.L. Lifesciences, Mumbai | 5286/ 15.06.2006 | 13061.00 |
| 19. | J.S.P. Surgical, Nashik | 7630/ 10.06.2006 | 1400.00 |
| 20. | S.S. Marketing, Aurangabad | 545/ 14.06.2006 | 1042.00 |
| 21. | Lifeline System, Delhi | 551/ 03.06.2006 | 4294.00 |
| 22. | Bafna Medico, Sangamner | 158341/ 20.06.2006 | 1532.00 |
| | | **Total amount in Rs.** | **119509.00** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१४)तातडीचे औषधे खरेदीसाठीचे कोटेशन उघडणे बाबत.**

श्री साईबाबा रुग्णालय दि. १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित करण्यात आलेले असून त्यामध्ये कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच ॲन्जीओग्राफी तपासण्या व ॲन्जीओप्लॅस्टीच्या शस्त्रक्रिया करण्यात येत आहे.

सदरच्या तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी सोबतच्या इंजेक्शनची आवश्यकता आहे. सदरच्या शस्त्रक्रिया व तपासण्या आपणाकडे यापुर्वी होत नसल्याने सदरची इंजेक्शन मागविण्यात येत नव्हती. सदरच्या इंजेक्शनची वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी केलेली असून ती उपलब्ध होण्यास आणखी दोन महिन्याचा कालावधी लागेल. तोपर्यंत सोबतच्या यादीतील औषधे खरेदी करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे रु. ३,५०,०००/- खर्च येणार आहे.

त्यामुळे सदरच्या तपासण्या व शस्त्रक्रियेसाठी तातडीची गरज म्हणून मुंबई, पुणे, संगमनेर, नगर, नाशिक येथून तातडीच्या खरेदीसाठी कोटेशन मागविण्यात आली होती. ते खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. बाफना मेडीको, संगमनेर (फॅक्सवर) |
| ०२. | मे. कांचन ड्रग्ज, पुणे (उघडलेले मुळ कोटेशन) |
| ०३. | मे. झेनीथ सर्जिकल, मुंबई (फॅक्सवर) |
| ०४. | मे. जेएमडी फार्मा, मुंबई (बंद कोटेशन) |
| ०५. | मे. दिपक डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद (फॅक्सवर) |
| ०६. | मे. फार्मासिया लिंक, पुणे (बंद कोटेशन) |
| ०७ | मे. त्रिमुर्ती एजन्सी, नाशिक (बंद कोटेशन) |
| ०८. | मे. गिरीश एजन्सी, नाशिक (बंद कोटेशन) |
| ०९. | मे. चाचा मेडीकल, नाशिक (बंद कोटेशन) |

वरीलप्रमाणे अ.नं. १, ३, ५ हे फॅक्सव्दारे प्राप्त झालेले आहे. अ.नं. २ उघडलेल्या स्थितीत प्राप्त झालेले आहे. तर अ.नं. ४, ६, ७, ८, ९ हि बंद पाकीटे प्राप्त झालेली आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ४,६,७,८,९ ही कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन औषधांची तातडीची आवश्यकता असल्याने संबंधितास निम्नतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१५)औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत.**

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य इत्यादीची एक वर्षाकरीता मागणी केलेली आहे.

सदरचे औषधे, सर्जिकल साहित्य इत्यादी करीता मा. व्यवस्थापन समितीचे मंजुरीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येत आहे. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना देखील पत्र पाठवून कळविण्यात येत आहे. निविदा फॉर्म हे दि. ०८/०७/२००६ पासून विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येत असून स्विकारण्याची शेवटची मुदत २६/०७/२००६ ठेवण्यात आलेली आहे. सदरची औषधे उपलब्ध होणेस अंदाजे अजुन दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत दोन्ही रुग्णालयास सोबतच्या औषधांची तातडीने आवश्यकता आहे. त्यासाठी अंदाजे रु. ४,६३,९१८.५० इतका खर्च येणार असून सदरचे औषधे विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१६)सूचर्स खरेदी बाबत**

श्री साईबाबा रुग्णालयात जनरल शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वित करण्यात आलेला आहे. जनरल सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाने डि.पी. क्र. ६९८१ दि. ०१/०६/२००६ अन्वये जनरल सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाने एकुण १० प्रकारच्या सुचर्सची मागणी केलेली आहे.

आर्थोपेडीक शस्त्रक्रिया विभागासाठी लागणाऱ्या सुचर्सकरीता आपण जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, मुंबई या कंपनीकडून तसेच त्यांचे दोन अधिकृत विक्रेतेकडून कोटेशन मागवून प्रस्ताव उपसमितीचे सभा दि.२४.०६.२००६ रोजी मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरच्या प्रस्तावास उपसमितीचे सभेत मान्यता निम्नतम दराने खरेदी करण्यास व एकुण खर्च रु.१,२१,८५२/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तद्नंतर जनरल सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे विभागासाठी लागणारे सुचर्स मटेरिलयची मागणी केलेली आहे. दि.२४.०६.२००६ चे सभेत ऑर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी लागणारे ३३ प्रकारचे सुचर्समधील जनरल सर्जरीसाठी लागणारे सुचर्स आहे. तेंव्हा मंजूर झालेल्या निम्नतम दरानुसार जनरल सर्जरी शस्त्रक्रियेसाठी मागणी केलेले सुचर्स खरेदी करता येतील. निम्नतम दरानुसार सदरचे खरेदीसाठी एकुण रु.७१,७४२.८४ इतका खर्च येणार आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| S.N | Name of Item | Code No. | Qty. | J & J, Mumbai | Om Sai, Mumbai | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Proline No. 1 on Round Needle | NW 843 | 6 | 1323.04 | | 7938.24 |
| 02. | Proline No. 1-0 on Round Needle | NW 842 | 5 | 1388.88 | | 6944.40 |
| 03. | Proline No. 2-0 on Round Needle | NW 841 | 5 | 1388.88 | | 6944.40 |
| 04. | Mersilk No. 1 on Cutting Needle | NW 5062 | 5 | 947.88 | | 4739.40 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **05.** | Mersilk No. 1-0 on Cutting & Round Needle | NW 5037 | 3 | 755.80 | | 2267.40 |
| **06.** | Vicryl No. 1 on Round Body Needle | NW 2343 | 5 | 2608.16 | | 13040.80 |
| **07.** | Vicryl No. 1-0 Round & Cutting Needle | NW 2338 | 5 | 2690.00 | 2690.00 | 13450.00 |
| **08..** | Vicryl No. 2-0 Round & Cutting Needle | NW 2382 | 5 | 2817.68 | | 14088.40 |
| **09.** | Mersuture No.2 on Round Needle | NW 4241 EP | 5 | 465.96 | | 2329.80 |
| | | | | Total - | Total - | 71742.84 |

तरी सदरचे सुचर्स मे. जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, मुंबई व मे. ओम साई सर्जिकल, मुंबई यांचेकडून मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रुपये ७१,७४२.८४ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१७) चौकशी व निवासस्थान विभागासाठी गादीपाट, गादीखोळ, बेडशिट व उशी कव्हर कापड खरेदी बाबत**

व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३५४ नुसार चौकशी व भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे गादीपाट, गादीखोळ, बेडशीट व उशीकव्हर कापड खरेदीकामी निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन व्यवस्थापन समितीचे स्थानिक समिती सदस्यांनी नमुन्यांची पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरलेले असल्याने मा.विश्वस्तांनी प्राप्त सर्व नमुन्यांची पहाणी करुन मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचेकडून रुपये ६७.५० प्रती मीटर या न्युनतम दराने बॉम्बे डाईंग कंपनीचे बेडशीट तसेच उशीकव्हर कापड खरेदी करावे असा निर्णय झाला तसेच गादीपाट (पट्टा) शिल्पा फॅब्रीक्स कंपनीचे कापडसाठी रुपये ४०.२५ प्रती मीटर हा नमुना योग्य असल्याने त्यांचेकडून खरेदी करणेत यावा, अशी शिफारस करण्यात आली.

व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.६.२००६ चे सभेमध्ये चौकशी व भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे गादीखोळ कापड निवडण्यात न आल्याने, मात्र गादी दीर्घकाळ टिकण्यासाठी सदरचे गादीखोळ कापड आवश्यक असल्याचे चौकशी विभाग प्रमुखांनी सांगितल्याने आजचे सभेत गादीखोळ कापडाच्या नमुन्यांची पहाणी करण्यात आली. सदरील नमुने मा.विश्वस्तांनी समक्ष पाहून मे.सारडा इंटेरिअर यांचेकडील प्रकाश कॉटन मिलच्या कापडाचा नमुना रुपये ५७/- प्रती मीटर दराने घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१८)नविन भक्तनिवासकडील सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे वादळाने झालेल्या नुकसानीचे दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

दिनांक २८-०५-२००६ च्या रात्रौ शिरडीत झालेल्या वादळी पाऊस - वाऱ्याने नविन साईभक्तनिवासस्थान इमारतीवर लावलेल्या सोलर सिस्टिमचे काही पॅनेल्स वाकले गेले, काही पॅनेल्सच्या काचा फुटल्या, काही पाईपलाईन खराब झाल्या असून , दिनांक २९-०५-२००६ रोजी समक्ष पाहणी केली. पाहणीत आढळून आलेले नविन भक्तनिवासकडील सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे वादळामुळे झालेले नुकसान खालीलप्रमाणे :-

०१). BC कॉर्नर पाईपलाईन सरकलेली आहे. २० नग कलेक्टर प्लेट सरकलेल्या आहेत.
०२). CD कॉर्नर पाईपलाईन सरकलेली आहे. ०३ नग कलेक्टर प्लेट सरकलेल्या आहेत.
०३). DA कॉर्नर पाईपलाईन सरकलेली आहे. १० नग कलेक्टर प्लेट सरकलेल्या आहेत.
०४). डी विंगची पाईपलाईन सरकलेली आहे. ०३ नग कलेक्टर प्लेट सरकलेल्या आहेत.
०५). AB कॉर्नर कॉर्नर पाईपलाईन सरकलेली आहे. ०६ नग कलेक्टर प्लेट सरकलेल्या आहेत.

या सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे दुरुस्तीसाठी (१) मे.ॲकसन्स सोलर इक्विपमेंट प्रा.लि., पुणे यांना दिनांक २९-०५-२००६ रोजी दूरध्वनीवरून व संस्थान जा.क्र. एसएसएस/विद्युत/७०६७/२००६ दिनांक ३१-०५-२००६ अन्वये तसेच (२) मे. जैन इरिगेशन सिस्टिमस प्रा.लि.,जळगाव यांनाही दिनांक २९-०५-२००६ रोजी दूरध्वनीवरून व संस्थान जा.क्र. एसएसएस/विद्युत/७०३५/२००६ दिनांक ३१-०५-२००६ अन्वये पत्राद्वारे कळवून त्यांचेकडून दुरुस्तीसाठी खर्चाचे इस्टिमेट मागविण्यात आले होते.

दिनांक ३०-०५-२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलकडे काम करीत असलेल्या जैन सोलर सिस्टिमच्या प्रतिनिधीने तसेच मे.जैन इरिगेशन सिस्टिमस प्रा.लि.,जळगाव यांचे वतीने (१) मे.आदित्य सोलर सिस्टिम, श्रीरामपूर यांनी दिनांक ०१-०६-२००६ रोजी, (२) मे.सुलभ इरिगेशन, राहुरी व (३) मे.शुभंकर एजन्सीज, अहमदनगर यांनी अनुक्रमे दिनांक ०४-०६-२००६ व दि. ०५-०६-२००६ रोजी समक्ष जागेवर येऊन पाहणी केली होती. तसेच या दुरुस्तीसाठी मे.ॲकसन्स सोलर इक्विपमेंट प्रा.लि., पुणे यांनी दिनांक ३१-०५-२००६ रोजी समक्ष येऊन पाहणी केली आहे. आता मे.जैन इरिगेशन सिस्टिमस प्रा.लि.,जळगाव यांचे वतीने तीन पार्टीचे कोटेशन व मे.ॲकसन्स सोलर इक्विपमेंट प्रा.लि., पुणे यांचे एक कोटेशन प्राप्त झाले आहे. तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पार्टीचे नांव व गाव | दुरुस्तीची रक्कम |
|---|---|---|
| ०१. | मे.आदित्य सोलर सिस्टिम, श्रीरामपूर | रु.८५,३९०.०० |
| ०२. | मे.ॲकसन्स सोलर इक्विपमेंट प्रा.लि., पुणे | रु.९०,०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ०३. | मे.सुलभ इरिगेशन, राहुरी | रु.९४,९००.०० |
| ०४. | मे.शुभंकर एजन्सीज, अहमदनगर | रु.९६,०००.०० |

वरील दरामध्ये मे.जैन इरिगेशन सिस्टिम, जळगाव यांचे अधिकृत सेल्स ॲंड सर्व्हिस डिलर मे.आदित्य सोलर सिस्टिम, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. याकामी येणारे रु. ८५,३९०.०० चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ०४. व्यवस्थापन समितीचे दि.२०.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३४.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१.सन २००६-२००७ खिसमिस खरेदी बाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४०(अ) नुसार सन २००६-०७ मध्ये प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारा १०५ क्विंटल खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली व पंढरपूर येथील मोंढयावरुन जाहिर लिलावाने तसेच मे.प्रवरा फळे भाजीपाला व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडून खरेदी करणेस व अहमदनगर येथील शितगृहात ठेवणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार १४.४४ क्विंटल खिसमिस खरेदी करणेत आलेला असून त्यातील ९०.५६ क्विंटल खिसमिस खरेदी करणे बाकी आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.४० (ड-१) अन्वये, मा.विश्वस्त उपसमितीने आंध्रप्रदेशात किंवा तांदूळ उत्पादक करणारे राज्यात समक्ष जाऊन अथवा निविदा मागवून आंध्र सोना मसुरी तांदुळाच्या नमुन्यांची पाहणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरलेले होते. त्यानुसार दि.२९.०५.२००६ रोजी मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांचे उपसमितीने आंध्रप्रदेशात तांदुळ खरेदीसाठी जातांना तासगांव येथील मा.ॲड.आर.आर. पाटील शेतकरी सह. खरेदी विक्री संघ लि., येथील खिसमिसच्या मोंढयास भेट देऊन, नमुने पाहून लिलाव पद्धतीने २०७.२६ क्विंटल खिसमिस खरेदी केलेला आहे. त्याचा तपशिल सोबतच्या परिशिष्टात सादर केलेला आहे.

सन २००६-०७ करीता ९०.५६ क्विंटल खिसमिस खरेदी शिल्लक होते. तथापि तासगांव मोंढयावर प्रत्यक्षात खिसमिसची मोठया प्रमाणात आवक असल्याने व उत्तम प्रकारचे नमुने आल्याने तसेच दरही कमी असल्याने उपसमितीने प्रत्यक्षात २०७.२६ क्विंटल म्हणजे ११६.७० क्विंटल खिसमिस जादा खरेदी केलेला आहे. श्री साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात मोठया प्रमाणात वाढ झालेली असून गर्दीचे प्रमाण वाढत असून प्रसादलाडूंची विक्रीही जादा होत आहे. परिणामी खिसमिस वापराचे प्रमाणही वाढलेले आहे. तासगांव येथून जादा खरेदी करणेत आलेला ११६.७० क्विंटल खिसमिस अंदाजे ८ ते १० महिने पुरेल म्हणजेच खरेदी करणेत आलेला एकुण २०७.२६ क्विंटल खिसमिस हा अंदाजे डिसेंबर २००७ अखेर पुरेल. खरेदी करणेत आलेला खिसमिस अहमदनगर येथील कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवणेत येऊन आवश्यकतेनुसार आणून वापरणेत येईल.

तरी मुळ मंजूरीनुसार खरेदी करणेत आलेला ९०.५६ क्विंटल खिसमिस व मुळ मंजूरी व्यतिरीक्त खरेदी करणेत आलेला जादा ११६.७० क्विंटल असा एकुण २०७.२६ क्विंटल खिसमिस खरेदीस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**०२.श्री साईबाबा हॉस्पिटलचे वातानूकूलित यंत्रणेच्या मशिनरीकरीता शेड बनविणे बाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे सेंट्रल ए.सी.प्लॅंटच्या मशिनरी या इमारतींच्या गच्चीवर ठेवण्यात आलेल्या आहेत. या मशिनरींच्या सुरक्षिततेकरीता व ऊन-पावसापासून संरक्षणाकरीता आर्किटेक्ट मे.काबरे ॲण्ड चौधरी, नाशिक यांचेकडे संपर्क साधला होता. आर्किटेक्ट मे.काबरे ॲण्ड चौधरी, नाशिक यांनी शेडचे ड्राईंग व इस्टिमेट पाठविले असून शेडचे काम हे मोठया स्वरुपाचे आहे. आर्किटेक्ट यांचेकडून आलेल्या इस्टिमेटमध्ये मोठया प्रमाणावर काम सिव्हिल वर्क असून या सिव्हिल कामासंबंधी तसेच स्लॅबवर शेड उभे करताना स्लॅब लिक झाला नाही पाहिजे याचीही काळजी घेणे आवश्यक असल्याने आर्किटेक्ट यांचे सल्ल्यानुसार शहरातील इमारतींवर शेड उभारणारे अनुभवी फॅब्रिकेटर यांचेकडून काम करुन घ्यावे लागणार आहे. हे काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. संस्थानने मटेरीअल मागवून नंतर ते फॅब्रिकेशन करुन शेड उभे करण्यात वेळ फ़ार लागणार आहे. शिवाय फिनिशींग कमी राहील. त्याकरीता बाहेरील शेड मॅन्युफॅक्चरर्सकडून टर्न की जॉबमध्ये शेड लवकर व सुबक तयार होऊ शकेल.

संस्थान आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्ट, नासिक यांनी दिनांक ०४-०७-२००६ रोजी पाठविलेल्या इस्टिमेटचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | शेड उभे करावयाची जागा | कामाची रक्कम रुपये | + वॅट १२.५ % रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | डोम कव्हरींग ( शेड ) बिल्डिंग ए साईज- १४.९ मी.x७.५ मी.X१ नग एरिया - १०८.५ मीटर | ४,१०,०००.०० | रु.५१,२५०.०० | रु.४,६१,२५०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | डोम कव्हरींग ( शेड ) बिल्डींग डी साईज- ५.५ मी.x४.७ मी.X२ नग एरिया - ४९.४ मीटर | रु.२,०५,०००.०० | रु.२५,६२५.०० | रु.२,३०,६२५.०० |
| ०३. | डोम कव्हरींग ( शेड ) बिल्डिंग ई साईज- ३.६ मी.x५.४मी.x१ नग एरिया - १८.६ मीटर | रु.०,९५,०००.०० | रु.११,८७५.०० | रु.१,०६,८७५.०० |
| | | रु.०७,१०,०००.०० | रु.८८,७५०.०० | रु.७,९८,७५०.०० |

एकुण काम रु. ७,१०,०००/- अधिक १२.५ टक्के वॅट मिळून रु. ७,९८,७५०.०० इतक्या रकमेचे आहे. म्हणजे रु. ५ लाखापेक्षा जास्त आहे. संस्थान ठरावानुसार रु. ५ लाखाच्या वरील कामासाठी अथवा खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणे गरजेचे आहे.

प्रस्तावावर विचार होऊन वरील कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०३. <u>मंदिर व परिसर संरक्षणासाठी चारही महाव्दारांमधून स्टेनलेस स्टिलचे रिव्हाल्व्हिंग गेट खरेदी करुन बसविणे बाबत.</u>**

जागतिक किर्तीचे तीर्थक्षेत्र श्री साई संस्थान, शिर्डी मंदीराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमवेत दिनांक १३-०६-२००६ रोजी मंदिर परिसरात व मंदिराचे सभोवताली राऊंड घेतला.त्या अनुषंगाने काही गोष्टींच्या तातडीच्या पूर्ततेसाठी मा.सहाय्यक पोलीस निरिक्षक, शिरडी यांनी दिनांक १४-०६-२००६ रोजी एक पत्र पाठविले आहे.

यामध्ये मंदिर परिसरात चार महाद्वारे असून या महाद्वारातून श्री साईभक्तांची तसेच संस्थान स्टाफची व गावकऱ्यांची ये-जा चालू असते. हे गेट आकाराने मोठे असून येणाऱ्या-जाणाऱ्याची तपासणी करतेवेळी पोलीस तसेच संस्थान वॉचमन यांना अडचणीचे होते.

मंदिर परिसरात असलेल्या चार महाद्वारामधून स्कॅनर बसविण्याचे आहेत. स्कॅनर बसविल्यानंतर श्री साईभक्त तसेच संस्थान स्टाफ व गावकरी नियंत्रित होऊन तपासणीकरीता स्कॅनरचा वापर करताना एका वेळी एकच व्यक्ती स्कॅनरमध्ये प्रवेश करू शकेल व तपासणी होऊन मगच तेथून आत येईल तसेच बाहेर जातेवेळी गडबड होऊ नये म्हणून तसेच इमरजन्सी तपासणीकरीता गेट असे या चारही महाद्वारांमधून ठिकाणी रिव्हाल्व्हिंग गेट (विकेट गेट) बसविणे गरजेचे असल्याचे राऊडमध्ये ठरले आहे. तसेच उत्सवातील व तसेच इतर धार्मिक मिरवणुकींच्या प्रसंगी हे रिव्हाल्हिंग गेट तात्पुरते काढता येईल व पुन्हा गरजेनुसार बसविता येईल अशा पद्धतीचे हे रिव्हाल्व्हिंग गेट बनविण्यात येणार आहे.

सुरक्षा विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार खालील ठिकाणी गेट बसवावे लागणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| ०१. | मुख्य मंदिर महाद्वार ( फूल मार्केटजवळील) | ०४ गेट |
| ०२. | शांतिनिवास - पिंपळवाडी रोड महाद्वार | ०४ गेट |
| ०३. | पी.आर.ओ. महाद्वार | ०४ गेट |
| ०४. | मारुती मंदिर महाद्वार | ०२ गेट |
| ०५. | गुरुस्थान गेट- साईनाथछाया रोड | ०१ गेट |
| | एकुण | १५ गेट |

या कामी स्टेनलेस स्टीलच्या एका रिव्हाल्व्हिंग गेटला रु. ३०,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे. एकुण १५ गेटसाठी एकुण रु.४,५०,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस व कोटेशन बोलावून स्टेनलेस स्टीलचे रिव्हाल्व्हिंग गेट खरेदीकामी कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०४.<u>पुस्तके/फोटो छपाई करणे बाबत.</u>**

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | १८.०४.०२ | ४.०० | १०,००० | ८.०० | ८०,०००/- |
| | | | | | | एकूण रु. | ८०,०००/- |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दगडावर बसलेले श्री साईबाबा फोटो काळा/पांढरा | १४"x२०" | १२.९.०२ | १.७५ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०२ | भिंतिलगत उभे असलेले श्री साईबाबा फोटो काळा/पांढरा | १४"x २०" | २५.४.०५ | २.०३ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| | | | | | | एकूण रूपये | ४,००,०००/- |

वरील तपशिलाप्रमाणे पुस्तके व फोटो छपाईकामी "अ "व "ब" मिळूण अंदाजे रूपये - ४,८०,०००/-(अक्षरी रूपये चार लाख, ऐंशी हजार) मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली.पुस्तके व फोटो छपाईकामी संस्थानने मान्य केलेल्या २९ निवडक प्रेसधाकांकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**०५.जेष्ठ नागरिक संघ व्दितीय वर्धापन दिनाबाबत**

श्री द.बं. फटांगरे, अध्यक्ष, राजर्षी शाहू महाराज जेष्ठ नागरीक संघ, कोपरगांव तालुका, शाखा अहमदनगर यांचे दि. १३/६/२००६ रोजीचे पत्रान्वये - शुक्रवार, दि. २६/०७/२००६ रोजी उपरोक्त संघाचा द्वितीय वर्धापन दिन शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या वर्धापन दिनी जेष्ठ नागरीकांचे दृष्टीने हितावह घोषणा सदरचा संघ करणार असून त्या ऐतिहासीक निर्णयास संस्थानचाही हातभार लागावा म्हणून संस्थानमार्फत खालीलप्रमाणे सहकार्य मिळावे, अशी विनंती केलेली आहे.

०१)मंगल कार्यालय ( पिंपळवाडी रोड) - ५ टेबलसह ५०० नग खुर्च्या व लाऊडस्पीकर.
०२) सुमारे ७०० ते १००० प्रतिनिधींचे भोजन व चहा-पाण्याची व्यवस्था.
०३) न.भ.निवास येथे देश व राज्य पातळीवरील १० पदाधिका-यांसाठी - ५ रुम्स.
०४) १०० हार व २५ गुच्छ.

चौकशी कार्यालयाला चौकशी केली असता सदर दिवशी उपरोक्त कार्यक्रमासाठीच मंगल कार्यालय राखून ठेवण्यात आलेले आहे. कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे टेबल्स, लाऊडस्पीकर, इ. व्यवस्था संस्थानमार्फत करता येईल. तसेच ७०० ते १००० प्रतिनिधींना संस्थानमार्फत भोजन व्यवस्था करुन प्रसादालयाचे मागील बाजूने भोजनासाठी सोडता येईल. सशुल्क चहापाण्याची व्यवस्था कार्यक्रमाचे ठिकाणी करता येईल. देश व राज्य पातळीवरील येणा-या पदाधिका-यांची निवास व्यवस्था न.भ.नि. येथे सशुल्क करता येईल. सत्कारासाठी हार व गुच्छ हे मंदिरातून नेण्याची व्यवस्था संबंधीतांनी करणेबाबत कळविता येईल. उपरोक्तप्रमाणे संबंधीत विभागांकडून व्यवस्था करता येईल. तसेच खुर्च्यांची व्यवस्था संबंधीत संघाला करणेबाबत कळविता येईल.

तरी जेष्ठ नागरीक संघाचे दि.२६/०७/२००६ रोजी होणा-या द्वितीय वर्धापन दिनासाठी मंगल कार्यालय-येथे सभेची व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, देश व राज्य पातळीवरील येणा-या पदाधिका-यांसाठी न.भ.नि. येथे सशुल्क निवास व्यवस्था, प्रतिनिधींसाठी चहापाणीची सशुल्क व जेष्ठ नागरीक म्हणून भोजनाची संस्थानमार्फत व्यवस्था करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**०६.नगर-मनमाड रोडचे डिव्हायडरचे सुशोभिकरण करणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या वेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी नगर मनमाड रोडच्या डिव्हायडरमध्ये तातडीने उंच असलेली झांडे लावण्यास सांगितले आहे. त्यानुसार मुंबई, पुणे व हैद्राबाद येथील नर्सरीमध्ये १२ फुट उंचीचे बॉटल पामची चौकशी केलेली आहे. या सर्व नर्सरीमधून आंध्रा प्रदेश मधील हबसीगुडा (हैद्राबाद) येथील न्यु रीफ बायो प्रॉडक्ट प्रा.लि. व ब्रिंदावन नर्सरी हैद्राबाद यांचेकडे ही झाडे उपलब्ध आहेत. त्या झाडाची उंची १२ फुट असून खोडाची रुंदी २ फुट आहे व त्याची किंमत रुपये १,७००.०० असून झाडे शिर्डी पोहच देणार आहेत. नगर-मनमाड रोडच्या नवीन भक्तनिवास ते साईप्रसाद या अंतरामध्ये १०० नग बॉटल पामची झाडे खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,७०,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता द्यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

**०७)संस्थान परिसरातील नारळांच्या झाडांना पत्रा लावणेबाबत.**

संस्थान धर्मशाळा, भक्तनिवास व साठवण तलाव येथे नारळांची एकूण १,५०० नग झाडे लावलेली आहेत. नारळांची फळे येण्यास सुरुवात झालेली आहे. रुपये ७.०० प्रति नग याप्रमणे या नारळ फळांची विक्री चालू आहे. दरवर्षी या झाडांना नवीन फळधारणा होते. साठवण तलाव व भक्तनिवास येथील लहान नारळांच्या झाडांना येणाऱ्या फळांना उंदिर व खाऱ्या यांचा फारच उपद्रव होत आहे. बरेच झाडांची फळे पक्व न होता गळ होते व त्यामूळे फार नुकसान होत आहे. त्यासाठी नारळाच्या झाडांना पत्रा बसविणे आवश्यक असून त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अंदाजे रुपये १,९९,६८७.०० (पुर्णांकित रुपये २,००,०००.००)खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्याची उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं. | तपशिल | दर प्रति फुट रुपये | लागणारा पत्रा | अंदाजे एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | गॅलॅनाईज पत्रा ३० मी.मी. ३ फुट उंचीचा | ३५.०० | १३५०० | १,७७,१८७.०० |

| | | अधिक व्हॅट | चौ.फुट | |
|---|---|---|---|---|
| ०२. | पत्रे बसविण्याची मजूरी | १५ प्रति झाड | १५०० नग | २२,५००.०० |
| | | | एकूण | १,९९,६८७.०० |

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

**०८) मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल्स खरेदीबाबत..**

समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.आय.पी.व महत्वाचे पदसिद्ध अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल व श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. त्यांचे सत्कारकामी संस्थानचे वतीने शॉल देण्याची पूर्वापार पद्धत असल्याने मान्यवरांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करणेत येत आहे. यापूर्वी मंदिरातील बाबांना अर्पण केलेल्या शॉल्स देण्यात येत होती. मात्र मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०१.२००५ निर्णय क्र.४३ (अ) नुसार मे.शारदा टेक्सटाईल्स मिल्स (मुंबई) (प्रा.) लि., मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या शॉल्स वापरणेत येत आहेत. त्यांचेकडून आजअखेर खालीलप्रमाणे शॉल्स व कॉटन पट्टी खरेदी करणेत आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | मंजूर दर | आज अखेर खरेदी |
|---|---|---|---|
| ०१. | कॉटन शॉल २.५ मीटर (जरी बॉर्डर ) | रु. ७५/-प्रती नग | १७० नग |
| ०२. | कॉटन शॉल २.५ मीटर (जरी बॉर्डर नसलेली) | रु. ७५/-प्रती नग | ३२९६ नग |
| ०३. | सिंथेटीक जरी | रु.१०५/-प्रती नग | १६५ नग |
| ०४. | कॉटन पट्टी | रु. २५/-प्रती नग | ७८० नग |

उपरोक्तपैकी २.५ मीटर लांबी असलेली कॉटनची ( जरी बॉर्डर नसलेली ) शॉल्स जादा वापरात असल्याने मंदिर विभागाने प्रत्येक महिन्यासाठी ४०० ते ५०० शॉल्स याप्रमाणे एका वर्षाकरीता ६००० शॉल्सची मागणी केलेली आहे. सदरील शॉल्स खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,५०,०००/- चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१.०४.२००६ निर्णय क्र.२४५ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-मंदिर/७४६३/२००६ दि.०८.०६.२००६ अन्वये दि.१५.०६.२००६ अखेर दरपत्रके व नमुने मागविणेत आलेले असून आजअखेर खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.शारदा टेक्सटाईल्स मिल्स (मुंबई) (प्रा.) लिमीटेड, मुंबई |
| ०२ | पालख एन्टरप्राईजेस, सुरत |
| ०३ | आदिनाथ टेक्स-केम लिमीटेड, सुरत |
| ०४ | एन.एस.अरोरा ॲण्ड कंपनी, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं | कोटेशन्सधारकाचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.शारदा टेक्सटाईल्स मिल्स (मुंबई) (प्रा.) लिमीटेड, मुंबई | ७५.०० |
| ०२ | पलख एन्टरप्राईजेस, सुरत | ४३.०० |
| ०३ | आदिनाथ टेक्स-केम लिमीटेड, सुरत | ५८.०० |
| ०४ | एन.एस.अरोरा ॲण्ड कंपनी, मुंबई | ६२.००<br>७५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कोटेशन्ससादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरात मे.पलख एन्टप्रायजेस,सुरत यांनी देऊ केलेले दर कमी आहेत. त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करुन संस्थानला कमीत कमी दरात शॉल्स देणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी दुरध्वनीवरुन संपर्क साधला असता रु. ४२/- या दराने शॉल्स खरेदी करावयात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**०९) आय.टी.आय. कडील संगणक लॅबचे इलेक्ट्रीकल वायरींग कामासाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटी करून निर्णय घेणेबाबत .**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे नविन वातानुकुलीत संगणक लॅब तयार करण्याचे काम चालू आहे. या लॅबचे फॉल सिलींगचे काम पुर्ण होत आलेले असून फर्निचरचे काम बांधकाम विभागाने कार्यादेश दिलेल्या नासिक येथील कॉन्ट्रॅक्टरमार्फत चालू झालेले आहे. आता इलेक्ट्रिकलच्या कामाचे ड्रॉईंग बांधकाम विभागाने विद्युत विभागाकडे पाठविले असून सदरचे काम चालू असतानाच त्याचबरोबर इलेक्ट्रीकल लाईट वायरींग व मशिनरींचे वायरींग काम चालू करावे लागणार आहे. फॉल सिलींग व फर्निचरचे कामात आर्किटेक्ट्ने इलेक्ट्रीफिकेशनचे कामाचा समावेश केलेला नाही.

त्यामुळे वरीलप्रमाणे इलेक्ट्रीक वायरींग काम त्वरीत पुर्ण करुन घेणेकरीता स्थानिक विद्युत ठेकेदारांकडून संस्थान जा.क्र. एसएसएस - विद्युत - ९०६५ - दिनांक ११/०७/२००६ अन्वये कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यानुसार खालीलप्रमाणे सहा कोटेशन्स प्राप्त झाली असून तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.मनस्वी इलेक्ट्रीकल्स वर्क्स, जेऊर पाटोदा |
| ०२. | मे.प्रशांत इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव |
| ०३. | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव |
| ०४. | मे.अवचित इलेक्ट्रीकल्स, जळगांव |
| ०५. | मे.अविनाश इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर |
| ०६. | मे.यशश्री एन्टरप्राईझेस, पुणे |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.मनस्वी इलेक्ट्रीकल्स वर्क्स, जेऊर पाटोदा | १,०६,७५०.०० | अनुपस्थित |
| ०२. | मे.प्रशांत इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | १,११,७८०.०० | अनुपस्थित |
| ०३. | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | ९२,८५०.०० | ९१,०००.०० |
| ०४. | मे.अवचित इलेक्ट्रीकल्स, जळगांव | १,१८,६५०.०० | अनुपस्थित |
| ०५. | मे.अविनाश इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | १,०७,६१५.०० | अनुपस्थित |
| ०६. | मे.यशश्री एन्टरप्राईझेस, पुणे | १,१३,६६०.०० | १,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**१०) श्री साई सच्चरित पारायण सोहळा**

दरवर्षी श्रावण मासात श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन मंदिर परिसरात करण्यात येते. या पारायण सोहळ्यामध्ये स्थानिक गांवकरी, स्त्री-पुरुष, तसेच बाहेरील गांवचे साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी होत असतात.

पारायण सोहळ्याचे स्वरुप सर्वसाधारणपणे सकाळी ७.०० ते ११.०० -साई सच्चरिताचे पारायण, दुपारी ४.०० ते ५.०० प्रवचन व रात्रौ ७.३० ते ९.३० कीर्तन कार्यक्रम असे असते. याशिवाय हळदी-कुंकू, सरस्वती पूजन कार्यक्रम, कर्तृत्ववान महिला सत्कार, जेष्ठ नागरिकांचा सत्कार, श्रींच्या ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा , कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा असे असते.

मागिल वर्षापर्यंत नाट्य रसिक संच, शिर्डी हे श्री साईबाबा संस्थानच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजन करित होते. मात्र यावर्षी त्यांचा अर्ज अद्याप आलेला नाही.

श्री साईबाबांच्या जीवन चरित्राचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत चालु आहे. हा उद्येश लक्षात घेता यावर्षीचा हा पारायण सोहळा संस्थानमार्फत नऊ दिवस साजरा करावा लागेल. याकामी साधारणपणे खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **अंदाजीत खर्च** |
|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | रु. ००,२५,०००.०० |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | रु. ००,२०,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | रु. ००,३०,०००.०० |
| ०६ | महाप्रसाद भंडारा | रु. ०१,२५,०००.०० |
| | **एकुण खर्च (अक्षरी रु. तिन लाख मात्र)** | **रु. ०३,००,०००.००** |

तरी सदरचा पारायण सोहळा कार्यक्रम बुधवार, दि. २६/०७/२००६ ते गुरुवार, दि. ०३/०८/२००६ अखेर साजरा करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००.०० (अक्षरी रुपये तीन लाख मात्रचे ) खर्चास तसेच याकामी नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्य घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**११) श्री पुण्यतिथी उत्सव -२००६ बाबत**

श्रीसाईबाबांचा ८८ वा पुण्यतिथी उत्सव २००६,रविवार दिनांक १/१०/२००६ ते बुधवार दिनांक ४/१०/२००६ असा चार दिवस साजरा होणार आहे. या उत्सवातील कार्यक्रमाच्या रुपरेषेबाबतच्या टिप्पणीची प्रत सर्व सदस्यांना पुरविणेत आली होती. तिची नोंद घेण्यात आली.

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव २००६ बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले.

**(०१) <u>निमंत्रण पत्रिका-</u>**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००६ च्या निमंत्रण पत्रिका आजीव, आश्रयदाते आदि सर्व सभासद यांना पाठविण्यात याव्यात. एकूण ०१ लाख ५५ हजार नग निमंत्रणपत्रिका तसेच २००० सन्माननीय पाहूण्यांसाठी निमंत्रणपत्रिकांची छपाई करुन घेण्यासाठी नेहमीचे प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून व अंतिम निर्णय घेऊन छपाई आदेश देणेत यावेत. तसेच इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांतून उत्सवाचे निमंत्रण "न्यूज आयटेम" म्हणून प्रसिध्द करण्यात यावे.

**(०२) <u>निमंत्रित कलाकार कार्यक्रम-</u>**

निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व स्थानिक सदस्यांनी निश्चित करावेत.

**(०३) <u>कीर्तन कार्यक्रम-</u>**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००६ या चार दिवसांसाठी कीर्तनकार ठरविण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व स्थानिक सदस्यांना देण्यात आले.

**(०४) मंडप व कमानीः-** उत्सवात गरजेप्रमाणे मंडप व स्टेज टाकण्यात यावा

**(०५) सर्व साधारण व्यवस्थाः-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात याव्यात. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणाऱ्या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रित कलाकारांची निवास,भोजन, मानधन व्यवस्था करण्यात यावी. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार एम.टी.डी.सी हॉटेल, शिरडी अथवा संस्थानचे निवासात करण्यात यावी.

सालाबादप्रमाणे भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात विश्वस्तांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, वीणा, व पोथी यातील विश्वस्तांचा सहभाग, सिमोल्लंघन, गांवजेवण, प्रसाद जेवण व्यवस्था, पालखी व्यवस्था, कंत्राटी कामगार, विद्युत रोषणाई , मिष्टान्न निश्चिती, इ.बाबी नेहमीप्रमाणे करण्यात याव्यात.

**(०६ ) <u>उत्सवाचे खर्चाचे अंदाजपत्रक-</u>**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००६ करिता रुपये २७,१५,०००/- (अक्षरी रुपये सत्ताविस लाख पंधरा हजार मात्र) चे अंदाजित खर्चास मान्यता देण्याची उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**१२) <u>जनरल साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत...</u>**

साईबाबा रुग्णालयाचे सर्व वॉर्ड व शस्त्रक्रिया विभागासाठी लागणाऱ्या जनरल साहित्य खरेदीकामी रु.६१,५११.६९ चे साहित्य मे.वॉर्डन सर्जिकल, मुंबई यांचेकडून पुर्वीचे मंजूर दराने खरेदीचा प्रस्ताव दि.२५.०५.२००६ चे वैद्यकीय समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी पुन्हा कोटेशन मागवुन खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार इकडील पत्र क्रमांक ८२८६ दि.२२/०६/२००६ अन्वये दि.०५.०७.२००६ अखेर एकुण ९ अधिकृत विक्रेते / उत्पादक कंपनीचे कोटेशन मागवण्यात आले होते. त्यापैकी खालील बंद कोटेशन प्राप्त झाले आहेत.

०१. मे. वॉर्डन सर्जीकल, मुंबई
०२. मे. मॉरीन सर्जीकल, मुंबई
०३. मे. एस.आर.ट्रेडर्स, पुणे
०४. मे. लाईफ लाईन सर्जीकल, कोपरगांव
०५. मे. सुप्रिया सर्जीकल, नाशिक
०६. मे. एस.के. एजन्सी, धुळे
०७. मे. पुर्णिमा सर्जीकल, नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तक्ता तयार करणेत आला असून तो सोबत **<u>परिशिष्ट "अ" म्हणून</u>** ठेवण्यात आलेला आहे. या तक्त्यातील निम्नतम दर स्वीकारणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१३) <u>प्रयोगशाळा विभागासाठी किरकोळ साहित्य खरेदीबाबत.</u>**

श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात दैनंदिन कामकाजासाठी किरकोळ साहित्य / केमीकल्सची आवश्यकता आहे असे त्यांनी त्यांचे डि.पी.क्र. २७२२ दि. २१/०६/२००६ ने मागणी केलेली आहे. सदरचे खरेदीसाठी अंदाजे खर्च रु. ७०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

त्याकामी फॅक्सवर बंद पाकीटात कोटेशन मागविण्यात आले आहेत ते खालीलप्रमाणे-

०१. मिडास डायगोस्टीक, मुंबई
०२. ट्रिव्हीट्रॉन डायगोस्टीक प्रा. लि., मुंबई

०३. अमेस हेल्थकेअर, मुंबई
०४. निधीलाईफ केअर, मुंबई
०५. नोबल ड्रग्ज, मुंबई
०६. युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तक्ता तयार करणेत आला असून तो सोबत **परिशिष्ट "ब"** म्हणून ठेवण्यात आलेला आहे. या तक्त्यातील निम्नतम दर स्विकारणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१४) पडदे शिलाई कोटेशन उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झाले असून हॉस्पिटलसाठी आवश्यक असणा-या पडदयांचे खरेदीस दिनांक ११/०४/०६ च्या मंजूर टिपणीअन्वये मान्यता मिळाली आहे, दिनांक ०३/०६/२००६ च्या मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पडदे खरेदीचा पुरवठा आदेश जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/८३५५/२००६ दि.२४/०६/२००६ अन्वये, मे.सारडा इंटेरिअर, अ.नगर यांना देणेत आलेला आहे.

पुरवठा आदेश दिल्याप्रमाणे माल प्राप्त झालेला असून पडदे शिलाई करुन घेणे आवश्यक आहे व हॉस्पिटलसाठी साधे पडदे व पट्टीचे पडदे अशा दोन प्रकारांमध्ये पडदे शिलाई करुन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे पडदे शिवून घेणेकामी पुर्वी संस्थानची कामे केलेले व इतर काही टेलर्सकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती त्याप्रमाणे खालील ७ टेलर्सकडून शिलाई बंद कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.

१. मे.सारडा इंटेरिअर, अ.नगर
२. ॐ साई टेलर, शिर्डी, राहाता
३. स्टीच वेल मेन्स वेअर, लोणी
४. संकेत टेलर, लोणी
५. न्यु लाहोटी गादी कारखाना, अ.नगर
६. विराज कर्टन्स, अ.नगर
७. गणेश कर्टन्स, अ.नगर

वरिलप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशन्स आजचे सभेपुढे उघडण्यात आले असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | प्राप्त कोटेशन धारकांचे यादी | दर साधे पडदे | दर-अमेरीकन पडदे |
|---|---|---|---|
| १ | विराज कर्टन्स,अ.नगर | १५/- | ४०/- |
| २ | न्यु लाहोटी गादी कारखाना,अ.नगर | १६/- | ४२/- |
| ३ | संकेत टेलर,लोणी | २८/- | ५०/- |
| ४ | ॐ साई टेलर, राहाता | २२/- | ४३/- |
| ५ | गणेश कर्टन्स,अ.नगर | १६/- | ३४/- |
| ६ | स्टीच वेल मेन्स वेअर,लोणी | २५/- | ४६/- |
| ७ | सारडा इंटेरिअर, अ.नगर | १३/- | ३४/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना आवश्यकतेनुसार साधे व अमेरिकन पडदे शिवणेसाठी कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१५) दंत विभाग साहित्य खरेदीबाबत चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०६.२००६ चे सभेतील मंजुरी अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागासाठी डेंटल मशिनरी इक्वीपमेंटचे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.११,२१,०००/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ७८०८ दि.१४.०६.२००६ अन्वये एकुण १९ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.२४.०६.२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी १० कोटेशन प्राप्त झालेले आहेत. ते खालील प्रमाणे.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नांव | अ.नं | कोटेशनसादरकर्त्यांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | मे. वसंत डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक | ०२. | मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद |
| ०३. | मे. न्यु स्माईल डिस्ट्रीब्युटर्स, लोणी | ०४. | मे. दोशी मार्केटीग कार्पो., मुंबई |
| ०५. | मे. क्रोमोडेंट डेंटल इक्वीपमेंट, मुंबई | ०६. | मे. श्रीशा डिस्ट्रीब्युटर्स, पुणे |
| ०७. | मे. श्रीरंग डिस्ट्रीब्युटर्स, लातूर | ०८. | मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद |
| ०९. | मे. जे.सी.गोडीवाला, मुंबई | १०. | मे. सर्फा ट्रेडर्स, मुंबई |

वरीलपैकी अ.नं. ६,७,८,९ हे कोटेशन प्रशासन शाखेमार्फत टपालातून उघडुन मिळाले आहे व अ.नं. १० हे कोटेशन ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहे. अ.नं.९ जे.सी. गोडीवाला, मुंबई यांना आपण कोटेशनचे पत्र पाठवले नव्हते. तथापी त्यांनी स्वत:हून कोटेशन दिलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.७.२००६ चे सभेतउघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता खालील कोटेशन्ससादरकर्ते आजचे सभेस उपस्थित होते.

| अ.नं. | कंपनीचे नांव |
|---|---|
| १ | वसंत डिस्ट्रीब्युटर्स,नाशिक |
| २ | सुझ-डेंन्ट,अहमदाबाद |
| ३ | दोशी मार्केटींग , मुंबई |
| ४ | न्युसमाईल डिस्ट्रीब्युटर्स,लोणी |
| ५ | क्रोमोडेन्ट,मुंबई |
| ६ | सर्फा ट्रेडर्स,मुंबई |

उपरोक्त सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना सभेपूढे समक्ष बोलाविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे याबाबत विचारणा केली व त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यांनी देऊ केलेल्या दराचा बंद पाकिटे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली.त्यांनी देऊ केलेल्या सुटीचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कंपनीचे नांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| १ | वसंत डिस्ट्रीब्युटर्स,नाशिक | OPG मशिनसाठी ७% व उर्वरित आयटमसाठी ३% |
| २ | सुझ-डेंन्ट,अहमदाबाद | १०% |
| ३ | दोशी मार्केटींग , मुंबई | २ ते १०% परंतू कोणत्या आयटमसाठी किती सुट असा स्पष्ट उल्लेख नाही |
| ४ | न्युसमाईल डिस्ट्रीब्युटर्स,लोणी | ८% |
| ५ | क्रोमोडेन्ट,मुंबई | आयटमवाईज |
| ६ | सर्फा ट्रेडर्स,मुंबई | वेगळ्या कंपनीचे दर दिलेले आहेत. |

वरील सूट विचारात घेऊन त्यांनी दिलेल्या सुटी नंतरचा फेर तुलनात्मक तक्ता तयार करण्यात यावा. कोटेशन्ससादरकर्त्यांनी देऊ केलेले दर व तांत्रिक बाबी डॉ.विखे व डॉ.पाटील यांनी तपासून पाहून त्यांचे शिफारशीनुसार खरेदी करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.०५. व्यवस्थापन समितीचे दि.२७.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३५.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) फिजीओथेरपी विभागासाठी उपकरणे/साहित्य खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात डॉ.सुरेश नवसुपे हे फिजीओथेरपीस्ट म्हणून हजर झालेले आहेत. आपले रुग्णालयात फिजीओथेरपी हा विभाग कार्यान्वीत नाही. तेंव्हा सदरचा विभाग नविनच सुरु करावयाचा आहे. त्यासाठी फिजीओथेरपीस्ट डॉ. सुरेश नवसुपे यांनी याकामी आवश्यक असणारे उपकरणे/ साहित्य खरेदीकामी प्रस्ताव सादर केलेला असून या यादीप्रमाणे साहित्य/उपकरणे इत्यादीकामी अंदाजे रु.४१,१०,०१०/- खर्च अपेक्षित आहे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याचवेळी वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल व वैद्यकिय अधिक्षिका,रुग्णालय यांनी फिजिओथेरपी विभागासाठी १५०० ते २००० स्केअर फूट जागेची आवश्यकता असून सदरहू जागा श्री साईनाथ रुग्णालयासमोर असलेल्या धर्मशाळेचे हॉलमध्ये उपलब्ध होऊ शकेल व तेथे फिजिओथेरपी रुग्णांना देता येईल असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, फिजिओथेरपी विभागासाठी आवश्यक असणारे उपकरणे/ साहित्य खरेदीकामी मुंबई व पुणे येथील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४१,१०,०१०.०० चे खर्चास तसेच सदरहू विभाग धर्मशाळेतील हॉलमध्ये सुरु करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०२) ऑक्सिजीनेटर व ट्युबींग खरेदी बाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात बायपास सर्जरीचे शस्त्रक्रियेसाठी लागणारेऑक्सीजीनेटर व टयुबींग सेट करीता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरचे खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ चे सभेतील निर्णय क्र. १२६ अन्वये मे. बी.एल. लाईफ

सायन्स, दिल्ली यांना सदरच्या साहित्याचा इकडील पत्र क्र. ३७०० दि. १५/०३/२००६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | साहित्याचे नाव | मागणी | दर प्रती नग | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | Oxygenator | १५ | १२६५०.०० | १८९७५०.०० |
| २ | Tubing Set | १५ | ४१८०.०० | ६२७००.०० |
| | | | एकुण - | २५२४५०.०० |

वरीलप्रमाणे साहित्य मे. बी. एल. लाईफ सायन्स, दिल्ली यांनी मालाचा पुरवठा केलेला असून सदरचे साहित्य बायपास शस्त्रक्रियासाठी वापरण्यात आलेले आहे. पुन्हा सदरचे साहित्याची बायपास शस्त्रक्रियेसाठी आवश्यकता आहे. तेंव्हा वरील साहित्य हे मे. बी.एल. लाईफ सायन्स, दिल्ली यांचेकडून मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

| अ.नं. | साहित्याचे नाव | मागणी | मंजुर दर प्रती नग | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | Oxygenator | ३० | १२६५०.०० | ३७९५००.०० |
| २ | Tubing Set | २५ | ४१८०.०० | १०४५००.०० |
| | | | **एकुण -** | **४८४०००.००** |

तरी वरीलप्रमाणे साहित्य हे मे. बी. एल. लाईफ सायन्स, दिल्ली यांचेकडून मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणारा खर्च रु. ४,८४,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०३) प्रयोगशाळा विभागाकरीता किरकोळ साहित्य खरेदी बाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात लागणारे किरकोळ साहित्य व केमीकल्स इत्यादी खरेदीबाबत दि. १०/०७/२०६ चे टिपणी अन्वये अंदाजे खर्च रु. ७०,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला होता. तसेच याकामी सहा अधिकृत विक्रेते यांचेकडून बंद पाकीटात कोटेशन देखील मागविण्यात आले होते.

सदर टिपणीवरील मा.कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार सदरचा विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. तथापि सदर दिवशी सदर विषयावर निर्णय होऊ न शकल्यामुळे व सदरची मागणी तातडीची असल्यामुळे याकामी प्राप्त झालेले कोटेशन हे उपसमिती सभा दि. २०/०७/२००६ चे सभेपुढे कोटेशन उघडणेस व रु. ७०,०००/- च्या खर्चाची मान्यता घेण्यात आली होती.

सदरच्या कोटेशनचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करणेत आला होता. त्यामध्ये अ. नं. १,२,४,५,६ साठी फक्त एकाच कोटेशनधारकाचे दर प्राप्त झाले आहे. तर उर्वरित साहित्यासाठी एकापेक्षा जास्त दर प्राप्त झालेले आहेत.

वरील साहित्याची शिफारस करताना कंपनी, तांत्रिक बाबी, इत्यादीचा पॅथोलॉजीस्ट डॉ.न्यायधीश यांनी अभ्यास करुन शिफारस केलेली आहे. सदरचे शिफारसीनुसार सदरचे खरेदी कामी रु. ८५,६६३.१३ इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मागणी करण्यात आलेले प्रयोगशाळा साहित्य हे हिस्टोपॅथी विभागाचे आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय हे वेगवेगळ्या प्रयोगशाळा साहित्याची मागणी करतात. याकरीता दोन्ही प्रयोगशाळा विभागाकडील डॉ.भारव्दाज व डॉ.न्यायाधीश ह्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकत्रित बसून प्रयोगशाळा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्याचा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलकडील लॅब रिपोर्ट डॉ.न्यायाधीश यांना दाखवून त्यांच्या सह्या घेत जाव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०४) बायोकेमिस्ट्री ॲटो ॲनालायझर मशिनसाठी क्युवेटस खरेदी बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात रक्त लघवीच्या तपासण्या मशिनवर ॲटोमॅटीक करणेसाठी आपण मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांचेकडून बायोकेमीस्ट्री ॲटो ॲनालायझर मशिन घेतलेले आहे. सदर मशिन कंपनीने बसवून व्यवस्थित कार्यान्वित करुन दिलेले आहे. सध्या प्रयोगशाळा विभागाचे कामकाज चालु झालेले आहे. सदर मशिनवर सॅम्पल गोळा करुन ते तपासणी करणेसाठी मशिनमध्ये ठेवण्यात येते. त्यासाठी वरील क्युवेटस लागतात. ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीच्या क्युवेटस वापराव्या लागतात.

तथापी दि.२४.०६.२००६ चे उपसमितीत झालेल्या चर्चेनुसार खरेदीपुर्वी किमान तीन कोटेशन मागवण्यात यावीत . त्यानुसार मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांना दुरध्वनीकरुन त्यांचेकडून तसेच त्यांचे इतर दोन अधिकृत विक्रेते यांचेकडून दराबाबत चौकशी करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी त्यांचे अधिकृत विक्रेते मे.नोबेल डायग्नोस्टीक ,मुंबई व सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स ,औरंगाबाद यांचेकडून दर मागवण्यात आले होते. त्यांचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे.

| अ.नं. | कंपनीचे नांव | मागणी संख्या | दर प्रती पॅक | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई | २ Pkt ( १२००० Pices) | १६५७५.०० | ३३१५०.०० |
| २ | मे.नोबेल डायग्नोस्टीक ,मुंबई | २ Pkt ( १२००० Pices) | १८०७६.५० | ३६१५३.०० |
| ३ | सिध्दी मेडीकल,औरंगाबाद | २ Pkt ( १२००० Pices) | १९०००.०० | ३८०००.०० |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करता मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांचे दर निम्नतम आहेत. तेंव्हा त्यांचेकडून (१२००० PCS चे) दोन पॅकेट खरेदी करण्यास व याकामी येणा-या खर्च रु.३३१५०.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०५) पोर्टेबल फ्लॅश ऑटोक्लेव्ह खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे पोर्टेबल फ्लॅश ऑटोक्लेव्ह खरेदीकामी दि. २५/०५/२००६ चे वैद्यकिय उपसमितीचे सभेमध्ये रु. ८४,४००/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी एकुण ०४ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून इकडील पत्र क्र. ७६२६ दि. १०/०६/२००६ अन्वये दि. १५/०६/२००६ अखेर बंद पाकीटात कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून ३ अधिकृत विक्रेते / कंपनीचे कोटेशन प्राप्त झालेले होते. सदरचे कोटेशन हे दि. २४/०७/२००६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून घेण्यात आलेले आहेत. त्यांचे तुलनात्मक दर खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Qty. | Model | Rate | Total Amt.Rs. |
|---|---|---|---|---|---|
| १ | Nat Steel Equipment Pvt.Ltd., Mumbai | १ | 16/E/M50 | ३०४०८७.०० | ३०४०८७.०० |
| २ | S.R.Traders, Pune | १ | STERRAP X | २१८००००.०० | २१८००००.०० |
| ३ | M.Shah & Co., Pune | १ | Electroquip | **८४४००.००** | **८४४००.००** |

यावर सविस्तर चर्चा होऊन मे. एम. शहा अॅन्ड कं., पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०६) चिकुणगुण्याचे औषधे खरेदी कामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत**

श्रीसाईबाबा संस्थानतर्फे अहमदनगर जिल्हा परीषद यांना दयावयाचे औषधे खरेदीकामी दि. २२/०७/२००६ चे टिपणीन्वये थेट उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते अशी मिळून सुमारे ४५ कंपन्या/अधिकृत विक्रेते यांचेकडून दि. २५/०७/२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून खालील उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून कोटेशन प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | गौरव मेडीकल, श्रीरामपुर | ११ | विजय मेडीकल स्टोअर्स, शिरडी |
| २ | जेसीपीएल, जळगाव | १२ | एमआरके हेल्थकेअर, पुणे |
| ३ | काब्रा मेडीकल, जळगाव | १३ | डी. विजय फार्मा, नाशिक |
| ४ | श्री स्वामी समर्थ फार्मा, जळगाव | १४ | त्रिमुर्ती एजन्सी, नाशिक |
| ५ | चाचा मेडीकल एजन्सी, नाशिक | १५ | पॅरेन्ट्रल ड्रग्ज, मुंबई |
| ६ | मीना एजन्सी, नाशिक | १६ | रत्नप्रभा मेडीकल एजन्सी, श्रीरामपुर |
| ७ | लाईफ लाईन सर्जिकल, कोपरगाव | १७ | मंत्री एजन्सी, अहमदनगर |
| ८ | केप्स फार्मा, मुंबई | १८ | हाफकीन बायोफार्मा, मुंबई (फॅक्सव्दारे) |
| ९ | वैभव एजन्सी, पुणे | १९ | पोफळे मेडीकल, संगमनेर (फॅक्सव्दारे) |
| १० | नेहा एंटरप्रायजेस, पुणे | | |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता. त्याची प्रत सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवण्यात आली आहे. या तक्त्यातील निम्नतम दर स्वीकारणेत येऊन संबंधितांना औषधे पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. संबंधितांनी सदरची ओषधे शिर्डी पोहच केल्यानंतर जिल्हा परिषदेकडे देण्यात यावी. परस्पर देऊ नयेत. तसेच सदर औषधांचे केंद्रवार वाटपाची यादी जिल्हा परिषदेने संस्थानकडे पाठवावी. औषधांचे वापराची खात्री करणेसाठी मा.विश्वस्त केव्हाही, कोणत्याही केंद्रास भेट देऊन खात्री करतील याबाबत जिल्हा परिषदेस कळवावे , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०७) हॅलोथेन व्हेपोराइझर मशिन खरेदी बाबत**

श्री साईबाबा रुग्णालय हे दि.१५.०५.२००६ पासून कार्यान्वीत करण्यात आले आहे. हॉस्पीटलमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया कार्यान्वीत झालेल्या आहे. सदर शस्त्रक्रियेच्यावेळी पेशंटला भुल देण्यासाठी हॅलोथेन व्हेपोराइझर मशिनची डॉ.रेठे, (भुलतज्ञ ) यांनी मागणी केलेली आहे.

सदरचे औषध तयार करणारी कंपनी मे.रमन ॲण्ड वेल प्रा.लि., मुंबई, यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क केला असता त्यांनी हॅलोथेन व्हेपोराइझर मशिनची किंमत रु.९०,०००/- इतकी सांगितली आहे.

परंतू आपण जर त्यांचेकडून २४ बाटल्या हॅलोथेन औषध खरेदी केले तर ते हॅलोथेन व्होपोराइझर हे उपकरण मोफत मिळेल अशी योजना आहे. त्यांचे दर २५० मीलीचे बाटलीकरीता रु.१०००/- असे दिलेले आहे. त्यासाठी अंदाजे रु.२४,०००/- इतका खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

याचवेळेस चर्चा होऊन यापूर्वी संस्थानने खरेदी केलेले बॉईल्स मशिन खरेदी करतांना कोटेशन्समध्ये हॅलोथेन व्हेपोराझर या उपकरणाचा समावेश होता किंवा कसे या बाबत तपासणी करावी. असल्यास त्यांनी दिलेले दर व रमण ॲण्ड वेल कंपनीने दिलेले दर याबाबतची सविस्तर माहिती उपसमितीचे पुढील सभेत द्यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०८) बायोमेडिकल वेस्ट बॅग (ट्रॅश) खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात तयार होणार बायोमेडीकल कचरा जाळणे पुर्वी तो विहीत बॅगमध्ये (लाल, निळया, पिवळया) इत्यादीमध्ये भरुन नंतर तो इन्सीनेटरमध्ये जाळण्यास पाठवण्यात येतो. त्यासाठी वरील बॅगची आवश्यकता असते. याकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८/१२/२००५ चे सभेत निर्णय क्र.८२० अन्वये रु.२,४४,१५,०००/- खर्चास व खरेदीस मान्यता घेतलेली आहे. तदनंतर याकामी विविध मशिनरी / उपकरणे समवेत (गट क) मधील किरकोळ साहित्य म्हणून वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात आल्या होत्या.

सदरहू निविदाधारकांना दि.११/०२/२००६ चे वैद्यकीय उपसमितीचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानंतर सुटीनंतरचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अंतिम निर्णय घेणेसाठी दि.०४.०३.२००६ च्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. परंतू त्या दिवशी गट क मधील साहित्यवर निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यामुळे त्यातील किरकोळ साहित्य खरेदी करण्यात आले नाही. सदरचे किरकोळ साहित्यामधील उपरोक्त बॅगची आपणास सध्या आवश्यकता आहे. त्यासाठी श्री आर्थोटुल्स , नाशिक यांचे एकमेव कोटेशन प्राप्त झाले होते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| S.N. | Description | Qty. Demand | Make / Specification / Model Etc. | Original Rate Per Unit Rs. | Rate after Negotiation | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| A | **CLEANING ITEMS FOR HOSPITAL** | | | | | |
| 1 | TRASH BAG YELLOW BIG (BIO-MEDICAL WASTE COLLECTION BAG) | 2000 | | | | |
| | Shree Orthotools, Nashik | 2000 | Balson Ind. | 20.54 | 20.54 | 41080.00 |
| 2 | TRASH BAG YELLOW SMALL (BIO-MEDICAL WASTE COLLECTION BAG) | 2000 | | | | |
| | Shree Orthotools, Nashik | 2000 | Balson Ind. | 9.88 | 9.88 | 19760.00 |
| 3 | TRASH BAG BLACK BIG (BIO-MEDICAL WASTE COLLECTION BAG) | 300 | | | | |
| | Shree Orthotools, Nashik | 300 | Balson Ind. | 20.54 | 20.54 | 6162.00 |
| 4 | TRASH BAG BLACK SMALL (BIO-MEDICAL WASTE COLLECTION BAG) | 300 | | | | |
| | Shree Orthotools, Nashik | 300 | Balson Ind. | 9.88 | 9.88 | 2964.00 |
| 5 | TRASH BAG RED BIG {BIOHAZARED} (BIO-MEDICAL WASTE COLLECTION BAG) | 300 | | | | |
| | Shree Orthotools, Nashik | 300 | Balson Ind. | 20.54 | 20.54 | 6162.00 |
| | | | | **Total Amt.** | | 76128.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर येथील बायोमेडिकल वेस्ट नष्ट करणारे मे.बायोक्लीन, अहमदनगर हे ट्रॅश बॅग्जचा पुरवठा करतात किंवा कसे याबाबत माहिती घेण्यात यावी. ते बॅग्ज पुरविणार असल्यास खरेदी करु नये अन्यथा वरीलप्रमाणे मे.आर्थो टूल्स,नाशिक यांचेकडून खरेदीस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(०९) श्री साईबाबा रुग्णालय प्लॅस्टिक सर्जरीसाठी मशिनरी ,साहित्य /हत्यारे इ.खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात प्लॅस्टिक सर्जरी विभाग कार्यान्वीत करण्यात आलेला असून या विभागासाठी नियुक्त करण्यात आलेले सर्जन डॉ. करमरकर यांनी सादर केलेल्या यादीप्रमाणे मशिनरी /उपकरणे / हत्यारे इत्यादीची मागणी केलेली आहे. त्यांनी दिलेल्या मशिनरी/उपकरणे/हत्यारे इत्यादी खरेदीकामी अंदाजे रु.८०,००,०००/-(अक्षरी रु.ऐंशी लाख मात्र) इतक्या रक्कमेचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. सभेत चर्चा होऊन सदर विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली होती.

परंतु डॉ.करमरकर, प्लॅस्टिक सर्जन यांनी सदर विभागासाठी काही ठराविक प्रकारच्या शस्त्रक्रियासाठी आवश्यक हत्यारांची/मशिनरी/उपकरणांची मागणी केली आहे व त्यासाठी अंदाजे रु. २०,००,०००/- (अक्षरी रु. वीस लाख मात्र) खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालय प्लॅस्टिक सर्जरीसाठी मशिनरी,साहित्य / हत्यारे इ.तसेच इतर खरेदीसाठी वर्तमानपत्रात एकत्रित जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे रुपये २० लाखचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१०) सिरींज पंप खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे आय.सी.सी.यु. व आय.सी.यु., ऑपरेशन थिएटर, वॉर्ड इत्यादी ठिकाणी लागणारे १० सिरिंज पंप करीता व इतर मशिनरी खरेदीकामी विहीत पध्दतीनुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात आल्या होत्या. वर्तमान पत्रातील जाहिरातीस अनुसरुन ४ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले होते. सदर ०४ निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५/११/२००५ चे सभेपुढे बोलवण्यात आले होते. त्यांचे दरांची / वाटाघाटीची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. फ्रेसेनीयस काबी लि., पुणे | रु. 67603.15 | रु. 67603.15 | अनुपस्थित |
| 2 | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई Model SP 500 | 118000 YEN App. Price in Rs. 46610.00 | 108900 YEN App. Price in Rs. 43000.00 | Custom Duty 5.1% Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| 3 | मे. बी.ब्रॅान मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई Model Perfusor Compact | Rs. 42500.00 | Rs. 40500.00 | 12.5% VAT Extra |
| 4 | मे. इमको मेडीटेक, मुंबई Model Infusor 8 50 | Rs. 35887.50 | Rs. 29000.00 | 10% CST<br>1 Year Additional Warranty |

उपरोक्त सिरिंज पंपसाठी दि.०५.११.२००६ चे सभेत निर्णय क्रमांक ६९८ अन्वये १० नगाऐवजी २० नग खरेदी करण्यात येऊन त्याची ऑर्डर मे.अलविन लाईफ केअर,मुंबई यानां १० नग व बी-ब्रॅान मेडीकल इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून प्रत्येकी १० नग खरेदीबाबत निर्णय झाला होता.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | नग | किंमत प्रती नग |
|---|---|---|---|
| 1 | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई Model SP 500 | 10 | 43000.00 + Custom Duty 5.1% 108900 YEN App. Price in Rs. Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| 2 | मे. बी.ब्रॅान मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई Model Perfusor Compact | 10 | Rs. 40500.00 + 12.5 % VAT |

दोन्हीही पुरवठाधारकांनी आदेशा प्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केला असून आपणास एकुण २० सिरिंज पंप प्राप्त झालेले आहेत ते सर्व वार्ड व शस्त्रक्रिया विभागात मागणी प्रमाणे देण्यात आलेले आहे. इन्टेसीव्हीस्ट डॉ.बंडोपाध्याय यांनी पुन्हा २४ नगाची मागणी केलेली आहे. त्यांनी दि. ०७/०७/२००६ चे पत्रान्वये बी- ब्रॅान कंपनीचे २४ पंप घेण्याबाबत कळविले आहे.

वरील निर्णयानुसार मे.बी-ब्रॅान इंडिया लि.,मुंबई यांना इकडील जा.क्र.१२९०७ दि.०८.११.२००५ अन्वये प्रती नग रु.४५,५६२.५० या दराने १० नगाचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. तर मे. अलविन लाईफ केअर यांचा एक पंप सर्व करांसह कस्टम ड्युटी इत्यादीसह रु.४५,५०७/- इतक्या रुपयात आलेला आहे.

तेंव्हा मे.बी-ब्रॅान इंडिया लि.,मुंबई यांचेकडून मंजूर दराने २४ नग खरेदी करण्यास व त्याकामी येणारे रु. १०,९३,५००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत बायोमेडिकल इंजिनिअर श्री वाकडे व श्री पंडित हे हजर होते त्यांनी ऑलवीन लाईफ केअर, मुंबई यांचे सिरींज पंप उत्कृष्ट असल्याचे सभेस सांगितले .

यावर सविस्तर चर्चा होऊन, बायोमेडिकल इंजिनिअर यांनी शिफारस केल्यानुसार ऑलवीन लाईफ केअर, मुंबई यांचे सिरींज पंप खरेदी करण्यात यावेत. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(११) बायपास शस्त्रक्रियेसाठी कन्झ्युमेबल सर्जीकल साहित्य खरेदी बाबत**

श्री साईबाबा रुग्णालयात दि.१८.०२.२००६ पासून बायपास सर्जरी, व्हाल्व सर्जरी, व्हाल्वो प्लॅस्टी आणि ए.एस.डी. सर्जरी इत्यादी शस्त्रक्रिया कार्यान्वीत झालेल्या आहे.

सदरचे विभागासाठी लागणारे साहित्याचा विभाग कार्यान्वीत होणेचे वेळेस खरेदी केले होते. परंतू रुग्णांचे संख्येत अपेक्षेपेक्षा वाढ झाल्यामुळे सदरचे साहित्य हे कमी पडत आहे. आज अखेर एकुण १५ बायपास शस्त्रक्रिया झालेल्या आहे. तेंव्हा सी. व्ही. टी. एस. विभागाने २० ऑपरेशनसाठी कन्झुमेबल सहित्याची मागणी केलेले आहे. त्यासाठी अंदाजे रु.१७,५१,३२०/- खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बायपास शस्त्रक्रियेसाठी पूर्वी कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात आलेले कन्झ्युमेबल सर्जीकल साहित्य ज्या पुरवठाधारकाकडून खरेदी करण्यात आलेले आहे. ते पूर्वीचेच मान्य दराने पुरविण्यास तयार असतील तर त्यांचेकडून खरेदी करण्यात यावे अन्यथा निविदा मागणी करुन खरेदी करावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१२) प्लॅस्टीक सर्जरी विभागासाठी ग्लायकोलीक ॲसिड किट खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.करमरकर हे प्लास्टीक सर्जन म्हणून नियुक्त झालेले आहेत. त्यांनी बाह्यरुग्ण विभागात रुग्णांचे उपचार करणेसाठी ग्लायकोलीक ॲसिड किटची मागणी केलेली आहे.सदर किटच्या वापरामुळे रुग्णांच्या त्वचेवर असलेले काळे डाग जाण्यास फायदा होतो.

सदर किट इम्पोर्टेड असून त्यांचे भारतातील एकमेव डिलर मे.टिम्पॅक इंजिनिअर्स, दिल्ली यांचेकडून याकामी दर मागविलेले आहेत. मे.टिम्पॅक इंजिनिअर्स, दिल्ली यांनी त्यांचे दि.३.६.२००६ चे पत्रान्वये दर पाठविले आहेत. प्लास्टीक सर्जन डॉ.करमरकर यांनी सदरचे किट फक्त एकाच कंपनीचे येतात व त्यांचे भारतातील मे.टिम्पॅक इंजिनिअर्स, दिल्ली हे एकमेव डिलर आहेत. सदर किट हा बऱ्याच रुग्णांना वापरता येऊ शकतो असा अभिप्राय सदर कोटेशनवर दिलेले आहे. तेंव्हा तूर्तास एक किट खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

मे.टिम्पॅक इंजिनिअर्स,दिल्ली यांचे दरानुसार सदर खरेदीकामी रुपये २४,७००/- इतका खर्च येणार असून, सदर किट मे.टिम्पॅक इंजिनिअर्स, दिल्ली यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये २४,७००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१३) सेल काऊंटर मशिनसाठी केमिकल्स खरेदी बाबत**

श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालयात नविन PCE - २१० मॉडेलचे दोन सेल काऊंटर मशिन हे मे.ए.जी.डी. बायोमडीकल, सिकंदराबाद यांचेकडून रु.९,५०,०००/- इतक्या रक्कमेस खरेदी करुन कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

सदरच्या मशिनसाठी लागणारे केमीकल्स हे फक्त ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीचे केमिकल्स वापरावे लागते दुसरे केमीकल्स चालत नाही. त्यामुळे सदर मशिनसाठी लागणाऱ्या केमीकल्ससाठी मे.ए.जी.डी. बायोमेडीकल, सिकंदराबाद यांना विचारणा केली असता त्यांचे दि.१४.०१.२००६ चे पत्रान्वये त्यांचे अधिकृत विक्रेते मे.युनिक केमीकल्स, नाशिक यांच्याकडून खरेदी करण्यास सांगितले होते. त्यानुसार मे. युनिक केमीकल्स, नाशिक यांचेकडून दरपत्रक मागवुन त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ निर्णय क्र.१२४ नुसार त्यांना इकडील पत्र क्र.४०३६ दि.२४.०३.२००६ अन्वये रु.४४,०७४/- चे केमीकल्सचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर पुरवठा आदेशान्वये मे.युनिक केमीकल्स,नाशिक यांनी मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे.

सदर केमीकल्सचा साठा संपल्यामुळे सदरचे केमीकल्सची प्रयोगशाळा विभागाने पुन्हा दोन महिने पुरु शकेल इतक्या साठ्यांची मागणी दि.१४.०७.२००६ रोजी केली आहे. सदर केमीकल्सची मागणी वार्षीक खरेदीमध्ये करण्यात आली असून सदरचा साठा उपलब्ध होण्यास अजून २ महिने लागतील.

दि.२४.०६.२००६ चे उपसमिती सभेत झालेल्या चर्चेनुसार ज्या मशिनसाठी त्याच कंपनीचे केमीकल्स लागतात अशा ठिकाणी संबंधीत एकाच कंपनीकडून खरेदी न करता त्यांचे इतर अधिकृत विक्रेत्यांकडून देखील दर मागविण्यात यावेत असे ठरले आहे. त्यानुसार मे.ए.जी.डी.बायोमेडीकल,सिकंदराबाद यांना सदरचे केमीकल्स पुरवठा करणेसाठी त्यांचे इतर अधिकृत विक्रेते यांचेकडून देखील दर मागविण्यात आले आहे. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| Sr. N0. | Description | Qt. | Uniqe, Nashik | Swami Samrth,Pune | S.S. A,Bad | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Autodil 20 Lit. | 12 | 1688.00 | **1687.50** | 1756.00 | 20256.00 |
| 2 | AutoClean 2 Lit. | 12 | 579.00 | **579.00** | 602.00 | 6948.00 |
| 3 | Auto Lyse 500ml | 8 | 2543.00 | **2542.50** | 2645.00 | 20344.00 |
| 4 | Cleaning Solu. 1 Lit. | 6 | 800.00 | 843.75 | 832.00 | 4800.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | EDTA Diapot.Sol. | 6 | **446.00** | 461.25 | 00.00 | 2676.00 |
| | | | | | **Total Amt.Rs.** | **55024.00** |

तरी वरीलप्रमाणे अ.नं.१,३ हे मे.स्वामी समर्थ,पुणे यांचे दर निम्नतम असून व अ.नं.४ व ५ करीता मे. युनिक केमीकल्स,नाशिक यांचे दर निम्नतम आहे तर अ.नं.२ करीता मे.युनिक केमीकल्स, नाशिक व स्वामी समर्थ पुणे यांचे दोघांचे दर सारखे असून सदर केमीकल्सची ऑर्डर दोघांना विभागुन देण्यात येईल. तथापी मे.स्वामी समर्थ ,पुणे यांनी वरील दराव्यतिरिक्त वाहतूकीचा खर्च वेगळा कळविला आहे. म्हणजे त्यांचे केमीकल्स आपणास मे.युनिक केमीकल्स, नाशिक यांचेपेक्षा महाग पडणार आहे. तर मे.युनिक केमीकल्स हे त्यांचे स्वखर्चाने पोहच करणार आहे. तेंव्हा सदरचे केमीकल्स हे मे.युनिक सर्जीकल, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास व रु.५५,०२४/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सेल काऊंटर मशिनसाठी आवश्यक असणारे केमिकल्स मे.युनिक सर्जीकल, नाशिक यांचेकडून दोन महिन्याऐवजी चार महिन्यासाठी पुरेल एवढे म्हणजेच प्रस्तावापेक्षा दुप्पट खरेदी करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१४) कन्झ्युमेबल स्टेअरपार्ट खरेदी बाबत**

श्रीसाईनाथ हॉस्पिटलमधील मशिनरी/उपकरणे दुरुस्ती व देखभालीसाठी बायोमेडिकल इंजिनिअरींग विभागामार्फत काही कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीबाबत दि.२४.४.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२६६ अन्वये रुपये ३,७७,१४६/- चे खर्चास व कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार एकुण १५ अधिकृत विक्रेत्यांकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी खालीलप्रमाणे ८ कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं | कोटेशन्स सादरकर्त्याचे नांव | अ.नं | कोटेशन्स सादरकर्त्याचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | अलमेड इक्वीपमेंट, मुंबई | ०२. | देवी सर्जिकल,अहमदनगर |
| ०३. | हॉस्पीकेअर,अहमदनगर | ०४. | अॅड्रॉइट,पुणे |
| ०५. | नॅट स्टिल इक्वीपमेंट,मुंबई | ०६. | शिलर हेल्थकेअर,पुणे |
| ०७. | सिध्दार्थ इंजिनिअरिंग कंपनी,मुंबई | ०८ | साईट्रॉन्स,लाणी |

वरील कोटेशन हे उपसमितीचे दि.२४.०६.२००६ सभेपुढे समक्ष उघडण्यात आले होते. एकुण ८ कोटेशनचा तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यामध्ये निम्नतम दरांची शिफारस केली असून अ.नं.१, ८ (अ) आणि अ.नं.२,३,४ व साठी एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले असून अ.नं. ५ मधील मर्क्युरीसाठी कोणीही दर भरलेले नाही. त्यासाठी नंतर आणखी निविदा मागवुन खरेदी करता येईल.

अ.नं. ६ साठी मे. साईट्रान्स, लोणी यांचे दर निम्नत्तम असून सदर ऑटोक्लेव्ह गॅस्केट हे मे. नॅट स्टील, मुंबई यांचेकडून ओरीजनल पार्ट घेणे योग्य राहील असे मत आहे. अ.नं. १२ व १३ साठी निम्नत्तम दर हे मे.देवी सर्जीकल, अहमदनगर यांचे आहेत. परंतु ते सदरचे ओरीजनल स्पेअर पार्टस ऐवजी पर्यायी स्पेअर पार्टस देत आहेत व सदरचे पर्यायी स्पेअर पार्टस वापरल्यास एल अॅन्ड टी च्या मुळ मशिनला हानी पोहचू शकते. त्यासाठी मे.अॅड्रॉइट मेडीकल सिस्टीम, पुणे हि कंपनी मे. एल अॅन्ड टी कंपनीची सर्व्हीस डीलर असून त्यांच्याकडून ओरीजनल पार्टस घेणे योग्य राहील. तसेच अ.नं. १९ (ब) साठी मे. साईट्रॉन्स, लोणी यांचे दर निम्नत्तम आहेत. वरीलप्रमाणेच अं.नं. १९ (अ) व (ब) साठी मे. अॅड्रॉइट मेडीकल सिस्टीम, पुणे यांचेकडून ओरीजनल स्पेअर पार्ट घेणे योग्य राहील असे मत आहे आणि अ.नं. २० (अ) साठी मे. हॉस्पिकेअर, अहमदनगर व अ.नं. २० (ब) साठी मे. साईट्रॉन्स, लोणी यांचे दर निम्नत्तम आहेत. परंतु सदर दोन्हीही कंपन्याकडून पर्यायी स्पेअर पार्ट घेणेऐवजी मे. शिलर हेल्थकेअर, पुणे यांचेकडून ओरीजनल स्पेअर पार्टस खरेदी करणेस योग्य ठरेल.

वरील स्पेअर पार्ट वगळता इतर स्पेअर पार्टस निम्नत्तम दराने खरेदी करणेस हरकत नाही.त्यानुसार सदरचे खरेदी व रु.३,२८,६८४.५० चे खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१५) तातडीची औषधे खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

दिनांक १५.५.२००६ रोजी श्रीसाईबाबा हॉस्पिटल कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात अॅन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसच प्लस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी, डेंटल, ओ.पी.डी.कॅन्ज्युलिटीचे वॉर्ड सुद्धा कायान्वीत करण्यात आलेले आहेते. सदर वॉर्डमध्येय काही वॉर्ड नविनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वॉर्डसाठी लागणारी औषधे, सर्जीकल साहित्य, जी आपलयाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती आपणास नाशिक, मुंबई,कोपरगाव,संगमनेर,शिर्डी आणि पुणे

येथून तातडीने खरेदी करावी लागली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेत वैद्यकीय संचालक यांनी दरमहा रुपये १,००,०००/- पर्यंतचे खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरची खरेदी ही माहे जुन,२००६ मधील असून ती वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा रुपये १,००,०००/- चे तरतूदीतून केलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| Sr.No. | Name of Party | Bill No./Date | Total Amount |
|---|---|---|---|
| 01. | Farmachem Enterprises, Pune | 824/2.8.20006 | 6181.00 |
| 02. | Kanchan Drugs, Pune | 2191/1.8.2006 | 6581.00 |
| 03. | Kanchan Drugs, Pune | 2192/1.8.2006 | 3038.00 |
| 04. | Meena Agencies, Nashik | 2037/6.6.2006 | 17910.00 |
| 05. | Critical Care System, Nashik | 203/9.6.2006 | 1969.00 |
| 06. | Lifeline Surgical, Kopargaon | 190/12.6.2006 | 19173.00 |
| 07. | Lifeline Surgical, Kopargaon | 197/14.6.2006 | 1909.00 |
| 08. | Cosmos Enterprises, Mumbai | 94/12.6.2006 | 4539.00 |
| 09. | Vijay Medical Stores,Shirdi | 14877/16.6.2006 | 2760.00 |
| 10. | Maruti Surgical Works, Mumbai | 23/14.6.2006 | 4894.00 |
| 11. | Bafna Medico, Sangamner | 157951/16.6.2006 | 2033.00 |
| 12. | Lifeline Srgical, Kopargaon | 204/17.6.2006 | 2320.00 |
| 13. | Kancan Drugs.Pune | 2700/15.6.2006 | 4854.00 |
| 14. | Kancan Drugs.Pune | 2975/23.6.2006 | 13770.00 |
| 15. | Vijay Medical Stores, Shirdi | 14887/23.6.2006 | 2825.00 |
| 16. | Vijay Medial Stores, Shirdi | 14892/23.6.2006 | 3200.00 |
| 17. | Vijay Medial Stores, Shirdi | 14893/24.6.2006 | 800.00 |
| 18. | Universal Cemical, Nashik | 4681/8.6.2006 | 900.00 |
| **Total Amt.in Rs** | | | 99656.00 |

उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीसाठी करण्यात आलेल्या रु.९९,६५६/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**(१६) चिकूणगुण्यासाठी फॉगींग मशिन खरेदी बाबत**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.७.२००६ चे सभेतील निर्णयानुसार चिकुण गुनिया या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर सुरु झालेला असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी तातडीची उपाय योजना म्हणून श्री साईबाबा संस्थानकडून ७५ फॉगींग मशिनची मागणी केलेली आहे. त्यानुसार दिनांक २२.७.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक २५.७.२००६ अखेर पुरवठाधारकांचेच लेटरहेडवर ७५ पोर्टेबल फॉगींग मशिनसाठी दर मागविण्यात आलेले होते. या मुदतीत खालील पुरवठाधारकांनी आपले कोटेशन्स सादर केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | पेस्ट कंट्रोल(इंडिया) प्रा.लि. मुंबई |
| ०२ | रॉयल ट्रेडलिंक प्रा.लि. न्यु.दिल्ली |
| ०३ | पालवे पेस्ट कंट्रोल प्रा.लि.नाशिक |
| ०४ | के प्रकाश ॲण्ड कंपनी,अहमदनगर |
| ०५ | सुकून एजन्सीज, मुंबई |
| ०६ | इंटरनॅशनल ॲग्रीकल्चरल इंडस्ट्रीज , अहमदनगर |
| ०७ | विनीत इंजिनिअरिंग कंपनी,पुणे |
| ०८ | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | पेस्ट कंट्रोल(इंडिया) प्रा.लि. मुंबई | ६९,७५०.०० | ६२,०००.०० |
| ०२ | रॉयल ट्रेडलिंक प्रा.लि. न्यु.दिल्ली | ५९,७६६.०० | ५३,१२५.०० |
| ०३ | पालवे पेस्ट कंट्रोल प्रा.लि.नाशिक | २०,२५०.०० | १९,५००.०० |
| ०४ | के प्रकाश ॲण्ड कंपनी,अहमदनगर | ६४,५००.०० | ६१,०००.०० |
| ०५ | सुकून एजन्सीज, मुंबई | ६४,५००. | अनुपस्थित |
| ०६ | इंटरनॅशनल ॲग्रीकल्चरल इंडस्ट्रीज , अहमदनगर | ६४,७००.०० | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | विनीत इंजिनिअरिंग कंपनी,पुणे | १७,५५०.०० | १६,३००.०० |
| ०८ | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट, मुंबई | २२,८७५.०० | २२,८७५.०० (फॅक्सपत्राव्दारे) |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त अ.नं. ७ चे कोटेशन्ससादरकर्ते मे विनीत इंजिनिअरिंग कंपनी, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. याचवेळी त्यांनी एक मशिन संस्थानला देणगी म्हणून देणार असलेचे सांगितले त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**(१७) अपघात विभागात तपासणी झालेल्या रुग्णांस मोफत औषधे देणे बाबत.**

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये (कॅज्यूल्टी ) विभाग श्री साईनाथ रुग्णालयामधून हलवून फक्त श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चालू ठेवावा त्यास अनुसरुन दिनांक २६.७.२००६ पासून अपघात विभाग श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चालू करण्यात आलेला आहे. त्यासाठी केसपेपरचा दर रुपये १०.०० आहे. केसपेपर काढल्यानंतर श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये औषधे मोफत दिली जातात त्याचप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुपये १०.०० चा केसपेपर काढल्यानंतर रुग्णांस उपलब्ध असलेली औषधे मोफत देण्यात यावीत परंतू उपचार केल्यास उपचाराचे चार्जेस रुग्णांकडून वसूल करण्यात यावे तसेच संस्थान नियमाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना मोफत उपचार करण्यात यावे असे ठरले.

याचवेळी खालील बाबींवर चर्चा झाली.

०१)श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जैव घन कचरा हाताळणीबाबतचा प्रशासकीय अधिकारी श्री प्रकाश तु जोशी यांनी सविस्तर अहवाल सादर करावा.

०२) संस्थान कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये औषोधोपचार घेतात परंतू तेथे केसपेपरवर लिहून दिलेल्या गोळया औषधे देणेसाठी बाह्यरुग्ण विभाग नाही. त्यामूळे कर्मचाऱ्यांना औषधे मिळणेस अडचणी निर्माण होतात. तेव्हा सध्या कॅज्युअल्टी विभागातील ड्युटीवर असणाऱ्या नर्सेसना औषधे उपलब्ध ठेवण्यास व त्यांचेमार्फत औषधे देण्याचे चालू करावे त्यानंतर सहा महिन्यात रुग्णांचे संख्येचा आढावा घेऊन स्वतंत्र फार्मसिस्टची नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.०६. दिनांक १५.०५.२००६ व दिनांक ०३.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.५३६.** दिनांक १५.०५.२००६ व दिनांक ०३.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०७. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता जून-जुलै,२००६.**

**(ब) माहे जून-जुलै, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जून-जुलै,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जून-जुलै,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्र व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३६.** (A)माहे जुन-जुलै, २००६ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे जुन-जुलै, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते माहे १३जुलै,२००६ व ११ ऑगष्ट,२००६ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे जुन-जुलै,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीचा तक्ता, माहे जुन-जुलै,२००६ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे जुन-जुलै,२००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**(B).** माहे जुन-जुलै,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. रुग्णालयातील रुग्णांना माहे जुन-जुलै-२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३६. (C)** माहे जुन-जुलै,२००६ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४.** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे जुन-जुलै,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलती बाबत.

**निर्णय क्र.५३६. (D)** माहे जुन-जुलै,२००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. माहे जुन-जुलै,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३६. (E)** माहे जुन-जुलै, २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.५३६. (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता ज्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.५३६.(F)** माहे जुन-जुलै, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं. ०८. नव्याने सुरु झालेले श्रीसाईबाबा हॉस्पिटल व पूर्वीचे कार्यरत असलेले श्रीसाईनाथ रुग्णालय या दोन्ही विभागांची एकत्रित लेखाविषयक (Accounting) कार्यप्रणाली स्वतंत्र ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.५३७.** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असून, भक्तांना योग्य त्या सोई सुविधा मिळाव्यात यासाठी संस्थानमध्ये चालणारे कामकाज एकूण ३२ विभागांमध्ये विभागण्यात आले आहे. त्यापैकी श्रीसाईनाथ रुग्णालय हा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असून, येथे अल्पशा दरात रुग्णांना आरोग्याविषयक सेवा पुरविण्यात येत आहेत. रुग्णांना आवश्यक त्या सेवा तत्परतेने मिळाव्यात यासाठी या विभागांर्तगत एकूण १४ विविध वॉर्डस् कार्यरत आहेत. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवेबंद्दल मिळणाऱ्या मोबदलाचा (आर्थिक स्वरुपात) भरणा दररोज लेखाशाखेत केला जातो. रुग्णालयाबाबतच्या आर्थिक हिशोबासंबंधातील नोंदी सध्या लेखाशाखेत ठेवण्यात येत आहेत.

आता,श्रीसाईबाबा रुग्णालय हा नवीने विभाग स्वतंत्र सुरु करण्यात आलेला असून, त्याचे नुकतेच उद्घाटन होऊन, त्याठिकाणी हृदय शस्त्रक्रियासुध्दा करण्यात आली आहे. या विभागाचा व्याप दिवसेंदिवस वाढणार असून, त्याप्रमाणात आर्थिक व्यवहारातही वाढ होणार आहे. तसेच सदरील विभागामार्फत २४ तास रुग्णंना सेवा पुरविण्यात येणार असून, शस्त्रक्रियांसाठी आकारण्यात येणारी फी ची रक्कमही मोठया प्रमाणात राहणार आहे. तसेच त्या ठिकाणी रात्रंदिवस आर्थिक व्यवहारचा संबंध येणार आहे. सर्व आर्थिक व्यवहाराबाबतची माहिती पूर्णपणे लेखाशाखेत ठेवल्यास भविष्यात लेखापरिक्षणाच्या दृष्टीने गुंतागुतीचे होणार आहे.

त्या अनुषंगाने, श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी नव्याने विविध विषयांतील तज्ञ कर्मचारी नियुक्त करण्यात येत असून, त्यामध्ये लेखाविषयातील काही तज्ञ कर्मचा-यांचा (आर्थिक व्यवहारातील सखोल माहिती असलेले) समावेश आहे. सबब याठिकाणी चालणा-या आर्थिक व्यवहाराबाबतचा स्वतंत्र हिशोब ठेवण्याची जबाबदारी त्यांचेवर टाकल्यास आर्थिक व्यवहारावर योग्य नियंत्रण राहून, भविष्यात सुसुत्रता निर्माण होईल. पूर्वीचे कार्यरत असलेले श्री साईनाथ रुग्णालय व नव्याने सुरु करण्यात आलेले श्री साईबाबा रुग्णालय या दोन विभागाचे एकत्रित मिळून लेखाविषयक (Accounts) व्यवहार स्वंतत्र ठेवून त्याचा एकत्रित मासिक अहवाल, जमा-खर्च तेथील जबाबदार अधिका-यांच्या स्वाक्षरीसह लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा व तद्नंतर संस्थानचा एकत्रित मासिक अहवाल तयार करता येईल.

उपरोक्त दोन्ही रुग्णालयाचे मिळून एकत्रित हिशोब ठेवण्यासाठी रुग्णालयास एक स्वतंत्र बँक खात्याची आवश्यकता आहे. त्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, शिरडी शाखा येथे संस्थानचे नवीन स्वतंत्र बँक खाते हे रुग्णालय विभागासाठी देण्यात येईल. रुग्णालयात जमा होणारा संपूर्ण पैसा उपरोक्त बँक खात्यावर जमा करण्यात येईल, आणि आदा करण्यात येणारी (खर्च होणारी संपूर्ण रक्कम) बीलांची रक्कमही याच खात्यातून खर्च करण्यात येईल. खर्चाचे प्रमाण वाढल्याने जर या खात्यावरील शिल्लक रक्कम कमी पडल्यास, लेखाशाखेतनू सदर बँक खात्यावर, इतर बँकांतील खात्यामधून रक्कम वर्ग करण्यात येईल. अशा प्रकारे स्वंतत्र बँक खाते असल्यास येणारे उत्पन्न व होणारा खर्च याबाबतची माहिती पाहिजे त्यावेळेस उपलब्ध होऊ शकेल. तसेच आर्थिक व्यवहारावरही योग्य ते नियंत्रण राहील आणि भविष्यातील दिवसेंदिवस वाढत असलेल्या कामकाजाचा विचार करता लेखापरिक्षणाच्या दृष्टीने सोईस्कर होईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे आशयाची टिपणी कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे दि.१८ मे, २००६ रोजी सादर करण्यात आली होती. त्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, रुग्णालयासाठी लेखाविषयक स्वतंत्र कार्यप्रणाली ठेवणे कसे उचित आहे, याबाबत संस्थानचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षकांचा

अभिप्राय मागविण्यात आलेला होता. तो इकडील कार्यालयास आज दि.१२ जूलै, २००६ रोजी प्राप्त झाला असून, त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे -

**(अ) श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंट, कोपरगांव**

०१.हिशोबामध्ये सुस्पष्टता असावी (**Seprate Accounts** ठेवणेसाठी) म्हणून हॉस्पिटल वेगळा विभाग करावा लागेल.

०२.श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथरुग्णालय या दोही दवाखांन्याचे एकाच रोजकिर्दमध्ये स्वतंत्र लेखे लिहून, त्याची स्वतंत्र खतावणी करावी.

०३.हिशोबपत्रके स्वतंत्र ठेवावीत त्यासाठी अकौंट क्लार्क, अकौंट ऑफिसर/प्रबंधक, वैद्यकिय संचालक, प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यपध्दती ठरवनू जबाबदारी निश्चित कराव्यात. आदा करण्यात येणारे बिलांचे धनादेश, धनाकर्ष यावर स्वाक्षरीचे अधिकार मा.अध्यक्ष मा.कार्यकारी अधिकारी यांना असावेत.

०४.जमा होणारी रक्कम व आदा करण्यात येणारी बीले यांचा हिशोब घालून दिवसाअखेर हातातील रोख रक्कम(**Cash in hand**) शिल्लक ठेवण्याची मर्यादा ठरवून द्यावी.

०५.रुग्णालयातील पेशंटची होणारी फी व त्यातील मोठ्या असणा-या रकमांचा तपशिल (रु.१,०००/- व रु.५००/-सारख्या नोटा) लिहून, विद्यापीठात ज्याप्रमाणे फी चलनाने भरली जाते त्यानुसार चलनान्वये थेट बँकेत भरणा करावा. भरणा करावयाचे चलन रुग्णालयाच्या जबाबदार अधिकाऱ्याने तपासून सही शिक्क्यानिशी बॅंकेकडे पाठवावे.

०६.भरणा केलेल्या चलनांचे एकत्रित स्टेटमेंट बँकेकडून प्राप्त झाल्यावर त्यानुसार जमा-खर्च ठेवावा.

०७.बीलांची रक्कम बँकेत भरणा करावयाची असल्याने, रुग्णालयाच्या जागेत राष्ट्रीयकृत बँकेचे किमान एक डिपॉझीट कांऊटर उघडणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकेस विनंती वजा पत्र पाठवावे. डिपॉझिट कांऊटर उघडण्यासाठी बँकेस भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार असल्याने, भाडे स्वरुपामध्ये संस्थानची आर्थिक जमा वाढणार आहे.

०८.रुग्णालयातून होणारे सर्व आर्थिक व्यवहार धनादेश, धनाकर्षाने करावेत. रोखीने व्यवहार करु नये.

०९.संस्थानकडे येणारे वैद्यकीय निधीची (Medical Fund) देणगी रुग्णालय विभागाकडे वर्ग करता येईल.

१०.रुग्णालयाचे स्वतंत्र व्यवहार ठेवल्यास दर महिन्याचे उत्पन्न व खर्च पाहून येणाऱ्या तुटीसाठी तरतूद करावी.

११.रुग्णालयाच्या संबंधित होणारे सर्व खर्च व येणारे सर्व उत्पन्न स्वतंत्र बँक अकौंटमधून करण्यात यावेत.

१२.रुग्णालयासाठी संगणकाचे नेटवर्कीग करण्यात आले असून स्वतंत्र संगणक आज्ञावली खरेदी करण्यात आलेली असल्याने सर्व आर्थिक व्यवहार, लेखे संगणकीकृतच करावेत.

१३.दररोजच्या जमा-खर्चाच्या हिशोबाचा एकत्रित गोषवारा मुख्य कार्यालयाकडे पाठवावा व त्यामध्ये काही अडचणी असल्यास तशी स्वतंत्र टिपणी त्वरीत सादर करावी.

१४.पेटीकॅशमधून फक्त किरकोळ व अपेक्षित खर्च करावा.

१५.वर्षाअखेरीस दोन्ही रुग्णालयाचे एकत्रित आय-व्यय पत्रक, ताळेबंद तयार करुन मुख्य कार्यालयाकडे सादर करावेत.

१६.दर महिन्याचे मासिक खर्चाचे विवरणपत्रक पुढील महिन्याच्या पाच तारखेच्या आत मुख्य कार्यालयाकडे सादर करावेत.

१७.रुग्णालय विभाग स्वतंत्र केल्यास सध्या एकत्रित असलेल्या चल व अचल मालमत्तेच्या नोंदीपैकी रुग्णालयासंबधीत नोंदी त्यांचेकडे वर्ग कराव्यात,म्हणजे चल मालमत्ता व स्थावर मालमत्तेच्या नोंदी स्वतंत्र ठेवून त्यावर घसारा टाकून हिशोब लिहिणे सोईस्कर होईल.

१८.रुग्णालय मॅनेजमेंट खर्चासाठी मुख्य कार्यालयाच्या एकत्रित खर्चापैकी काही खर्च टक्केवारीने वर्ग करता येईल.

१९.रुग्णालय विभाग स्वतंत्र केल्यास प्रत्येक अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निश्चित करुन द्यावेत.

२०.रुग्णालयासाठी स्वतंत्र अंतर्गत तपासणीची व्यवस्था करुन दरमहा अहवाल घेणे आवश्यक आहे.

**(ब) शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंटस, पुणे**

रुग्णालय हे स्वतंत्र हिशोब केंद्र ठेवणे पुढील बाबीसाठी देखील आवश्यक आहे.

०१. आपणास विहीत आहेच की, नुकतेच संस्थानला आयकर कायदा कलम ३५(AC) खाली राजपत्राव्दारे विशेष सवलत मिळाली आहे. या सवलतीच्या अटी शर्ती अन्वये हॉस्पिटलचे हिशेब स्वतंत्र ठेवणे व ३० जूनच्या आत हे हिशेब सनदी लेखापालांकडून तपासणी करुन राजस्व खात्याकडे दाखल करणे जरुरी आहे. तसेच हॉस्पिटलचे स्वतंत्र बँक खाते उघडणे जरुरी आहे.

०२. सद्यस्थितीतील लेखाशाखेच्या कार्यपध्दतीमध्ये सर्व खात्यांचे हिशेब एकत्र ठेवले असल्यामुळे खातेबार कार्यक्षमता ठरविता येत नाही. तसेच विविध खात्यांवर होणाऱ्या खर्चाचा योग्य विनियोग प्रमाणित करता येत नाही. हॉस्पिटलची स्वतंत्र लेखाविषयक कार्यप्रणाली ठेवल्यास एखादे खाते हे स्वयंपूर्ण आहे किंवा कसे हे ठरवून व्यवस्थापकीय निर्णय होणे सहज शक्य होते.

**(क) श्री.राजीव निगम, चार्टर्ड अकौंटंटस्, नवी दिल्ली**

श्रीराजीव निगम, चार्टर्ड अकौंटंटस्, नवी दिल्ली यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या लेखापरिक्षणाच्या कामाचा मोठा अनुभव आहे. त्यांनी माहे जून, २००६ मध्ये संस्थानला प्रत्यक्ष भेट दिली असता, त्यांचेशी रुग्णालयाच्या कार्यप्रणालीबाबत समक्ष चर्चा केली असून, दोन्ही रुग्णालयासाठी एकत्रित लेखाविषयक स्वतंत्र कार्यप्रणाली असावी असे मत प्रदर्शित केलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, दोन्ही रुग्णालयासाठी एकत्रित लेखाविषयक कार्यप्रणाली त्वरीत सुरु करणे गरजेचे असल्याने, संस्थानच्या अंतर्गत लेखापरिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार त्वरीत कार्यवाही करुन स्वतंत्र लेखाविषयक कार्यप्रणाली (Accounting) सुरु करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असून, रुग्णालय विभागाकडे रुग्णांना आवश्यक त्या सेवा तत्परतेने मिळाव्यात, यासाठी नव्याने सुरु करण्यात आलेले श्री साईबाबा रुग्णालय व पूर्वी कार्यरत असलेले श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही विभागांची एकत्रित लेखाविषयक कार्यप्रणाली स्वतंत्र सुरु करणेबाबतचा प्रस्ताव आजचे सभेत सादर करण्यात आला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

त्या अनुषंगाने सदरील ठरावाची अंमलबजावणी यथावकाश करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी रुग्णालय विभागाने करावयाची आहेत.

०१. लेखाविषयक कामकाजासंबंधी आवश्यक ते सर्व रजिस्टर्स (रोजकिर्द, खतावणी, बँक खतावणी, डिपॉझिट्स, व्हॉऊचर्स, भरणा रजिस्टर्स वगैरे त्या अनुषंगीक लेखाविषयक सर्व रजिस्टर्स) छपाई करण्यात यावी.

०२. कार्यालयाच्या दैनंदिन वापरासाठी लेखाविषयक व इतर आवश्यक ते सर्व रबरी स्टॅम्प तयार करुन घेणे.

०३. रुग्णालयातील लेखाविषयक अधिका-यांच्या कर्तव्ये आणि जबाबदा-या पुढील पद्सोपान-परंपरेनुसार पार पडतील.

लिपीक-वरिष्ठ लिपीक-अधिक्षक-लेखापाल-फायनान्स मॅनेजर- वैद्यकीय अधिक्षिका/ वैद्यकीय संचालक- प्रशासकीय अधिकारी - कार्यकारी अधिकारी

**दोन्ही रुग्णालयाची लेखाविषयक एकत्रित कार्यप्रणाली स्वतंत्र सुरु केल्यानंतर रुग्णालय विभागाच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील.**

०१. लेखाविषयक सर्व आर्थिक व्यवहार स्वतंत्र ठेवून त्याबाबतचा मासिक अहवाल मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा यांचेकडे पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावेत.

०२. प्रत्येक आर्थिक व्यवहाराचे स्वतंत्र व्हाऊचर तयार करुन ते लेखापरिक्षणाकामी योग्य पध्दतीने जतन करुन ठेवावेत.

०३. आर्थिक व्यवहाराबाबत जमा व खर्चाच्या सर्व नोंदी रोजच्या रोज पूर्ण करुन, शिल्लक रक्कम काढण्यात यावी (रोखपाल रोजकिर्द रोजचे रोज पूर्ण करणे) व ती बरोबर असलेबाबत जबाबदार अधिकाऱ्याच्या सह्या घेण्यात याव्यात.

०४. अत्यंत निकडीची आवश्यकता असल्यास, पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार रोखीने करु नयेत.

०५. दरवर्षी रुग्णालय विभागासाठी आवश्यक असणारे मूळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे.

०६. आर्थिक बाबींशी सर्व संबंधीत विषयाचे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करणे व त्यावर झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणे.

०७. सर्व प्रकारचे शासकीय भरणे, तसेच दैनंदिन भरणे बँकेत वेळेवर भरणा करावेत. रोख रक्कम स्विकारण्याऐवजी फी चलनान्वये थेट बँकेत भरणा करण्यात यावी. धनादेशा (Cheque) ऐवजी धनाकर्षा (Demand Draft) ने रक्कम स्विकारण्यात यावी.

०८. रुग्णालयाच्या वापरासाठी स्वतंत्रपणे देण्यात आलेल्या सिर्डीकेट बँक, शिर्डी शाखेच्या बँक खात्यावरील शिल्लक रक्कम अदायगी पेक्षा कमी पडणार असल्यास तशी लेखी पूर्व सूचना किमान ५ दिवस अगोदर मुख्यलेखाधिकारी यांचेकडे कळवावी व आवश्यक ती रक्कम रुग्णालयासाठीच्या बँक खात्यावर जमा करुन घ्यावी.

०९. प्रत्येक महिन्याचे वेतन विषयक व त्या अनुषंगाने येणारे सर्व देयके नियमानुसार तपासणी करुन कालमर्यादेत आदा करण्यात यावेत.

१०. चल मालमत्तेबाबतच्या (Dead Stock) सर्व नोंदी वेळच्या वेळी पूर्ण करुन, वर्षाअखेरीस त्याची लेख्यांशी जुळवणी विहित नोंदवहीशी करुन, तसेच त्याची प्रत्यक्ष पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल मुख्यलेखाधिकारी यांचेकडे सादर करण्यात यावा.

११. रुग्णालयाकडे असलेल्या सादील/किरकोळ स्वरुपाच्या वस्तू, लिनन व औषध साठ्यांची वेळोवेळी प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा लेखी अहवाल वरिष्ठांना सादर करणे.

१२. लेखापरिक्षणासाठी आवश्यक ते सर्व कागदपत्रे तयार ठेवून संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षण करुन घेणे. तसेच लेखापरिक्षण अहवालातील त्रुटीच्या मुद्यांबाबतचा दोष-दुरुस्ती अहवाल विहीत मर्यादेत मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणे.

१३. रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या सर्व वस्तूच्या पुरवठाधारकांचे सर्व प्रकारचे देयके तसेच त्या अनुषंगाने येणारे इतर देयके नियमाप्रमाणे विहित पध्दतीने छाननी करुन आदा करणे.

१४. मा.व्यवस्थापन समितीस वेळोवेळी लागणारी रुग्णालयासंबंधीची आर्थिक व प्रशासकीय माहिती पुरविणे.

१५. स्वतंत्र देण्यात आलेल्या बँक खात्याचा महिना संपताच ताळमेळ (Reconcilation) घालणे.

१६. वर्षाअखेरीस अय-व्ययपत्रक (Receipts & Payments) तसेच ताळेबंद (Balance-Sheet) तयार करुन ते मुख्यलेखाधिकारी यांना पाठविणे.

१७. रुग्णालय विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागांमध्ये चालणाऱ्या आर्थिक, प्रशासकीय कामकाजाबाबत योग्य समन्वय व नियंत्रण ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

तरी यथावकाश दोन्ही रुग्णालयाची मिळून एकत्रित लेखाविषयक कार्यप्रणाली स्वतंत्र सुरु करण्यात यावी. यासाठी उपरोक्तप्रमाणे जबाबदाऱ्या असून त्याव्यतिरीक्त लेखाविषयक व त्या अनुषंगाने येणाऱ्या संपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडण्यात याव्यात.

(कार्यवाही - वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षिका/ मुख्यलेखाधिकारी )

दिनांक १९.०८.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-

**विषय नं.०९.** **मा.अध्यक्षांनी सुचविलेल्या संस्थानचे उत्पन्न वाढीचे योजनांबाबत.**

**निर्णय क्र.५३८.** मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक १६.७.२००६ चे व्यवस्थापन समितीचे सभेत उत्पन्न वाढीच्या दोन योजना सुचविल्या होत्या त्यानुसार सदर योजनांचे सविस्तर प्रस्ताव तयार करुन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहेत.

**: श्री साई कुटीर प्रकल्प :**

**नांव :**

सदर भक्त निवास प्रकल्प हा "श्री साई कुटीर प्रकल्प" या नावाने ओळखला जाईल.

**उद्देश :**

"श्री साई कुटीर प्रकल्प" या योजनेंतर्गत तिरुपती संस्थानाप्रमाणे भक्तांच्या निवासासाठी कुटीर बांधण्यात येणार आहेत.

**क्षेत्रफळ :**

साधारणतः ३०० चौरस फुटाची एक कुटीर, अशा प्रकारचे १००० कुटीर तयार करता येतील.

**स्थान :**

२५० कुटीर एका ठिकाणी, अशा प्रकारे शिर्डी शहराच्या चार दिशांमधील चार जागा निवडण्यात येऊन त्या ठिकाणी सदर प्रकल्प उभारण्यात येईल.

**निधी व्यवस्थापन :**

एका कुटीरासाठी रक्कम रु. ४,००,०००/- इतकी स्विकारली जाईल. सदर रक्कम ही एक रकमी अथवा चार वर्षे मुदतीच्या चार हप्त्यातही स्विकारण्यात येईल.

**प्रारंभ :**

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी घेण्यासाठी दि. २ ऑक्टोबर, २००६ पासून सुरुवात करण्यात येईल.

**सदर प्रकल्पासंबंधी सांख्यिकीक माहिती :**

**जमा खर्च तक्ता**

| **अ) जमा** | **रक्कम रु.** |
|---|---|
| भक्तांकडून कुटीरसाठी प्राथमिक अनुदान | |
| १,००० कुटीर रु. ४,००,०००/- प्रमाण प्रत्येक कुटीर | ४००,०००,००० |
| एकुण प्राथमिक जमा | **४००,०००,०००** |
| मिळणारे भाडे | |
| भक्तांच्या निवासासाठी खोल्या | |
| १,००० खोल्या रु . ५०० प्रत्येकी खोली १०० दिवसांसाठी | ५०,०००,००० |
| एकुण भाडे | **५०,०००,०००** |
| **ब) प्राथमिक भांडवली खर्च** | |
| अ) बांधकामाचा खर्च | ३३०,०००,००० |
| (जमिन, आर्किटेक्ट फी, व इतर प्रासंगीक खर्चासह ) | |

| | |
|---|---|
| ब) अंतर्गत सजावट व फर्चिर | ५०,०००,००० |
| क) बस खरेदी (कुटीर ते मंदीर परिसर ) | २,२००,००० |
| ड) ध्यामंदीर व पारायण कक्ष | ८,८००,००० |
| इ) बालोद्यान व बगीचा | २,०००,००० |
| फ) साई जीवन कथा संग्रहालय | ६,०००,००० |
| ग) किरकोळ खरेदी विक्री केंद्र | १,६५०,००० |
| **एकुण खर्च** | **४००,६५०,०००** |

## नफा - तोटा पत्रक (Statement of Profitability)

| तपशील | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ | वर्ष ४ | वर्ष ५ |
|---|---|---|---|---|---|
| मिळणारे भाडे | ५०,०००,००० | ५२,५००,००० | ५५,१२५,००० | ५७,८८१,००० | ६०,७७५,००० |
| (अंदाजे ५% वाढ ) | | | | | |
| **एकुण जमा (A)** | **५०,०००,०००** | **५२,५००,०००** | **५५,१२५,०००** | **५७,८८१,०००** | **६०,७७५,०००** |
| | | | | | |
| देखभाल खर्च व कर वगैरे | ५,०००,००० | ५,२५०,००० | ५,५१२,५०० | ५,७८८,१०० | ६,०७७,५०० |
| विद्युत खर्च | ४,८००,००० | ५,०४०,००० | ५,२९२,००० | ५,५५७,००० | ५,८३५,००० |
| पाणी खर्च | ५७६,००० | ५०४,००० | ५२९,२०० | ५५५,७०० | ५८३,५०० |
| दुरुस्ती खर्च | १,००२,००० | १,०५२,००० | १,१०५,००० | १,१६०,००० | १,२१८,००० |
| प्रशासकीय खर्च | १,२००,००० | १,२६०,००० | १,३२३,००० | १,३८९,००० | १,४५८,००० |
| घसारा | २०,०३२,५०० | १९,०३०,८७५ | १८,०७९,३३१ | १७,१७५,३६५ | १६,३१६,५९६ |
| **एकुण खर्च (B)** | **३२,६१०,५००** | **३२,१३६,८७५** | **३१,८४१,०३१** | **३१,६२५,१६५** | **३१,४८८,५९६** |
| उत्पन्न (अ - ब) | १७,३८९,५०० | २०,३६३,१२५ | २३,२८३,९६९ | २६,२५५,८३५ | २९,२८६,४०४ |
| % उत्पन्न ते एकूण जमा | ३४.७८ | ३८.७९ | ४२.२४ | ४५.३६ | ४८.१९ |
| + घसारा | २०,०३२,५०० | १९,०३०,८७५ | १८,०७९,३३१ | १७,१७५,३६५ | १६,३१६,५९६ |
| उपलब्ध रक्कम | ३७,४२२,००० | ३९,३९४,००० | ४१,३६३,३०० | ४३,४३१,२०० | ४५,६०३,००० |
| उपलब्ध रक्कम (लाखामध्ये) | ३७४.२२ | ३९३.९४ | ४१३.६३ | ४३४.३१ | ४५६.०३ |

## चलन वहन दर्शक तक्ता ( Cash Flow Statement)

| तपशील | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ | वर्ष ४ | वर्ष ५ |
|---|---|---|---|---|---|
| **आवक** | | | | | |
| निव्वळ उत्पन्न | १७,३८९,५०० | २०,३६३,१२५ | २३,२८३,९६९ | २६,२५५,८३५ | २९,२८६,४०४ |
| + घसारा | २०,०३२,५०० | १९,०३०,८७५ | १८,०७९,३३१ | १७,१७५,३६५ | १६,३१६,५९६ |
| कुटीरासाठी मिळालेली देणगी | ४००,०००,००० | | | | |
| **एकुण आवक** | ४३७,४२२,००० | ३९,३९४,००० | ४१,३६३,३०० | ४३,४३१,२०० | ४५,६०३,००० |
| **जावक** | | | | | |
| बांधकाम खर्च | ४००,६५०,००० | | | | |
| **एकुण जावक** | **४००,६५०,०००** | | | | |
| उत्पन्न | | | | | |
| आरंभी शिल्लक | | ३६,७७२,००० | ७६,१६६,००० | ११७,५२९,३०० | १६०,९६०,५०० |
| + निव्वळ | ३६,७७२,००० | ३९,३९४,००० | ४१,३६३,३०० | ४३,४३१,२०० | ४५,६०३,००० |
| **अखेरची शिल्लक** | ३६,७७२,००० | ७६,१६६,००० | ११७,५२९,३०० | १६०,९६०,५०० | २०६,५६३,५०० |

वरील सांख्यिकीय माहितीवरुन असे स्पष्ट होते की, फक्त ५ वर्षांतच हया योजनेमार्फत रु. २० ोटी ६५ लाख एवढी निव्वळ रक्कम जमा होईल.

* निवास व्यवस्था : एका वर्षातील ५० दिवस मोफत निवास व्यवस्था - सदरची व्यवस्था फक्त देणगीदार व त्यांनी सुचविलेल्या व्यक्ती यांचेसाठी असेल.

* निवास व्यवस्था लाभ कालावधी : तसेच सदरच्या योजनेचा लाभ सभासद झाल्यापासून २० वर्षे इतक्या कालावधीपर्यंत राहील.

* सदर कुटीरांमध्ये २४ तास पाणी पुरवठा, संस्थान मार्फत वीज पुरवठा व वाहतूकीसाठी सिमेंट कॉक्रीट रस्ते.

* अंतर्गत सजावट खर्च : १ कुटीरसाठी अंदाजे रु. ५०,०००/- या प्रमाणे १००० कुटीरांसाठी

** ध्यान मंदीर व पारायण कक्ष -प्रत्येकी १००० चौ. फूट असे ४ ध्यानमंदीर व ४ पारायण कक्ष

*** बालोद्यान व बगीचा साधारणत: ६००० चौ. फुट. असे ४ - प्रत्येकी खर्च अंदाजे रु. ५ लाख.

**** साईंच्या जीवनकथा संग्रहालय - प्रत्येकी १००० चौ.फूट. या प्रमाणे ४ संग्रहालय वास्तू . अंदाजे प्रत्येकी खर्च रु. १५ लाख अपेक्षीत आहे.

***** किरकोळ खरेदी व विक्री संकूल : एका संकुलामध्ये किमान १५ गाळे (१०X १० चौ. फुट.) या प्रमाणे एकूण ४ संकूले .

**भक्तांना प्राधान्याने देण्यात येणाऱ्या सुविधा :**

दर्शन व्यवस्था, सत्यनारायण पूजा, अभिषेक पुजा (आवश्यक्तेप्रमाणे व मंदीराचे सोईनुसार शक्य असेल त्यानुसारच)

भक्तांना उत्सवाची निमंत्रण पत्रिका व उत्सव झाल्यानंतर उदी-प्रसाद पाठविला जाईल.

दरवर्षी सदर योजनेचा सविस्तर आढावा, मा. व्यवस्थापन समितीमार्फत घेण्यात येऊन, सदर योजना कार्यान्वीत ठेवणे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. व्यवस्थापन समिती राखून ठेवेल.

**कार्यवाही :**

**बांधकाम विभाग** : जमीन संपादन करणे, प्रकल्प उभा करणेकामी अनुषंगीक सर्व कामे.

**पाणीपुरवठा विभाग** : सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेप्रमाणे पाण्याचे नियोजन करणे.

**बगीचा विभाग** : बालोद्यान व बगीचा संबंधी आवश्यक ते कामे करणे तसेच कुटीरांसभोवती झाडांचे सुशोभित कुंपण तयार करणे.

**विद्यूत विभाग** : सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेप्रमाणे वीज पुरवठयाचे नियोजन करणे.

**जनसंपर्क विभागः** प्रकल्पाची सर्व प्रकारे विविध माध्यमाने प्रसिद्धी देणे. सर्व प्रकारची माहितीपत्रके छापून घेणे, वाटप करणे.

**संरक्षण विभाग** : सदर प्रकल्पासाठी लागणारी उत्तम सुरक्षा व्यवस्था पुरविणे

**माहिती तंत्रज्ञान विभाग** : संगणक आज्ञावलीमध्ये बदल करणे, सदर योजनेची माहिती संस्थानचे संकेत स्थळावर उपलब्ध करणे.

**विधी विभाग** : सदर योजनेसंबंधी सर्व कायदेशीर बाबींची तपासणी करणे व आवश्यक त्या मान्यता घेणे.

**ध्वनीक्षेपण विभाग** : सदर प्रकल्पाच्या ठिकाणी सतत साई धुन सुरु राहिल याची व्यवस्था करावी.

**लेखाशाखा** : सदर येणारा निधी स्वीकारणे.

**: गोल्डन कार्ड योजना :**

साई भक्तांना प्राधान्याने दर्शन सुविधा, घरपोच उदीप्रसाद मिळण्याच्या दृष्टीने सदर कार्डस साई भक्तांना देण्यात येतील.

**सभासदत्व :**

एक रकमी रु. ५,००,०००/- गोल्डन कार्ड निधीस, संस्थान जमा करावे लागतील.

**सभासदत्वासाठी फोटो :**

सभासदत्व घेतांना संबंधीत व्यक्तीस स्वतःचा पारपत्राच्या आकाराचे दोन फोटो अथवा कुटुंबातील जास्तीत जास्त चार (पती, पत्नी, व २ अपत्ये) लोकांचे प्रत्येकी दोन फोटो देणे बंधनकारक राहिल. फोटो दिल्यापासून किमान १५ दिवसांपर्यंत कार्ड उपलब्ध करुन देता येईल.

**सुविधा :**

प्राधान्याने दर्शन सुविधा, घरपोच उदीप्रसाद.

**मर्यादा :**

सदर कार्डचा वापर हा वर्षात कधीही संस्थानने ठरविलेल्या नियोजनानुसारच करता येईल. कार्डधारकास संस्थानचे सोईनुसारच दर्शन व्यवस्था करण्यात येईल. गर्दी लक्षात घेऊन वेळोवेळी होणारे बदल हे कार्डधारकांवर बंधनकारक राहतील त्याबाबत त्यांना तक्रार करण्याचा हक्क राहणार नाही.

**वैधता :**

सदर कार्डची मुदत ही कार्ड दिल्यापासून १० वर्षेपर्यंतच राहील. मात्र संस्थान, भविष्यातील परिस्थीतीनुसार, सदर कार्डवरील सुविधा देण्याचे अथवा बंद करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवेल.

**निधी संकलनः**

दरवर्षी साधारणपणे ५००० भक्त या योजनेचा लाभ घेतील अशा अंदाजाने रु. २५ कोटी दरवर्षी जमा होतील. यासाठी एक स्वतंत्र निधी स्थापन करावा लागेल.

**प्रारंभ :**

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी घेण्यासाठी दि. २ ऑक्टोबर, २००६ पासून सुरुवात करण्यात येईल.

दरवर्षी सदर योजनेचा सविस्तर आढावा, मा. व्यवस्थापन समितीमार्फत घेण्यात येऊन, सदर योजना कार्यान्वीत ठेवणे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. व्यवस्थापन समिती राखून ठेवेल.

पूर्वी मोठया रकमांची देणगी दिलेल्या देणगीदारांबाबत, त्यांचेकडून मागणी आल्यास निर्णय घ्यावा लागेल.

**कार्यवाही :**

**जनसंपर्क विभाग** : योजनेची सर्व प्रकारे विविध माध्यमाने प्रसिद्धी देणे. सर्व माहितीपत्रके छापून घेणे, वाटप करणे.

**संरक्षण विभाग** : सदर कार्डधारकांना प्राधान्याने संस्थानचे सोईनुसार सुलभ दर्शन होईल याची व्यवस्था पाहणे

**माहिती तंत्रज्ञान विभाग** : सदर कार्डचे डिझाईन बनवून घेणे अथवा सदर कार्ड बनविण्याचे मशीन आज्ञावलीसह संस्थानसाठी घेणेबाबत कार्यवाही करणे. सदर योजनेची माहिती संस्थानचे संकेत स्थळावर उपलब्ध करणे.

**आस्थापना विभाग** : मा. व्यवस्थापन समितीच्या मंजूरी नुसार, लेखाशाखेने दिलेल्या यादीनुसार व माहिती तंत्रज्ञान आणि जनसंपर्क विभाग यांच्याशी समन्वय साधून कार्ड तयार करुन घ्यावे व वितरण करावे.

**विधी विभाग** : सदर योजनेसंबंधी सर्व कायदेशीर बार्बीची तपासणी करुन आवश्यक ती मान्यता घेणे.

**मंदीर विभाग** : मंदीरातील दैनंदीन कार्यक्रम व इतर भक्तांची व्यवस्था सांभाळून सदर कार्डधारकांच्या दर्शनासाठी योग्य प्रकारे व्यवस्था करणे.

**लेखाशाखा** : सदर येणारा निधी स्वीकारणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई कुटीर प्रकल्पाबाबत व्ही.जे.टी.आय. मुंबई यांचेकडून प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा, तसेच गोल्डन कार्ड योजनेबाबत श्री एस.एस.गणपुले, इन्कम टॅक्स कन्सल्टंट, मुंबई व इतर तज्ञांकडून प्रकल्प अहवाल मागविण्यात यावा,असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं. १०. नवीन व्ही.आय.पी जवळील जागेत लॅन्डस्केपींग करणे बाबत.**

**निर्णय क्र.५३९.** प्रसादालय परिसरात साईप्रसाद नं. ०२ चे पाठीमागील बाजूस भक्तांच्या निवासासाठी तसेच व्ही.आय.पी, व्ही.व्ही.आय.पी करीता साईनिवास अतिथीगृह (वातानुकुलित) बांधण्यात आलेले आहे. सध्या या अतिथीगृहात २४ व्ही.आय.पी. सूटस आहेत. या अतिथीगृहात साधारणपणे दररोज व्ही.आय.पी, व्ही.व्ही.आय.पी निवासासाठी येत असतात. तसेच या अतिथीगृहात मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य ही निवासासाठी असतात. याच इमारतीत मा.व्यवस्थापन समितीचे सभागृह बांधलेले असून या ठिकाणी नेहमी मा.व्यवस्थापन समितीच्या सभा, शासकीय अधिकाऱ्यांच्या तथा सल्लागार परिषदेच्या ही सभा होत असतात.

या इमारतीचे प्रांगणात सध्या डांबरीकरण करण्यात आलेले आहे. या इमारतीत निवासासाठी येणाऱ्या व्ही.आय.पी, व्ही.व्ही.आय.पी व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत असे वातावरण अनुभवास मिळावे या दृष्टीने या इमारती सभोवती प्रांगणात (खुल्या जागेत) लॅन्डस्केपींग करावयाचे आहे.

यासाठी नाशिक येथील लॅन्डस्केप आर्किटेक्ट श्री हेमंत खैरे यांना या खुल्या जागेत थोडेस बांधकाम करुन त्यामध्ये हिरवळ, पाण्याचा कारंजा, फुलझाडे व समोरील बाजूने (गॅस टँकच्या बाहेरील बाजूने) भिंतीवरुन पाण्याचे झरे व फुलझाडे अशा प्रकारे सुशोभिकरण करात येईल असे सूचविलेले आहे. भांडार समोरील सर्व मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे दाखविलेले आहे. यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे खर्च दर्शविलेला आहे.

| अ.नं. | कामाचे स्वरुप | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | लॅण्डस्केपिंग करावयाची जागा व कारंजा | ६,७२,३२७.०० |
| ०२. | पेव्हींग ब्लॉक (पर्किंग व रिकामी जागा ) | २,५१,७८४.०० |
| | एकूण | ९,२४,१११.०० |

यासाठी एकत्रित खर्च अंदाजे रुपये ९,२४,१११.०० मात्र अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन नवीन व्ही.आय.पी जवळील जागेत लॅन्डस्केपींग करणेकामी लॅण्डस्केप आर्किटेक्ट श्रीमती अमृता पवार,नाशिक यांना आमंत्रित करुन त्यांचेकडून लॅण्ड स्केपिंग करुन घेण्यात यावे याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं. ११. समाधी मंदिर परिसर संरक्षणाच्या दृष्टीने चारही महाव्दारांजवळ संरक्षण कॅबीन खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.५४०.** मुंबई येथे झालेल्या अतिरिकी बॉंब हल्ल्यामुळे साईबाबा मंदिराची सुरक्षा वाढविणेचे दृष्टीने संरक्षण विभागाने वरिल संदर्भिय टिपणी अन्वये काही गोष्टींची तात्काळ पुर्तता करणेबाबत कळविले आहे. त्यामध्ये मुख्यतः चारही महाव्दारांना पोलीस व सुरक्षा गार्ड यांचेकरीता कॅबीन तयार करणेबाबत कळविले आहे.

अशा प्रकारची फायबरची एक कॅबीन खरेदी करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| S.No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | FRP PORTA CABIN - (फायबर कॅबीन )<br>Material of construction - 30 mm th. FRP+PU+FRP<br>Type- Modular type with sloping roof.<br>Flooring-Steel Frame with 18mm ply.<br>Accessories- 1 door with 3 sides glass window with Al. Frame.<br>i) Size -7 ft x7 ft x 9 ft. ht.<br>Or<br>ii) Size - 10 ft. x 10ft. x 9 ft. | 54,000.00<br>1,08,000.00 |

तरी वरीलप्रमाणे दोन्ही साईज पैकी पर्याय १ ची ७'x७' या साईजची फायबर कॅबीन खरेदी करणेस हरकत नाही.एकूण चार चौक्या खरेदी कामी अंदाजे रु. २,१६,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून चार नगर फायबर कॅबिन्स खरेदी करण्यात याव्यात.

याचवेळेस मा.अध्यक्ष महोदय यांनी असे निदर्शनास आणले की, सध्या संस्थान परिसरात येण्यासाठी दोन व जाण्यासाठी दोन गेटचा वापर करण्यात येतो. त्यामूळे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना संस्थान परिसरात येण्याचे व जाण्याचे गेटची माहिती नसल्याने अडचण येते व त्यामूळे गेटवर वारंवार साईभक्त व सुरक्षा कर्मचारी यांच्यात भांडणे होतात याकरीता प्रत्येक गेटला पार्टीशन टाकून जाण्याची व येण्याची सुविधा करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/संरक्षण विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. १२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या समोरील जागेत गार्डन करणे बाबत**

**निर्णय क्र.५४१.** नव्याने तयार करण्यात आलेल्या श्री साईबाबा हॉस्पिटलच्या (सुपर स्पेशालिटी) समोरील मोकळ्या जागेत गार्डन करावयाचे आहे. या हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच इतर व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत असे वातावरण अनुभवास मिळावे तसेच रुग्णांना धुळीचा व प्रदुषणाचा त्रास होऊ नये या दृष्टीने या जागेवर लॅण्डस्केप करावयाचे आहे.

यासाठी नाशिक येथील लॅण्डस्केप आर्किटेक्ट श्री हेमंत खैरे यांनी या खुल्या जागेत थोडेसे बांधकाम करुन त्यामध्ये हिरवळ, पाण्याचा कारंजा, फुलझाडे व समोरील बाजूने भिंतीवरुन पाण्याचे झरे व फुलझाडे अशाप्रकारे सुशोभिकरण करता येईल असे सूचविले आहे. यामध्ये रुग्ण व नातेवाईक यांना पेव्हींग ब्लॉक टाकून बसण्याची सोय करावयाची आहे. या गार्डनमध्ये पाण्याचा धबधबा दाखविलेला आहे.

| अ.नं. | कामाचे स्वरुप | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | लॅण्डस्केपिंग करावयाची जागा | ५,२२,९३६.०० |
| ०२. | पाण्याचा कारंजा व धबधबा | २,००,०००.०० |
| | एकूण | ७,२२,९३६.०० |

याकामी एकत्रित अंदाजे रुपये ७,२२,९३६.०० खर्च अपेक्षित आहे. तसेच याकामी आर्किटेक्ट श्री खैरे यांनी ४% फी ची मागणी केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसमोरील जागेत लॅन्डस्केपींग करणेकामी लॅण्डस्केप आर्किटेक्ट श्रीमती अमृता पवार,नाशिक यांना आमंत्रित करुन त्यांचेकडून लॅण्ड स्केपिंग करुन घेण्यात यावे याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्रीसाईबाबा हॉस्पिटल पार्किंगसाठी साईनगर पटांगणचा वापर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं. १३. रथ पालखी रस्त्याचे कॉन्क्रटीकरण करणे कामाबाबत.**

**निर्णय क्र.५४२.** संस्थानचे रथ-पालखी रस्ता कॉंक्रीटीकरण करणेचे काम ठेकेदार मे.एम.आर.मुथ्था,अ.नगर यांना इकडील जा.नं.४०३९ दि. २०/०४/२००५ चे ऑर्डरअन्वये देण्यात आलेले आहे. निविदा शर्तीनुसार सदर कामाची मूदत पाच महिने म्हणजेच दि.१२/११/२००५ अखेर काम पूर्ण होणे आवश्यक होते. रथ पालखी रस्ता ९.०० मी. रुंदीचा उपलब्ध असणे आवश्यक होते. परंतू ठेकेदार यांनी काम सुरु केल्यानंतर असे दिसून आले की, बऱ्याच ठिकाणी सदर रस्ता ९.०० मी. रुंदीचा उपलब्ध झाला नाही. शासनाकडून ९.०० मी. रस्ता उपलब्ध होऊन मिळेल अशी अपेक्षा होती. त्यामुळे ठेकेदार यांना प्रथम ड्रे-नेज सर्व्हीस पाईप टाकण्याचे काम करण्यास सांगितले. मात्र सदर काम सुरु केल्यानंतरही रस्त्यामध्ये -नागरीकांचे सेप्टीक टॅंक पाण्याची टाकी, केबल, पायऱ्या नागरीकांनी वेळेवर न काढून दिल्यामुळे कामास विलंब झाला तसेच इले.पोल बाबत. म.रा.वि.मं.यांचेशी विद्युत विभाग प्रमुख यांचेमार्फत पाठपुरावा करण्यात आला परंतू अद्यापही इले. लाईन शिफ्ट झालेले नाही. दरम्यान दि. ११/१२/२००५

रोजी मा. अध्यक्ष साो., यांचे समवेत मा. कैलास (बापू) कोते नगराध्यक्ष, विश्वस्त डॉ. ई.बी. गोंदकर, मा.का.अ., मा. मुख्याधिकारी, शिरडी नगरपंचायत यांनी समक्ष रस्त्याची पहाणी केली. सदर रस्त्याची ९.०० मी. रुंदी उपलब्ध होत नाही. तसेच रस्त्यात असलेली पाण्याची टाकी, सेप्टीक टँक, इले, पोल इत्यादी अडथळे आहेत. त्यावेळेस सध्या असलेली रुंदीप्रमाणे काम करुन घ्यावे असे ठरले. त्यानुसार ठेकेदार यांनी उपलब्ध रुंदीनुसार कॉंक्रीटकरणाचे कामास सुरुवात केली. त्यामुळे ठेकेदार यांना निविदेतील मुदतीनुसार काम पूर्ण करता आले नाही. ठेकेदार यांनी दरम्यानच्या काळात मटेरीअलचे बाजारभाव भरमसाठ वाढल्याने भाववाढ मिळणेबाबत दि. ०३/०६/२००६ चे पत्रान्वये विनंती केली आहे. ठेकेदार यांनी जाोवारी २००६ पासनू बांधकाम साहित्याचे बाजारभाव भरमसाठ खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वाढलेले असल्याचे कळविले आहे.

| अ.नं. | बाब | भाववाढ |
|---|---|---|
| ०१. | वहातुकीचे दर | ५०% |
| ०२ | सिमेंट | ५६% |
| ०३. | लोखंड | २५% |
| ०४ | खडी | ४०% |
| ०५ | वाळू | ७०% |
| ०६ | दगड, मुरुम | ५५% |
| ०७ | आर.सी.सी.पाईप | ४६% |
| ०८ | जी.आय.पाईप | ३५% |
| ०९ | पी.व्ही.सी.पाईप | ५५% |
| | | ४३२% |
| | सरासरी | ४८% |

जानेवारी २००६ पासनू बांधकाम साहित्याचे दर सरासरी ४८% ने वाढलेले आहेत. तरी याप्रमाणे भाववाढीचे दर देण्यात यावे. अशी विनंती ठेकेदार केलेली आहे.

याबाबत इकडील जा. नं.८१५२/दि. २०/०६/२००६ चे पत्रान्वये आर्किटेक्ट मे. निकम पा. श्रीरामपूर यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी दि. २९/०६/२००६ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

"सदर रस्त्याचे कामकरतांना ठेकेदार यांना बऱ्याच ठिकाणी अडचण आल्यामुळे मूदतीत काम पूर्ण करता आले नाही. मधील काळात सिमेंटचे दरात खुप वाढ झाली. टेंडर मधील पेज नं. ८९ क्लॉज नं. २९ मध्ये सिमेंटचा बेसिक दर रु. १२५/- धरुन मार्केट मधील दर व बेसिक दर यातील फरक ठेकेदार यांना देणेस हरकत नाही.

याबाबत सविस्तर चर्चा झाली, त्यावेळी संस्थान आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूरहे उपस्थित होते. ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीत (साईट) रस्ता पुर्ण रुंदीमध्ये उपलब्ध नव्हता. त्यानंतर उपलब्ध रुंदीनुसार काम करण्याचे ठरले. दरम्यान सिमेंट वाळू या मटेरिअयलचे दरात मोठी वाढ झाली आहे. काम पूर्ण होण्याचे दृष्टीने ठेकेदार यांना आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचे अभिप्राय घेऊन सिमेंट व वाळू या मटेरियलमध्ये झालेल्या वाढीमधील फरक आदा करण्यात यावा, तसेच ठेकेदार यांना ३१ ऑगस्ट,२००६ पर्यन्त मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. १४. आरक्षण क्र.२३ बेघरांसाठी घरे जमीन विकत घेणे बाबत**

**निर्णय क्र.५४३. (अ)**मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीच्या सभेत, सर्व्हे नं.२/२, २/३ व ३/४ (लक्ष्मीनगर) मधील क्षेत्र हेक्टर ०१-८८ आर मालकी महाराष्ट्र सरकार यांची (स्मशानभूमी वगळून) जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांना मोफत मिळणेस व लक्ष्मीनगर वसाहत पुनर्वसनासाठी आरक्षण क्रं.२३ सर्व्हे नं. ५४, ५५ जागेबाबत ङ निर्णय क्रमांक १०८(०४) खालीलप्रमाणे झाला आहे :

"... अर्जदारांनी वरील प्रमाणे क्षेत्र हेक्टर ५.०८ आर आहे. पैकी अ.नं. ०१ ते ०५ एकूण हेक्टर १.८३ आर देण्यास तयार आहे.

सर्व सबंधित जमीन मालकांची जमीन भूसंपादनाने वा वाटाघाटीने जमीन खरेदी करणेबाबत उचित कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की,स.न. २/२,२/३ व ३/४ या जमीनी संस्थानला मोफत मिळाव्यात म्हणून शासन व जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच आरक्षण क्र.२३ मधील जमीन खरेदी देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे जमीन घेण्यात यावी. आरक्षण क्रमांक २३ ची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी असे करणेबाबत शिरडी नगरपंचायतीने पाठपुरावा करावा त्यानुसार आजचे सभेत चर्चा होऊन, आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर मधील नागरीकांचे पुनर्वसन करणेसाठी शासन व जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. उपरोक्त जागा शिर्डी गावठणापासून जवळच्या अंतरावर आहे. त्यामूळे सध्याची मोक्याची संस्थानला लगत असलेली जागा साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मिळेल. सदरची जागा संस्थानला अत्यंत आवश्यक आहे.करीता वरीलप्रमाणे जमीन मालकांशी वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रती आर रुपये

१,२५,०००.०० प्रमाणे जमीन खरेदी करणेस, याकामी आवश्यक स्टॅम्प फी, नोंदणी फी व इत्यादी त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. .."

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीच्या सभेत, 'प्रसादालय लगतची शिर्डी येथील लक्ष्मीनगर वसाहत स्थलांतर करणेबाबत' या प्रस्तावावर निर्णय क्रमांक १९१ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, एकूण १ हेक्टर ८९ आर क्षेत्रापैकी सुमारे ४७.१० आर क्षेत्र जमीन तसेच रस्ता व आरक्षण क्र.२५ मधील क्रिडांगणाची आरक्षीत जमीन जमिनमालक सहमतीने देत आहेत ती जमीन खरेदी करणेत यावी. इतर उर्वरीत क्षेत्र भूसंपादनाचे माध्यमातून मिळणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले."

**(ब)** उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दिनांक ०६ एप्रिल, २००६, २० एप्रिल, २००६, २६ एप्रिल,२००६ व २७ मे,२००६ अन्वये आरक्षण क्रमांक २३, २५, १८ मीटर रुंद रस्ता व १२ मीटर रुंद रस्त्यामध्ये येणाऱ्या खातेदारांच्या जमिनी खरेदी करण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे, म्हणून विनंती केली होती.

त्यावर मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक बांध/कावि / ५-१८०/०६, दिनांक ०२ जुन, २००६ अन्वये आरक्षण क्रमांक २३ मधील जमिनी खरेदी करण्याबाबत खालीलप्रमाणे अटी घातलेल्या आहेत :

अट क्रमांक २ : लक्ष्मीनगर वसाहती अंतर्गत १०१ अधिकृत पुर्नवसन करतांना आरक्षण क्रमांक २३ मध्ये प्रत्येकास ०१ (एक) आर जागा व या जागेत ५०० चौरस फुट क्षेत्राचे आरसीसी स्वरुपाचे बांधकाम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मार्फत करुन देण्यात यावे. सदर बांधकामासाठी

नियमानुसार शौचालय, बाथरुम स्वतंत्र असावे. तसेच भविष्यात वर एक मजला बांधकाम करता येईल अशा स्वरुपाचे स्ट्रक्चरल स्टील डिझाईन करुन देण्यात यावे.

अट क्रमांक ३ : आरक्षण क्रमांक २३ मध्येच १०१ व्यतिरिक्त उर्वरित १९० रहिवाश्यांना ०१ रुम किचन संडास व बाथरुम अशा स्वरुपाच्या बांधकामाचा फ्लॅट बांधून देण्यात यावा.

अट क्रमांक ४ : सदर योजनेतील आरक्षण क्रमांक २३ येथे बांधण्यात येणारे १०१ नागरीकांच्या जागा त्यांचे नावावर करण्यात याव्यात. तसेच १९० नागरिकांचे फ्लॅट त्यांचे नावावर करण्यात यावे.

अट क्रमांक ५ : आरक्षण क्रमांक २३ मधील बांधण्यात येणाऱ्या वसाहतीतील रस्ते व खुली जागा नगरपंचायतीच्या नावावर करण्यात यावी. तसेच सदर रस्ते श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी भुयारी गटार कॉंक्रिटीकरण व विद्युत व्यवस्थेसह तयार करुन देण्यात यावे.

अट क्रमांक ६ : वरीलप्रमाणे सर्व बाबींचा आराखडा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी तयार करुन त्यास नगरपंचायतीची परवानगी घेण्यात यावी.

अट क्रमांक ७ : लक्ष्मीनगर वसाहती अंतर्गत विकास योजना १८ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्र नगरपंचायतीकडे विनामुल्य हस्तांतर करावे.

अट क्रमांक ८ : आरक्षण क्रमांक २५ क्रिडांगण व १८ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्राची विकसन यंत्रणा नगरपंचायत असल्याने संस्थान यांनी खरेदी केलेली जागा भविष्यात नगरपंचायतीस आवश्यकता असल्यास भुसंपादन अथवा शासकीय दरानुसार सदर जागा नगरपंचायतीकडे विनातक्रार नगरपंचायतीस द्याव्या लागतील.

अट क्रमांक ९ : आरक्षण क्रमांक २३, २५ व १८ मीटर व १२ मीटर रुंदीच्या रस्त्याचा विकास नगरपंचायतीच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

**(क)** उपरोक्त अटीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :

अट क्रमांक ०२ बाबत, आरक्षण क्रमांक २३ मधील जागा अधिकृत १०१ व अनधिकृत १९० एकुण २०९ व्यक्तींच्या पुर्नवसनासाठी पुरेशी नाही. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक १९१ अन्वये, लक्ष्मीनगर वसाहतीतील मूळ १०१ रहिवाशाकरीता ७५० चौ.फूट जागेत दोन खोल्या अधिक किचन,संडास,बाथरुमसह ४४० चौ.फूट बांधकामाचे रो हाउस व उर्वरीत २१३ अतिक्रमीत रहीवाशांसाठी एक खोली अधिक किचन, संडास, बाथरुम सह प्रत्येक २९२.० चौ.फूट बांधकाम (जीना, समाईक बांधकाम वेगळे ) अशा प्रकारे बांधकाम करण्यात येईल व त्यास नगरपंचायतीने मंजुरी द्यावी, असे दिनांक १२ जुन,२००६ रोजीचे पत्राने विनंती केलेली आहे.

आता, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. आरक्षण क्रमांक २३ मधील बांधण्यात येणाऱ्या वसाहतीतील रस्ते व खुली जागा नगरपंचायतीच्या नावावर करणे तसेच सदर रस्ते भुयारी गटार कॉंक्रीटीकरण व विद्युत व्यवस्थेसह तयार करणे.

०२ लक्ष्मीनगर वसाहतीअंतर्गत विकास योजनेतील १८ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्र नगरपंचायतीकडे विनामुल्य वर्ग करणे.

०३. आरक्षण क्रमांक २५ क्रिडांगण व १८ मीटर रुंद रस्ता, १२ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्र भविष्यात नगर पंचायतीस आवश्यकता भासल्यास भूसंपादन अथवा शासकीय दरानुसार नगरपंचायतीकडे देणे.
आरक्षण क्रमांक २३, २५ व १८ मीटर व १२ मीटर रुंदीच्या रस्त्याचा विकास करणेसाठी नगरपंचायतीची रितसर परवानगी घेणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. १५. नविन प्रसादालय साईटवरील माती परिक्षण (Subsoil Investigation ) साठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५४४. (अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर ८० व ८५ मधील जागेत नियोजित नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकामाचा ठेका आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे यांना इकडील कार्यादेश क्रमांक ५९२१ दिनांक ०३ मे,२००६ नुसार देण्यात आलेला आहे. सदरहू बांधकामाचे जागी बांधकाम ठेकेदार यांनी लाईनआऊटचे काम पूर्ण केलेले असून, मुख्य इमारतीसाठी खोदाईकाम (Mass Excavation) दिनांक २३ मे,२००६ पासून व कम्पाऊंड भिंतीसाठी खोदाईचे काम दिनांक २५ मे,२००६ पासुन सुरु केले आहे.

तसेच, नियोजित नवीन प्रसादालय इमारत बांधकामाचे प्रकल्पासाठी टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि., पुणे यांची इकडील कार्यादेश क्रमांक ६४१५ दिनांक १८ मे,२००५ अन्वये कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार या संस्थेचे प्रतिनिधी ही शिर्डी येथे हजर झालेले आहेत.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे, नियोजित नवीन प्रसादालय इमारत बांधकाम प्रकल्पासंदर्भात, या कामाशी संबंधीत आर्किटेक्ट, बांधकाम ठेकेदार, मॅनेजमेंट कन्सल्टंट, आरसीसी कन्सल्टंट यांचे प्रतिनिधीसमवेत, मा.विश्वस्त सौ.उर्मिला जाधव व संस्थान अधिकारी यांचे उपस्थितीत कामकाजाच्या नियोजनासाठी दिनांक २६ मे,२००६ रोजी शिर्डी येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपरोक्त संबंधीत संस्थांचे प्रतिनिधी हजर होते.

याच बैठकीत, नियोजित नवीन प्रसादालय इमारतीच्या पायासाठी खोली ठरविणेकामी माती परिक्षण (Standard Penetration Test (SPT)) करणे आवश्यक असल्याचे मत आर्किटेक्ट, आरसीसी कन्सल्टंट व मॅनेजमेंट कन्सल्टंट यांनी व्यक्त केले. सदर इमारतीचे पायाचे खोदकाम या परिक्षणावर अवलंबून असल्याने सदर माती परीक्षण तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने, हे माती परिक्षणाचे काम तातडीने करुन घेणेबाबत मा.विश्वस्त सौ.उर्मिला जाधव यांनी सुचना दिल्या.

त्यानुसार, या प्रकल्पाचे मॅनेजमेंट कन्सल्टंट टीसीई , पुणे या संस्थेचे प्रतिनिधींनी, माती परीक्षण (Soil Investigation) करणाऱ्या पुढील दोन संस्थांची नांवे सुचविली.

०१.SoilTech (I) Pvt. Ltd., Pune.

०२. DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai.

**(क)** उपरोक्त <u>परिच्छेद ब</u> मधील माती परीक्षण करणाऱ्या दोन्ही संस्थांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून, त्यांना करावयाचे कामाबाबत सविस्तर कल्पना देण्यात येऊन, या माती परीक्षणाचे कामासाठी दरपत्रके पाठविणेस सांगण्यात आले. त्यानुसार उपरोक्त दोन्ही संस्थांनी आपली दरपत्रके फॅक्सव्दारे पाठविलेली होती. त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे :

| Sr.No. | Name of the Company | Amount Rs. |
|---|---|---|
| 01. | SoilTech (I) Pvt. Ltd., Pune | 60,000/- Plus Taxes Extra |
| 02. | DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai | 49,080/- Plus Taxes Extra |

वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार, DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai यांचे माती परीक्षणासाठीचे दर न्युनतम आहेत. त्यांचे दराने माती परीक्षण करुन घेण्यास येणारे अंदाजे रक्कम रुपये ५५,१००/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार शंभर मात्र ) इतके खर्चास बांधकाम विभागाकडील मंजूर टिपणी दिनांक २७ मे,२००६ अन्वये तत्वतः प्रशासकीय मान्यता घेणेत आली होती. याच मान्यतेनुसार, DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai यांना कार्यादेश जा.क्र. एसएसएस/बांधकाम/७०३४/२००६, दिनांक २९ मे, २००६ रोजी देणेत आलेला होता.

उपरोक्त कार्यादेशानुसार, संबंधीत संस्थेने माती परीक्षणाचे काम तातडीने पूर्ण करुन दिनांक ०१ जुलै,२००६ रोजी माती परीक्षणाचा अंतिम अहवाल सादर केलेला आहे व त्यानुसार बांधकाम ठेकेदार यांनी प्रसादालय इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे.

DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai यांनी माती परीक्षणाचे अंतिम बिल क्रमांक १६०६/०६/शिर्डी, दिनांक २८ जून, २००६ (प्रत्यक्षात दिनांक ०८ जुलै,

२००६ रोजी प्राप्त) सादर केले होते. प्रत्यक्ष परिमाण व दर तपासणीनंतर संबंधीत संस्थेस एकूण रक्कम रुपये ५५,२७२/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार दोनशे बहात्तर मात्र ) अदा करणेत आलेले आहेत.

(ड) उपरोक्त परिच्छेद क मधील विवेचनानुसार, DBM Geotechnics and Constructions Pvt.Ltd., Mumbai या संस्थेकडून नियोजित नवीन प्रसादालय इमारतीचे पायासाठी करुन घेण्यात आलेल्या माती परीक्षणाचे (Standard Penetration Test (SPT)) कामास व त्या कामी आलेला एकूण खर्च रक्कम रुपये ५५,२७२/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१६. पालखी थांब्यासाठी जागेबाबत.**

**निर्णय क्र.५४५. (अ)** मा.सरपंच, ग्रामपंचायत सायाळे यांनी दिनांक ०७ जुलै, २००६ रोजी सायाळे येथे श्री साई भक्तांच्या पालखी थांब्यासाठी दोन एकर जागा देणेबाबत अर्ज दिलेला आहे. त्यासोबत ग्रामपंचायत सायाळे यांच्या दिनांक १० जुलै, २००६ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय क्रमांक ०४ चा वृत्तांत जोडला आहे. सदर वृत्तांतामध्ये खालील बाबी नुमद केलेल्या आहेत :

" .. .. ग्रामपंचायत मालकीच्या जागेची विक्री / हस्तांतरीत करणेसाठी ग्रामपंचायत सदर जागेची विक्री किंवा हस्तांतरील करणेसाठी सक्षम नाही. त्यासाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची परवानगी घेऊनच सदर ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

तसेच ग्रामसभेच्या खालीलप्रमाणे अटी आहेत :

०१. सदर जागेसाठी सेवक वर्ग नेमावयाचे असल्यास स्थानिक तरुणांना प्राधान्य द्यावे.

०२. सदर जागा साईभक्तांच्या गैरहजेरीवेळी सार्वजनिक कार्यक्रम व लग्नसोहळयास खुले असावे.

वरीलप्रमाणे अटीच्या अधिन राहून ही सभा सदर जागा श्री साईबाबा संस्थान शिर्डीला बक्षिसपत्र म्हणून देणेस मान्यता व मंजूरी देत आहे. छ

याबाबत दिनांक १५ जुलै,२००६ रोजी संस्थानचे मोजणीदार यांनी जागेची मोजणी केली. ती प्रत्यक्षात ०० हेक्टर ८२ आर जागा भरते.

गट नंबर ८१९ हा मुळचा शासनाच्या मालकीचा आहे. जागा बक्षिसपत्राने घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी, नाशिक / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची परवानगी घेणेत येत आहे.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. मौजे सायाळे येथील गट नंबर ८१९/१ मधील ०० हे ८२ आर जागा बक्षिस पत्राने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

०२. सदर जागेमध्ये संस्थानने बांधकाम केल्यानंतर देखभाल करण्यासाठी सेवक वर्ग नेमावयाचा असल्यास स्थानिक तरुणांना प्राधान्य द्यावे असे सायाळे ग्रामपंचायतीने नमुद केले आहे, त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

०३. सायाळे ग्रामपंचायतीने सदर जागा साईभक्ताच्या पालख्या ज्या वेळेस येतील ती वेळ सोडून इतर वेळेस सार्वजनिक व लग्नसोहळयास देण्यात यावी, असे नमूद केले आहे. याबाबत निर्णय होणेस विनंती आहे. तसेच अशा रितीने जागा देणेबाबत निर्णय झालातर त्यासाठी शर्ती व अटी ठरविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

०४. सदर जागा बक्षिसपत्राने मिळविणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी, नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेशी तसेच सरपंच सायाळे यांचेशी पत्रव्यवहार करणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

०५. सक्षम अधिकाऱ्याची परवानगी मिळाल्यानंतर, संस्थान वकिलांकडून बक्षिसपत्र तयार करुन घेणेस, बक्षिसपत्र नोंदणी करणेबाबत मुद्रांक व नोंदणी शुल्क, बक्षिस पत्र व इतर कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मंजुरीचा निर्णय होणेस विनंती.

**(ब)** श्री. निवृत्ती तुकाराम शिंदे यांनी दिनांक १२ जुलै, २००६ रोजी त्यांची मौजे सायाळे येथील जमीन गट नंबर ५२८ क्षेत्र ०१ हेक्टर ५० आर अधिक पोटखराबा ०१ हेक्टर ४५ आर अशी एकुण ०२ हेक्टर ९५ आर जमिनीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे:

०१. सदर जमिनीपैकी ०० हेक्टर २० आर जमीन संस्थानला भक्तनिवासाकरीता बक्षीस म्हणून देणेस तयार आहे.

०२. उर्वरित राहणारी जमीन विकत देण्यास तयार आहे, त्यासाठी त्यांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे.

त्यानंतर श्री. निवृत्ती तुकाराम शिंदे यांनी दिनांक १५ जुलै, २००६ रोजीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे प्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे :

०१. गट नंबर ५२८ मधील ०१ एकर जमीन संस्थानला दान म्हणून द्यावयास तयार आहे.

०२. राहिलेली जमीन संस्थानला बाजारभावाने द्यावयास तयार आहे.

गट नंबर ५२८ चा उतारा पाहिला असता, इतर हक्कांत " नियंत्रित सत्ता प्रकार कु. का. ४३ प्रमाणे " अशी नोंद आहे. सोसायटीच्या कर्जाची नोंद आहे. अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे एक एकर (४०

आर) जमीन दान म्हणून तसेच उर्वरित ०२ हेक्टर ५५ आर जमीन विकत घेणे असली तर, याबाबत मा.उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांची परवानगी आवश्यक आहे.

सदरची जमीन कुळ कायद्यान्वये श्री. शिंदे यांना मिळालेली आहे. गट नंबर ५२८ मधील ०१ एकर (४० आर) जमीन दान म्हणून देणेबाबत तसेच उर्वरित ०२ हेक्टर ५५ आर जमीन संस्थानला विकत म्हणून देणेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडे परवानगी मिळणेसाठी दिनांक ०४ ऑगष्ट, २००६ रोजी श्री. शिंदे यांनी अर्ज केलेला आहे.

श्री.निवृत्ती तुकाराम शिंदे यांनी ०० हेक्टर ४० आर जमीन दान म्हणून स्वीकारणेबाबत व उर्वरित ०२ हेक्टर ५५ आर जमीन बाजारभावाने घेणेबाबत अर्ज दिलेला आहे.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

मा.उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांनी परवानगी दिल्यानंतर, मौजे सायाळे येथील श्री. निवृत्ती तुकाराम शिंदे यांची गट नंबर ५२८ मधील क्षेत्र ०० हेक्टर ४० आर जमीन दान म्हणून स्वीकारणेबाबत.

उपरोक्त परिच्छेद अ व ब प्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांनी, मौजे सायाळे तालुका सिन्नर येथील जमीनी दान म्हणून घेणेबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला

०१. उपरोक्त ग्रामपंचायत सायाळे व श्री. तुकाराम निवृत्ती शिंदे यांच्या जमिनी मुंबईहून पालखी घेऊन येणाऱ्या साईभक्तांच्या पालखी थांब्यासाठी उपयुक्त आहेत. या जमिनी ते विनाअट देण्यास तयार असतील तर त्या स्वीकारण्यात याव्यात.

०२. या जमिनी संस्थानला बक्षिसपत्राने घेणेकामी आवश्यक ती सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यात यावी. याकामी संस्थान वकिलांचा अभिप्राय घेण्यात यावा. बक्षिस पत्र व इतर कायदेशीर अनुषंगिक बाबी पुर्ण करणेकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

०३. पदयात्रींसाठी बांधावयाचा पालखी थांबा मौजे सायाळे ग्रामपंचायत यांचेकडून मिळणाऱ्या जमिनीत उभारण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१७. तिर्थक्षेत्रांचे ठिकाणी भक्तांच्या सोयीसाठी धर्मशाळा उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.५४६.** श्री क्षेत्र पंढरपूरला हजारोंच्या संख्येने साईभक्त भेट देतात. विशेषतः आंध्र, कर्नाटक प्रांतातून शिर्डीस दर्शनास येतांना अगर जातांना श्री विठ्ठलाचे दर्शन अवश्य घेतात.

शेगांवचे श्री गजानन महाराज संस्थानने श्री क्षेत्र पंढरपूर या ठिकाणी धर्मशाळा व श्री गजानन महाराज मंदिराची उभारणी केलेली आहे. त्यामुळे भक्तांचे निवास व भोजनाची व्यवस्थाही झाली तसेच श्री गजानन महाराजांचे शिकवणूकीचा प्रचार व प्रसार ही होत आहे.

श्री क्षेत्र पंढरपूर प्रमाणेच श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, श्री क्षेत्र आळंदी, श्री क्षेत्र ओंकारेश्वर (मध्यप्रदेश) या ठिकाणीही श्री गजानन महाराज संस्थानच्या धर्मशाळा आहेत. त्यामुळे भक्तांची मोठया प्रमाणात सोय झालेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी असा उपक्रम राबविल्यास, भक्तांची मोठी सोय होईल. त्यादृष्टीने श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र आळंदी, श्री क्षेत्र ओंकारेश्वर (मध्यप्रदेश) त्र्यंबकेश्वर ,वणी,इत्यादी ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत भक्तांच्या निवासासाठी धर्मशाळा व श्री साईबाबांचे मंदिर बांधणेचा निर्णय झाल्यास जागा पाहणी करुन याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात येईल.

तरी श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, श्री क्षेत्र आळंदी व श्री क्षेत्र ओंकारेश्वर (मध्यप्रदेश) वणी इत्यादी ठिकाणी जागा उपलब्ध करवून, संस्थानमार्फत धर्मशाळा व श्री साईबाबा मंदिर बांधणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१८ साईभक्तांच्या स्वागतासाठी विविध ठिकाणी स्वागत कमानी उभारणीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.५४७.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशाचे सर्व भागातून तसेच विदेशातून मोठ्या प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे येत असतात. शिर्डी येथे जवळ आलो आहोत, याची जाणीव व्हावी याकरीता खालील ठिकाणी आर.सी.सी. कमानी उभारणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ चे सभेत निर्णय क्र. ६६१ अन्वये ठरले आहे.

०१. शिर्डी येथे नगर-मनमाड रोडवर दोन्ही बाजूस

०२. बाभळेश्वर येथे नगर- मनमाड रोडवर

०३. कोपरगांव येथे नगर-मनमाड रोडवर

०४. सिन्नर येथे नाशिक शिर्डी रोडवर

०५. नेवासा फाटा येथे औरंगाबाद शिर्डी रोडवर

उपरोक्तपैकी अ.नं. १ ते ३ ठिकाणी कमानी उभारणे करीता कार्यकारी अभियंता जागतीक बँक प्रकल्प विभाग अ.नगर, अ.नं. ४ येथे कमान उभारणे करीता कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग अ.नगर व अ.नं. ५ करीता कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य.) विभाग अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. मात्र संबधीत विभागांनी खालील कारणांमुळे कमानी उभारणेस परवानगी नाकारली आहे.

**०१) <u>नगर-मनमाड रोडवर</u> :-**

शिर्डी, बाभळेश्वर, कोपरगांव येथील कमानी बाबत दिनांक २०/१२/२००५ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता बँक प्रकल्प अहमदनगर यांनी नगर-मनमाड रस्त्याचे रुंदीकरण/ चौपदरीकरण खाजगीकरणामार्फत होणारी कामे पूर्ण झाल्यानंतर परवानगी देता येणे शक्य होईल. मात्र सद्या स्थितीत परवाणगी देता येणार नाही असे कळविले आहे.

**०२) <u>सिन्नर येथे नाशिक शिर्डी रोडवर कमान उभारणे बाबत</u> :-**

दि. २०/०४/२००५ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी सिन्नर शिर्डी रस्त्याचे रुंदीकरण गृहीत काही अटीची पूर्तता करुन कामास उभारणेस मान्यता दिली होती. त्यांनी नमूद केलेल्या अटींची पूर्तता करुन फेर मंजुरीसाठी इकडील जा.नं.६२०९ दि. १०/०५/२००६ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, नाशिक यांचे फेर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र जा.नं. ७८०९ दि. २२/०५/२००६ पत्रान्वये कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे की, सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहती पर्यंतचा रस्ता भविष्यात चौपदरी करण्याचे काम प्रस्तावीत आहे. आज कमानीच्या जागेवर ७.०० मी. रुंदीचा डांबरी प्रकल्प रस्ता असून सदर जागेवर आर.सी.सी. प्रकारची पक्की कमान आजमितीस उभारणे योग्य होणार नाही कारण सदर कमानीचा मध्यपाद रस्त्याच्या मध्यावर आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होणार आहे. त्यामुळे तेथे तात्पुरत्या स्वरुपाची व रस्त्याचे रुंदीकरण सुरु झाल्यास काढून घेता येईल अशा प्रकारची कमान आजमितीस उभारणे योग्य राहील असे कळविले आहे.

**०३) <u>नेवासा फाटा येथे औरंगाबाद शिर्डी रोडवर कमान उभारणे बाबत :-</u>**

दि. ०६/०६/२००६ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता रो.ह. यो. (कार्य ) विभाग अहमदनगर यांनी नेवासा फाटा येथे स्वागत कमानीस परवानगी देताना आपणास २०० मीटर रस्ता चौपदरीकरण करणे आवश्यक आहे. व रस्त्याचे मध्यभागी दुभाजक व रा.मा.६० वर फनिंग करणे ही कामे करणे देखील आवश्यक राहील या कामासाठी अंदाजीत रक्कम रु. १४.२८ लक्ष खर्च येणार असल्याचे कळविले आहे. सदर कामे करण्यास संस्थानची सहमती असल्यास मुळ प्रस्ताव कार्यालयीन मंजुरीसाठी वरीष्ठाना सादर करणेत येईल असे कळविले आहे.

याबाबत मा. नामदार श्री. छगनरावजी भुजबळ, मंत्री सा.बां.विभाग हे दि. १२/११/२००५ रोजी शिर्डी येथे आले असता त्यांना शिर्डी येथे येणाऱ्या प्रमुख राजमार्गावर स्वागत कमानी उभारणे कामी संबधीत विभागीय कार्यलयांना सूचना देणेबाबत विनंती करण्यात आलेली होती. तसेच त्यांना जा.नं. एसएसएसटी/वशी-बांधकाम/२००५ दि. १२/११/२००५ चे पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

तरी संबधीतांनी उपरोक्त प्रमाणे शिर्डी, बाभळेश्वर व कोपरगांव येथे कमानी उभारणेस रस्ता रुंदीकरणामुळे मंजुरी नाकारण्यात आलेली आहे. सिन्नर येथे तात्पुरत्या स्वरुपाची व काम झाल्यानंतर काढून घेता येईल, अशाप्रकारची कामानी उभारणे बाबत व नेवासा फाटा येथे कमानीचे कामा व्यतिरिक्त दुभाजक व फनिंग करणे बाबत येणारे जादा रु. १४.२८ लक्ष जादा खर्चाची सहमती असल्यास प्रस्ताव वरीष्ठांना सादर करता येईल असे कळविले आहे

**०४. <u>मा.कार्यकारी अभियंता यांनी पाठविलेला अहवाल</u> :-** दि. १९/०७/२००६ राजीचे पत्रान्वे कार्यकारी अभियंता, जागतीक बँक, अ.नगर यांनी कळविले आहे की, कोपरगांव व अहमदनगर रा.मा.१० व अहमदनगर औरंगाबाद रा.मा.क्र.६० या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम लवकर सुरु करण्यात येत असल्याने आर.सी.सी. प्रकारची पक्की कमान आजमितीस उभारणे योग्य होणार नाही. कारण सदर कमाणीचा मध्यपाद रस्त्याचे मध्यावर असल्याने वहातुकीस अडथळा निर्माण होणार आहे. त्यामुळे तेथे तात्पुरत्या स्वरुपाची व रस्त्याचे रुंदीकरण सुरु झाल्यास काढून घेता येईल अशा प्रकारची कमान आजमितीस उभारणे योग्य होईल".

तरी उपरोक्त सहाही ठिकाणी पक्या कमानी न उभारता रस्ता रुंदीकरणाचे वेळेस त्यामध्ये सुधारणा करुन पुन्हा उभारता येतील अशाप्रकारच्या कमाणी उभारणे कामी आर्किटेक्ट यांचेकडून नव्याने प्लॅन व एस्टीमेट मागविणेस व ठेकेदार मे.गुगळे कंन्स्ट्रक्शन अ.नगर यांना देण्यात आलेला कार्योदेश रद्द करुन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे बाबत मा. अध्यक्ष सो., यांचेशी चर्चा झाली आहे.

त्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

०१ आर.बी रंगदास, औरंगाबाद
०२ एम.एस.आय.डी.सी अ.नगर,
०३ पन्हाळे पी.व्ही., लातूर
०४ गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर
०५ अरहिंत मेटल, नाशिक

उपरोक्त ठेकेदरांपैकी खालील तीन ठेकेदारांनी सिलबंद निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | पन्हाळे पी.व्ही., लातूर |
| ०२. | एम.एस.आय.डी.सी अ.नगर, |
| ०३. | गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर |

या व्यतिरिक्त मे.आलाप कंन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी संस्थानमधून कोरे निविदा फॉर्म न घेता निविदा सादर केली असल्यामूळे त्यांची निविदा विचारात घेण्यात आली नाही.

वरीलप्रमाणे मे.आलाप कंन्स्ट्रक्शन,नाशिक यांचे व्यतिरिक्त प्राप्त झालेल्या तीन ठेकेदारांच्या निविदा आजचे सभेत उघडण्यात आल्या .बांधकामाची अंदाजित रक्कम रुपये ३४,९१,२४८.०० इतकी आहे. सदर रकमेनुसार ठेकेदार यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | पन्हाळे पी.व्ही., लातूर | १५.३०% अधिक |
| ०२. | एम.एस.आय.डी.सी अ.नगर, | १९.००% अधिक |
| ०३. | गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर | १४.४०% अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर यांचे निम्नतम दराची (१४.४०% अधिक) निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. १९. श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता क्ष-किरण मशिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५४८.** श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता सन १९९१ साली एक ३०० एम.ए. इमेज इन्टीसीफायर ट्युबसह क्ष-किरण मशिन साईभक्त श्री. राजु बतरा यांनी देणगी म्हणून दिले होते. त्यावेळेस सदर मशिनची किंमत रु. १६,००,०००/- इतकी होती. सदर मशिन १५ वर्षापुर्वी जुने असून त्यांचे ४ फोकस पैकी ३ फोकस खराब झालेले आहे. त्यामुळे ते व्यवस्थित काम देत नाही. त्यामुळे दैनंदिन कामकाज सुरळीत होत नाही. तेंव्हा ते कंपनीस परत करुन (Buyback) त्या बदली नविन ५०० एम.ए. मशिन घ्यावयाचे आहे.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयात असलेले एक पोर्टेबल मशिन सध्या श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब ओ.टी. मध्ये वापरण्यात येत आहे. सदरचे मशिन कॅथलॅब ओ.टी. मध्ये ठेवून श्री साईनाथ रुग्णालयाकरीता एक नविन पोर्टेबल व एक ५०० एम.ए. मशिन खरेदी करणेबाबत दि. ७/७/२००६ चे टिपणी अन्वये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचे मशिनरी विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी खालीलप्रमाणे अंदाजे रु. ३०,००,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | मशिनचे नाव | मागणी | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १ | X-Ray Machine with immage intensifier Tube 500 MA | ०१ | २५,००,०००.०० |
| २ | Portable 10 MM | ०१ | ५,००,०००.०० |
| | | एकुण - | ३०,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास तत्वतः मान्यता देणेत आली. श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता कोणते क्ष-किरण मशिन खरेदी करावे याबाबत उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालय)

**विषय नं. २०. श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाबाबत नियमावली.**

**निर्णय क्र.५४९.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०६.२००६ रोजी शिरडी येथे झालेल्या उपसमितीचे सभेत नव्यानेच सुरु झालेल्या श्री साईबाबा हॉस्पिटल व पूर्णपणे कार्यान्वीत असलेले श्री साईनाथ हॉस्पिटल यांच्यामध्ये योग्य तो समन्वय आणून कार्यात सुसूत्रता आणणे कामी खालीलप्रमाणे नियमावली निश्चित करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. अपघात विभाग फक्त श्री साईबाबा रुग्णालयातच चालू राहिल कारण साईबाबा रुग्णालय शहराच्या मध्यवर्ती भागात असून बसस्थानकासमोर आहे, व रुग्णाच्या सोयीचे आहे. रुग्णाची तब्येत

अपघात विभागात स्थिर झाल्यानंतर त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार साईनाथ अथवा साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात येईल. (दि.०३.०५.२००६, निर्णय क्र.३०८ चे इतिवृत्त).

०२. सर्व स्पेशालिस्ट, सुपर स्पेशालिस्ट व आर. एम. ओ. हे संस्थानचे वैद्यकिय अधिकारी असतील आणि गरजेनुसार ते दोन्ही दवाखान्यात काम करतील.

०३. साईनाथ हॉस्पिटलमधील बाहयरुग्ण विभाग हा Intern डॉक्टर्स आणि आर.एम.ओ. यांनी चालवायचा आहे, यातून जे रुग्ण स्पेशालिस्ट डॉक्टर्सना दाखवायचे आहेत तेवढेच रुग्ण स्पेशालिस्ट डॉक्टर्स तपासतील, जेणेकरुन स्पेशालिस्ट डॉक्टरांवरील प्रत्येक रुग्ण तपासण्याचा ताण कमी होईल व फक्त गरजू लोकांना स्पेशालिस्ट डॉक्टरांची सेवा मिळेल.

०४. साईनाथ हॉस्पिटलमधील रुग्णांना स्पेशालिस्ट डॉक्टरांचे शुल्क परवडत असल्यास साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती करुन त्यांच्यावर उपचार करण्यात येतील व त्यांचा योग्य तो मोबदला संबंधित डॉक्टरांना संस्थानच्या नियमाप्रमाणे देण्यात येईल.

०५. सुपर स्पेशालिस्ट सेवा हि फक्त साईबाबा रुग्णालयातच उपलब्ध राहिल व त्यामध्ये कोणत्याही प्रकारची सूट देणे योग्य होणार नाही. सध्या सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर्स साईबाबा रुग्णालयात बसून आपली सेवा देतात, सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर्स साईनाथ रुग्णालयात सुध्दा सुविधा उपलब्ध असल्यास तिथे उपचार करतील. त्यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही.

०६. साईनाथ रुग्णालय हे अत्यल्प शुल्क आकारत असल्यामुळे त्याचा उपयोग जनरल हॉस्पिटलप्रमाणे गरीबांसाठीच करण्यात यावा. जे आर्थिक दृष्टया सबळ आहेत त्यांना साईबाबा रुग्णालयात सशुल्क उपचार देण्यात यावेत.

०७. ठरावाप्रमाणे २०% जागा मोफत उपचारासाठी जनरल वॉर्ड मध्येच उपलब्ध राहातील, चॅरिटीचा कोणताही रुग्ण प्रायव्हेट, सेमी डिलक्स, डिलक्स अथवा आय.सी.यू. मध्ये ॲडमीट होणार नाही, कारण त्याचा खर्च हॉस्पिटलच्या आवाक्याबाहेरचा आहे.

०८. साईबाबा हॉस्पिटलमध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर्स, कन्सलटंट, सर्जन यांच्या सल्ल्यानंतरच पेशंटला ॲडमीट केले जाईल.

०९. पेशंटला ॲडमीशन देणे निश्चित झाल्यानंतर त्यांचे आर्थिक कुवतीनुसार त्यांचे स्वेच्छेने वेगवेगळया सोयीनुसार त्यांना त्या त्या विभागात भरती करण्यात येईल.

१०. ज्या रुग्णांकडे आर्थिक दृष्टया दुर्बल असलेबाबतचे शासनाचे वितरीत केलेले कार्ड असेल व सकृतदर्शनी तो खरोखरच आर्थिक दृष्टया दुर्बल वाटत असेल याची खात्री करुनच त्याला साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठरलेल्या २०% च्या सवलतीत विनामोबदला जनरल वार्डमध्ये कोटा शिल्लक असेल व साईनाथ रुग्णालयात जागा उपलब्ध नसेल तर साईनाथ रुग्णालयाचे अधिक्षकाचे शिफरशीनुसार त्यांस साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रवेश देण्यात यावा.

११. साईबाबा हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या तपासण्यांमध्ये कुठलीही सवलत देता येणार नाही. मात्र सवलतीच्या (संस्थानने ठरवून दिलेल्या) दरातच तपासणी करता येईल.

१२. जनरल आय.सी.यू. मध्ये (साईबाबा हॉस्पिटलमध्ये) ठरल्याप्रमाणे एकूण कॉटच्या २०% कॉट हया विनामोबदला ठेवण्यात येतील, त्या शिल्लक असतील तरच त्यांना ॲडमीशन दिले जाईल. उर्वरित सर्व कॉट हया Paying स्वरुपाच्या असतील.

१३. अँजोग्राफी व व्हेंटिलेटरसाठी कुठलीही सवलत दिली जाणार नाही.

१४. अँजोप्लास्टी व बाय पास सर्जरी मध्ये ५०% पर्यन्त सवलत ही २०% आर्थिक दुर्बल लोकांना देण्यात येईल. ज्यांचे आर्थिक वार्षीक उत्पन्न रु. ५०,०००/- पेक्षा कमी आहे यांनाच या सवलतीचा फायदा घेता येईल. यासाठी सर्व योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता होणे गरजेचे आहे. कुणी खोटी माहिती देवून संस्थानची फसवणूक करुन सवलत घेतल्याचे लक्षात आले किंवा कुणी तक्रार केल्यास त्यांचेवर व त्यांची शिफारस करणारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१५. ज्या रुग्णांना कुणीही वारस नाही व तो अतिशय गरिब आहे अशा रुग्णांना १००% सवलत देण्यात येईल. माहिती खोटी आढळल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१६. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर असलेल्या अवलंबितांना साईबाबा हॉस्पिटलचे जनरल वॉर्डमध्ये सर्व तपासण्या व सर्व सुविधा विनामुल्य रहातील. त्यांनी त्यावरील सेमी डिलक्स, डिलक्स वॉर्डची मागणी केल्यास त्यांना त्याचे आकाराचा फरक भरावा लागेल.

१७. ज्या सुविधा संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध आहेत व त्या सुविधा संस्थान कर्मचाऱ्याने इतर रुग्णालयात घेतल्यास त्या रकमेची परतफेड करण्यात येऊ नये.

१८. संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात द्यावयाचे सोयी सवलतीबाबत नियमावली तयार करुन त्यास व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी .

या विषयावर चर्चा होत असताना मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी, यांनी या नियमावलीमध्ये अजुनही काही सुधारणा करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू नियमावलीची प्रत सर्व मा.विश्वस्तांना पाठविण्यात यावी व त्याबाबत त्यांचेकडून सुधारणा/मार्गदर्शन मागविण्यात यावे, असें ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं. २१. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आकारण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवांच्या दरांबाबत...**

**निर्णय क्र.५५०.** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना आकारावयाचे सेवादरांची निश्चिती करणेबाबत विविध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्या आधारे सदर हॉस्पिटलमध्ये आकारावयाचे दरांचा प्रस्तावित तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०५/२००६ चे उपसमितीचे सभेत मांडण्यात येउन दरांबाबतची निश्चिती करण्यात आली. सदर विषय दि.०३/०६/२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होत असतांना मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी त्यात काही दुरुस्तीपर सूचना सुचविल्या होत्या.

उपरोक्तप्रमाणे सुचविलेल्या दुरुस्त्यांसह फेरबदल केलेल्या दरांची सूची ती सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवण्यात आली आहे त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं. २२. डोळयांच्या शस्त्रक्रिया बाबत.**

**निर्णय क्र.५५१.** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदू या विकारावर इलाज करण्यासाठी फेको इमाल्सि फायर हे अद्ययावत मशिन बसविण्यात आले आहे. या मशिनचे कामकाज सुरु करण्यासाठी डॉ.नागेंद्र शहा, नेत्ररोग तज्ञ,बॉम्बे हॉस्पिटल हे दि.०८/०७/२००६ रोजी आले होते व त्यांनी खालीलप्रमाणे दोन शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. सदर शस्त्रक्रिया मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी मोफत करण्याचे आदेश दिले असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | लाभार्थी पेशंटचे नाव | Sex | वय | OPD No. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती सरस्वती बाबूलाल सोनजे | स्त्री | ६० | ७८० |
| ०२ | श्री शिवाजी पांडुरंग काळे | पुरुष | ५५ | ७८१ |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २३. डॉक्टरांच्या देय मोबदल्याबाबत.**

**निर्णय क्र.५५२.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध प्रकारच्या रुग्णसेवा सुरु झाल्या आहेत. या सेवांची दर निश्चिती करतांना रुग्णांवर उपचार करणा-या डॉक्टरांना बीलातील रक्कमेतून काही प्रमाणात हिस्सा देण्याचे तत्व दि.२५/०५/२००६ रोजी आयोजित मा.उपसमितीचे व दि.०३/०६/२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये तत्वतः मान्य झाले होते. दि.१४/०६/२००६ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी डॉ.संजय पटवर्धन, वैदयकीय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांना मुंबई येथील प्रत्यक्ष भेटीत याबद्दल समक्ष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दरपत्रकाची (Schedule of charges) ची सुधारीत आवृत्ती बनविण्यात आली आहे. त्यात डॉक्टरांना देण्यात येणारा हिस्साही ठरविण्यात आला असून डॉक्टरांना कामाच्या टक्केवारीनुसार होणारा मोबदला देताना मानद डॉक्टर्स व पूर्णवेळ डॉक्टर्स असा भेदभाव न करण्याबाबतही मा.डॉ.तिवारी यांनी स्पष्ट आदेश दिलेले आहेत.

त्यातील विविध सुत्रांनुसार येथे सेवा देणा-या डॉक्टरांना अदा करणे बाकी असलेल्या माहे फेब्रुवारी २००६ ते जून २००६ पर्यंतच्या देय रकमेचा तक्ता मा.वित्त व्यवस्थापक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांनी सादर केला होता. सदर तक्त्यानुसार संबंधित डॉक्टर्सना त्यांचे कामाचे हिस्स्याप्रमाणे देय रक्कम अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच येथूनपुढेही ठरलेल्या दराने डॉक्टरांना देय मोबदला देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**विषय नं. २४. जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीबाबत.**

**निर्णय क्र.५५३.** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलच्या जैव वैद्यकीय घन कचरा व विल्हेवाट लावणेसाठी इन्सीनरेटर व ऑटोक्लेव्ह यांची उभारणी केली आहे. सदर इन्सीनरेटर मशिन व ऑटोक्लेव्ह सिस्टीम बाबत महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर व नाशिक यांनी खालील प्रमाणे आक्षेप घेतलेले आहेत. तसेच पत्र क.मप्रनिमं/उपाका/अ.न./६१३ दि.१७.०६.२००६ अन्वये सदरचे इन्सीनरेटर प्लँट अद्यावत करण्यात यावा असे सुचविले आहे.

१. इन्सीनरेटर मशिन हे श्री साईबाबा मंदिरापासून अवघे २०० /३०० मीटर अंतरावर आहे . व त्यास कुठलेही हवा प्रदुषण नियंत्रण संयंत्र बसविलेले नाही, त्यामुळे साईभक्त व रहिवाशी नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब अतिशय गंभीर आहे.

२. इन्सीनरेटर मशिनला हवा प्रदुषण नियंत्रण यंत्रणा उदा - व्हेंच्योरी स्कबर जोडलेले नाही.

३. इन्सीनरेटर मशिनच्या तापमानाची नोंद घेण्यासाठी चार्ट रेकॉर्डर असायला हवा.

४.सांडपाणी प्रकिया संयंत्र असणे आवश्यक आहे .

५.ऑटोक्लेव्हला शेडर असणे आवश्यक आहे .

६. कचऱ्याची वर्गवारी करुन विशिष्ट रंगाच्या पिशव्यामधुन कचरा गोळा करण्यात यावा.

तसेच दि.११.०७.२००३ रोजी महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळ , नाशिक यांचे रिजनल ऑफिसर श्री.मिरासे साहेब यांनी सदर इन्सीनरेटर व ऑटोक्लेव्ह सिस्टीमच्या प्रत्यक्ष पाहणी करुन दिलेल्या अहवालात खालील प्रमाणे निरिक्षणे नोंदविलेली आहेत.

१.हॉस्पीटलसाठी सांडपाणी प्रकिया संयंत्र उपलब्ध नाही.

२.हॉस्पीटलमध्ये निघणारे सांडपाणी नगरपंचायत ड्रेनेज सिस्टीममध्ये सोडण्यात येते.

३. दोन्ही हॉस्पीटल, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल यांनी जैव वैद्यकीय घन कचरा हाताळणी व व्यवस्थापन बाबत महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळाची स्वतंत्रपणे मान्यता घेतलेली नाही.

४.वरील कारणांमुळे महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळ ऑथोरीटीने सदरच्या इन्सीनरेटर / ऑटोक्लेव्ह सिस्टीममध्ये महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळांच्या मार्गदर्शक सुचनानुसार सुधारणा / अद्यावत होईपर्यंत तसेच दोन्ही हॉस्पीटलला जैव वैद्यकीय घनकचरा हाताळणीसाठी स्वतंत्रपणे मान्यता मिळेपर्यंत तातडीने जवळच्या महाराष्ट् प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मान्यता प्राप्त सामुदायीक जैव वैद्यकीय घन कचरा हाताळणी व विल्हेवाट लावणाऱ्या व्यवस्थेशी संलग्न होण्याविषयी सुचना केली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ उपप्रादेशिक कार्यालय अहमदनगर यांनी पत्र क.मप्रनि/उपाका/ ६१३ दि.१७.०३.२००६ नुसार पाठविलेल्या केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने बायोमेडीकल वेस्ट इन्सीनरेटर मशिन प्लँटबाबत ठरविलेली मार्गदर्शक तत्वे पाठविली आहेत. त्यानुसार सध्याची जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणेकामी असलेली व्यवस्था (इन्सीनरेटर व ऑटोक्लेव्ह) सध्याच्या हॉस्पीटलमध्ये असण्याऐवजी नगरपंचायत हद्दीपासून दोन किमी अंतरावर असणे आवश्यक आहे . तसेच सध्याची व्यवस्था अद्यावत करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ) भांडवली खर्च

| अ.नं. | तपशिल | खर्च रु. |
|---|---|---|
| ०१ | व्हेंच्योरी स्क्रबर | ४,००,०००.०० |
| ०२ | सांडपाणी प्रकीया संयंत्र व्हेच्योरी स्कबरसाठी | १,७५,०००.०० |
| ०३ | ऑटोलोडींग सिस्टीम | २,००,०००.०० |
| ०४ | ऑटोमॅटीक कन्टोल पॅनल | १,००,०००.०० |
| ०५ | टेम्प्रेचर चार्ट रेकॉर्डर | २५,०००.०० |
| ०६ | चिमणी उंची ३० मीटर x १/२ मीटर | २,५०,०००.०० |
| ०७ | श्रेडर | १,२५,०००.०० |
| | एकुण रू. | १२,७५,०००.०० |

वरील प्रमाणे सध्याचे जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणेकामी असलेली व्यवस्था नविन ठिकाणी स्थलांतरीत होईपर्यंत व प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदरची व्यवस्था अद्यावत करण्याचे काम पुर्ण होईपर्यंत जवळच्या सामुदायीक जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणाऱ्या संस्थेस सदरचा घनकचरा देण्यास हरकत नाही. असा निष्कर्ष मा.वैद्यकीय संचालक साहेबांनी वरील माहिती अभ्यासुन व दि.०१.०८.२००६ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या रिजनल ऑफिसर श्री. मुंडे यांचेशी झालेल्या चर्चेनंतर काढला आहे.

अशा प्रकारच्या जैव वैद्यकीय घन कचरा हाताळणी करणाऱ्या एकुण तीन कंपन्यांकडून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलच्या एकुण बेड क्षमतेसाठी (एकुण १५० + २०० = ३५०) दर मागविण्यात आले आहेत ते खालील प्रमाणे -

| अ.नं. | कंपनीचे नांव | दर | इतर चार्ज | एकुण खर्च / महिना |
|---|---|---|---|---|
| १ | मे.बायोक्लीन सिस्टीम, अहमदनगर | ३२०००.०० | | ३२०००.०० |
| २ | मे.वॉटर गॅस बायोमेडीकल मॅनेजमेंट, जालना | २.७५ प्रती बेड प्रती दिन x ३५० x ३० = २८८७५.०० | २००००.०० | ४८८७५.०० |
| ३ | मे.अतुल एन्व्हॉरमेंटल सर्व्हीसेस, नाशिक | ३.०० प्रती बेड प्रती दिन x ३५० x ३० = ३१५००.०० | ५००.००प्रती दिन | ३१५००.००+१५०००.००= ४६५००.००- (१५ टक्के डिस्काऊंट) = ३९५२५.०० |

यावरुन असे दिसते की, मे.बायोक्लीन सिस्टीम, अहमदनगर यांचे दर निम्नतम आहेत. तथापी मे.बायोक्लीन सिस्टीम, अहमदनगर हे दोन दिवसातून एकदा कचरा घेऊन जाणार आहे. म्हणजे त्यांचेकडून कचरा घेऊन जाणेसाठी दोन दिवसापेक्षा जास्त उशिर होऊ शकतो. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून अजुन एक कॉन्टॅक्टर यांना देखील सदरचे कॉन्टॅक्ट देण्यात यावेत जेणेकरुन दैनंदिन कचऱ्याचे विल्हेवाट होऊ शकेल.

वरील तीनही कॉन्टॅक्टर यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नांव | देऊ केलेले दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | मे.बायोक्लीन सिस्टीम, अहमदनगर | ३२०००.०० | ३२,०००.०० |
| २ | मे.वॉटर गॅस बायोमेडीकल मॅनेजमेंट, जालना | ४८८७५.०० | अनुपस्थित |
| ३ | मे.अतुल एन्व्हॉरमेंटल सर्व्हीसेस, नाशिक | ३३९५२५.०० | ३३९५२५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.बायोक्लीन सिस्टम, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २५. सांडपाणी प्रक्रिया संयंत्र उभारणीबाबत.**

**निर्णय क्र.५५४.** श्रीसाईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सांडपाणी हे सध्या सेफ्टीक टँकद्वारे बायोडिग्रेडेशन होऊन पुढे ते नगरपंचायतीच्या ड्रेनेजमध्ये सोडले जाते. ही सविस्तर माहिती महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाच्या फिल्ड ऑफिसर श्री.मिरासे यांना त्यांच्या आदेशावरुन देण्यात आली . यावर त्यांनी हे स्पष्ट केले आहे की, हॉस्पीटलचे प्रदुषीत व सांसर्गीक सांडपाणी हे सेफ्टीक टँकद्वारे बायोडिग्रेडेशन होऊन पुढे ते नगरपंचायतीच्या ड्रेनेजमध्ये सोडणे बेकायदेशीर आहे. सदर सांडपाण्याची विल्हेवाट ही सांडपाणी प्रक्रीया संयंत्राद्वारे त्यावर प्रक्रिया करुन नंतरच नगरपंचायतीच्या ड्रेनेजमध्ये सोडता येऊ शकते.

सध्या दोन वेगळे हॉस्पीटल अंदाजे १ किमी अंतरावर असलेमुळे अशा दोन संयंत्राची उभारणी करणे आवश्यक आहे. सदर सांडपाणी प्रक्रीया संयंत्राच्या उभारणीकामी प्रत्येक हॉस्पीटलसाठी अंदाजे रु.३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर सांडपाणी प्रक्रीया संयंत्राला दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नाही व जैव वैद्यकीय घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) सन १९९८ या कायद्याच्या द्दष्टीने हे आवश्यक आहे. यापुर्वी आपल्याकडून अजाणता या कायद्याचे उल्लघन झाले असले तरी यापुढे मात्र आपणास याबाबतीत लवकारात लवकर कार्यवाही करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिले असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दोन्ही रुग्णालयांसाठी एकच सांडपाणी प्रक्रिया सयंत्र उभारणेत यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका/बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. २६. वैद्यकीय बीलात सवलत मिळणेबाबत, श्रीमती अनुसया रमणीक ठक्कर, नाशिक, श्री.इलियास चाँदभाई शेठ, अहमदनगर, श्री.काशिनाथ धुळाजी बनसोडे, पारेगाव बु।। ता.संगमनेर व सौ.भाग्यश्री पुरुषोत्तम रेडगांवकर,नाशिक यांच्या अर्जांबाबत.**

**निर्णय क्र.५५५.** अ) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये श्रीमती अनुसया रमणिक ठक्कर,नाशिक यांनी ह्रदयरोग उपचारासाठी ॲंजिओग्राफी करण्यासाठी रुपये ६०००/- व रुपये ५०,०००/- असे एकूण रुपये ५६,०००/-दिनांक १७.०६.२००६ रोजी भरलेले होते. व त्यानुसार उपचारही झालेले आहेत.

सदर रुग्णाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने मा.अध्यक्ष श्री जयंत मुरलीधर ससाणे यांनी दिनांक १८.०६.२००६ रोजीचे पत्रान्वये श्रीमती अनुसया रमणिक ठक्कर यांच्या वैद्यकीय बिलामध्ये रुपये १०,०००.०० सवलत देण्याची शिफारस केलेली आहे.

ब) श्री.इलियास चाँदभाई शेठ रा.अहमदनगर यांचे अँजिओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी रुपये ६०,०००/- खर्च येणार असून त्यासाठी त्यांनी रुपये ३०,०००/- हॉस्पिटलकडे आगाऊ जमा केलेले असून,ऑपरेशन पूर्वी रुपये १०,०००/- जमा करणार आहेत. उर्वरित रुपये २०,०००/- इतर धर्मदाय संस्थाकडून परस्पर मदत म्हणून आपलया हॉस्पिटलमध्ये जमा होणार आहेत अशी अपेक्षा आहे. तथापि मदत रक्कम रुपये २०,०००/- येण्यापूर्वी ऑपरेशन करणेबाबत मा.अध्यक्ष श्री जयंत मुरलीधर ससाणे यांनी दिनांक ११.०७.२००६ रोजीचे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. यदाकदाचित मदत रक्कम रुपये २०,०००/- जमा न झाल्यास रुग्णाचे जावई श्री.मुनिरखान पठाण, संचालक,श्रीरामपूर पिपल्स बँक, श्रीरामपूर यांनी उर्वरित रक्कम जमा करण्याची लेखी हमी घेतलेली आहे.

क) श्री.काशिनाथ धुळाजी बनसोडे,वय ७४ हे त्यांची ह्रदय शस्त्रक्रिया आपल्या श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये करुन घेऊ इच्छित आहेत. आपल्या ह्रदयरोग तज्ञांच्या सल्ल्यानुसार शस्त्रक्रियेचा अंदाजे खर्च रुपये ७६,०००/- सांगितलेला आहे. सदर रुग्ण हे गरीब शेतकरी असून, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे. त्यांच्या शस्त्रक्रियेचा रुपये ७६,०००/- हा खर्च त्यांच्या कुवतीबाहेरचा आहे. तरी त्यांनी नातेवाईक व मित्र परिवार यांचेकडून रुपये ५०,०००/- जमा केलेले आहेत. त्यांची अद्याप शस्त्रक्रिया होणे बाकी आहे. तथापि उर्वरित रक्कम रुपये २६,०००/- ची तरतुद करणे त्यांना शक्य नाही, असे त्यांनी दि.१५.७.२००६ चे विनंती अर्जात म्हटलेले आहे. तसेच मा.अध्यक्ष श्री जयंत मुरलीधर ससाणे यांनी कमीत कमी दर आकारणी करुन शस्त्रक्रिया करावी अशी शिफारस केलली आहे.

तरी श्री.काशिनाथ धुळाजी बनसोडे यांना रुपये २६,०००/- विशेषबाब म्हणून सवलत देणेस मान्यता असावी.

ड) श्री.पुरुषोत्तम त्र्यंबक रेडगावकर, रा.नाशिक यांनी त्यांची पत्नी सो.भाग्यश्री पुरुषोत्तम रेडगावकर यांचे कॅन्सरचे आजारावरील उपचाराकरिता संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेल असून सदरचा अर्ज दिनांक १५.३७.२००६ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. सौ.भाग्यश्री या कॅन्सरचे विकाराने आजारी असून, नामको चॅरिटेबल ट्रस्टचे कॅन्सर हॉस्पिटल, नाशिक या रुग्णालयात उपचार घेत आहे. या उपचारासाठी रुपये १,००,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र संबंधित रुग्णालयाने दिलेले आहे.

परंतू श्री.रेडगांवकर यांनी यापुर्वीही सन १९९९ मध्ये सौ.भाग्यश्री यांचेकरिता संस्थानकडे अनुदान मागणी अर्ज केलेला असून, सदरचे अर्जास अनुसरुन रुपये १८००/- टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई या रुग्णालयाचे नावे दिनांक २६.४.१९९९ रोजी पाठविण्यात आलेले आहेत व या रकमेचा उपयोग सौ.भाग्यश्री यांचे उपचाराकरिता करण्यात आलेला आहे.

संस्थानेच वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील नियम क्र.११ अन्वये प्रत्येक रुग्णास संस्थानतर्फे दिले जाणारे अनुदान हे एकदाच देण्यात येईल. पुन्हा अनुदान मागणी अर्ज आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही असा उल्लेख केलेला आहे.

तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.५.५.२००६चे पत्रान्वये संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान योजनेस मान्यता दिलेली असून, त्यामध्ये वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आदेश दिलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ५.११.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६६५ अन्वये फक्त संस्थान वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावेत. नियमावलीत न बसणारे अर्ज मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत, असे ठरलेले आहे.

सौ.भाग्यश्री यांना पुन्हा अनुदान देणेबाबत मा.विश्वस्त श्री.शैलश कुटे यांनी शिफारस केलेली असून, त्यांचे मते एका रुग्णाने जर एकाच आजारासाठी दोन वेळेस अर्ज केलेला असेल तर दोन्ही अर्जास मिळून संस्थान देत असलेल्या रुपये २०,०००/- चे कमाल मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात हरकत नाही. तसेच सदरचे प्रकरण खास बाब म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे विचारार्थ ठेवणेबाबत दि.२.८.२००६ रोजी दूरध्वनीवरुन कळविलेले आहें.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त **अ,ब,क** या प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच **ड** बाबत उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं. २७. व्हेन्टीलेटरसाठी Non Invasive Software बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.५५६.** श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता लागणारे व्हेन्टीलेटर हि उपकरणे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ निर्णय क्र.३३२ अन्वये मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र.९३८५ दि.३१.०८.२००५ खरेदी करण्यात आले होते.

| Sr.No. | Name of Ventilator | Qty .Purchased | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Servo S Ventilator | 8 | 8,75,000.00 | 70,00,000.00 |
| 2 | Servo I Ventilator | 4 | 10,00,000.00 | 40,00,000.00 |
| | | | Total Rs.- | 1,10,00,000.00 |

सदरचे सॉफ्टवेअर बसवणेकामी डॉ.बंडोपध्याय यांनी कंपनीस विचारणा केली होती. त्यानुसार मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.लि.,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.MCC/WR/१२१/०६ दि.०७.०७.२००६ अन्वये सदर सॉफ्टवेअरचे कोटेशन दिलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr.No. | Descripton | Qty. | Rate | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Software for Non Invasive Ventilation for Servo i | 4 | 145000.00 | 5,80,000.00 |
| 2 | Software for Non Invasive Ventilation for Servo s | 8 | 145000.00 | 11,60,000.00 |
| | | | Total Rs.- | 17,40,000.00 |

इन्टेसीव्हेस्ट डॉ.बंडोपाध्याय यांनी कमीतकमी ४ व्हेन्टीलेटरला सॉफ्टवेअर बसवुन घ्यावेत असे सुचविले आहे. या मशिनचे Conversion केल्यानंतर आपणास नक्कीच फायदा होईल असा अभिप्राय दिलेला आहे. वरीलपैकी Servo I Ventilator 4 मशिनला सॉफ्टवेअर बसवण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी कंपनीने एकुण खर्च रु.५,८०,०००/- इतका कळविला आहे. सदरची रक्कम कंपनीशी चर्चा / वाटाघाटी केल्यानंतर अजून कमी होईल. मशिन मॅक्वेट कंपनीचे असल्यामुळे त्याच कंपनीचे सॉफ्टवेअर बसवावे लागणार आहे. तसेच सदर प्रस्तावावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांची मान्यता घेण्यात आलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी चार Servo I Ventilator मशिनला सॉफ्टवेअर बसवण्यास व याकामी येणारे रुपये ५,८०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २८. कार्डिओप्लेजीया युनिट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५५७.** श्री साईबाबा रुग्णालयात बायपास शस्त्रक्रियेसाठी उपरोक्त कार्डीओप्लेजीया युनिट १ ज्ञ्नगाची आवश्यकता आहे. सदरचे खरेदीकामी मुंबई येथील नामांकित उत्पादक कंपनी/अधिकृत विक्रेते यांचेकडून बंद पाकिटात दुरध्वनीवरुन कोटेशन मागवण्यात आले होते.

०१ अमेय सर्जीकल प्रा.लि.,मुंबई
०२. अर्चना सर्जीकल,मुंबई
०३. पुनम सर्जीकल,मुंबई
०४. बॉम्बे सर्जीकल,मुंबई
०५. झेनीथ सर्जीकल,मुंबई

उपरोक्त बंद कोटेशन ही दि.०९.०८.२००६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्याचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | मागणी | एकुण किंमत |
|---|---|---|---|
| १ | अमेय सर्जीकल,मुंबई | १ | ३७५१८.७५ |
| २ | अर्चना सर्जीकल,मुंबई | १ | ३६०००.०० |
| ३ | पुनम सर्जीकल,मुंबई | १ | ३९६००.०० |
| ४ | बॉम्बे सर्जीकल,मुंबई | १ | ३५७१८.७५ |
| ५ | झेनीथ सर्जीकल,मुंबई | १ | ३०९३७.५० |

उपरोक्त कोटेशन दरांचा विचार करता अ.नं. ५ मे.झेनीथ सर्जीकल,मुंबई यांचेदर निमतम आहे. तथापी त्यांचे कोटेशनमध्ये त्यानी सदर युनीटसाठी लागणारी जादा ग्लास व वॉशर दिलेले नाही. त्यानंतर क्रमांक दानचे दर मे.अमेय सर्जीकल व बॉम्बे सर्जीकल या दोघाचे आहे. त्यापैकी बॉम्बे सर्जीकल यांनी त्याच किंमतीत जादा वॉशर दिलेले आहे. त्यामुळे त्यांचेकडून खरेदी करण्याची शिफारस केलेली आहे. तरी वरील प्रमाणे एक युनीट खरेदी करण्यास व याकामी येणारा खर्च रु.३५,७१८/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २९. डोळयाचे शिबीरासाठी औषधे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५५८.** श्रीसाईबाबा रुग्णालयात नेत्रशल्य चिकित्सा विभागाचे उद्‌घाटनानिमित्त दि. १८-१९-२०/०८/२००६ रोजी डोळयाचे शस्त्रकिया शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. सदरचे शिबीरात सुमारे २०० रुग्णांवरती शस्त्रकिया करणेचे नियोजन आहे. त्यासाठी सोबतच्या यादीतील औषधांची आवश्यकता आहे.

सदरचे औषधांपैकी जी औषधे आपणाकडे उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यादीतील परीशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेली औषधे आपण हि सन २००५-२००६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी केलेली आहेत त्यासाठी मंजुर दराने रु. ६७,९३०/- इतका खर्च आलेला आहे तर परीशिष्ट "ब" मध्ये नमुद केलेली औषधे आपणाकडे उपलब्ध नाही ती तातडीने कोटेशन हि फॅक्स/बंद पाकीटात मागवून खरेदी केलेली आहे त्यासाठी रु. १,६१,९४८/- इतका खर्च आलेला आहे. दोन्हीही मिळून सदरचे खरेदीकामी रु. २,२९,८७८/- इतका खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३०. वार्षिक औषधे खरेदीकामी आलेल्या निविदा उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.५५९.** श्रीसाईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे खरेदीकामी दि. २४/०४/२००६ चे सभेत निर्णय क. २८५ अन्वये रु.५,९३,९१,९८४/- चे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदरचे ठरावानुसार प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे समक्ष जाऊन तेथील कार्यपध्दतीची देखील माहिती घेण्यात आली होती.

सदरचा विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार तसेच प्रवरा हॉस्पिटल येथील प्रस्तावित केलेल्या पध्दतीचा समावेश करण्यात यावा. तसेच यावर चर्चा होऊन इतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात कशाप्रकारे औषधे खरेदी केली जातात त्याची देखील माहिती घेण्यात यावी, असे ठरले.

सदरचे वार्षीक औषधे खरेदीकामी आपण वर्तमान पत्रात जाहिरात देऊन उत्पादक कंपन्या / अधिकृत विकेते यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच इकडील पत्र क. ९००५ दि. १०/०७/२००६ अन्वये २०५ उत्पादक कंपन्याना पत्र पाठवून त्यांचेकडून देखील दि. २६/०७/२००६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. विकीसाठी निविदा हया संस्थानचे शिरडी तसेच मुंबई कार्यालयात ठेवण्यात आल्या होत्या. शिरडी येथे एकुण १३५ निविदांची विकी झाली आहे तर मुंबई कार्यालयात एकुण १०९ निविदांची विकी झालेली आहे. दोन्ही कार्यालयात मिळून २४४ निविदांची विकी झालेली आहे. दि. २६/०७/२००६ अखेर १४४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | श्री एंटरप्रायजेस, पुणे | ७६ | मे.नॅशनल मेडीकल,श्रीरामपुर |
| २ | मे.नेहा एंटरप्रायजेस,पुणे | ७७ | मे.रेकॉन डायग्नोस्टीक प्रा.लि.,बडोदा |
| ३ | मे.अभिनव एजन्सी,नाशिक | ७८ | मे.सेन्टॉर फार्मास्युटिकल्स,मुंबई |
| ४ | मे.स्वीटी सर्जीकल , नाशिक | ७९ | मे.रजत सेल्स प्रा.लि.,मुंबई |
| ५ | मे.निर्मल एजन्सी,अहमदनगर | ८० | मे.बीडीएच इंडस्ट्रीज लि,मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | मे.एस.एस.मार्केटींग ,औरगांबाद | ८१ | मे.ओमनी लेन्स प्रा,लि.,अहमदाबाद |
| ७ | मे.वैभव एजन्सी, पुणे | ८२ | मे.सोनल सर्जीकल ,मुंबई |
| ८ | मे.जे.एस.पी.सर्जीकल, नाशिक | ८३ | मे.चंदाभगत फार्मा.प्रा.लि,मुंबई |
| ९ | मे.श्री स्वामी समर्थ आयुर्वेदीक ,जळगांव | ८४ | मे.एन.पी.एजन्सी,मुंबई |
| १० | मे.स्प्रेलॅन्ड, औरंगाबाद | ८५ | मे.इन्टरमेडीक्स,मुंबई |
| ११ | मे.युनिव्हर्सल केमीकल्स, नाशिक | ८६ | मे.कार्डीओ प्रॉडक्स,मुंबई |
| १२ | मे.सुर्या सर्जीकल फार्मा, नाशिक | ८७ | मे.स्नेहल एंटरप्रायजेस,नागपुर |
| १३ | मे.एस.पी.डिस्ट्रीब्युटर्स, पुणे | ८८ | मे.हाफकीन बायोफार्मा,मुंबई |
| १४ | मे.महर्षी आयुर्वेदा प्रॉडक्ट, नागपुर | ८९ | मे.इंडियन इम्युनोलॉजीकल्स,हैदाबाद |
| १५ | मे. फरसिनेस काबी,पुणे | ९० | मे.जया एंटरप्रायजेस,लातुर |
| १६ | मे.फार्मासिया लिंक,पुणे | ९१ | मे.रुबी सर्जीकल,मुंबई |
| १७ | मे.न्युलाईफ फार्मास्युटिकल्स,पुणे | ९२ | मे.तिरुपती एंटरप्रायजेस,पुणे |
| १८ | मे. शलॅक्स फार्मास्युटिकल्स प्रा.लि., दिल्ली | ९३ | मे.हंसराज नायर मेडीकल इंडिया,मुंबई |
| १९ | मे.कुंदन सर्जीकल,अहमदनगर | ९४ | मे.ॲडव्हान्स मेडीकल डिव्हायसेस,ठाणे |
| २० | मे.बोरा एजन्सी,अहमदनगर | ९५ | मे.बेल फार्मा,मुंबई |
| २१ | मे.हाय-टेक सर्जीकल सिस्टीम, मुंबई | ९६ | मे.संजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर,पुणे |
| २२ | मे.तांबे मेडीकल हाऊस, अहमदनगर | ९७ | मे. लक्ष्मी मेडीकल,पुणे |
| २३ | मे.मिलन एंटरप्रायजेस,अहमदनगर | ९८ | मे.एमआरके हेल्थकेअर,मुंबई |
| २४ | मे.सुभाष डिस्ट्रीब्युटर्स, नेवासा | ९९ | मे.दिना एंटरप्रायजेस,मुंबई |
| २५ | मे.लाईफलाईन सर्जीकल,कोपरगांव | १०० | मे.महाराष्ट्र सर्जीकल हाऊस,पुणे |
| २६ | मे.पंकज फार्मा,पुणे | १०१ | मे.लाईफकेअर डिव्हायसेस,ठाणे |
| २७ | मे.महेश सर्जीकल, पुणे | १०२ | मे.हिंदुस्थान फोटो फिल्म्स ,मुंबई |
| २८ | मे.रेणुका सर्जीकल सिस्टीम, औरंगाबाद | १०३ | मे.एच ॲण्ड एच फार्मास्युटिकल्स, मुंबई, |
| २९ | मे.मॉरिन सर्जीकल, औरंगाबाद | १०४ | मे.नितीन मिनिकेम, जोधपुर |
| ३० | मे.मंत्री एजन्सी, अहमदनगर | १०५ | मे.निधी लाईफकेअर, मुंबई |
| ३१ | मे.आयव्हीएस ड्रग्ज प्रा.लि. इंदोर | १०६ | मे.मेकर्स लॅब,मुंबई |
| ३२ | मे.;युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे | १०७ | मे.साई फार्मास्युटिकल्स,पुणे |
| ३३ | मे.संजय एजन्सी,अहमदनगर | १०८ | मे.बायोलॅब डायग्नोस्टीक,मुंबई |
| ३४ | मे.गौरव मेडीकल ॲण्ड जनरल, श्रीरामपुर | १०९ | मे.टिस्टार रेमीडीज प्रा.लि.,अहमदाबाद |
| ३५ | मे.इंटीग्रेटेड हेल्थकेअर डिव्हाईसेस, पुणे | ११० | मे.राहूल ब्रदर्स,मुंबई |
| ३६ | मे.श्रीजी एजन्सी,श्रीरामपुर | १११ | मे.व्हीन्टेक सर्जीकल,मुंबई |
| ३७ | मे.सिनर्जी डायग्नोस्टीक प्रा.लि.ठाणे | ११२ | मे.स्कीमेड टेक्नोलॉजी प्रा.लि.,मुंबई |
| ३८ | मे.जेसीपीएल फार्मा,जळगांव | ११३ | मे.इंगा लॅब्रोटरीज प्रा.लि.मुंबई |
| ३९ | मे.रमन ॲण्ड वेल,मुंबई | ११४ | मे.बी.एल.लाईफसायन्स,दिल्ली |
| ४० | मे.रत्नप्रभा मेडीकल एजन्सी, श्रीरामपुर | ११५ | मे.बायोकेम फार्मास्युटिकल्स इंडिया लि,मुंबई |
| ४१ | मे.भारत सिरम ॲण्ड व्हॅक्सीन लि.मुंबई | ११६ | मे.गॅलॅक्सी मेडीकल डिव्हायसेस,मुंबई |
| ४२ | मे.किटीकल केअर सिस्टीम,पुणे | ११७ | मे.टी.टी.के हेल्थकेअर लि.,मुंबई |
| ४३ | मे.कांचन ड्रग्ज प्रा.लि.,पुणे | ११८ | मे.मॅग्नाकेम फार्मास्युटिकल्स,मुंबई |
| ४४ | मे.परमेश्वर एंटरप्रायजेस,श्रीरामपुर | ११९ | मे.खंडेलवाल लॅब्रोटरीज प्रा.लि.,मुंबई |
| ४५ | मे.काब्रा मेडीकल,जळगांव | १२० | मे.झुविस्टा हेल्थकेअर लि.,मुंबई |
| ४६ | मे.उत्कर्ष एजन्सी,राहूरी | १२१ | मे.निलेश सर्जीकल ,मुंबई |
| ४७ | मे.राहूल एंटरप्रायजेस,नाशिक | १२२ | मे.सेंटेनियल सर्जीकल सुचर्स, ठाणे |
| ४८ | मे.माऊली फार्मा ॲण्ड सर्जीकल,कोपरगांव | १२३ | मे.एसएस फार्मा एजन्सी,मुंबई |
| ४९ | मे.विशाल एजन्सी,अहमदनगर | १२४ | मे.इंडको रेमीडीज लि.,मुंबई |
| ५० | मे.नेहा एजन्सी,अहमदनगर | १२५ | मे.केप्स फार्मा,मुंबई |
| ५१ | मे.हेम एजन्सी,कोपरगांव | १२६ | मे.पिनाकल बायोमेड प्रा.लि.,मुंबई |
| ५२ | मे.सर्जीलिंक,श्रीरामपुर | १२७ | मे.शिवम ट्रेडींग कं,मुंबई |
| ५३ | मे.रोहीत एंटरप्रायजेस,पुणे | १२८ | मे.फंटायर मेडी-टेक इं.प्रा.लि.,मुंबई |
| ५४ | मे.संदिप एजन्सी,कोपरगांव | १२९ | मे.इमर्जन्ट मेडी-टेक,मुंबई |
| ५५ | मे.सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद | १३० | मे.फॅन्को इंडीयन,मुंबई |
| ५६ | मे.दास एजन्सी,नाशिक | १३१ | मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया फार्मा,मुंबई |
| ५७ | मे.कपील मेडीकल, जळगांव | १३२ | मे.ऑस्टीन हेल्थकेअर , पुणे |
| ५८ | मे.वरद एंटरप्रायजेस,नाशिक | १३३ | मे.सीनी केअर सर्जीकल ,मुंबई |
| ५९ | मे.श्रेया एंटरप्रायजेस,अहमदनगर | १३४ | मे.गगन फार्मा,मालाड-मुंबई |
| ६० | मे.सुभाष एजन्सी,अहमदनगर | १३५ | मे.आप्पास्वामी असोसिएटस,मुंबई |
| ६१ | मे.श्रीराम एटरप्रायजेस,श्रीरामपुर | १३६ | मे.बी.ब्रॉन मेडीकल प्रा.लि.,मुंबई |
| ६२ | मे.अंबिका सर्जीकल,संगमनेर | १३७ | मे.एडवर्ड लाईफसायन्स,मुंबई |
| ६३ | मे.आनंद एंटरप्रायजेस,पुणे | १३८ | मे.कुमार ब्रदर्स फार्मा,मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | मे.अल्फा मेडीकेअर ॲण्ड डिव्हायसेस, अहमदाबाद | १३९ | मे.नुतन फार्मास्युटिकल्स,पुणे |
| ६५ | मे.अभिषेक एंटरप्रायजेस,बीड | १४० | मे.जनेसिस रेमीडीज,पुणे |
| ६६ | मे.पायोनिअर एंटरप्रायजेस, अहमदनगर | १४१ | मे.इंदु फार्मा,जेजुरी |
| ६७ | मे.स्पंदन बायोटेक ,औरंगाबाद | १४२ | मे.डी.विजय फार्मा,नाशिक |
| ६८ | मे.विजय ट्रेडींग कार्पो.श्रीरामपुर | १४३ | मे.एव्हरेस्ट लॅब, मीरत |
| ६९ | मे.स्पंदन एंटरप्रायजेस,नाशिक | १४४ | मे.अल्फा एंटरप्रायजेस,मुंबई |
| ७० | मे.फार्माको, पुणे | १४५ | मे. ॲबॉट इंडीया, मुंबई (दि. ३१/०७/२००६ रोजी उघडलेल्या स्थितीत प्राप्त) |
| ७१ | मे.साईकृपा मेडीकल, कोपरगांव | | |
| ७२ | मे.ए-वन मेडीकल ॲण्ड सर्जीकल, नारायणगांव | | |
| ७३ | मे.एस.के.एजन्सी,धुळे | | |
| ७४ | मे.मीना एजन्सी,नाशिक | | |
| ७५ | मे.फार्माकेम एंटरप्रायजेस,पुणे | | |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेत आले होते. उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित बोलावून त्यांना श्रीसाईबाबा संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यानेपूर्वी दिलेल्या दरांमध्ये काही सवलत देणार किंवा ? कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात द्यावे असे सांगण्यात आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, नामांकित कंपन्यांची औषधे निम्नतम दराने खरेदी करण्यात यावीत, असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३१. श्रीसाईनाथ रुग्णालयाचे शस्त्रक्रिया विभागासाठी मॉनिटर्स खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६०.** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रकियेचे वेळेस भुल देणेकामी लागणारा उपरोक्त मॉनिटर्स दोन नगाची तातडीने आवश्यकता आहे . त्यासाठी त्यांनी त्यांचे दि.०२.०८.२००६ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यात एक साधे मॉनिटर तर एक इटीसी सुविधा असलेले मॉनिटर्सची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता आपण वर्तमान पत्रात जाहिरात देऊन उपरोक्त मल्टीपॅरामिटर मॉनिटर्ससाठी दर मागवण्यात आले होते. त्यांचेशी दि.१८.०७.२००५ चे सभेत त्याचेशी चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्या होत्या. मे.एल ॲण्ड टी, पुणे यांचे कंपनीचे दर Planet ५० या मॉडेलकरीता प्रती नग रु.१,२५,०००/- इतके असून त्यांचेकडून ८ नग इकडील पत्र क.८३७२ दि.०८.०८.२००५ अन्वये खरेदी केलेले आहे.

याबाबत रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनीअर यांचे मते श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये एल ॲन्ड टी कंपनीचे Planet ५० हे दोन नग खरेदी करुन दिल्यास त्याचे दैनंदिन काम सुरुळीत चालु शकेल असे मत दिले आहे. त्यांनी मागणी केलेल्या दुसऱ्या मॉडेलसाठी तीन कंपन्याकडून दर मागवून स्वतंत्र प्रस्ताव सादर करत आहे. तोपर्यंत त्यांचे दैनंदिन कामात अडचण येऊ नये म्हणून २ नग Planet ५० हे मॉनीटर्स मे.एल ॲण्ड टी ,पुणे यांचेकडून मंजुर दर रु. १,२५,०००/- प्रती नग प्रमाणे खरेदी करण्यास व याकामी येणारा खर्च रु. २,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३२. कार्डियाक ओ.टी.साठी सर्जिकल साहित्य खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६१.** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये खालील सर्जीकल साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr.No. | Name of Item | Qty. |
|---|---|---|
| 1 | Dial flow | 200 Nos. |
| 2 | Peadiatric Drips Set. | 200 Nos. |
| 3 | HME Filter | 200 Nos. |
| 4 | T.Recovery Kit | 200 Nos. |

सदरचे साहित्य खरेदीकामी मुंबई येथील खालील अधिकृत विक्रेते यांना दुरध्वनीवरुन बंद पाकिटात कोटेशन मागवण्यात आले होते.

१. श्रीजी सर्जीकल,मुंबई
२. अल्फा एंटरप्रायजेस,मुंबई
३. राजेश ट्रेडींग ,मुंबई
४. मेहता सर्जीकल,मुंबई

वरील चारही बंद कोटेशन ही मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष दि.०९.०८.२००६ उघडण्यात आले आहे. त्यांचे तुलाात्मक दर खालील प्रमाणे.

| Sr.No | Name of Item | Qty. | Mehata Surgi. | Rajesh, | Alpha | Shreeji | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | Mumbai | Mumbai | Mumbai | Mumbai | in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dial flow | 200 | 163.12 | 180.00 | **123.75** | 140.62 | 24750.00 |
| 2 | pedi.Drips Set. | 200 | 54.08 | 62.40 | **41.60** | 49.92 | 8320.00 |
| 3 | HME Filter | 200 | 253.12 | 219.37 | **185.62** | 219.37 | 37124.00 |
| 4 | T.Recovery Kit | 200 | 106.87 | 106.87 | **73.12** | 90.00 | 14624.00 |
| | | | | **Total Amount in Rs.** | | | **84818.000** |

उपरोक्त तुलनात्मक दरांचा विचार करता मे.अल्फा एंटरप्रायजेस,मुंबई यांचे दर निम्नतम असून त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.८४,८१८ इतका खर्च येणार आहे. तरी वरील प्रमाणे साहित्य मे.अल्फा एंटरप्रायजेस,मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ८४,८१८/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३३. इंजेक्शन युरोग्राफिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६२.** उपरोक्त इंजेक्शन खरेदीकामी नाशिक, नगर, संगमनेर येथून कंपनीचे अधिकृत विकेते यांचेकडून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यापैकी नाशिक व संगमनेर येथील दोन अधिकृत विकेते मे. मीना एजन्सी, नाशिक व मे. पोफळे मेडीकल, संगमनेर यांचे दर प्राप्त झाले होते. तर अहमदनगर येथील अधिकृत विकेते यांनी त्यांचे दर दिले नव्हते. प्राप्त झालेल्या दोन अधिकृत विक्रेते यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यास उपसमितीची सभा दि. २४/०६/२००६ चे सभेत मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार मे. मीना एजन्सी, नाशिक यांचेकडून १०० नग खरेदी करण्यात आले होते. त्याचा खप झाला असून आता पुन्हा त्याच मंजुर दराने मे. मीना एजन्सी, नाशिक यांचेकडून १०० नग इंजेक्शन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मंजुर दराने रु. ४०,७०५/- इतका खर्च येणार आहे.

तरी मे. मीना एजन्सी, नाशिक यांचेकडून मंजुर दराने सदरचे इंजेक्शन खरेदी करण्यास व रु. ४०,७०५/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३४. डिजीटल टॉर्नीक्युट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६३.** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे आर्थोपेडीक शस्त्रकिया विभागासाठी शस्त्रकिया करणेकामी डॉ. खुराना यांनी डी.पी. क. ८१६० दि. १९/०७/२००६ अन्वये तातडीचे शस्त्रकिया करणेसाठी एक वरील टॉर्नीक्युट मागणी केलेली आहे. सदर टॉर्नीक्युट बनविणारी नामांकित कंपनी मे. इंडस्टीयल इलेक्टॉनीक्स ॲन्ड अलाईड प्रॉडक्ट, पुणे (डायमंड) कंपनी यांना दुरध्वनीवरुन विचारणा केली असता. त्यांनी त्यांचे दि. २६/०७/२००६ चे पत्रान्वये एका टॉर्नीक्युटची किंमत ही रु. ३५,७००/- (अक्षरी रु. पस्तीस हजार सातशे मात्र) १५ % सुट व सर्व करांसह इतकी कळविली आहे.

सदरचे टॉर्नीक्युट हे दैनंदिन शस्त्रकियेसाठी आवश्यक असल्याने ते मे. इंड्रस्टीयल इलेक्ट्रॉनीक्स ॲन्ड अलाईड प्रॉडक्ट, पुणे या कंपनीकडून खरेदीस व याकामी येणारा खर्च रु. ३५,७००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३५. पुरग्रस्त रुग्णांचे उपचारासाठी औषधे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६४.** सध्या अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस चालू आहे. सदरच्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळजवळ सर्व नद्यांना पुर चालू आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सध्या सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलेले आहे. तसेच सतत चालू असलेल्या पावसामुळे सर्वत्र ठिकाणी दलदलीची परिस्थीती निर्माण झाली आहे. त्यामुळे साथीच्या रोगाचे आजार पसरण्याची दाट शक्यता आहे. अशा साथीच्या आजारामध्ये लोकांना जुलाब , उलटी, ताप , मळमळ, थंडी अशा प्रकारचे आजार होऊ शकतात. शिर्डी परिसरातील बहुतेक लोक हे संस्थानचे रुग्णालयात उपचारासाठी हजर झाल्यावर त्यांचे उपचारासाठी आपल्याकडे खालील प्रकारची औषधे उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे रु. ८,८०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Name of Medicine | Qty. | Rate per Approx | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Metronidazle 100 ml | 10000 | 9.00 | 90000.00 |
| 2 | I/V. Ringer Lacted 500ml | 5000 | 22.00 | 110000.00 |
| 3 | I/V. D.N.S. 500ml | 5000 | 14.00 | 70000.00 |
| 4 | Inj.Taxim 1gm | 10000 | 22.00 | 220000.00 |
| 5 | Inj.Perinorm Amp. | 10000 | 2.00 | 20000.00 |
| 6 | Inj.Ranitidine Amp. | 5000 | 3.00 | 15000.00 |
| 7 | Inj.Ceftrixome 1gm | 10000 | 22.00 | 220000.00 |
| 8 | Tab.Taxim o 200mg | 10000 | 10.00 | 100000.00 |
| 9 | Tab.Lomotil | 10000 | 0.50 | 5000.00 |
| 10 | Tab.Norflox TZ | 10000 | 3.00 | 30000.00 |
| | | | | 880000.00 |

वरीलप्रमाणे औषधे ही तातडीने खरेदी करवयाची असल्याने त्यासाठी शिर्डी, संगमोर, कोपरगांव, श्रीरामपुर, अहमदनगर, नाशिक येथील अधिकृत विक्रेते यांचेकडून समक्ष जाऊन कोटेशन मागवुन खरेदी करता येईल. तरी सदरचे औषधे कोटेशन मागवुन खरेदी करण्यास व रु.८,८०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.यावर सविस्तर चर्चा होऊन सदरचा प्रस्ताव उपसमितीचे सभेपूढे प्रथम ठेवून उपसमितीचे शिफारसींनुसार औषधे खरेदी करण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३६. सुक्ष्मदर्शक यंत्र व इतर उपकरणे अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांना संस्थानतर्फे खरेदी करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.५६५.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३७. लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रूमेंट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६६.** श्री साईबाबा रुग्णालयाचे जनरल सर्जरीच्या शस्त्रक्रियेससाठी लागणाऱ्या ७ प्रकारच्या हत्यारांचा प्रस्ताव मा.उपसमिती सभा दि.२४.०६.२००६ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.१,७२,८६७/- चे खर्चास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या ५ कोटेशनमधील निम्नतम दरानुसार खरेदीस व याकामी रु. १,७२,८६७/- चे जादा खर्चास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार एकुण ७ हत्यारांपैकी ५ हत्यारांचा पुरवठा आदेश मे.कालेलकर सर्जीकल यांना व दोन हत्यारांचा पुरवठा आदेश अर्चना, मुंबई यांना निम्नतम दरानुसार जात आहे. त्यातील अर्चना सर्जीकल, मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तर कालेलकर सर्जीकल यांचा पुरवठा आदेश तुर्त स्थगित ठेवला आहे. सदर हत्यारामधील Telescope $30^0c$ 10 मीमी ची किमंत रु.१,४०,६२५/- इतकी आहे व त्याची ऑर्डर ही मे.कालेलकर सर्जीकल, मुंबई यांना द्यावयाची आहे.

तथापी डॉ.रेड्डी यांनी त्यांचे दि.३०.०६.२००६ चे पत्रान्वये आपण कार्ल स्टोअर्ज कंपनीचा लॅप्रोस्कोप सेट घेतलेला आहे व आपणास त्याच कंपनीचा टेलेस्कोप पाहिजे असे कळविले आहे. तेंव्हा याकामी मे.चिमको बायोमेडीकल इंजिनिअरींग,मुंबई ज्यांचेकडून आपण लॅप्रोस्कोप इन्स्ट्रुमेंट खरेदी केली आहेत. त्यांचे ३०°C टेलेस्कोप १० मीमी चे दर मागविले होते.

सदर टेलेस्कोपची किंमत त्यांनी रु.२,९८,७१०/- इतकी कळविली आहे. तर कालेलकर यांच्या टेलस्कोपची किंमत रु.१,४०,६२५/- इतकी आहे. म्हणजे सदरचा टेलेस्कोप हा चिमको बायोमेडकील यांचेकडून खरेदी केल्यास याकामी रु.१,५८,०८५/- इतका खर्च येणार आहे.

तेंव्हा कालेलकर सर्जीकल यांना तुर्तास ३०°C टेलेस्कोप १०मीमी चा पुरवठा आदेश रद्द करणेस व चिमको बायोमेडीकल,मुंबई यांचेकडून टेलेस्कोप खरेदी करण्यास व रु.१,५८,०८५/- च्या जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३८. औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.५६७.** श्रीसाईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य इत्यादीची एक वर्षाकरीता मागणी केलेली आहे.

सदरचे औषधे, सर्जिकल साहित्य इत्यादी करीता मा. व्यवस्थापन समितीचे मंजुरीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येत आहे. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना देखील पत्र पाठवून कळविण्यात येत आहे. निविदा फॉर्म हे दि. ०८/०७/२००६ पासून विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येत असून स्विकारण्याची शेवटची मुदत २६/०७/२००६ ठेवण्यात आलेली आहे. सदरची औषधे उपलब्ध होणेस अंदाजे अजुन दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत दोन्ही रुग्णालयास सोबतच्या औषधांची तातडीने आवश्यकता आहे. त्यासाठी अंदाजे रु. ४,६३,९१८.५० इतका खर्च येणार आहे.

सदरचा विषय मान्यतेसाठी उपसमिती सभा दि. ०५/०७/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेत यावर चर्चा होऊन यकामी बंद पाकीटात कोटेशन मागवून तातडीने खरेदी करण्यात यावी असे ठरले होते. त्यानुसार याकामी दुरध्वनीवरुन / समक्ष / बंद पाकीटात १० अधिकृत विकेते यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. सदरचे कोटेशन हे उपसमिती सभा दि. २०/०७/२००६ चे सभेपुढे समक्ष उघडणेत आले होते. त्यातील एक कोटेशन मे. टॉपटेक सर्जीकल, नाशिक हे कोटेशन सलाईन स्टॅन्डचे असल्याने ते विचारात घेतलेले नाही. उर्वरीत ९ कोटेशनचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला असून त्यामध्ये एकुण १०७ औषधांपैकी १५ औषधांसाठी एकाच कोटेशनधारकाचे दर प्राप्त झालेले आहे. तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. १७ औषधांसाठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. उर्वरीत ७५ औषधांसाठी एकापेक्षा जास्त अधिकृत विकेते यांचे दर आहे. तेथे निम्नत्तम दराने शिफारस करण्यात आलेली आहे.

वरील शिफारसीनुसार ९० औषधांसाठी एकुण रु. ४,८४,१०८.९० इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३९. ऑक्टोपस खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६८.** श्री साईबाबा रुग्णालयात बायपासच्या शस्त्रकिया करणेसाठी उपरोक्त ऑक्टोपसची आवश्यकता असते. यापुर्वी सदरच्या ऑक्टोपस व इतर कार्डीयाक कन्झुमेबलचे कोटेशन मागविण्यात आले होते. सदरच्या मागणीमध्ये आपण एकुण ०४ ऑक्टोपसची मागणी केली होती. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ चे सभेत चर्चा होऊन निर्णय कमांक १३१ नुसार आवश्यक तितकेच साहित्य कोटेशनमधील मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मंजुरी मिळालेली होती त्यानुसार मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून ४ ऑक्टोपसपैकी २ नगाचा पुरवठा आदेश इकडील पत्र ४०३९ दि. २४/०३/२००६ अन्वये देण्यात आला होता.

सदरच्या ऑक्टोपसचा साठा सध्या शिल्लक नसून पुन्हा मंजुर दराने ०४ नगापैकी ०२ नग खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Octopus – 4 Tissue Stabilizer | 2 | 67500.00 | 135000.00 |
| | | | **Total -** | **135000.00** |

तरी वरीलप्रमाणे २ नग ऑक्टोपस पुर्वीचे मंजूर दराने मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे मंजूरीस अधिन राहून पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४०. एस.एल.एस क्लिप्स खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५६९.** श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपासच्या शस्त्रकिया करणेसाठी उपरोक्त क्लीप्सची आवश्यकता असते. यापुर्वी सदरच्या क्लीप्स व इतर हत्यांरासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदामधील दरांवर चर्चा / वाटाघाटीनंतर मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ चे सभेत चर्चा होऊन निर्णय कमांक १२६ नुसार मे. बी. एल. लाईफसायन्स, दिल्ली यांना उपरोक्त क्लीप्सची ऑर्डर इकडील पत्र ३७०० दि. १५/०३/२००६ अन्वये देण्यात आली होती.

सदरच्या क्लीप्सचा साठा शिल्लक नसून पुन्हा प्रत्येकी १० नग मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description | Qty. | Make | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Horizon Ligating Clips SM Bx/600, 25Ctx24Cl | 10 | SLS Brand | 4257.00 | 42570.00 |
| 2 | Horizon Ligating Clips MD Bx/600, 25Ctx24Cl | 10 | SLS Brand | 4257.00 | 42570.00 |
| | | | | **Total -** | **85140.00** |

तरी वरीलप्रमाणे प्रत्येकी १० नग मे. बी. एल. लाईफसायन्स, दिल्ली यांचेकडून मंजुर दराने खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४१. बेड साईड स्क्रिन व आय.व्ही. स्टॅण्ड खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७०.** श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता काही वार्ड/विभागास बेडसाइड स्क्रिन व आय.व्ही. स्टॅन्डची आवश्यकता आहे. याकामी अंदाजे रु.३०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचे बेड साईड स्क्रिन २४ नग व आय.व्ही.स्टॅन्ड १२ नगाकरीता नाशिक, पुणे,औरंगाबाद व कोपरगांव येथील पुरवठाधारक / अधिकृत विक्रेते यांचेकडून तातडीने बंद पाकिटात कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन प्राप्त झालेले कोटेशन खालीलप्रमाणे-

०१. टॉपटेक सर्जीकल,नाशिक

०२. मेट्रो मेटल,औरंगाबाद

०३. क्वालीसर्ज ,पुणे

०४. लाईफ लाईन सर्जीकल,कोपरगांव

वरीलप्रमाणे बंद कोटेशन हे दि. २७/०७/२००६ च्या उपसमिती सभेत समक्ष उघडून घेतलेले असून मे. जनक हेल्थकेअर, मुंबई यांचे कोटेशन टपालामार्फत उघडलेल्या स्थितीत दि. २७/०७/२००६ रोजी प्राप्त झाले आहे.

सदरचे कोटेशन्स उघडण्यात आले असता,कोटेशनसादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| Sr.No. | Name | Beside Cutain Stand – 24 Nos. | I.V.Stant without Caster- 12 Nos |
|---|---|---|---|
| 01 | M/s jank,Mumbai | 2819.31 | 1635.01 |
| 02 | M/s Life Line,Kopargaon<br>Make- | **2000.00** | 697.00<br>Without Wheels |

| | | Hospicare | |
|---|---|---|---|
| 03 | M/s Toptech Surgical, Nashik | 1860.00 | 775.00 |
| 04. | M/s Metro Metal ,A'bad Make- | 1068.75 Metro with Wheel | **528.75 Metro** |
| 05. | M/s Quali Surgical, Pune Make- | 2362.50 Bharat Surgical | 956.25 Bharat Surgical |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.नं. ०१ करीता मे. टॉपटेक सर्जीकल, नाशिक यांचे दर निम्नत्तम दिसत आहेत. याबाबत त्यांना दुरध्वनीवरून विचारणा केली असता त्यांनी सदरचे दर हे कपडया व्यतिरीक्त आहे. शिवाय आमचेकडे ज्या कंपनीचे उपलब्ध असेल त्या कंपनीचे देण्यात येईल असे श्री. अदीत यांनी सांगितले.

त्यानंतर अ.नं. १ करीता मे. लाईफ लाईन सर्जीकल, कोपरगांव यांचे दर प्रती नग रु. २०००/- सर्व करांसहित व कपडयासह आहे. शिवाय ते हॉस्पिकेअर या कंपनीचे देणार आहे. तेंव्हा तेथे त्यांचे दरांची शिफारस केलेली आहे.

अ.नं. ०२ करीता मे. मेट्रो मेटल, औरंगाबाद यांचे दर निम्नत्तम असून तेथे त्यांची शिफारस केलेली आहे. वरील शिफारसीनुसार सदरचे खरेदीस एकुण रु. ५४,३४५/- इतका खर्च येणार आहे.

तरी सदरचे साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणारा खर्च रु. ५४,३४५/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४२. बायपास शस्त्रक्रियेसाठी सर्जीकल साहित्य, हत्यारे खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.५७१.** श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपास सर्जरीच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारे हत्यारे खरेदीकामी विहीत पध्दतीनुसार जाहिरात देऊन व निविदा मागवुन दर मागवण्यात आले होते. सदरचे निविदाधारकांबरोबर दि.११.०२.२००६ चे सभेत चर्चा / वाटाघाटी करुन सदर खरेदीवर दि.०४.०३.२००६ चे सभेत उपस्थित ६ बायोमेडीकल इंजिनिअर यांचे सल्ल्यानुसार हत्यारे खरेदीबाबत निर्णय क.१२६ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे . त्यानुसार खालील कंपनीकडून आपण कार्डीओ व्हॅस्क्युलर हत्यारे खरेदी केलेले आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | आदेश क. | दिनांक | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे.बी.एल.लाईफसायन्स, दिल्ली | ३७०० | १५.०३.२००६ | २५,५६,२५७.०० |
| २ | मे.झेनिथ सर्जीकल,मुंबई | ३६९३ | १५.०३.२००६ | १२,८८,९४५.०० |

उपरोक्त पुरवठाधारकांना दिलेल्या हत्यांरापैकी पुन्हा काही आवश्यक हत्यारे आपणास खरेदी करवयाची आहे त्याची एकुण रक्कम व तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | एकुण रक्कम |
|---|---|---|
| १ | मे.बी.एल.लाईफसायन्स, दिल्ली | १०,६४,६३५.०० |
| २ | मे.झेनिथ सर्जीकल,मुंबई | २,०६,४६१.०० |
| | | १२,७१,०९६.०० |

बायपास सर्जरीचे शस्त्रकियाकरणे साठी आपणाकडे पुर्णवेळ सर्जन म्हणून डॉ.विद्युतकुमार हे सध्या काम करत आहे. तेंव्हा ते दररोज शस्त्रकिया करणार आहेत. या शिवाय मानद सर्जन देखील येत असतात. त्यामुळे जेंव्हा दोन शस्त्रकिया करण्याची वेळ येईल त्यावेळेस दोन हत्यारांचे सेट आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे . त्यामुळे एक सेट हा आपणास निर्जेतुक करुन ठेवता येईल व दुसऱ्या शस्त्रकियेसाठी तो लगेच वापरता येईल. याबाबत उपसमिती सभा दि.२४.०६.२००६ चे सभेत आपणाकडे दोन सेट असणे गरजेचे आहे अशी चर्चा झाली होती. तसेच सदरच्या हत्यारे खरेदीबाबत फॅक्सवर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांची देखील मान्यता घेण्यात आलेली आहे .

वरीलप्रमाणे कार्डीओव्हॅस्कुलर हत्यारे पुर्वीचे मंजुर दराने मे. बी.एल.लाईफसायन्स, दिल्ली व मे. झेनिथ सर्जीकल,मुंबई यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे मंजूरीस अधिन राहून पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४३. Adhesive Roll खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७२.** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे सन २००५-२००६ वर्षाकरीता Adhesive Roll १०cm x १०m मा. व्यवस्थापन मंडळाचे मंजुरीने निम्नत्तम दराने मे. संजय मेडीकल,पुणे यांना इकडील जा. क्र. एसएसएस/एसएसएच/स्टोअर/८०८७/०५ दि. ०१/०८/२००५ अन्वये ऑर्डर देण्यात आली होती. मे. संजय मेडीकल,पुणे यांनी सदर मालाचा पुरवठा आदेशाप्रमाणे पुर्ण केलेला आहे. सदर Adhesive

Roll हे ऑपरेशन थिएटर व सर्व वॉर्ड विभागासाठी आवश्यक असतात. सदरचे Adhesive Roll आपणाकडे सध्या शिल्लक नाही. तेंव्हा खालीलप्रमाणे खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

| अ.नं. | तपशिल | मुळ मागणी | २५% प्रमाणे मागणी | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | Adhesive Roll 10cm x 10m | १५०० | ३७५ | १५६.०० | ५८५००.०० |
| | | | | **एकुण किंमत -** | **५८५००.००** |

त्यासाठी मंजुर दराने रु. ५८५००/- मात्र खर्च येईल. मा. कार्यकारी अधिकारी यांना व्यवस्थापन मंडळ सभा दि. १७/०४/२०५ निर्णय क्र. १६८ अन्वये मुळ मागणीच्या २५ टक्के इतकी औषधे मंजुर दराने खरेदी करण्यास अधिकार देण्यात आले आहे. त्यानुसार सदर खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त Adhesive Roll मे. संजय मेडीकल,पुणे यांचेकडुन मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कमरु.५८५००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४४. हॅलोथेन व्हेपोराइझर मशिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७३.** श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि.१५.०५.२००६ पासून कार्यान्वीत करण्यात आले आहे. हॉस्पीटलमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया कार्यान्वीत झालेल्या आहे. सदर शस्त्रक्रियेच्यावेळी पेशंटला भुल देण्यासाठी हॅलोथेन व्हेपोराइझर मशिनची डॉ.रेठे, (भुलतज्ञ ) यांनी मागणी केलेली आहे.

उपरोक्त विषय मान्यतेसाठी उपसमितीची सभा दि. २७/०७/२००६ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन ज्या कंपनीकडून बॉईल्स मशिन आपण खरेदी केले होते. त्या कंपनीने कोटेशनमध्ये वरील उपकरणाचे दर दिले होते का? व त्यांना पुरवठा आदेश तसा देण्यात आला होता का ? याची खात्री करुन प्रस्ताव फेर मान्यतेसाठी उपसमिती सभेपुढे ठेवावा असे ठरले होते.

सदरचे बॉईल्स मशिन आपण हे मे. एल ॲन्ड टी कंपनी, पुणे यांचेकडून खरेदी केलेले आहेत. त्यांचे कोटेशन बघीतले असता त्यांनी उपरोक्त उपकरण हे Optional Accessories म्हणून वेगळे कोटेशन दिले होते. त्याची किंमत त्यांनी प्रती नग ८५,०००/- + १२.५% अशी दिली होती. म्हणजे त्याची किंमत सर्व करांसह रु. ९५,६२५/- इतकी होते.

मे. रमन ॲन्ड वेल प्रा. लि., मुंबई यांनी सदर उपकरणाची किंमत रु. ९०,०००/- इतकी दिली आहे. शिवाय ते रु. २४,०००/- चे हॅलोथेन हे औषध घेतल्यावर कायमस्वरुपी मोफत देणार आहे. तेंव्हा सदरचे उपकरण हे मे. रमन ॲन्ड वेल प्रा. लि., मुंबई या कंपनीकडून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४५. सिरींज पंप खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७४.** उपरोक्त प्रमाणे एकुण २४ नग सिरींज पंप मे. बी. ब्रॉन लि.,मुंबई या कंपनीकडून खरेदीचा प्रस्ताव मान्यतेसाठी उपसमिती सभा दि. २७/०७/२००६ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होते वेळेस रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनीअर उपस्थित होते. त्यावेळी चर्चा होऊन असे ठरले की, मे. बी. ब्रॉन लि., मुंबई या कंपनीपेक्षा JMS या कंपनीचे पंप जे आपण खरेदी केलेले आहेत त्याचा अनुभव समाधानकारक आहे तेंव्हा JMS कंपनीचे पंप खरेदी करावे असे ठरले. JMS कंपनीचे पंप हे इम्पोर्टेड (जपान) असून यापुर्वी ते Import केले होते व त्याचे पेमेंट संस्थानतर्फे L/C उघडून अदा करण्यात आले होते. JMS कंपनीचे भारतातील अधिकृत विकेते मे. अलविन लाईफ केअर, मुंबई यांना ते मागील मंजुर दराने पुरवठा करणेस तयार आहे किंवा कसे? याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती. तेंव्हा पुर्वीचे मंजुर दराने पुरवठा करणेस तयार असून तसे त्यांनी त्यांचे दि. ०२/०८/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे. त्यांनी दिलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Item Descriptiom | Qty. | Unit Price in Jap. yen | Total Price Jap. Yen |
|---|---|---|---|---|
| 1 | Syringe Pump "JMS" JAPAN | 24 | 108900 | 2613600.00 |
| | Model : SP -500 | | | |
| | | | | 2613600.00 |
| | प्रती YEN 0.395 प्रमाणे रुपयात अंदाजे किंमत रु. | | | 1032372.00 |
| | कस्टम डयुटी 5.1 % | | | 52650.972 |
| | क्लीयरन्स चार्जेस 1% | | | 10323.72 |
| | एकुण रक्कम रु. | | | 1095346.692 |

याशिवाय त्यांचे पेमेंट अदा करणेसाठी संस्थानला राष्टीयकृत बँकेत L/C उघडावी लागणार आहे व त्याचे बँक कमीशन हे संस्थानला सोसावे लागणार आहे. मे. अलविन लाईफ केअर, मुंबई यांचे वरील दरानुसार २४ मशिनची अंदाजे किंमत रु. १०,९५,३४६.६९२/- इतकी होते. ज्या दिवशी L/C व्दारे पेमेंट होईल त्यावेळेस Yen ची जी किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदा करावी लागणार आहे. तर बी. ब्रॉन यांचे कंपनीचे खरेदीची किंमत रु. १०,९३,५००/- इतकी होते.

उपरोक्त पंप खरेदी बाबत मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांना टिपणीचा फॅक्स करुन त्यांचा अभिप्राय घेण्यात आला होता. त्यावर त्यांनी मे. बी. ब्रॉन लि., मुंबई या कंपनीचे पंप चांगले असल्याचे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर विषयावर चर्चा होत असताना, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ बी.गोंदकर यांनी सभेस अशी माहिती दिली की, Baxter या कंपनीकडे सलाईन खरेदी केल्यास सिरींज पंप मोफत देण्याची योजना आहे. या योजनेबाबत कंपनीकडे चौकशी करावी. अशी योजना नसल्यास वरीलप्रमाणे २० सिरींज पंप खरेदी करण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.४६. श्रीसाईनाथ रुग्णालयमध्ये इ.एन.टी.च्या अद्यायावत शस्त्रक्रिया करण्यासाठी मशिनरी/उपकरणे/ हत्यारे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५७५.** श्रीसाईनाथ रुग्णालयात सध्या नाक-कान घश्यावरील सर्वसाधारण (General) शस्त्रक्रिया करण्यात येत असतात. बऱ्याचदा काही विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रिया होतात. परंतू आपणाकडे सदरचे मशिनरी/उपकरणे/हत्यारे नसल्यामूळे अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया होत नाहीत. त्यासाठी रुग्णांना पुणे, अहमदनगर, मुंबई इत्यादी ठिकाणी पाठवावे लागते. संस्थानकडे अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया होण्यासाठी डॉ.आर.के.कुलकर्णी यांनी सादर केलेल्या यादीप्रमाणे मशिनरी/उपकरणे/हत्यारे मागणी केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रुपये ३५,०१,०००.०० इतका खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली, सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागवून करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.४७. पुरग्रस्तांसाठी ए.एस.व्ही.इन्जेक्शन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५७६.** नुकत्याच झालेल्या पावसामूळे कोपरगांव, राहता,श्रीरामपूर तालूक्यातील गोदावरी व प्रवरा नद्यांना महापूर आलेले आहे. या पुरामूळे नदीतील सर्प बाहेर येऊन नदीकाठच्या लोकांना सर्पदंश होण्याची जास्त शक्यता असते. ज्या लोकांना तात्पूरता निवारा देण्यात आलेला आहे अशा लोकांना सर्पदंश झाल्यास त्यांना उपचारासाठी उपरोक्त इंजेक्शनची आवश्यकता असते.

मा.अध्यक्ष महोदय यांनी वरील इंजेक्शन खरेदी करुन शिर्डी परिसरातील सरकारी दवाखान्यांमध्ये त्यांचे मागणीनुसार मदत म्हणून देण्याबाबत सुचना केल्या आहेत.

सदरचे इलेक्शन खरेदीकामी मे.भारत सिरम, मुंबई या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.विश्वेश एंटरप्रायजेस, संगमनेर यांना विचाराणा केली असता त्यांचे दर प्रती इंजेक्शन ३८६.४० असे आहेत. तर मे हाफकिन बायोफार्मा कार्पोरेशन, मुंबई या सरकारी उत्पादक कंपनीचे दर रुपये २९६.४० प्रती इंजेक्शन असे आहेत.

वरील दरांचा विचार करता मे.हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांचे दर निम्नतम असून त्यांचेकडून १००० इंजेक्शन खरेदी केलेले आहे. त्यासाठी एकूण रुपये २,९६,४००.०० इतका खर्च आलेला आहे. तरी रुपये २,९६,०००.०० चे खर्चास व खरेदीस कार्योत्तर मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याच वेळेस सदरची इंजेक्शन्स पुरग्रस्तांना मोफत पुरविण्यात यावीत. तसेच इतर रुग्णालयांनी मागणी केल्यास ५० टक्के शुल्क आकारुन देण्यात यावे, असें ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४८. सन २००६-२००७ गाय दुध दरवाढीबाबत.**

**निर्णय क्र.५७७.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० ड(०५) नुसार सन २००६-०७ मध्ये कॅन्टीनसाठी आवश्यक असणारे गाय दूध खरेदीकामी निविदा मागणी करणेस तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधित निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०४.२००६ चे सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी निमंत्रीत करणेत येऊन त्यांचेकडून मुळ दरावर सुट पत्र देणेबाबत सांगणेत आले होते. त्यावर मे.गोदावरी खोरे, कोपरगांव यांनी त्यांचे दि.२३.०४.२००६ पत्राने सादर केलेल्या निविदामध्ये रु.१/-प्र.लिटर दरवाढ करणेत येऊन रु.१२.५० प्रति लिटर असा दर ग्राहय धरण्यात यावा असे कळविलेले आहे. तसेच त्यापुढे पुन्हा त्यांनी त्यांचे दि.२४.०४.२००६ चे पत्राने दूध पुरवठयासाठी दर रु.११.८५ प्र.लिटर शिरर्डी पोहोच असा राहील. सदर दरामध्ये ५ पैसे प्रती लिटर कमी करण्यास तयार असल्याचे पत्र त्यांनी सादर केले. त्यानुसार मा.व्यवस्थापन उपसमितीच्या दि.०३.०५.२००६ चे सभेत कँटीनकरीता आवश्यकता असलेले गाईचे दूध गोदावरी खोरे नामेदवरावजी परजणे पाटील तालूका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव यांचेकडून प्रती लिटर रु.११.८५ या निम्नतम दराने

घेण्याचा निर्णय झालेला होता. त्यानुसार मे.गोदावरी खोरे, कोपरगांव यांना त्यांचे पत्रानुसार जा.क्र.७२१६ दि.०२.०६.२००६ अन्वये रु.११.८० प्रती लिटर दराने पुरवठा आदेश देणेत आलेला असून दि.०४.०६.२००६ पासून त्यांनी पुरवठा करणेस सुरुवात केलेली आहे.

मे.गोदावरी खोरे, कोपरगांव यांनी त्यांचे दि.३१.०५.२००६ चे पत्राने महाराष्ट्र शासनाने दि.१ जून २००६ पासून दूध उत्पादकांच्या दूध खरेदी दरामध्ये भाववाढ केल्याने दुधाचा दर रु.१३/-प्र.लिटर राहील अशी मागणी केल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाचा जी.आर.पाठविण्यास सांगणेत आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि.१६.०६.२००६ चे पत्राने महाराष्ट्र शासनाने दि.१३ जून २००६ पासून दूध उत्पादकांच्या दरात वाढ जाहिर केलेली असल्याने दूध व तूपात दरवाढ करणे अपरिहार्य असल्याचे कळवून स्थानिक बाजारापेठेतील दरापेक्षा रु.०.५०पैसे कमी दर आकारणेचे कळविलेले आहे व सदरचे पत्रासोबत महाराष्ट्र शासन दरवाढीच्या जी.आरची झेरॉक्स प्रत पाठविलेली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमएलके १००५/१२८१/प्र.क्र.१५/पदुम-८ मंत्रालय, मुंबई ३२ दि.१३ जून २००६ अन्वये, दूधाच्या खरेदी दरात रुपये १.२५ प्रति लिटर इतकी वाढ करण्यात यावी असे नमुद केलेले आहे. मे.गोदावरी खोरे यांना रु.११.८० प्रति लिटर दराने पुरवठा आदेश दिलेला असल्याने रु.१.२५ प्र.लिटर दरवाढ केल्यास ती रु.१३.०५ प्रति लिटर अशी होईल. निविदेतील व पुरवठा आदेशातील शर्ती व अटीमध्ये "शासनाने दरवाढ केल्यास, संबंधित जी.आरची प्रत सादर केल्यानंतर दरवाढीचा विचार केला जाईल." असे नमुद केलेले आहे. मे.गोदावरी खोरे, कोपरगांव यांनी शासनाच्या जीआरची प्रत सादर केलेली असून त्यांना दि.१३.०६.२००६ पासून त्यानुसार दरवाढ द्यावी लागेल.

तरी मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव यांचेकडून रु.१३/-प्र.लिटर दराने गाय दूध खरेदी करणेस तसेच दि.१३.०६.२००६ पासून दरवाढीचा फरक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी अधिकारी)

**विषय नं. ४९.** **सन २००६-२००७ गावरान तूप खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७८.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० ड(२) नुसार सन २००६-०७ करीता किराणा माल व प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारे गावरान तूप (सहामाही) १७०० क्विंटल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या निविदाधारकांना दि.२४.०४.२००६ चे सभेत आमंत्रित करणेत येऊन सुधारीत दर देण्यास सांगणेत आलेले होते. त्यानुसार पुरवठाधारकांकडून देण्यात आलेले सुधारित दर व निवडण्यात आलेले स्विकारार्ह नमुने यांची छाननी करुन प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी सन २००६-०७ या वर्षाकरीता आवश्यक असलेला खाण्यास योग्य उत्तम प्रतीचा किराणा माल खरेदी करण्याचे अधिकार मा.विश्वस्त श्री अभंग सो., मा.श्री वाबळे., मा.श्री खांबेकर., व मा.डॉ.गोंदकर., यांचे उपसमितीला प्रदान करण्यात आले.

मा.व्यवस्थापन उपसमितीच्या दि.०३.०५.२००६ चे सभेत गावरान तूप खरेदीकामी "मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस, संगमनेर यांनी दि.०३.०५.२००६ चे पत्राने गावरान तूप प्रती किलो रु.११०/- (सर्व करांसहीत) १००% पुरवठा करणेस तयार असल्याचे कळविलेले असल्याने त्यांचेकडून गावरान तूप खरेदी करण्याची शिफारस करण्यात आली तसेच तूपाची खरेदी ही प्रामुख्याने तूप उत्पादकांकडून करण्यात यावी. मे.पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा हे निम्नतम दराने पुरवठा करण्यास तयार असल्यास त्यांचेकडूनही विभागून निम्मे गावरान तूप खरेदी करण्यात यावे" असा निर्णय झालेला आहे. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.०५.२००६ निर्णय क्र.३०८ नुसार मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि,.संगमनेर यांना जा.क्र.७२६५ दि.०२.०६.२००६ अन्वये ८५० क्विंटल कॅनमधील लूज गावरान तूपाचा पुरवठा आदेश देणेत आलेला असून मे.पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा यांना जा.क्र.७१४०/०१.०६.२००६ अन्वये पत्र देऊन रु.११०/-प्र.किलो (व्हॅटसह) दर मान्य असलेबाबतचे संमतीपत्र पाठविण्यास सांगणेत आले असता, त्यांनी त्यांचे दि.२८.०६.२००६ चे पत्राने दूधाचे तसेच डिझेलचे भाव तसेच वहातुक खर्च वाढलेला असल्याने पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. मे.एस.आर.थोरात मिल्क, संगमनेर यांनी दि.१०.०८.२००६ अखेर ९५० क्विंटल तूपाचा पुरवठा केलेला असल्याने मागणीपेक्षा १०० क्विंटलचा जादा पुरवठा केलेला आहे. तसेच संस्थानची अडचण होऊ नये म्हणून त्यांना केलेल्या विनंतीनुसार त्यांचेकडील पुरवठा चालू आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.१३.०६.२००६ रोजी दूध खरेदी दरामध्ये वाढ केलेली असल्याने मे.एस.आर.थोरात मिल्क यांनी त्यांचे पत्र क्र.१८२५ दि.०२.०८.२००६ ने रु.१२५/-प्रती किलो दरवाढ मागितलेली आहे. मे.पराग मिल्क यांनीही दि.२८.०६.२००६ चे पत्राने रु.१३०/-प्रती किलो दर मागितलेला होता. तरी दोन्ही पुरवठाधारकांशी चर्चा करुन दरवाढीबाबत निर्णय घ्यावा लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एस.आर.थोरात,संगमनेर व मे.पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा यांना सहामाही खरेदीमधील शिल्लक ८५० क्विंटल गावरान तूपापैकी प्रत्येकी ५० टक्के गावरान तूप प्रति किलो रुपये १२५.०० (व्हॅटसह) या निम्नतम दराने पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा. मे.पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा हे रुपये १२५.०० प्रति किलो (व्हॅटसह) या निम्नतम दराने लूज गावरान तूप पुरवठा करण्यास तयार नसल्यास मे.एस.आर.थोरात,संगमनेर यांचेकडून दिनांक ०३.५.२००६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत ठरलेनुसार मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालूका सहकारी दुध

उत्पादक संघ कोपरगांव यांचेकडूनही प्रति किलो रुपये १२५.०० (व्हॅटसह) एकूण ८५० क्विंटल लूज गावरान तूप खरेदी करण्यात यावे. त्यांनीही सदरचे निम्नतम दराने लुज गावरान तूपाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्यास पूर्ण ८५० क्विंटल लूज गावरान तूप मे.एस.आर.थोरात,संगमनेर यांचेकडून निम्नतम दराने खरेदी करण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी अधिकारी)

**विषय नं. ५०. सन २००६-२००७ पॉलिकप खरेदी बाबत**

**निर्णय क्र.५७९.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० नुसार सन २००६-०७ करीता कॅन्टीनसाठी आवश्यक असणारे पॉलीकप-७५ लाख नग खरेदीकामी मागविण्यात आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१.०४.२००६ मध्ये उघडणेत येऊन निवडक नमुने निवडणेत आलेले होते. तसेच निवडलेल्या नमुनेधारकांना मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २४.०४.२००६ चे सभेत आमंत्रित करणेत येऊन सुधारीत दर देण्यास सांगणेत आले. त्यावर सुधारीत दर व निवडण्यात आलेले स्विकारार्ह नमुने यांची छाननी करुन प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी सन २००६-०७ या वर्षाकरीता आवश्यक असलेला खाण्यास योग्य उत्तम प्रतीचा किराणा माल खरेदी करण्याचे अधिकार मा.विश्वस्त श्री.अभंग पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरशे गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे उपसमितीला प्रदान करण्यात आले.

मा.व्यवस्थापन उपसमितीच्या दि.२७.०४.२००६ चे सभेत स्विकारार्ह नमुने पाहून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार व्हर्जीन फुड ग्रेड, १०० मिली क्षमता असलेले, पॉलीकप-७५ लाख नग खरेदीकामी मे.सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर व मार्केट मेकर्स, पुणे यांचेकडून रु.१५९.७४ प्रती हजारी नग दराने विभागून खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.०५.२००६ निर्णय क्र.३०८ नुसार मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार मे.सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर व मार्केट मेकर्स, पुणे यांना प्रत्येकी ३७.५ लाख नग पॉलीकपचा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. तसेच पुरवठा करणेची हमी म्हणून त्यांचेकडील बयाणा रक्कम रु.२५,०००/- त्यांचे सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेत आलेली आहे. मे.सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर व मे.मार्केट मेकर्स, पुणे यांना खरेदी मालाचे चलने पाठविणेत आलेले असून मे.सिद्धार्थ कंटेनर्स यांचा पुरवठा सुरु झालेला आहे. मात्र मे.मार्केट मेकर्स, पुणे यांनी अदयापपावेतो पॉलीकपचा पुरवठा केलेला नाही. याबाबत त्यांना विचारणा केली असता, दर परवडत नसल्याचे सांगितले. तसेच मे.मार्केट मेकर्स, पुणे यांनी त्यांचे दिनांक नसलेले मात्र दि.२४.०६.२००६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये पॉलीकपचे भाव जास्त वाढलेले असल्याने मंजूर दराने पुरवठा करु शकत नसून पॉलीकपसाठी भरलेले डिपॉझीट परत मिळणेची विनंती केलेली आहे.

निविदेतील तसेच पुरवठा आदेशातील शर्ती व अटीनुसार "मंजूर झालेल्या मान्य दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. तसेच माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा नमुनाबरहुकूम माल पुरवठा न केल्यास, पुरवठा न केलेल्या मालाच्या रकमेच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत खात्यातून दंड म्हणून वसुल करणेत येईल." असे नमुद केलेले आहे. तथापि मे.मार्केट मेकर्स, पुणे यांनी सन २००५-०६ मध्ये संस्थानचे मागणीनुसार पॉलीकपचा पूर्णक्षमतेने, वेळेवर पुरवठा केलेला आहे हे विचारात घेऊन त्यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करुन त्यांचेकडील पॉलीकपची मागणी मे.सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर यांचेकडून मंजूर दराने पुर्ण करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मार्केट मेकर्स,पुणे यांनी नियमानुसार पॉलिकपचा पुरवठा करणे आवश्यक आहे. तथापि ते मालाचा पुरवठा करणेस तयार नसल्यास त्यांचा पुरवठा आदेश रद्द करुन त्यांचे बयाणा रकमेतून रुपये ५०००/- मात्र दंड वसूल करण्यात यावा व उर्वरित मालाचा पुरवठा आदेश मे.सिध्दार्थ कंटेनर्स,श्रीरामपूर यांना देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी अधिकारी)

**विषय नं. ५१. ट्रॅक्टर खरेदी कामी आलेल्या कोटशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५८०.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ निर्णय क्र.१४८ नुसार कनकुरी येथील साठवण तलावावरील नांगरट करणे व नव्याने शेती महामंडळाचे खरेदी केलेल्या शेतीची मशागत करणे इत्यादी कामासाठी आवश्यक असणारा जॉनडियर कंपनीचा ट्रॅक्टर तसेच पल्टीप्लाऊ, सरी रेझर व इतर अनुषंगिक साहित्य अधिकृत विक्रेत्याकडून खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-बगीचा/८०२४/२००६दि.१९.०६.२००६ अन्वये दि.२४.०६.२००६ अखेर दरपत्रके मागविणेत आलेले असून मुदतीअंती खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झ ालेली आहेत. त्याचा तपशिल-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव | ट्रॅक्टर कंपनीचे नांव |
|---|---|---|
| ०१ | मायकेल ॲटोमोबाईल्स, श्रीरामपूर | एचएमटी |
| ०२ | अंबिका ॲटोमोबाईल्स, येवला | आयशर |
| ०३ | मातृछाया सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस प्रा.लि., अहमदनगर | जॉनडिअर |
| ०४ | राहुल ट्रॅक्टर्स, कोल्हार | जॉनडिअर |
| ०५ | भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा.लिमीटेड, कोपरगांव | स्वराज |

उपरोक्त निविदाधारकांपैकी फक्त क्र.३ व ४ यांनीच संस्थानचे मागणीप्रमाणे जॉनडिअर कंपनीचे ट्रॅक्टरचे दर भरलेले असल्याने त्यांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव | ट्रॅक्टर कंपनीचे नांव | कोटेशनमधील दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | मातृछाया सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस प्रा.लि., अहमदनगर | जॉनडिअर | ४,८३,३३५.०० | ४,८३,३३५.०० |
| ०२ | राहुल ट्रॅक्टर्स, कोल्हार | जॉनडिअर | ४,८१,५३५.०० | ४,६१,५३५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.राहूल ट्रॅक्टर्स, कोल्हार यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी/वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ५२. विद्युत पाणीपुरवठा, स्वच्छता, बगीचा,स्टेशनरी यांचे खरेदीबाबत .**

**निर्णय क्र.५८१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ निर्णय क्र.२७१ नुसार सन २००६-०७ सालामध्ये विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम, स्वच्छता, बगीचा विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरीचे वार्षिक खरेदीस व त्याकामी येणारे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१. | विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण साहित्य | रु.३३,२४,६६२.७५ |
| ०२. | स्वच्छता व बगीचा साहित्य | रु. ६,६९,२५०.०० |
| ०३. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी | रु.१३,९३,२४७.५० |

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून मागविण्यात आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत येऊन संबंधितांना दि.३.५.२००६ चे उपसमितीत चर्चेसाठी निमंत्रित करणेत आलेले होते. सदरील सभेत त्यांनी दिलेल्या दरावर सुटपत्र देण्याबाबत सांगणेत आलेले असून संबंधितांनी सुट दराचे तसेच दरवाढीचेही पत्र दिलेले आहे. त्यानुसार साहित्यासाठी ज्यांचे दर न्युनतम आलेले आहेत त्यांना अलाहिदा पुरवठा आदेश पाठविणेत आलेले आहेत. विदयुत, पाणीपुरवठा, स्वच्छता, बगीचा तसेच स्टेशनरी साहित्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा तसेच आलेल्या खर्चाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे-

**०१. विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण साहित्य-**

विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण साहित्यासाठी एकुण ०९ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांचे नाव काळया यादीत टाकणेत आलेले असल्याने त्यांचे निविदेचा विचार केलेला नाही. पुरवठा आदेश देणेत आलेल्या साहित्य खरेदीस रु.३४,२०,६८०/- खर्च आलेला असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.९६,०१८/-जादा खर्च आलेला आहे. तसेच ज्या साहित्यासाठी दर आलेले नाही त्या साहित्यासाठी फेरकोटेशन मागणी करावी लागेल. फेरकोटेशन मागणी करुन येणाऱ्या साहित्यासाठी अंदाजे रु.४,३०,३८५/-खर्च अपेक्षित असल्याने एकुण ३८,५१,०६५/- पुर्णांकित रक्कम रु.३८.५२ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता असावी.

**०२. स्वच्छता व बगीचा साहित्य-**

स्वच्छताचे साहित्यासाठी प्राप्त झालेल्या १४ निविदापैकी काही निविदाधारकांनी निवडक नमुने दिलेले होते. सदरील सर्व नमुने स्वच्छता विभागाकडे पाठविणेत येऊन त्यावर अभिप्राय देणेबाबत सांगणेत आलेले होते. स्वच्छता विभागाने प्राप्त नमुने वापरुन पाहिलेले असून त्यावर त्यांनी अभिप्राय दिलेला आहे. नमुने आवश्यक नसलेल्या ठिकाणी व बगीचा औषधे, किटकनाशकासाठी न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेले आहे. आदेश देणेत आलेल्या साहित्य खरेदीस **रु.६,४४,३९७/-**खर्च येणार आहे. या व्यतिरीक्त उर्वरीत साहित्यासाठी नमुने पाहून आदेश देणेत येईल.

**०३. कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी**

कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्यासाठी १० निविदा प्राप्त झालेल्या असून न्युनतम दर येणाऱ्या निविदाधारकांस पुरवठा आदेश देणेत आलेले आहे. रुग्णालय तसेच इतर विभागांची झेरॉक्स पेपरची मागणी पहाता, ४०० रिम मंजूर दराने खरेदी करणेत येत आहे. सदरील सर्व साहित्यासाठी **रु.१३,१०,३७८/-**खर्च येणार आहे. दर न आलेल्या ९ नग काट्रेजसाठी फेरकोटेशन मागणी करणेत येत आहे.

उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ५३. संस्थान कर्मचारी गणवेश खरेदीबाबत अहवाल.**

**निर्णय क्र.५८२.** संस्थानमधील कायम कर्मचा-यांसाठी (स्त्री व पुरुष) गणवेषाचे कापड, साडया इ. खरेदी तसेच शिलाई विहीत पद्धतीने करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१३,१६,४५०/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ निर्णय क्र.१६३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून मागविणेत आलेल्या निविदा मा.स्थानिक विश्वस्त समितीचे दि.२५.०५.२००६ चे सभेत उघडणेत येऊन संबंधितांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०६.२००६ मध्ये आमंत्रित करणेत येऊन निविदेतील दरावर सुट देणेबाबत सांगणेत आलेले होते. याचवेळेत मा.विश्वस्त श्री शैलेश कुटे यांनी सभेस अशी माहिती दिली की, रेमंड कंपनीचे मालक हे साईभक्त आहेत व वारंवार शिरडी येथे साईबाबांचे दर्शनासाठी ते येत असतात, ते संस्थानसाठी कंपनीमार्फत रेमंड कंपनीचे कापड बाजारातील दरापेक्षा जास्तीत जास्त सवलतीचे दराने देतील. तरी त्या दराने संस्थान कर्मचा-यांकरीता गणेवश कापड खरेदी करावे असा निर्णय झालेला असल्याने दि.१८.०६.२००६ रोजी मा.विश्वस्त श्री शैलेश कुटे सो., डॉ.गोंदकर सो.,यांचे समवेत अधिक्षक खरेदी यांनी दि.१८.०७.२००६ रोजी ठाणे येथील रेमंड कंपनीत जाऊन नमुन्यांची पहाणी केलेली असून काही निवडक नमुने निवडलेले आहे. निवडणेत आलेल्या नमुन्यांचे मे.रेमंड लिमीटेड, ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र.आयएनएस/एलसी/००२/२००६ दि.१८.०७.२००६ ने खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | क्वॉलिटी तपशिल | दर प्र.मीटर |
|---|---|---|
| ०१. | सुटींग-०१४३००१०१९ | रु.१९५/- |
| ०२. | सुटींग-०१४१८०५३५५ | रु.२१७/- |
| ०३. | सुटींग-०१४३०११८९४ | रु.१६८/- |
| ०४. | सुटींग-०१५३००२९३९ | रु.१३४/- |
| ०५. | सुटींग-०१५३००२८२४ | रु.१३४/- |
| ०६. | शर्टींग-००९१४१०० | रु.६८/- |

मे.रेमंड लिमीटेड, ठाणे यांचे पत्रानुसार उपरोक्त दरावर ४ टक्के व्हॅट टॅक्स, टेक्सटाईल कमिटी सेसचा दर रु.०.०५ व इन्शुरन्सचा दर रु.०.१५ असा जादा राहील. तसेच वाहतुक भाडे व इतर चार्जेस संस्थानला आदा करावे लागतील. कापडाची डिलेव्हरी ही दोन ते अडीच महिन्यात केली जाईल. संस्थानचे पुरुष कर्मचाऱ्यांसाठी सध्या खालीलप्रमाणे कापडाची आवश्यकता आहे.

| अ.नं. | वर्गवारीचा तपशिल | क्वॉलिटी तपशिल | शेड क्रमांक | मागणी मीटर | दर प्र.मीटर | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासकीय अधिकारी | सुटींग-०१४३००१०१९ सफेद | १ | २५ | १९५/- | ४,८७५/- |
| ०२. | अधिक्षक/ खातेप्रमुख | सुटींग-०१४१८०५३५५ | १ | १८५ | २१७/- | ४०,१४५/- |
| ०३. | लिपीक/ व.लिपीक | सुटींग-०१४३०११८९४ | ५३ | ८७० | १६८/- | १,४६,१६०/- |
| ०४. | वर्ग-४ | सुटींग-०१५३००२९३९ | ८७३ | १६६० | १३४/- | २,२२,४४०/- |
| ०५. | वर्ग-४(स्वच्छता) | सुटींग-०१५३००२९३९ | ६७८ | १६० | १३४/- | २१,४४०/- |
| ०६. | डॉक्टर/तंत्रज्ञ/ वार्डबॉय | सुटींग-०१५३००२८२४ सफेद | २४ | ४८७ | १३४/- | ६५,२५८/- |
| ०७. | शिक्षक/ वाहनचालक | सुटींग-०१५३००२८२४ | ४९ | १५१ | १३४/- | २०,२३४/- |
| ०८. | संरक्षण कर्मचारी | सुटींग-०१५३००२८२४ खाकी | ६५८ | ४०० | १३४/- | ५३,६००/- |
| ०९. | वाहनचालक | शर्टींग-००९१४१०० | १ | ८१ | ६८/- | ५,५०८/- |
| १०. | शिक्षक | शर्टींग-००९१४१०० | २ | २०२ | ६८/- | १३,७३६/- |
| | | | एकुण | | | ५,९३,३९६/- |
| | | | व्हॅट टॅक्स ४ टक्के | | | २३,७३६/- |
| | | | एकुण रक्कम | | | ६,१७,१३२/- |
| | | | +टेक्सटाईल्स कमिटी सेस दर रु.०.०५ पैसे व इन्श्युरन्स दर रु.०.१५ पैसे प्रती शेकडा + वहातुक खर्च | | | |

उपरोक्तप्रमाणे पुरुष कर्मचारी गणवेश कापड खरेदीस रु.६,१७,१३२/-अधिक टेक्सटाईल्स कमिटी सेस, इन्श्युरन्स व वहातुक खर्च अधिक दयावा लागेल. स्त्री कर्मचारी गणवेष कापड खरेदीकामी प्राप्त झालेल्या नमुन्यातून गणवेष निवडता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे मे.रेमंड लिमीटेड, ठाणे यांचेकडून पुरुष कर्मचारी गणवेश कापड खरेदीस तसेच निविदाधारकांनी सादर केलेल्या निविदेतील दर व नमुना विचारात घेऊन उपसमितीने स्त्री कर्मचारी गणवेष कापड खरेदी करणेस मान्यता देणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ५४. एम.एस.हार्डवेअर साहित्य जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५८३.** अ)विद्युत विभागाचे दि.०५.०४.२००६ चे मंजूर प्रस्तावानुसार प्रसादालयाजवळ साईभक्तांकरीता बस थांबा शेड बांधणेकामी आवश्यक असणारे एम.एस.हार्डवेअर साहित्य व फायबर खुर्च्या खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२४,५९६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.५६३४/२९.०१.२००६ अन्वये दरपत्रके मागविणेत येऊन दरपत्रकातील न्युनतम दराने मे.हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजिनीअरींग कंपनी, मुंबई व मे.गंगाधर पांडुरंग मोकळ, नांदगांव यांना पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांनी साहित्याचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सदरील साहित्य खरेदीकामी रु.४०,६६०/-खर्च आलेला असल्याने मुळ मंजूरी पेक्षा रु.१५,७०४/- जादा खर्च आलेला आहे.

ब) विद्युत विभागाचे दि.१७.०४.२००६ चे मंजूर प्रस्तावानुसार चौकशी ऑफीस विभागाकडील रॅक्सला टॉप बनविणेसाठी आवश्यक असणारी २५X३ एमएम साईजची एम.एस.फ्लॅट पट्टी १००० किग्रॅ. खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र. ७४८६ दि.०८.०६.२००६ अन्वये दरपत्रके मागविणेत येऊन दरपत्रकातील न्युनतम दराने मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांना जा.क्र.७४६८/ ०८.०६.२००६ रक्कम रु.३४,०००/- मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. साहित्याचे वजन किग्रॅ.मध्ये असल्याने प्रत्यक्षात एकुण १०४० किग्रॅ. एम.एस.पट्टी प्राप्त झालेली असल्याने रु.३५,३६०/-खर्च झालेला असल्याने रु.१०,३६०/- जादा खर्च आलेला आहे.

क) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.१०.२००५ निर्णय क्र.६१८ नुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत कनिष्ठ महाविद्यालयासाठी बनविणेत येणा-या ६० नग बेंचेससाठी आवश्यक असणारे हार्डवेअर साहित्य व सागवान फळया खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,१८,६२०/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.११८२५ दि.१७.१०.२००५ अन्वये एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीकामी व जा.क्र.१४२०६ दि.०७.१२.२००५ अन्वये सागवान फळया खरेदीकामी दरपत्रके मागविणेत येऊन न्युनतम दराने फळयांसाठी दि पटेल सॉ मिल, कोपरगांव व इतर साहित्यासाठी न्युनतम दराने २ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेला होता. सर्व साहित्याचा पुरवठा पुर्ण झालेला असून याकामी एकुण रु.१,३३,४१२/-खर्च झालेला असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.१४,७९२/-जादा खर्च आलेला आहे.

ड) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.७४ नुसार कनिष्ठ महाविद्यालयासाठी १२५ नग बेंचेस बनविणेसाठी आवश्यक असणारे हार्डवेअर साहित्य व सागवान फळया खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२,५०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.७४७५ दि.०८.०६.२००६ अन्वये सागवान फळया व जा.क्र.७४७९ दि.०८.०६.२००६ अन्वये एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीकामी दरपत्रके मागविणेत येऊन दरपत्रकातील न्युनतम दराने सागवान फळया पुरविणेकामी मे.गायत्री सॉ मिल, श्रीरामपूर यांना व मे.एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीकामी न्युनतम दराने ४ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. याकामी एकुण रु.२,८६,६००/-खर्च येणार असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.३६,६००/-जादा खर्च येणार आहे.

इ) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ निर्णय क्र.२९२ नुसार प्रसादालय डायनिंग टेबलकरीता नविन फ्रेम तयार करणेसाठी आवश्यक असणारा एम.एस.स्क्वेअर पाईप व जी.आय.राऊंड पाईप खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,०५,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.९०३१ दि.१०.०७.२००६ अन्वये मागविणेत आलेल्या दि.१८.०७.२००६ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेल्या दरपत्रकातील न्युनतम दराने मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांना व मे.हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजिनीअरींग कंपनी, मुंबई यांना पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. याकामी एकुण रु.१,५०,५५५/-खर्च येणार असल्याने मूळ मंजूरीपेक्षा रु.४४,८०५/-जादा खर्च येणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीकामी येणाऱ्या जादा खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं. ५५. नगर -मनमाड रोडच्या डिव्हायडरला बगीचा संरक्षक ग्रील तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र.५८४.** नगर-मनमाड रोडला तयार केलेल्या डिव्हायडरमध्ये फुलझाडे लावून रोड सुशोभित करावयाचा आहे. त्यामध्ये झाडे लावण्यात आली होती. परंतु पादचाऱ्यांनी ती येऊ दिली नाहीत. नगर-मनमाड रोडला कनकुरी रस्त्यापासून ते साईप्रसाद नं.२ च्या बिल्डींग पर्यंतच्या एकुण ७३४ मीटर (३६७x२) अंतराच्या डिव्हायडरला ग्रील बसवावे असे मा. अध्यक्ष महोदय यांनी घेतलेल्या राऊंडमध्ये सूचविले आहे.

नगर-मनमाड रोडच्या डिव्हायडरमधील फुलझाडांना संरक्षण म्हणून कनकुरी रोड ते साईप्रसाद नं.२ पर्यंतच्या डिव्हायडरला ग्रील तयार करणेसाठी खालीलप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | महावीर / स्वस्तिक मेक<br>एम.एस. ॲंगल, | ०८,४०० किलो. | रु. ०,०३०/- (प्रति किलो) | २,५२,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | साईज - ४० X ४० X ५ एम.एम | | | |
| ०२) | महावीर / स्वस्तिक मेक<br>एम.एस.स्क्वेअर बार.,<br>साईज :- १६ एम.एम | १०,२३२ किलो. | रु. ०,०३०/- (प्रति किलो) | ३,०६,९६०.०० |
| ०३) | महावीर/स्वस्तिक मेक<br>एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज- २५ x ५ एम.एम. | ०१,१७६ किलो. | रु. ०,०३०/- (प्रति किलो) | ३५,२८०.०० |
| ०४) | ॲडॉर वेल्डींग मेक वेल्डींग रॉड,<br>साईज - ३.२० स्क्वेअर एम.एम. | ००,०३५ बॉक्स. | रु. २,१००/- (प्रति बॉक्स) | ७३,५००.०० |
| ०५) | एशियन / नेरोलॅक मेक रेड ऑक्साईड, | ००,४०० लिटर्स. | रु. ०,१००/- (प्रति लिटर्स) | ४०,०००.०० |
| ०६) | एशियन / नेरोलॅक मेक काळा कलर, | ००,४०० लिटर्स. | रु. ०,१२०/- (प्रति लिटर्स) | ४८,०००.०० |
| ०७) | एशियन / नेरोलॅक मेक थिनर. | ००,०५० लिटर्स. | रु. ०,०७५/- (प्रति लिटर्स) | ३,७५०.०० |
| ०८) | नट बोल्ट, एम.एस.फूल थ्रेडेड,<br>साईज - ३/८" X २.१/२" | ००,१०० किलो. | रु. ०,०६०/- (प्रति किलो) | ६,०००.०० |
| | | | | ७,६५,४९०.०० |

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ही ग्रील बाहेरील वर्कशॉपधारकांकडून/ फॅब्रिकेटर्सकडून करुन घेणेसाठी निविदा बोलाविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ५६. नगर-मनमाड रोडवर हाय-मास्ट पोल उभे करून त्यावर मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेकामी टेंडरधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करून निर्णय घेणे..**

**निर्णय क्र.५८५.**मा.अध्यक्ष साहेब व मा.विश्वस्त श्री.कैलास बापू कोते यांचा नगर-मनमाड रोड व रथ-पालखी रस्ता या ठिकाणी राऊंड झाला. नगर-मनमाड रोडवर असलेल्या स्ट्रीट लाईट पोलवरील सध्याचे सोडीअम लॅम्प हे कमी क्षमतेचे असल्याने त्यांचा प्रकाश अंधूक पडतो. त्यामुळे वाहतूकीवर परिणाम होतो व वातावरण प्रसन्न वाटत नाही, याकरिता नगर-मनमाड रोडवर ०६ ठिकाणी फिलिप्स कंपनीचे हाय-मास्ट पोल उभे करून त्यावर फिलिप्स कंपनीचे पांढऱ्या प्रकाशाचे मेटल हॅलाईड लॅम्प बसविणे तसेच सध्याच्या जुन्या पोलवरही सोडीअम लॅम्पऐवजी फिलिप्स कंपनीचे पांढऱ्या प्रकाशाचे मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेबाबत निश्चित झाल्यानुसार यासाठी येणाऱ्या रू. १०,२२,२४६.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३-०६-२००६ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.१५ अन्वये मान्य करण्यात आला आहे. येणा-या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेसाठी तत्वत: मान्यता मिळाली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर मागविण्यात आले होते.

मुदतीत खालीलप्रमाणे संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ०७ व मुंबई कार्यालयात ०२ टेंडर प्राप्त झाले असून तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.बी.जे.इलेक्ट्रीक, नाशिक |
| ०२ | मे.मनिषा इंजिनिअर्स ॲण्ड इरेक्टर्स, राहुरी, जि.अहमदनगर |
| ०३ | मे.बेटॉन कॉक्रीट प्रॉडक्टस प्रा.लि, औरंगाबाद |
| ०४ | मे.शाह ट्रेडींग कं., श्रीरामपूर |
| ०५ | मे. यश इलेक्ट्रो लाईन ,पुणे |
| ०६ | मे.कैलास ईलेक्ट्रो कॅान्टॅक्ट्स , औरंगाबाद |
| ०७ | मे.प्राग्य इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद |
| ०८ | मे.बोन्द्रे ॲण्ड असोसिएट्स,पुणे |
| ०९ | मे.सेन्झो इंजिनिअरींग प्रा.लि, नवी मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडरस आजचे सभेत उघडण्यात येऊन , निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चेसाठी बोलाविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ. नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | हायमास्ट पोल मेक | लाईट फिटींग मेक | निविदेतील दर | चर्चा /वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.बी.जे.इलेक्ट्रीक, नाशिक | फिलीप्स | फिलीप्स | ८,५८,४००.०० | अनुपस्थित |
| ०२ | मे.मनिषा इंजिनिअर्स ॲण्ड इरेक्टर्स, राहुरी, जि.अहमदनगर | बजाज | क्रॅाम्प्टन ग्रीव्हज | ८,३२,१५७.०० | ८,१५,५१४.०० |
| ०३ | मे.बेटॉन कॉक्रीट प्रॉडक्टस प्रा.लि, औरंगाबाद | बेटॉन ( कॉक्रींट) | फिलीप्स | १४,७४,८७२.०० | अनुपस्थित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | मे.शाह ट्रेडींग कं., श्रीरामपूर | फिलीप्स<br>बजाज | फिलीप्स<br>फिलीप्स | १८,४८,७८०.००<br>९,३०,७८०.०० | ९,४०,९३६.००<br>९,३०,७८०.०० |
| ०५ | मे. यश इलेक्ट्रो लाईन ,पुणे | बजाज | फिलीप्स | ६,४९,९९९.०० | ६,४९,९९९.०० |
| ०६ | मे.कैलास ईलेक्ट्रो कॉन्टॅक्ट्स , औरंगाबाद | सूर्या | फिलीप्स | ७,५१,.०००.०० | ७,२५,०००.०० |
| ०७ | मे.प्राग्य इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद | फिलीप्स | फिलीप्स | ९,६४,६३०.०० | ९,५०,१६०.५५ |
| ०८ | मे.बोन्द्रे ॲण्ड असोसिएट्स,पुणे | फिलीप्स | फिलीप्स | ७,२७,७०४.०० | अनुपस्थित |
| ०९ | मे.सेन्झो इंजिनिअरींग प्रा.लि, नवी मुंबई | सूर्या | फिलीप्स | ८,०२,०२२.०० | ८,००,०००.०० |

यावर चर्चा चालू असताना मा.विश्वस्त, डॉ.ई.बी.गोंदकर यांनी अशी सूचना केली की, उपरोक्त नमूद केलेल्या ६ ठिकाणांसोबतच पिंपळवाडी रोड ( मनोजकुमार गोस्वामी पथ) वरही आणखी २ हायमास्ट पोल उभे करुन त्यावर मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग लावण्यात याव्यात. यावर सविस्तर चर्चा होऊन मा.विश्वस्त,डॉ.ई.बी.गोंदकर यांनी सुचविल्यानुसार, हायमास्ट पोल उभारणीचा कार्यादेश देताना एकुण ०८ (आठ) हायमास्ट पोल उभारणीकरीता कार्यादेश देण्यात यावा. व या जादा २ हायमास्ट पोल, त्यावरील मेटल हॅलाईड लॅम्प व इतर अनुषंगिक बाबीसाठी लागणाऱ्या रु.१,८२,२५०.०० इतक्या जादा खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

संस्थानने फिलीप्स कं.चा हायमास्ट पोल व फिलीप्स कं.च्या मेटल हॅलाईड लॅम्पसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देउन निविदा मागविल्या होत्या. या अटीनुसार ९ निविदाधारकांपैकी फक्त ४ निविदाधारकांनीच फिलीप्स कं.च्या हायमास्ट पोल व फिलीप्स कं.च्या मेटल हॅलाईड लॅम्पकरीता दर नमूद केलेले आहेत. त्यापैकी निम्नतम दराचे निविदासादरकर्ते मे.बोन्द्रे ॲण्ड असोसिएट्स,पुणे व मे.बी.जे.इलेक्ट्रीक, नाशिक हे चर्चा / वाटाघाटीस अनुपस्थित होते. उर्वरित दोन निविदासादरकर्ते मे.प्राग्य इलेक्ट्रीकल्स्, औरंगाबाद व मे.शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर यांचे दरांचा तुलनात्मक विचार करता मे.शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्वीकारण्यात येउन, यासाठी येणाऱ्या रु. ११,२३,१८६.०० इतक्या खर्चास मान्यता देण्यात येऊन मे.शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर यांना उपरोक्त २ वाढीव हायमास्ट पोलसह एकुण ०८ (आठ) हायमास्ट पोल उभारणीकरीता कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. ५७. नवीन प्रसादालयाचे बांधकामासाठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.५८६.** मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीमार्फत गट नंबर 80-85 A निमगांव-को-हाळे शिवार येथे नविन प्रसादालयाच्या प्रकल्प उभारणीसाठी बांधकाम विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यांनी कामास सुरुवात केली असून दि.१०-०५-२००६ चे पत्रान्वये त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे वीजेचा सप्लाय मिळणेकामी मागणी केली होती, व तसे मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, शिरडी यांना संस्थान पत्र क्र. एसएसएस/ विद्युत /६४७१ / २००६ दिनांक :-१९-०५-२००६ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून त्यांना १० के.ड्ब्लू.लोड जोडून देण्यात आला आहे.

यानंतर मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे यांनी पत्र पाठवून टेंडरमधील पान क्र.१८ वरील स्पेशल कंडीशनमधील क्लॉज क्र. ०५ { ELECTRIC POWER :- Arrangements for obtaining electric power shall be made by the owner at his own cost. The Contractor will have to bear all the cost and bills, which will be charged by the M.S.E.B. Extension of time to complete the work in case of non-availability of electric supply will not be considered.} अन्वये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, शिरडी यांचे कडून ६३ केव्हीए इतका लोड मिळण्याबाबत संस्थानने व्यवस्था करावी असे लेखी कळविले आहे. त्याचबरोबर याकामी नेमलेले कन्सल्टींग एजन्सी मे. टी.सी. ई. कन्सल्टींग़ इंजिनिअर्स लिमिटेड,पुणे-मुंबई यांनीही याच स्वरुपाचे पत्र दिले आहे.

मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव यांनी संस्थानने स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर उभारुन मे.आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्टस लि.पुणे यांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,शिरडी यांचेकडून ६३ के.व्ही.ए.सप्लाय त्वरीत उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे ६३ केव्हीए इतका लोड मिळण्याबाबत विनंती केली असता यासाठी संस्थानला स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसवावा लागेल असे सांगितले. व या वीजपुरवठ्याकामी मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी, अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक २१.७.२००६ चे पत्रान्वये ४० के. डब्लू वीजपूरवठा मंजूर केला असून याकामी रुपये ३,५६,२५०.०० इतका खर्च त्यांनी कळविला आहे.

उपरोक्तप्रमाणे नविन प्रसादालयाचे चालू असलेल्या बांधकामासाठी मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे यांना त्वरीत ६३ के.व्ही.ए.सप्लाय उपलब्ध करून देणेसाठी

स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर खरेदी करून बसविणेसाठी मा.अधिक्षक, अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी, अहमदनगर यांनी रुपये ३,५६,२५०.०० इतका खर्च कळविला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. ५८. समाधी मंदिर परिसराच्या भोवताली असलेल्या कास्टींग आयर्न कंम्पाऊंडला आतून सुरक्षिततेसाठी लोखंडी बारीक जाळी बसविणे बाबत**

**निर्णय क्र.५८७.** मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचा राऊंड व संरक्षण विभाग दि.१२.०७.२००६ टिपणी अन्वये श्री समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेबाबत मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सूचना दिल्या आहेत.

अ ) कास्टींग कंपाऊंडचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कंपाऊंडचा तपशील | जाळी साईज | एकुण नग |
|---|---|---|---|
| ०१) | पिंपळवाडी रोडकडील बाजू | १७५" x ९२" | ४४ नग. |
| ०२) | नगर-मनमाड रोडकडील बाजू | १७५" x ९२" | ३० नग. |
| ०३) | भक्तनिवास इमारतीची पूर्व बाजू | १७५" x ९२" | १७ नग. |
| | | एकुण :- | ९१ नग. |

ब ) पिलर एकुण :- ९६ नग.

उपरोक्त तपशीलानुसार श्री समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | 8 'x 4' x 1.6 एम.एम., जी.आय.पंचिंग शीट | ३६४ नग. | रु. २,३००/- (प्रति नग) | ८,३७,२००.०० |
| ०२) | २५ x २५ x ३ एम.एम., एम.एस.अँगल | १४५६ किलो. | रु. ३४/- (प्रति किलो.) | ४९,५०४.०० |
| ०३) | २५ x ३ एम.एम., एम.एस. फ्लॅट पट्टी. | ४५५ किलो. | रु. ३४/- (प्रति किलो.) | १५,४७०.०० |
| ०४) | लेबर / फॅब्रिकेशन चार्जेस | | | ५०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | ९,५२,१७४.०० |

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस व हे काम लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वरील काम बाहेरील वर्कशॉपधारकांकडून/ फॅब्रिकेटर्सकडून करुन घेणेसाठी निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. ५९. मध्यवर्ती भांडाराचे खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.५८८.** सर्व्हे नंबर १२५ मध्ये संस्थानमार्फत मध्यवर्ती भांडार बांधण्यात आले असून त्या गोडाऊनमध्ये गहू, हरबरा, तांदूळ मोठया प्रमाणात साठवणूक केलेली आहे. सदर हॉलमध्ये हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या असून खिडक्यांना काचा बसविलेल्या आहेत. सदर काचा वारे-वादळ किंवा कोणी दगड मारला तर फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी काचेच्या संरक्षणासाठी बाहेरील बाजूस लोखंडी जाळी बसवून मिळणेकामी भांडार विभागाने डि.पी.क्र.५७ दि.११-०७-२००६ अन्वये कळविले आहे.

भांडार विभागाचे नविन गोडाऊनच्या खिडक्यांना (६२ नग) सुरक्षिततेच्या दृष्टीने लोखंडी जाळी तयार करुन बसविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | ३५ x ३५ x ३ एम.एम., एम.एस.अँगल | १५८० किलो. | ३०/- (प्रति किलो) | ४७,४००.०० |
| ०२) | २५ x ३ एम.एम., एम.एस. फ्लॅट पट्टी. | २०० किलो. | ३०/- (प्रति किलो.) | ६,०००.०० |
| ०३) | १" x १" x ५ एम.एम., एम.एस.स्क्वेअर जाळी. (३ फूट उंचीची ) | ११ बंडल. | २,१००/- (प्रति बंडल.) | २३,१००.०० |
| ०४) | काळा कलर (ऑईलपेंट) | ५० लिटर्स. | १४०/- (प्रति लिटर) | ७,०००.०० |
| ०४) | लेबर / फॅब्रिकेशन चार्जेस | | | २६,०००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | १,०९,५००.०० |

प्रस्तावावर विचार होऊन भांडार विभागाचे नविन गोडाऊनच्या खिडक्यांना (६२ नग) सुरक्षिततेच्या दृष्टीने लोखंडी जाळीचे बसविण्याचे काम बाहेरील वर्कशॉप कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेणेसाठी कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. ६०. मध्यवर्ती भांडारासाठी मटेरिअल, पुस्तकांचा साठा ठेवणेकामी लोखंडी स्टॅण्ड बनविणे**

**निर्णय क्र.५८९.** सर्व्हे नंबर १२५ मध्ये संस्थानमार्फत मध्यवर्ती भांडारबांधण्यात आले असून त्या गोडाऊनमध्ये संस्थान प्रकाशित पुस्तके / फोटो, गहू , तांदूळ, हरबरा इ.वस्तू ठेवावयाच्या आहे. सदर मटेरीअल, पुस्तकांचा साठा ठेवणेकामी लोखंडी स्टॅण्ड 44" X 28" X 12" या साईजध्ये ५० नग लोखंडी स्टँड तयार करून मिळणेकामी भांडार विभागाने दिनांक ११-०७-२००६ चे पत्राने कळविले आहे. .

भांडार विभागातील पोते व पुस्तके ठेवणेसाठी 44" X 28" X 12" या मापाच्या ५० नग लोखंडी स्टँडसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | ५० X ५० X ५ एम.एम., एम.एस.अँगल | ११५० किलो. | ३०/- (प्रति किलो) | ३४,५००.०० |
| ०२) | ४० X ४० X ५ एम.एम., एम.एस.अँगल | १५० किलो. | ३०/- (प्रति किलो.) | ४,५००.०० |
| ०३) | ५० X ५ एम.एम., एम.एस. फ्लॅट पट्टी. | ६२० किलो. | ३०/- (प्रति किलो.) | १८,६००.०० |
| ०४) | स्मो ग्रे कलर, (ऑईलपेंट / एशियन मेक) | ५ लिटर्स. | १४०/- (प्रति लिटर) | ७००.०० |
| ०५) | लेबर / फॅब्रिकेशन चार्जेस | | | १४,५००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | ७२,८००.०० |

प्रस्तावावर विचार होऊन भांडार विभागाकरीता उपरोक्त 44" X 28" X 12" या मापाचे ५० नग लोखंडी स्टँड बाहेरील वर्कशॉपमधून तयार करुन घेणेसाठी कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. ६१. मंदिर व परिसर संरक्षणासाठी चारही महाव्दारांमधून स्टेनलेस स्टीलचे रिव्हाल्व्हिंग गेट बसविणेकामी आलेली कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५९०.** मंदिर व परिसर संरक्षणासाठी चारही महाद्वारांमधून स्टेनलेस स्टील चे रिव्हाल्व्हिंग गेट बसविणेबाबत व येणाऱ्या रू. ४,५०,०००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०७.२००६ चे झालेल्या स्थानिक विश्वस्तांचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्कशॉप-फॅब्रिकेटरकडून कोटेशन त्वरीत मागवावेत असा निर्णय झाला आहे. त्यानुसार विद्युत विभाग जा.क्र.एसएसएस-विद्युत-९८७१-२००६ दिनांक २५.०७.२००६ अन्वये वर्कशॉप-फॅब्रिकेटर्सकडून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०८ कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. आशय मशिन्स प्रा.लि., नासिक |
| ०२. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड |
| ०३. | मे. प्रणव कार्पोरेशन्स, पुणे |
| ०४. | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स,मुंबई |
| ०५. | मे. सुयश इंजिनिअरींग,ठाणे |
| ०६. | मे. रवि ट्रेडींग कं.,पुणे |
| ०७. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०८. | मे. अल्बाज इंजिनिअरींग वर्क्स, पुणे |

उपरोक्तप्रमाणे मंदिर व परिसर संरक्षणासाठी चारही महाद्वारांमधून स्टेनलेस स्टील चे रिव्हाल्व्हिंग गेट बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे. आशय मशिन्स प्रा.लि., नासिक | ५,८१,३४०.००० | अनुपस्थित |
| ०२. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड | ४,७३,५९७.०० | ४,७३,५९७.०० |
| ०३. | मे. प्रणव कार्पोरेशन्स, पुणे | ५,५०,१२५.०० | अनुपस्थित |
| ०४. | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स,मुंबई | ६,२४,३६०.०० | ५,७०,०००.०० |
| ०५. | मे. सुयश इंजिनिअरींग,ठाणे | ६,३०,०८०.०० | ६,००,०००.०० |
| ०६. | मे. रवि ट्रेडींग कं.,पुणे | ५,६२,५४५.०० | ५,५०,०००.०० |
| ०७. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ५,७१,७२४.०० | ५,५०,०००.०० |
| ०८. | मे. अल्बाज इंजिनिअरींग वर्क्स, पुणे | --- | --- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रायोगिक तत्वावर शांतिनिवास इमारतीजवळील पिंपळवाडी रोडकडील महाद्वारात २ रिव्हाल्व्हिंग गेट बसविणेबाबत निम्नतम दर दिलेले निविदासादरकर्ते मे.साई इंजिनिअर्स , अंबड याना कार्यादेश देण्यात यावा. हे २ रिव्हाल्व्हिंग गेट प्रायोगिक तत्वावर बसविण्यात आल्यानंतर संरक्षण अधिकारी यांनी या दोन्ही रिव्हाल्व्हिंग गेटचा भक्तांच्या गेटमधून येण्याजाण्याच्या गतीवर काही परिणाम होतो का ? तसेच भक्तांच्या येण्याजाण्याच्या गर्दीवर काही परिणाम होतो का?

याबाबत निरिक्षण- पाहणी करावी व मंदिर व परिसर संरक्षणासाठी बाकीचे महाव्दारांना स्टेनलेस स्टीलचे रिव्हाल्व्हिंग गेट बसविणेकामी उपसमितीने पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६२. श्रीसाईबाबा हॉस्पिटल वातानुकुलीत यंत्रणेच्या मशिनरीसाठी शेड बनविणेकामी आलेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५९१.** श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे वातानुकूलित यंत्रणेच्या मशिनरीकरीता शेड बनविणेबाबत व येणाऱ्या रु.७,९८,७५०.००इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०७.२००६ चे झालेल्या स्थानिक विश्वस्तांचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या सभेत हा प्रस्ताव मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०६ टेंडर प्राप्त झाले आहेत. टेंडर तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.तान्तक टेक्नोक्राफ्टस,नासिक |
| ०२. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड |
| ०३. | मे.फाईन फिनिश, नासिक |
| ०४. | मे. रेखा एन्टरप्राईझेस, नासिक |
| ०५. | मे. रौनक हाउस ऑफ इंटेरिअर्स, अहमदनगर |
| ०६. | मे.एम.एस.शेल्टर्स, नासिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.तान्तक टेक्नोक्राफ्टस,नासिक | ६,३१,९००.०० | ६,३१,९००.०० |
| ०२. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड | ६,५६,७५०.०० | ६,४०,०००.०० |
| ०३. | मे.फाईन फिनिश, नासिक | ७,९५,२००.०० | अनुपस्थित |
| ०४. | मे. रेखा एन्टरप्राईझेस, नासिक | ७,१०,०००.०० | अनुपस्थित |
| ०५. | मे.रौनक हाउस ऑफ इंटेरिअर्स, अहमदनगर | ७,४१,९५०.०० | ७,२०,०००.०० |
| ०६. | मे.एम.एस.शेल्टर्स, नासिक | ६,५३,२००.०० | ६,२०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.एम.एस.शेल्टर्स,नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६३. एल.सी.डी टाईप टी.व्ही. खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५९२.** समाधी मंदीरात दररोजच्या श्री साईंच्या होणाऱ्या चारही आरत्यांसाठी नंदीसमोरच्या मोठया हॉलमध्ये साईभक्तांना बसविले जाते, त्यावेळेस हॉलच्या दक्षिण व उत्तर भागामध्ये बसलेल्या भक्तांना सहजतो श्री साईंचे दर्शन व्हावे यासाठी पूर्वीपासून २१" (बॉक्स टाईप) टी. व्ही. लावलेले आहेत.

दिनांक १५/०५/२००६ रोजी मा. विश्वस्त श्रीमती रिम्पल लोहीया व मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी राउंड घेतला त्यावेळेस वरील दोने ठिकाणी मोठे टी. व्ही. बसविणेस सुचविले आहे, तिथे लावण्यासाठी योग्य साईजचे टी. व्ही. संस्थानकडे शिल्लक नाहीत.

हल्ली मार्केटमध्ये नवीन आलेले एल.सी.डी. (स्क्रीन) टाईप एल. जी. किंवा सॅमसंग कंपनीचे टी.व्ही. मिळतात, त्यांची साईज बॉक्सटाईप टी.व्ही. पेक्षा मोठी असल्याने त्यावरचे चित्र अधिक मोठे, सुस्पष्ट व चांगले दिसते. स्क्री टाईप असल्यामुळे सदर टी.व्ही. फिटींगसाठी मोठया जागेची अथवा स्टँडची गरज भासत नाही. वरील ठिकाणी दोन व नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) च्या चौकशी कार्यालयाजवळ (जेथे भक्त जास्त वेळ थांबतात किंवा रुम न मिळाल्यास तेथेच मुक्कामास असतात त्या ठिकाणी भक्तांना मंदीरातील श्रींचे थेट (लाईव्ह) दर्शन मिळावे यासाठी) एक असे तीन L.G. कंपनीचे L.C.D. टाईप टी.व्हीं चे मॉडेल नंबर 32 LZ 50 खरेदी करावे लागतील. टी. व्हीं. च्या किमतीबाबत हैद्राबाद येथील तिरुमल म्युझिक सेंटर प्रा. लि, चे श्री शिवा यांचेशी फोनवर चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे विक्रीचा दर दिलेला आहे. प्रत्येकी रुपये ८६,५००/- प्रमाणे तीन टी. व्हीं. ची किंमत रुपये २,५९,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी उपरोक्तप्रमाणे टी.व्ही. खरेदी विभागाकडून खरेदी करण्यास पूर्णांकित रक्कम रुपये २,६०,०००/- चे खर्चास व काम करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख/अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं. ६४. पाणी शुध्दीकरणासाठी देणगी स्वरुपात देऊ केलेल्या प्लॅन्टची उभारणी करणे बाबत.**

**निर्णय क्र.५९३.** दिनांक ०३/०७/२००६ रोजी AIFLTAI, All India Federation of Loitery Trade & Allied Industries. Chennai. यांचे पत्रानुसार त्यांनी कळविलेप्रमाणे त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे Claire Brand चा इंटरनॅशनल क्वॉलिटीचा प्रॉडक्ट WHO स्टँडर्डचा & आर.ओ. सिस्टिमने चालणारा, दिवसाला १०,००० ते २०,००० लिटर्स पाणी शुध्दीकरण क्षमतेचा २० लाख ते २५ लाख रूपये खर्चाचा प्लँटची उभारणी करून तो श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरूपात देण्याची तयारी दर्शविली आहे.

यापुर्वी त्यांनी अशा प्रकारचे प्लँट वेलकन्नई चर्च येथे नोव्हेंबर २००० मध्ये, अरूलमिगू (Arulmigu) सुब्रमन्यम् स्वामी मंदिर तीरूचेंदूर येथे फेब्रुवारी २००२ मध्ये तसेच नागोर दर्गा नागापट्टन्नम येथे जूलै २००४ मध्ये व सर्वात मोठा व नविन प्लँट सेंट जॉन हॉस्पिटल, बंगलोर येथे कार्यान्वित केलेला आहे.

तरी वरील प्रकारचे प्लँटची आपणास उभारणी करावयाची झाल्यास आपणास खालील बाबींची पुर्तता करावी लागणार आहे.

०१. सदर प्लँट उभारणी करीता 500 Sq.fit जागेची आवश्यकता आहे.

०२. पाणी साठवणी करीता 500 Sq.fit जागेत अदयावत इमारत व त्यावर साठवण टाकी.

०३. इलेक्ट्रिक सप्लाय तसेच गरज भासल्यास वॉटर कुलींग सिस्टिमची आवश्यकता आहे.

०४. प्लँट उभारणीचे जागेचा ले-आऊट प्लॅन, पाण्याची उपलब्धता प्लँट उभारणी करावयाची इमारत, पाणी पाईपलाईन मार्ग या सर्व बाबींचा अभ्यास करणेसाठी सदर एजन्सीजचे इंजिनियर्स त्यांना शिर्डी येथे बोलविण्यात येवून त्यांचेकडून संपुर्ण प्लँटची माहिती घेवून प्लँट उभारणीकरीता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे शुध्दीकरण प्लॅन्ट देणगी घेऊन सध्याचे प्रसादालय विभागात उभारण्यात यावा. व प्रसादालय आणि निवासस्थान विभागातील भक्तांसाठी त्याचा वापर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं. ६५. श्रीसाईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ छपाईबाबत.**

**निर्णय क्र.५९४.** सालाबादाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ साठी छपाई करावयाची आहे. संबंधीत छपाईकामी मागिल वर्षी निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून खालील प्रेसधारकांचे छपाईचे दर मान्य केल्याने त्यांचेकडून दैनंदिनी/दिनदर्शिका २००६ चे छपाईचे काम करुन घेण्यात आले आहेत.

**अ)** श्री साईबाबा दैनंदिनी २००६ साठी मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचेकडून ९०,००० नग छपाई आदेशापैकी ८९,९९३ नग दर प्रती नगास रु.४१/- प्रमाणे रुपये ३६,८९,७१३/- एवढी रक्कम दैनंदिनी छपाईकामी खर्च झाली आहे. दैनंदिनी छपाई करण्यात आलेल्या एकूण ८९,९९३ नग दैनंदिनींचा वितरण तपशिल दि.३०.०६.२००६ अखेर खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | एकूण नग |
|---|---|---|
| ०१ | संस्थान विश्वस्त, सन्माननीय पाहुणे विभाग प्रमुख ,पर्यवेक्षक यांना शिर्डी कार्यालयामार्फत ६७८० नग + मुंबई कार्यालय १८० नग याप्रमाणे भेट म्हणून वाटप. | ९४६० |
| ०२ | श्री साईबाबा दैनंदिनी विक्री दर रुपये ५०/ प्रमाणे शिर्डी कार्यालय २१८१५ + मुंबई कार्यालय ४५२६ एकूण विक्री | २६३४१ |
| ०३ | श्री साईबाबा दैनंदिनी विक्री दर रुपये २५/- प्रमाणे शिर्डी कार्यालय ३८१४५ + मुंबई कार्यालय १८८ एकूण विक्री | ३८३३३ |
| ०४ | पोस्टाद्वारे विक्री | २१३ |
| ०५ | शिल्लक | १५६४६ |
| | एकूण नग | ८९,९९३ |

वरील दर्शविलेल्या तपशिलानुसार प्रत्यक्ष काऊंटर विक्री २६३४१ नग + पोस्टाद्वारे २१३ मिळून एकूण २६५५४ नग प्रती नगास रु.५०/- प्रमाणे रुपये १३,२७,७००/- व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०४.२००६ नुसार दैनंदिनी ३८३३३ नगांची विक्री प्रती नगास रुपये २५/- या सवलतीच्या दराने विक्री करुन रुपये ९,५८,३२५ अशी एकूण रु.२२,८६,०२५/-इतकी रक्कम जमा झाली आहे.

**ब)** श्री साईबाबा ंदिनदर्शिका २००६ सिक्स शिटर - लहान साईज (तारखेसह) साठी मे. मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई यांचेकडून ७५,००० नग छपाई दर प्रती नगास रु.८.५० प्रमाणे रुपये ६,३७,५००/- एवढी रक्कम ंदिनदर्शिका छपाईकामी खर्च झाली आहे. ंदिनदर्शिका छपाई करण्यात आलेल्या एकूण ७५,००० नग ंदिनदर्शिका वितरण तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | एकूण नग |
|---|---|---|
| ०१ | संस्थान विश्वस्त, सन्माननीय पाहुणे विभाग प्रमुख ,पर्यवेक्षक यांना शिर्डी कार्यालयामार्फत २४५८ नग + मुंबई कार्यालय ११७ नग याप्रमाणे भेट म्हणून वाटप. | २५७५ |
| ०२ | श्री साईबाबा ंदिनदर्शिका विक्री शिर्डी कार्यालय ६७१०१ + मुंबई कार्यालय४९३६ एकूण विक्री | ७२०३७ |
| ०३ | शिर्डी व मुंबई कार्यालय पोस्टाद्वारे विक्री | ३३३ |
| ०४ | खराब नग १८+ कमी प्राप्त नग ११ व शिल्लक २६ | ५५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण नग | ७५,००० |

वरील दर्शविलेल्या तपशिलानुसार प्रत्यक्ष काऊंटर विक्री ७२,०३७ नग + पोस्टाद्वारे ३३३ मिळून एकूण ७२,३७० नग प्रती नगास रु.८.५०/- प्रमाणे रुपये ६,१५,१४५/- इतकी रक्कम जमा झाली आहे.

**क)** श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ सिंगल शिटर , खालील बाजूस डेट पॅडसह मे. मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई यांचेकडून ७०,००० नग छपाई दर प्रती नगास रु.५/- प्रमाणे रुपये ३,५०,०००/- एवढी रक्कम दिनदर्शिका छपाईकामी खर्च झाली आहे. दिनदर्शिका छपाई करण्यात आलेल्या एकूण ७०,००० नग दिनदर्शिका वितरण तपशिल खालील प्रमाणे..

| अ.नं. | तपशिल | एकुण नग |
|---|---|---|
| ०१ | संस्थान विश्वस्त, सन्माननीय पाहुणे विभाग प्रमुख ,पर्यवेक्षक यांना शिर्डी कार्यालयामार्फत २७१६ नग + मुंबई कार्यालय ३० नग याप्रमाणे भेट म्हणून वाटप. | २७४६ |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका विक्री शिर्डी कार्यालय ६२०८२ + मुंबई कार्यालय ४९४८ एकूण विक्री | ६७०३० |
| ०३ | शिर्डी व मुंबई कार्यालय पोस्टाद्वारे विक्री | १९७ |
| ०४ | शिल्लक | २७ |
| | एकूण नग | ७०,००० |

वरील दर्शविलेल्या तपशिलानुसार प्रत्यक्ष काऊंटर विक्री ६७०३० नग + पोस्टाद्वारे १९७ मिळून एकूण ६७२२७ नग प्रती नगास रु.५/- प्रमाणे रुपये ३,३६,१३५/- इतकी रक्कम जमा झाली आहे.त्यातून विक्री दर रु.५/- यातून छपाई दर रुपये ५/- वजा जाता ना नफा ना तोटा या तंत्वावर विक्री करण्यात आली आहे.

वरील तपशिलात दर्शविलेप्रमाणे "ब" नुसार श्री साईबाबा दिनदर्शिका-२००६ चे ६ फोटोंची दिनदर्शिका सिक्स शिटर दिनदर्शिकेचे १,००,००० नगांची छपाई करुन घ्यावेत नंतर गरजेनुसार जादा प्रतींची छपाई करुन घेता येईल असे मत आहे.

श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ छपाई करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. चालू वर्षीही सन २००७ ची दैनंदिनी ही मागिल सन २००६ च्या दैनंदिनीचे छपाईचे धर्तिवर छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देता येईल. तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल शिटर (तारखेच्या पॅडसह) सालाबादाप्रमाणे संस्थान मार्फत प्रकाशित केलेले दिनदर्शिकेचे धर्तिवर श्रीसाईबाबा दिनदर्शिका २००७ ही खालील बाजूस डेटपॅडसह प्रती महा १२ सीट याप्रमाणे छपाई करुन घेतल्यास त्यास भक्तांचा उत्स्पूर्त प्रतीसाद मिळेल.

सालाबादाप्रमाणे आता सन २००७ साठी वर नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ (१ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २००७ अखेर) छपाई करुन घ्यावी लागेल तरी श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ ही नोव्हेंबर २००६ चे पहिल्या आठवड्यात उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

करीता श्रीसाईबाबा दैनंदिनी २००७ ची ५०,००० नग, श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिक्स शिटर १,००,००० नग तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल शिटर (खालील बाजूस प्रतिमहा तारखेचे १२ शिटस) ची १,००,००० नग याप्रमाणे छपाई करुन घेणे आहे.

दैनंदिनीची सजावट आर्टवर्क त्यातील फोटो ग्राफ्स मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई , महाराष्ट्र मुद्रणालय, पुणे, श्री कांबळे, आर्टीस्ट अहमदनगर वगैरेंकडूंन तयार करुन मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेवून त्यांनी मान्य केलेल्या नमुन्यांचे छपाई कोटेशन्स मागविता येईल.

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका -२००७ चे छपाईचे काम हे मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्रमांक १३८ नुसार १८ निवडक प्रेसधारक अधिक मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं. २९ निर्णय क्रमांक ६७८ नुसार ११ निवडक प्रेसधारक याप्रमाणे एकूण २९ निवडक प्रेसधारकांकडून संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो, श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईची कामे ही निवडक प्रेसधारकांकडून थेट कोटेशन मागवून छपाई करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार २९ निवडक प्रेसधारकांना दैनंदिनी/ दिनदर्शिका २००७ छपाई कामाचे कोटेशन पाठविता येईल.

तरी वरील तपशिलानुसार श्री साईबाबा दैनंदिनी २००७ ची ५०,००० नग अंदाजे प्रती नग छपाई दर रु.५०/- प्रमाणे एकूण रुपये २५,००,०००/- व श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिक्स शिटर चे १,००,००० नग अंदाजे प्रती नग छपाई दर रु. १०/- प्रमाणे एकूण रुपये १०,००,०००/- तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ ची (दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रती महा तारखेसह १२ शीट सह) १,००,००० नग अंदाजे छपाई दर रु.६/- याप्रमाणे रुपये ६,००,०००/- याप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका सिक्स शिटर व दिनदर्शिका सिंगल शिटर २००७ (दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रती महा तारखेसह १२ शीट सह) तिन्ही मिळून रुपये ४१,००,०००/- इतका अंदाजे अपेक्षित खर्च लागणार आहे. सदरचा खर्च सन.२००६-२००७ चे पुस्तके/फोटो छपाई खर्चाचे मंजूर बजेट तरतूद रु.१,५०,००,०००/- मधून करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी २००७ ची ५०,००० नग, व श्री साईबाबा दिनदर्शिका सिक्स शिटर १,००,००० नग तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ (दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रती महा तारखेसह १२ शीट सह) १,००,००० नग याप्रमाणे छपाई करुन घेणे आहे. त्याकामी एकूण रुपये ४१,००,०००/- (एक्केचाळीस लाख ) मात्र इतक्या येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा दैनंदिनी २००७ ची ५०,००० नग, व श्री साईबाबा दिनदर्शिका सिक्स शिटर १,००,००० नग तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ (दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रती महा तारखेसह १२ शीट सह) १,००,००० नग याप्रमाणे छपाई करुन घेणेकामी निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४१,००,०००.०० च खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं. ६६. श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९५.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. साठी भक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्यामुळे सध्या श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. चा साठा हा फक्त तीन महिने पुरेल इतकाच शिल्लक असल्याने नव्याने व्ही.सी.डी ५०,००० संच (दोन सीडीचा १ संच) तातडीने तयार करुन साईभक्तांसाठी विक्रीस उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

तरी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. ची ५०,००० संचांची (दोन सीडीचा १ संच) निर्मिती करुन घेणेसाठी प्रती संच अंदाजे दर रु.२५/- या प्रमाणे एकूण रुपये १२,५०,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. संबंधीत व्ही.सी.डी.चे निर्मितीसाठी मुंबई येथील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून कोटेशन बोलावून तत्संबंधीत कार्यवाही करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये १२,५०,०००/- ( अक्षरी रुपये बारा लाख, पन्नास हजार) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यात देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं. ६७. ओकांर साधना मार्गदर्शिका इंग्रजी भाषेतील आवृत्ती संबंधी.**

**निर्णय क्र.५९६.** सदरहू विषय रद्द करण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं. ६८. पुस्तके/फोटो छपाईकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५९७.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३.०६.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्रमांक ३५३ नुसार खालील **"अ"** या परिशिष्टात दर्शविलेप्रमाणे मातृसाई हे तेलगू भाषिक पुस्तक छपाईस त्यासाठी येणा-या अंदाजित अपेक्षित खर्चास रु. ३,००,०००/-तसेच सचित्र साईबाबा मराठी/इंग्रजी भाषिक पुस्तक छपाईस व त्यासोबत खालील **"ब"** या परिशिष्टात दर्शविलेले तपशिलाप्रमाणे अ.नं.१) दगडावर बसलेले श्री साईबाबा काळा/पांढरा फोटो अ.नं.२) भिंतीलगत उभे असलेले श्री साईबाबा फोटो काळा/पांढरा छपाई करुन घेणेस व तत्संबंधीत येणा-या रुपये ४,८०,०००/- मात्र चे अपेक्षित खर्चास दिनांक- २७.०७.२००६ रोजी मा व्यवस्थापन स्थानिक समितीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मातृसाई प्रथम आवृत्ती | तेलगू | ------ | ------ | ५,००० | ६०.०० | ३,००,०००/- |
| ०२ | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | १८.०४.०२ | ४.०० | १०,००० | ८.०० | ८०,०००/- |
| | | | | | | एकूण रु. | ३,८०,०००/- |

.

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई के ल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दगडावर बसलेले श्रीसाईबाबा फोटो काळा/पांढरा | १४"x २०" | १२.९.०२ | १.७५ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०२ | भिंतिलगत उभे असलेले श्री साईबाबा फोटो काळा/पांढरा | १४"x २०" | २५.४.०५ | २.०३ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| | | | | | | एकूण रूपये | ४,००,०००/- |

तरी उपरोक्त "अ" व "ब" यात दर्शविलेले पुस्तके व फोटो छपाईकामी जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/ ९८७८/२००६ दि.२५.०७.२००६ नुसार खालील संबंधीत २९ निवडक प्रेसधारकांना

छपाई कामाचे कोटेशन पाठवून ते दि.१०.०८.२००६ पर्यंत मुदतीत भरुन जमा करणेविषयी कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १८ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १९ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| २० | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| २१ | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| २२ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| २३ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई |
| २४ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| २५ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २६ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| २७ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| २८ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| २९ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |

त्यानुसार प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे छपाईकामाचे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | मातृसाई प्रथम आवृत्ती मागणी ५ हजार नग | श्रीसाईबाबा चित्रावली मराठी/इंग्रजी ३ री आवृती मागणी १० हजार नग | दगडावर बसलेले श्रीसाईबाबा फोटो काळा/पांढरा १४"x१०" मागणी १ लाख नग | भिंतीलगत उभे असलेले बाबा काळा/पांढरा १४"x२०" |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई | -- | -- | ३.१५ | ३.१५ |
| ०२. | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | **१९.८०** | **५.६०** | **१.२८** | **१.२८** |
| ०३. | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | ४९.०० | ६.५० | -- | -- |
| ०४. | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ३१.०० | ७.२५ | १.९० | १.९० |
| ०५. | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | २३.०० | ८.०३ | २.११ | २.११ |
| ०६. | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे | ५१.०० | ७.७० | २.३० | २.३० |
| ०७. | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ३१.२३ | ७.४४ | १.९९ | १.९९ |
| ०८. | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ५१.५५ | ११.८४ | २.५० | २.५० |
| ०९. | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ४५.०० | १०.८० | २.४५ | २.४५ |
| १०. | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | ४०.६३ | ६.७० | २.६५ | २.६५ |
| ११. | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे | ३६.६८ | ८.६२ | २.४६ | २.४६ |
| १२. | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ३९.५२ | ६.२४ | २.४४ | २.४४ |
| १३. | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद | ४९.०० | ९.०० | २.९० | २.९० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे यांचे निम्नतम दर मान्य करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.६९. श्रीसाईबाबा दैनंदिनी २००६ चे संस्थानव्दारा शैक्षणिक संकुलातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत वाटप करणे बाबत.**

**निर्णय क्र.५९८.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी २००६ ही दरवर्षापेक्षा जास्त आकर्षक सुशोभित काढण्यात येणार असल्याने भक्तांकडून मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेवून मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.१०.२००५ रोजी चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. १८ निर्णय क्रमांक ६२९ नुसार श्री साईबाबा दैनंदिनी २००६ ची छपाई संख्या ५०,००० नगा ऐवजी ९०,००० नगापर्यंत छपाई करुन घेणेससंबंधीत निर्णय झाल्याने सदरहू काम मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचेकडून छपाई दर रुपये ४१/- प्रती नग याप्रमाणे करुन घेण्यात यावे या संमत निर्णयानुसार ८९९९३ नग दैनंदिनींची छपाई करुन भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी २००६ ची ८९९९३ छपाई नगापैकी आजपावेतो दि.२५.०७.२००६ अखेर ७२०८१ नगांची विक्री झाली असून संभावना खाते ७३०३ दैनंदिनी खर्ची टाकण्यात आल्या असून उर्वरित १०६०९ नगांची विक्री होणे बाकी आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०४.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.१९ निर्णय क्रमांक १९८ नुसार दैनंदिनीची विक्रीची किंमत प्रती नग रुपये २५/- याप्रमाणे किंमत कमी करुनही त्यास भक्तांचा फारसा प्रतीसाद मिळत नाही. सदरच्या शिल्लक दैनंदिनींची माहे जुलै-ऑगस्ट२००६ नंतर फारसी विक्री होणार नाही असे वाटते. तरी दैनंदिनी पडून राहण्याऐवजी शिल्लक दैनंदिनीचे साठ्यातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा इंग्लीश मेडियम स्कुल , कन्या विद्यामंदिर, आय.टी.आय, या शैक्षणिक संकुलनातील शालेय विद्यार्थ्यांना दैनंदिनीचे मोफत वाटप केल्यास त्याचा विद्यार्थ्यांना दैनंदिन गृहपाठाची नोंद घेणेकामी चांगला उपयोग होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शैक्षणिक संकुलातील इयत्ता ८वी चे पुढील तसेच आय.टी.आय मधील विद्यार्थ्यांना उपलब्ध दैनंदिनीचे मोफत वाटप करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७०. श्रीसाई सच्चरित तेलगू ऑडिओ सी.डी. तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र.५९९.** तेलगू भाषिक साईभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या भविकांसाठी श्री साईसच्चरित तेलगूची ऑडिओ सी.डी काढण्याचा मानस आहे.

ही ऑडीओ सी.डी. तयार करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | कथनकार | १,००,०००.०० |
| ०२ | संगीतकार | १,००,०००.०० |
| ०३ | कोरस | २५,०००.०० |
| ०४ | मास्टरींग खर्च | ७५,०००.०० |
| ०५ | इतर संबंधित खर्च | ७५,०००.०० |
| | एकूण रुपये | ३,७५,०००.०० |

साईभक्त एस.आर.कोटेश्वरराव,हैद्राबाद हे प्रसिध्द तेलगू संगीतकार आहेत त्यांचा स्वतःचा अद्यावत रेकॉर्डींग स्टूडिओ आहे याकामी सदरचा स्टूडिओ ते विनामुल्य देण्यास तयार आहेत असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई सच्चरित तेलगू ऑडिओ सी.डी. तयार करणे कामी नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७१. विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.६००.** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व इयत्ता १२ कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत सन २००६-२००७ मध्ये ५७० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी आर्थिकदृष्टया अतिशय गरीब आहेत. परिसरातील बऱ्याच कनिष्ठ महाविद्यालयात अशा विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना राबविली जाते. अश पुस्तकपेढी योजना श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सुरु करता येईल. सदरची योजना खालीलप्रमाणे कार्यान्वीत करता येईल.

०१. पुस्तक पेढी योजनेनुसार लाभार्थी विद्यार्थ्यांनी पुस्तकाचा संच वर्षभराच्या वापरासाठी देण्यात येईल वर्षभरांतर जमा करुन घेण्यात येईल.

०२. या पुस्तक वापराच्या बदल्यात विद्यार्थ्यांकडून पुस्तकांच्या किंमतीच्या २५% घसारा रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांना परत दिली जाणार नाही.

०३. पुस्तक हरवल्यास विद्यार्थ्यांकडून नवीन पुस्तक घेंण्यात येईल अथवा पुस्तकाच्या किंमतीइतकी रक्कम वसूल करण्यात येईल.

सन २००६-०७ मध्ये इ. ११वीं. च्या वर्गाचा अभ्यासक्रम बदलला आहे. त्यामुळे सन २००६-०७ मध्ये वरील प्रमाणे योजना राबविणेसाठी इ. ११वीं कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी अधिकृत शासनमान्य पाठयपुस्तकांचे १०० संच, इ. ११वीं वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ७५ संच व इ. ११वीं विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ७५ संच असे एकूण २५० संच खरेदी करता येतील.

इयत्ता ११ वी च्या वर्गातील एका संचासाठी रुपये ३५०.००, इयत्ता ११ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी २५० संच खरेदीसाठी अंदाजे रुपये ९०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे पुस्तकपेढी योजना सुरु करण्यासाठी पाठयपुस्तकांचे संच खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु. ९०,०००/- मात्र खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्यध्यापिका,कन्याविद्या मंदिर)

**विषय नं. ७२. अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचा वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार देणे बाबत.**

**निर्णय क्र.६०१.** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, Siemens Hipath 4300 IP ही २००० लाईन्स क्षमतेची अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून संदर्भ क्रमांक ०२ चे कार्यादेशान्वये खरेदी करुन, दिनांक २२ जुलै, २००४ रोजी कार्यान्वीत केलेली आहे. Siemens Hipath 4300IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तीन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १६ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या १६ Analog कार्डस्व्दारे प्रत्येक कार्डमध्ये २४ याप्रमाणे एकूण ३८४ अंतर्गत दूरध्वनी जोडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

मे. सिमेन्स, लि., मुंबई यांनी Siemens Hipath 4300IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेच्या कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार सदर यंत्रणा कार्यान्वीत केलेपासून दोन वर्षाची हमी दिलेली होती. या हमी कालावधीमध्ये अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेची दुरुस्ती व देखभाल त्यांचेकडून करुन घेण्यात आलेली आहे. अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा दिनांक २२ जुलै, २००४ रोजी कार्यान्वीत केलेली असल्याने, यंत्रणेचा हमी कालावधी दिनांक २१ जुलै, २००६ रोजी संपुष्टात येत आहे. कार्यादेशातील ई नुसार दुरध्वनी यंत्रणेचा हमी कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरिता वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार करावयाचा असल्यास, दूरध्वनी यंत्रणा खरेदीच्या एकूण किंमतीच्या ९% रक्कम आदा करण्यात यावी, असे ठरलेले आहे.

Siemens Hipath 4300IP ही अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा नविन डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित आहे. दूरध्वनी यंत्रणा व्यवस्थीत कार्यान्वीत राहण्यासाठी वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडे करणे आवश्यक आहे.

मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचा हमी कालावधी दिनांक २१ जुलै, २००६ अखेर संपुष्टात येत आहे. त्यांनी उपरोक्त संदर्भ क्रमांक ०३ चे पत्रानुसार पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरिता (दिनांक २२ जुलै, २००६ ते दिनांक २१ जुलै, २००७ अखेर) खरेदी किंमतीच्या ९% रक्कम रुपये १,२४,२८६/- मात्र कळविलेली आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेशी Siemens Hipath 4300IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरिता (२२ जुलै, २००६ ते दिनांक २१ जुलै, २००७ अखेर) दुरुस्ती देखभालीचा करार करण्यास व यासाठी लागणारी रक्कम रुपये १,२४,२८६/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं. ७३. मोबाईलव्दारे एस.एम.एस.सर्व्हिसेस व क्युऑस (टचस्क्रिन) साठी आलेल्या निविदांवर वाटाघाटीकरुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६०२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं. ७४. माल वाहतूक करीता दोन महिंद्रा मॅक्स पिकअप खरेदीचे कोटेशन्स बाबत**

**निर्णय क्र. ६०३.** संस्थानकडील कार्यलयीन वापरात व मालवाहतुक वापरात सु-सुत्रता यावी म्हणून सर्व वाहने एकत्रित करून सन-१९९९ला वाहन विभाग नव्याने सुरूवात करण्यात आलेले आहे.

नियोजित प्रसादालय, पाणी पुरवठा योजना (कनकुरीतळे), मुख्यभांडार व रुग्णालय दुर असलेने तसेच संस्थान उत्सव, संस्थान तर्फे वेळो-वेळी आयोजित केलेले कार्यक्रम इ. कामा करीता मालवाहतुक वाहने अपुरी पडत असलेने महिंद्रा कंपनीची दोन मॅक्स वाहने खरेदी करणे बाबत व वाहने खरेदी करतांना महिंद्रा कंपनीच्या अधिकृत डिलर्स कडून कोटेशन्स मागविणे व अंदांजे ०८ ते १० लाख मात्रचा खर्च या बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०६/२००६ चे सभेत सादर करण्यात आला होता. त्यास मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/७७११/२००६ दि.१२/०६/२००६ ने खालील प्रमाणे महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर कडून कोटेशन मागविण्यात आलेली होती.

०१. श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर. ०३. एन.बी.एस. इन्टरनॅशनल, लि., मुंबई.
०२. जितेंद्र मोटर्स, नाशिक. ०४. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी.

वरील चार कोटेशनधारका पैंकी खालील प्रमाणे तिन कोटेशनधारकांची कोटेशन प्राप्त झालेली आहे.

०१. श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर. - बंद कोटेशन
०२. जितेंद्र मोटर्स, नाशिक. - फॅक्स कोटेशन

०३.	एन.बी.एस. इन्टरनॅशनल, लि., मुंबई.	- खुले कोटेशन

तरी प्राप्त झालेली कोटेशन उघणेकरिता व डिलर्स बरोबर वाटाघाटी करीता मा. उपसमितीचे दि.०५/०७/२००६ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेली होती. सदर सभेत कोटेशन उघडून तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तो खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारक कंपनीचे नांव | वाहनांची मुळ किंमत (रू.) | इतर चार्जेस (रू.) | डिस्काऊंट (रू) | डिस्काऊंट वजा जाता एकूण किंमत (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर. | ४२९९००.०० | ००.०० | १५०००.०० | ४१४९००.०० |
| ०२. | जितेंद्र मोटर्स, नाशिक. | ४३४७२५.०० | ००.०० | ००.०० | ४३४७२५.०० |
| ०३. | एन.बी.एस. इन्टरनॅशनल, लि., मुंबई | ४१९५००.०० | ६००.०० | २००००.०० | ४००१००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन अ.नं. ३ चे कोटेशन सादरकर्ते एन.बी.एस. इन्टरनॅशनल, लि., मुंबई.यांचे निम्नत्तम दर असल्याने त्यांचे कडून दोन महिंद्रा पिक अप वाहन खरेदी करणेची शिफारस करण्यात आली.

तथापि महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कं., मुंबई यांनी दि.१५/०६/२००६ रोजीचे कोटेशन दि.१०/०७/२००६ रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे दि.०५/०७/२००६ चे मा.उपसमितीचे सभेपुढे सादर करता आले नाही.

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कं., मुंबई यांचे दि.१०/०७/२००६ रोजी प्राप्त झालेले कोटेशनमध्ये पुढील प्रमाणे रक्कम कळविलेली आहे. कंपनी किंमत, ट्रान्सपोर्ट चार्ज, व्हॅट इ. सह एकत्रित किंमत रू. ३,९५,८७७.११ इतकी असणार आहे. व सदर गाडया श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर यांचेकडून मिळणार आहेत. तसेच, त्यांना १००% ॲडव्हान्स द्यावा लागणार आहे. सदर खरेदीत रू.४,२२२.८९ मात्रची बचत होणार असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ७५. नवीन दोन बसेसच्या वाढीव दराबाबत.**

**निर्णय क्र. ६०४.** श्री साईभक्तांचे सुख-सुविधा करीता नगरसुल रेल्वेस्टेशन व रोटेगांव रेल्वे स्टेशन करीता दोन बसेस खरेदीस मान्यता मिळालेली आहे. प्राप्त झालेली कोटेशन दि.०३/०६/२००६चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे करीता व वाटाघाटी करीता सादर करण्यात आलेली होती. वाटाघाटी नंतर निम्नतम दर असलेली मे. शुभायन मोटर्स, अहमदनगर यांचेकडून प्रति बस रू.१५,२०,०००/- मात्र रक्कमेत खरेदी करण्यात याव्यात. व ५०% रक्कम त्यांना ॲडव्हान्स म्हणून देण्यात यावा असे निर्णय क्रं.३६०अन्वये ठरले.

वरील निर्णया नुसार जा.नं. एसएसएस/ वाहन/१८२२/२००६ दि.०५/०७/२००६ने पुरवठा आदेश देऊन ५०% रक्कम म्हणजे रू.१५,२०,०००/- मात्रचा डी.डी. देण्यात आलेला आहे.

दि.०१/०७/२००६ पासून उत्पादक कंपनी टाटा मोटर्स यांनी प्रति बस शोरूम किंमत दरात रू.३२,७५१/- ने वाढ केलेली असल्याचे उत्पादक कंपनी मे.टाटा मोटर्स यांचे दिनांक १४.०७.२००६ व मे. शुभायन मोटर्स, अहमदनगर यांनी दि.१५/०७/२००६ चे लेखी पत्राने कळविलेले आहे.

मे.शुभायन मोटर्स, अहमदनगर यांचे दि.०९/०५/२००६चे कोटेशन मधील अटी व शर्तीतील अ.नं.०१ मध्ये Above prices are current ex-showroom prices. Buyers will have to pay prices prevalling at the time of delivery. असे नमुद केलेले आहे.

मे. शुभायन मोटर्स, अ.नगर यांचे पत्र व उत्पादक टाटा कंपनी यांचे पत्र या नुसार दोन बसेस करीता रू.६५,५०२/- मात्र वाढीव दराप्रमाणे रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कंपनीनें लागु केलेल्या वाढीव दराबाबत टाटा कंपनीच्या दिनांक १४.७.२००६ चे पत्रानुसार त्यांना रक्कम अदा करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ७६. जुनी वाहने लिलावाने विक्री करणे व नवीन वाहने खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र. ६०५. अ)**विधी व न्याय विभाग शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/३८७/(११७)-का.सोळा, दि.२९/०६/२००६ नुसार जुनी वाहने निर्लेखित करणेसाठी असलेल्या शासनाच्या अटी पालन करून खालील प्रमाणे १४ वाहनांचा जाहीर लिलाव करता येईल.

०१.	शासनांच्या नियमाचे पालन करण्याच्या अटीस अधिन राहुन ०५ वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक जुनी असेलेली किंवा ०१ लाख किलोमिटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांचे लिलाव विक्रीस शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२.	सदर लिलाव विक्री संस्थानच्या विहीत कार्यपध्दती नुसार व्हावीत.

०३.	लिलाव विक्रीनंतर जमा झालेली रक्कम संस्थानच्या निधीत जमा करण्यात यावी.

०४. उपरोक्त नियमात न बसणाऱ्या वाहनांच्या लिलाव विक्रीबाबत सबळ कारण देऊन प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

०५. उपरोक्त वाहनांच्या विक्री नंतर संस्थानचा नवीन वाहन खरेदीचा मानस असल्यास त्या बाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा.

वरील शासनपत्रान्वये खालील प्रमाणे जुन्या वाहनांचा जाहीर लिलाव करता येईल.

| अ.नं. | संगणक कोड नंबर | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | खरेदी दिनांक | झालेले वर्ष -महिने | झालेले कि.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| **कार्यालयीन वाहने (04)** | | | | | | |
| 01 | VEHM-001 | एच-601 | हुन्डाई ॲसेंट | 01/05/2000 | 06-00 | 1,21,680 |
| 02 | VEH-6020 | एच-1101 | महिंद्रा बोलेरो | 16/08/2000 | 05-10 | 2,51,425 |
| 03 | VEH-6017 | एच-801 | ॲम्बेसॅडर कार | 19/05/2000 | 06-00 | 2,31,819 |
| 04 | VEH-6023 | के-1801 | टाटा सुमो | 02/01/2002 | 04-05 | 2,05,805 |
| **टुव्हिलर (03)** | | | | | | |
| 05 | VEH-2202 | एल-6097 | बजाज एम80 फोरस्ट्रोक | 13/06/2001 | 05-00 | 41,000 |
| 06 | VEH-1001 | ई -9100 | राजदुत (संरक्षण वि. कडील) | 14/02/1998 | 07-04 | 24,793 |
| 07 | VEH-6012 | एच-6838 | बजाज एम80 (रेकॉर्ड वि. कडील) | 01/12/1999 | 06-08 | 22,000 |
| **बसेस (05)** | | | | | | |
| 08 | VEH-404 | ए-7593 | टाटा कं.स्कुल बस | 11/06/1992 | 13-11 | 1,13,122 |
| 09 | VEH-405 | ए-7594 | टाटा कं.स्कुल बस | 01/06/1992 | 13-11 | 1,88,805 |
| 10 | VEH-6004 | ए-7595 | टाटा कं.भक्त निवास बस | 01/06/1992 | 13-11 | 1,25,812 |
| 11 | VEH-6002 | सी-9016 | टाटा कं.स्कुल बस | 05/12/1996 | 06-04 | 1,39,373 |
| 12 | VEH-6001 | सी-9017 | टाटा कं. भक्तनिवास बस | 05/12/1996 | 06-04 | 1,59,905 |
| **रुग्णवाहिका वाहने (02)** | | | | | | |
| 13 | VEH-6025 | के-6281 | टाटा सुमो ॲम्ब्युलन्स | 29/03/2002 | 04-03 | 2,59,140 |
| 14 | VEH-6026 | के-6601 | टेम्पो ट्रॅव्हलर ॲम्ब्युलन्स | 02/05/2002 | 04-00 | 1,81,682 |

वरील १४ वाहने जाहीर लिलावाने विक्री तसेच दि.१२/०८/२००६रोजी होणाऱ्या जाहीर लिलावाची १० वाहने अशी एकूण २४ वाहना बदली खालील प्रमाणे नवीन वाहने खरेदी करावी लागतील.

**ब) नवीन वाहने खरेदी :-**

वाहन विभागातील वापरात असलेली कार्यालयीन वाहने, स्कुल/भक्तनिवास बस, रुग्णवाहिका, मालवाहतुक वाहने यांचा जाहीर लिलाव झाले नंतर वाहने अपुरी शिल्लक राहिलेने दैनंदिन कामात अडचणी निर्माण होणार आहे. त्या करीता खालील प्रमाणे वाहने लवकरात लवकर खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | जाहीर लिलावाने विक्री होणारी वाहने | | प्रस्तावित खरेदी वाहने | अदाजे किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | ॲम्बेसॅडर कार- | ०३ | ०२ | १०,००,०००.०० |
| ०२ | स्कॉर्पिओ- | ०० | ०१ | ०८,००,०००.०० |
| ०३ | टाटा सुमो- | ०२ | ०२ | १०,००,०००.०० |
| ०४ | महिंद्रा बोलेरो- | ०१ | ०१ | ०६,००,०००.०० |
| ०५ | हुन्डाई ॲसेंट- | ०१ | ०० | - |
| ०६ | टुव्हिलर- | ०३ | ०२ | ०१,००,०००.०० |
| ०७ | स्कुल बसेस व भक्तनिवास बस | ०३+२ | ०५ | ६५,००,०००.०० |
| ०८ | रुग्णवाहिका- | ०३ | ०० | - |
| ०९ | ट्रॅक्टर- | ०१ | ०० | - |
| १० | ट्रेलर- | ०२ | ०० | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | मिनीडोर- | ०२ | ०० | - |
| १२ | टाटा४०७- | ०१ | ०० | - |
| | **एकूण** | **२४** | **१३** | **१,००,००,०००.००** |

वरील प्रस्तावाप्रमाणे १३ वाहने खरेदी करावे लागतील. त्याकामी विधी व न्याय विभाग यांचे पत्राप्रमाणे सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

त्यानंतर १४ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करता येईल. नवीन वाहने खरेंदी करणे कामी अंदाजे रू.१ कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी त्यास मान्यता असावी. वाहने खरेदी करतांना संबंधीत वाहनांच्या कंपनीच्या अधिकृत डिलरकडून कोंटेशन बोलाविण्यात येतील.

तरी ''अ'' प्रमाणे १४ वाहनांचा जाहीर लिलावाने विक्री करणेस व ''ब'' प्रमाणे नवीन १३ वाहने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ७७. गणकयंत्र खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६०६.** संरक्षण विभागाकरीता गणकयंत्र खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.२०९ चे मंजुर प्रस्तावानुसार जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/५९८९/२००६ दि.०५.०५.२००६ अन्वये दि. १५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. खालीलप्रमाणे दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली दि.३.६.२००६ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दरपत्रके उघडण्यात आलेली आहेत.

| **अ.नं.** | **कंपनी** |
|---|---|
| ०१ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता |
| ०२ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर |
| ०३ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई |
| ०४ | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक |

या दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन,कोटेशनसादरकर्त्यांना आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नाव** | **निविदेतील दर प्रती नग रुपये** | **चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर प्रती नग रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता | १,९९,३७५.०० | अनुपस्थित |
| ०२ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर | २,९१,८५५.०० | अनुपस्थित |
| ०३ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई | २,६३,२२१.०० | २,६३,२२१.०० |
| ०४ | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक | ५१,३७६.५० | **५०,३४८.९७** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स,नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं. ७८. व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६०७.** संरक्षण विभागाकडे असलेल्या व्यायामशाळेकरीता व्यायामशाळा साहित्य खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. २८ निर्णय क्र. २०७ चे मंजुर प्रस्तावानुसार तसेच सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्याच्या दि. ०१.०५.२००६ च्या मंजुर टिपणी नुसार संस्थान जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/६४०४/२००६ दि. १८.०५.२००६ अन्वये दि. २५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. खालीलप्रमाणे दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| **अ.नं.** | **कंपनी** |
|---|---|
| ०१ | विशाल इक्विपमेंट वर्ड, नाशिक |
| ०२ | अशोका इंजीनीयर्स, मुंबई |
| ०३ | दख्खन फेब्रीकेटर्स, नाशीक |
| ०४ | संतोष एन्टरप्रायजेस, कोपरगांव |
| ०५ | वडाळीकर हेल्थ इक्युपमेंट, ठाणे |
| ०६ | सरोदे जिम इक्विपमेंट, सिन्नर |
| ०७ | सातपुरकर फिटनेस वर्ड, नाशीक |

या दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन,कोटेशनसादरकर्त्यांना आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नाव** | **निविदेतील दर एकूण किंमत रुपये** | **चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर एकूण किंमत रुपये** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | विशाल इक्विपमेंट वर्ड, नाशिक | ५७,७१०.०० | ५६,२१०.०० |
| ०२ | अशोका इंजीनीयर्स, मुंबई | ५९,४००.०० | ५७,०२४.०० |
| ०३ | डेक्कन फेब्रीकेटर्स, नाशीक | ५४,३००.०० | ५३,२१४.०० |
| ०४ | संतोष एन्टरप्रायजेस, कोपरगांव | ५९,६४५.०० | ५४,०००.०० |
| ०५ | वडाळीकर हेल्थ इक्युपमेंट, ठाणे | ६२,५२०.०० | अनुपस्थिती |
| ०६ | सरोदे जिम इक्विपमेंट, सिन्नर | ५७,६४०.०० | अनुपस्थित |
| ०७ | सातपुरकर फिटनेस वर्ड, नाशीक | ६२,७८०.०० | अनुपस्थिती |

यावर सविस्तर डेक्कन फेबीकेटर्स,नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणे येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं. ७९. डिपसर्च व सर्च मिरर साहित्य खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६०८.** संरक्षण विभागाकरीता डिपसर्च व सर्च मिरर खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. ३३ निर्णय क्र. २१२ चे मंजुर प्रस्तावानुसार जा. नं. एसएसएस/वशी/संरक्षण/५९९०/२००६ दि. ०५.०५.२००६ अन्वये दि. १५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली असून दि.३.६.२००६ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दरपत्रके उघडण्यात आलेली आहेत.

| अ.नं. | कंपनी |
|---|---|
| ०१ | मगनुम इलेक्ट्रॉनीक्स, बैंगलोर |
| ०२ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता |
| ०३ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर |
| ०४ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई |
| ०५ | होप, दिल्ली |
| ०६ | पी. एम. जी. सिस्टीम, हैद्राबाद |
| ०७ | सेफगार्ड सिक्युरीटी सिस्टीम, पुणे |
| ०८ | सेक्युर बेन्ड्झ, मुंबई |
| ०९ | हायटच असोसीएटेड, कोलकत्ता |
| १० | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक |

या दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटी बोलविण्यात आले होते परंतू निम्नतम दराचा एक मिरर खरेदी करावयाचा असल्याने कोटेशनसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या नाही या कोटेशनसादरकर्त्यांनी देऊन केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | प्रकार | निविदेतील दर प्रती नग रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मगनुम इलेक्ट्रॉनीक्स, बैंगलोर | डिपसर्च | ३९,५१८.०० |
| | | मिरर | १३,०७२.५० |
| ०२ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता | डिपसर्च | ६१,६२०.०० |
| | | मिरर | ५,८६५.७५ |
| ०३ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर | डिपसर्च | ५३,९१५.०० |
| | | मिरर | ६,७०६.५० |
| ०४ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई | डिपसर्च | ३८,८१६.०० |
| | | मिरर | ६,३०७.६० |
| ०५ | होप, दिल्ली | डिपसर्च | १,०२,५६०.०० |
| | | मिरर | ७,०५१.०० |
| ०६ | पी. एम. जी. सिस्टीम, हैद्राबाद | डिपसर्च | ५३,१२५.०० |
| | | मिरर | ९,१३७.५० |
| ०७ | सेफगार्ड सिक्युरीटी सिस्टीम, पुणे | डिपसर्च | ५२,७०६.०० |
| | | मिरर | ९,९१३.२५ |
| ०८ | सेक्युर बेन्ड्झ, मुंबई | डिपसर्च | ९२,७४५.०० |
| | | मिरर | ५,९२१.८७ |
| ०९ | हायटच असोसीएटेड, कोलकत्ता | डिपसर्च | १,३९,२५०.०० |
| | | मिरर | २३,७१२.५० |
| १० | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक | डिपसर्च | ३१,४५५.०० |
| | | मिरर | **५,२४२.५०** |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.रिलायन्स इलेक्ट्रॉनिक, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना मिरर पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलें. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं. ८०. व्यायामशाळेसाठी प्रशिक्षक नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ६०९.** सदरहू विषयावरिल चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं. ८१.   स्कॅनर मशिन खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६१०.** सदरहू विषय तहकूब करण्यात आला.

**विषय नं. ८२.   श्रीसाई मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसंदर्भात झालेल्या मिटींग बाबत.**

**निर्णय क्र. ६११.** उपरोक्त विषयान्वये विनंती की, मा. श्री रामानंद साो., पोलिस अधिक्षक, अ. नगर यांनी दि. १३ जुलै २००६ रोजी पोलिस स्टेशन शिर्डी येथे श्री साई मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षीतते संदर्भात मिटींग घेतली.

मुंबई येथे बॉम्बस्फोटाच्या घटना घडल्यामुळे त्याचप्रमाणे यापुर्वी धार्मीक स्थळांच्या व गर्दी असलेल्या ठिकाणी अतिरेक्यांनी बॉम्बस्फोटाच्या घटना घडुन आणलेल्या असल्याने धार्मीक स्थळांची सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात यावी त्याचप्रमाणे असलेली सुरक्षा व्यवस्था सतर्क ठेवून मंदिर परिसरात येणाऱ्या प्रत्येक इसमाची तपासणी करण्यात यावी व सुरक्षेच्या दृष्टीने खालील गोष्टींची तात्काळ अंमलबजावणी करावी असे सांगीतले.

- मंदिर परिसरात येणे करिता शांतीनिवास प्रवेशद्वार (उत्तरेकडील) याचा वापर करण्यात यावा गेटच्या बाहेर कंपाऊंडला लागुन दोन्ही बाजुने रिलींग करुन एका बाजुने पुरुष व एका बाजुने स्त्रियांना आत प्रवेश देण्याची व्यवस्था करावी.
- दक्षिणेकडील महाद्वाराचा वापर साईभक्तांना बाहेर जाण्याकरिता करावा.
- साईनिवास प्रवेशद्वार (नगर-मनमाड रोड) वापर व्ही. आय.पी. व संस्थान कर्मचारी यांना येण्याकरिता करावा.
- पुर्वेकडील महाद्वार कायम स्वरुपी बंद ठेवावे.
- दक्षिणेकडील बाजुने वॉल कंपाऊंडला असलेले (गुरुस्थानचे शेजारील) प्रवेशद्वार कायम स्वरुपी बंद करावे.
- पी. आर. ओ. कार्यालय मंदिर परिसराच्या बाहेर स्थलांतरीत करुन त्याठिकाणी पास देण्याची व्यवस्था करावी.
- मंदिर परिसरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तपासणी करण्यात यावी. बॅग, मोठ्या पर्स आत घेऊन येण्यास मनाई करावी.

वरिल गोष्टींची तात्काळ अंमलबजावणी करावी असे सांगुन मंदिर परिसराचे आतमधील सुरक्षा व्यवस्था संस्थानने करावी व मंदिर परिसरा बाहेरील सुरक्षा व्यवस्था पोलिस विभाग करेल असे सांगीतले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिराचे सुरक्षीततेच्या दृष्टीने भक्तांना निष्कारण त्रास होणार नाही व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन योग्य ती व्यवस्था करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं. ८३.   मंदिर व मंदिर परिसर सुरक्षिततेकरीता अत्याधुनिक सिक्युरिटी सिस्टीम कार्यरत करणे बाबत.**

**निर्णय क्र. ६१२.** देशातील महत्वाची व भक्तांची गर्दी होणा-या धार्मिक स्थळांवर अतिरेकी व समाजविघातक कृत्य करणा-या व्यक्ती व संघटना यांचे कडुन वारंवार हल्ले होण्याचे प्रकार वाढलेले आहेत. (आयोध्या, अक्षरधाम मंदिर, हनुमान मंदिर वारानसी, या ठिकाणी केलेले हल्ले.) श्री साई मंदिर देशातील महत्वाचे व भक्तांची गर्दी असलेले धार्मिक स्थळ असल्याने मंदिर व मंदिर परीसराच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. सुरक्षा संबधाने पोलिस विभागाकडुन वारंवार सुचना दिल्या जात आहेत त्या अनुषंगाने सुरक्षा यंत्रणेत आवश्यक बदल करणे गरजेचे आहे.

तादिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम ही इस्त्राईल कंपनी असुन जगातील सिक्युरिटीच्या संबधात पहिल्या तिन कंपन्यात गणली जाते. जगातील ४३ देशात कंपनी कार्यरत असुन आपल्या भारत देशाला गेली १५ वर्षे सैन्य विभागात सेवा पुरवीत आहे.

कंपनिचे सिक्युरिटी एक्सपोर्ट (रिटायर कमांडर चीफ ऑफ इस्त्राईल आर्मी युनिट) यांच्या सहकार्यासह ०५ मार्च २००६ ला शिर्डी संस्थानच्या परिसराची सुरक्षा यंत्रणेची पहाणी केली व संस्थानच्या सुरक्षा कर्मचारी, अधिकारी तसेच पोलिस सुरक्षा कर्मचाऱ्यांकडुन तेथील सुरक्षा व्यवस्था समजावुन घेतली. त्यावेळी त्यांनी संस्थानसाठी संपुर्ण सुरक्षा व्यवस्थेत प्रोजेक्ट तयार करण्याचे अश्वासन दिले होते.

तादिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम युनिवेट टेक कंपनीने सादर केलेल्या प्रोजेक्ट मधिल महत्वाच्या गोष्टी खालील प्रमाणे.

०१. कंपनीने जे सॉफ्टवेअर विकसीत केलेले आहे ते अत्याधुनिक व एकमेव सिक्युरिटी सॉफ्टवेअर आहे.

०२.या यंत्रणेमुळे सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थानच्या प्रत्येक विभाग तसेच भविष्यात विकसीत होणारे उपक्रम विभाग व इतर सर्व इमारती एकाच सुरक्षा यंत्रणेखाली येतील व त्यामुळे संपुर्ण सुरक्षा व्यवस्था एकसंघ होऊन परिणाम कारकरित्या आपण संस्थानची सुरक्षा व्यवस्था राबवु शकतो.
०३. संपुर्ण सुरक्षा व्यवस्था एकसंघ झाल्यामुळे एकाच सुरक्षा सेंटर (कमांड ॲन्ड कंट्रोल) मधुन संस्थानची सुरक्षा तसेच इतर सर्व बाबींवर देखरेख ठेवु शकतो. त्यामुळे एखादी घटना घडली असता त्या घटनेला उत्तर देण्यासाठी लागणारा कालावधी हा कमीत कमी असेल.
४. आपल्याकडे असणाऱ्या सुरक्षा कर्मचारी वर्गाचा योग्यरित्या व परिणामकारक वापर आपण करु शकतो.
०५. एखादी अनियमीत घटना घडत असेल तर ही यंत्रणा या घटनेची माहिती ताबडतोब अलार्म देऊन सुरक्षा पथकाला सावध करेल.
०६. मानवी चुका कमीत कमी करुन ही यंत्रणा सुरक्षा व्यवस्था व्यवस्थीत करण्याचे प्रयत्न करते.
a. कंपनी या यंत्रणे बरोबर वेगवेगळी उपकरणे पुरवीत आहे.
**अ) गेट :-** हे गेट जगातील सर्व एक्सप्लोजीव शोधुन काढतात. तसेच शरीरावर लपवण्यात आलेले कोणतेही हत्यार तसेच अगदी आरडीएक्स (RDX) सुध्दा डिटेक्ट करते. अशा प्रकारचे आजनितीचे जगातील सर्वप्रथम उपकरण आहे. या गेटमुळे प्रत्येक माणसाला थांबवुन तपासण्याची गरज नाही. माणसाने नेहमी चालतो त्याप्रमाणे गेटमधुन चालायचे आहे.
**ब) पॅनिक बटन (वायरलेस, कॅमेरा, सेन्सस) :-** पॅनिक बटन कोणताही कर्मचारी खिशात घेऊन फिरु शकतो हे बटन दाबताच परिसरात लावलेल्या कॅमेरा जिथे तो माणुस आहे. त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करतो व तो परिसर मध्वर्ती सुरक्षा यंत्रणेवर दिसु लागतो. त्यामुळे त्या ठिकाणी किती मदत पाठवावी व कुठे पाठवावी याचा निर्णय घेता येतो.
**क) मोबाईल सुरक्षा व्यवस्था उपकरणे :-** या उपकरणांमुळे जिथे घटना घडली आहे. त्या घटनेची माहिती संपुर्ण छायाचित्रासह मोबाईल सुरक्षा युनिटला मिळु शकते. त्यामुळे घटनेच्या ठिकाणी परिणामकारकरित्या काय निर्णय घ्यावा याची कल्पना अगोदरच आल्यामुळे चांगल्या पद्धतीने निर्णय घेता येतो.
a. ही यंत्रणा सध्या अस्तित्वात असलेल्या सी. सी. टि. व्ही. तसेच इतर सुरक्षा सिस्टीमला सामावुन घेऊ शकते त्यामुळे आता पर्यंत झालेल्या खर्च वाया जात नाही.

सदर सिक्युरिटी सिस्टीम अत्याधुनिक असुन आवश्यक्तेप्रमाणे त्यामध्ये बदल करता येतील बदलती परिस्थीती व वाढत्या अतिरेकी कारवाया लक्षात घेता मंदिर व मंदिर परिसर नविन भक्त निवास इ्यादी ठिकाणची सुरक्षा व्यवस्था सतर्क ठेवण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रणाचा वापर करुन मंदिर व मंदिर परिसरात सध्या असलेली सुरक्षा व्यवस्था व मंदिर परिसरातील स्टॉल या मध्ये काही बदल करुन (उदा. वॉल कंपाऊंड, गेटवर सुरक्षा गार्ड करिता बांधीव मोर्चे, मोर्च्यांमध्ये हत्यारी पोलिस, एस.आर.पी. चे जवानांची नेमणुक, सध्या असलेल्या मंदिर परिसरातील गेट कमी करणे मंदिर परिसरातील एस. टी. बुकिंग, रेल्वे बुकिंग,कॅन्टीन,बगिचा विभागाचे स्टॉल,ए.टी.एम.सेंटर हे इतरत्र हालवुन परिसरात अनावश्यक गर्दी कमी करता येईल.) सदर सिस्टीम बसविल्यास सुरक्षीततेच्या दृष्टीने उपयुक्त राहिल. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तादिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम यांचे प्रतिनिधींना समक्ष चर्चा/वाटाघाटी व प्रात्यक्षिकासाठी मुंबई येथे पुढील आठवड्यात बोलविण्यात यावे. या वेळेस राज्याचे मुख्य पोलिस महासंचालक, मा.श्री.पसरीचासाहेब व सेवानिवृत्त लष्कर अधिकारी मा.श्री.कौलसाहेब यांना उपस्थित रहाणेबाबत विनंती करावी असे ठरलें. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं. ८४. संत श्री आसाराम बापू यांचा सत्संग कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र. ६१३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं. ८५. श्रीरामनवमी उत्सव-२००६ अंदाजपत्रकाबाबत.**

**निर्णय क्र. ६१४.** श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ०३,००,०००.०० | ०६,७१,५६९.०० | ०३,७१,५६९.०० |
| ०२. | कलाकार बिदागी, | ०६,००,०००.०० | ०५,०३,७४०.०० | --- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०२,००,०००.०० | ०१,६५,०६८.०० | --- |
| ०४. | विद्युत रोषणाई | ०३,००,०००.०० | ०३,६७,६००.०० | ००,६७,६००.०० |
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १०,५०,०००.०० | १०,१६,०८७.०० | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६. | जादा कामगार | ०१,५०,०००.०० | ०१,६८,२८६.०० | ००,१८,२८६.०० |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधा बीलासह. | ०२,००,०००.०० | ०१,८४,६४४.०० | --- |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ०१,००,०००.०० | ०१,२७,०९७.०० | ००,२७,०९७.०० |
| | एकुण खर्च | २९,००,०००.०० | ३२,८४,०२४.०० | ०३,८४,०२४.०० |

**अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. ०३,००,०००/- इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु.६,७१,५६९/- इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये श्री रामनवमी उत्सव, उन्हाळी मंडप व स्टेज, बॅरेकेटींग, ड्रेसींग रुम, ५०० खुर्च्या इ.कामी रु.१,५३,०००/- चे मंडपाची कामे दिली होती मात्र द्वारकामाई पुर्व/पश्चिम बाजू-२०x२९९, पिंपळवाडी गेट-३८x४१ व ९x१८, हाजी अब्दुल बाबा पाणपोईजवळ-१२x४०, चहा कँटीन एटीएम मागे-६x४४, प्रसादालय पाणपोईजवळ-१८x३६, सुलभ शौचालयाजवळ-३०x७५,प्रसादालय-चौ.का-१०x२७ व १२x३२,५०० KVA- २४x११९ व १३x८२, प्रसादालय-१२x४४ प्रसादालय ते लेंडीबाग येथील धबधब्यापर्यंत फुटपाथवर(६६३x९), साईप्रसाद ं.२ च्या पार्कींगचे ठिकाणी(६०x१०५ व ३०x४५), साईप्रसाद नं.१- चौ.का.समोरील बाजू (१५x१३५ व ३०x४५), न.भ.नि.-२९७x५५, पिंपळवाडी गेट शेजारील मंडप-५०x३८,सावळीविहीर येथे ९०x४५,मंगल कार्यालयसमोरील मोकळी जागा-६०x७५, जि.प.मराठी शाळा-४५x९०, पोलिस स्टेशन समोर-२०x४०, कुस्तीसाठी-१५x३०, प्रसादालय लाडू क्र.३ समोर-५६x१२, चहा कँटीन रस्ता-७x४१,लाडू -१३x४३,धर्मशाळा लाडु स्टॉल-१०x१० इ.ठिकाणी जादा मंडप टाकण्यात आले होते, पालखीतील पदयात्रेसाठी (१) कापडी मंडप - एकूण ३ मंडप -सिन्नर-एमआयडीसी - ८० x १२० , खोपडी- दत्तमंदिर - २०० x २०० व पांगरी-पांगारकर बाबा येथे -६० x १०० असे ३ ठिकाणी एकूण ५५,६०० चौ.फुट, मुंबई येथून येणा-या पदयात्रींसाठी शिरडी ते सिन्नर मार्गावर वावी श्री.कान्हुशेठचे हॉटेल मागे - २०० x २००, पाथरे-वनराई ढाबा -६०x१००,पोहेगांव -श्री साईबाबा मंदिर- ६० x १००, दुशिंगवाडी- मराठी शाळा- ६०x१००, मलढोण फाटा - ६० x १०० अशा पाच ठिकाणी एकूण ६४,००० चौ.फुट मंडप, मुंबई येथून येणा-या पदयात्रींसाठी मुंबई ते सिन्नर मार्गावर खर्डी-गोलभान-६०x१००,साईकृपा हॉटेल-कसारा-१०० x१२०,लतिफवाडी-बाबा दि ढाबा-१०० x १२०,घोटी-साईप्रसाद हॉटेल - ६० x ४०,अशा चार ठिकाणी एकूण ३२,४०० चौ.फुट मंडप इ.ठिकाणी जादा मंडप टाकण्यात आलेमुळे जादा खर्च झालेला आहे.

**अ.नं.०४ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्रीरामनवमी उत्सव २००६ मध्ये विद्युत रोषणाईवर रु. ०३,००,०००/- इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये विद्युत रोषणाईवर रु.०३,६७,६००/- इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये विद्युत रोषणाईवर झालेल्या डिझेल खर्चही धरण्यात आलेला आहे. त्यामुळे जादा खर्च झालेला आहे.

**अ.नं.०६ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये जादा कंत्राटी कामगार खर्च हा रु.०१,५०,०००/- इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये प्रत्यक्ष कंत्राटी कामगार खर्च हा रु.०१,६८,२८६/- इतका झालेला आहे, विभागवार मागणी ही २००५ पेक्षा २००६ मध्ये जादा असलेने मॅनडेज जादा भरले तसेच दर वाढ झालेने उर्वरीत खर्च जादा झालेला आहे.

**अ.नं.०८ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये पालख्या पिण्याचे पाण्याची व्यवस्थेसाठी रु. ०१,००,०००/- इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये प्रत्यक्ष पाणी व्यवस्था खर्च हा रु.०१,२७,०९७/- इतका झालेला आहे. यामध्ये पाणपोई, प्लंबींग साहित्य व टँकर डिझेल इ.खर्च धरला असलेने उर्वरीत खर्च जादा झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीने श्री रामनवमी उत्सव २००६ चा मंजूर केलेला खर्च हा अंदाजित असून सन २००६ मधील खर्चामध्ये १० टक्के जादा धरुन कळविण्यात आलेला होता प्रत्यक्षात मात्र टाकण्यात आलेले जादा मंडप, विद्युत रोषणाई, जादा कामगार, पाणी व्यवस्था इ. ठिकाणी भाववाढ व इतर कारणामुळे जादा खर्च झालेला आहे.

श्रीरामनवमी उत्सवात अंदाजीत खर्च रु.**२९,००,०००.००** इतका अपेक्षीत होता मात्र प्रत्यक्षात खर्च रु.**३२,८४,०२४.००** इतका झालेला आहे. उपरोक्तनुसार जादा खर्च रु.**०३,८४,०२४.००** (अक्षरी रु. तीन लाख चौ-याऐंशी हजार चोवीस मात्र) इतका झालेला आहे. तरी श्री रामनवमी उत्सवात जादा झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाख,वशी-०५)

**विषय नं. ८६. शिधा सामुग्री मिळणेबाबत, श्री सिताराम भागवत ढूस,अध्यक्ष, श्री त्रिंबकराज स्वामी ग्रामविकास संस्था, देवळाली प्रवरा ता.राहूरी यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र. ६१५.**उपरोक्त विषयास अनुसरुन, खालील दर्शविलेल्या संस्थेने मा. कार्यकारी अधिकारीसाहेब यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री सिताराम भागवत ढुस, अध्यक्ष , श्री त्रिंबकराज स्वामी ग्रामविकास संस्था, देवळाली प्रवरा, ता.राहुरी, जि.अहमदनगर | पंढरपूर येथे बांधण्यात आलेल्या - श्री त्रिंबकराज स्वामी वारकरी सेवाश्रम, या वास्तुच्या उद्घाटन समारंभनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.१/७ ते दि.८/७/०६ अखेर आयोजित केला असून त्यासाठी भरीव मदत मिळणेबाबत. | भरीव मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त संस्थेने सप्ताह व पारायण सोहळा कार्यक्रमास पहिल्यांदाच भरीव मदत संस्थानकडून मागण्यात आलेली आहे. सदर संस्थेला आर्थिक वा शिधा स्वरुपातील मदत अपेक्षीत आहे, याचा उल्लेख आढळत नाही. संस्थानमार्फत अशाप्रकारच्या कार्यक्रमासाठी आर्थीक स्वरुपात मदत देत नाही.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

मा.श्री. सुरेशराव वाबळे , विश्वस्त यांचे सांगणेवरुन व मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार उपरोक्त सेवाश्रमास रु. ११,०००/- मात्रचा वस्तुरुपात शिधा देण्यात आलेला आहे.

तरी पंढरपूर येथे बांधण्यात आलेल्या - श्री त्रिंबकराज स्वामी वारकरी सेवाश्रम, या वास्तुच्या उद्घाटन समारंभनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.१/७ ते दि.८/७/०६ अखेर पंढरपूर येथे होणा-या उपरोक्त धार्मिक कार्यक्रमास एक विशेष बाब म्हणून रु.११,०००/- (अक्षरी रु.अकरा हजार मात्र) चा शिधा देण्यात आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाख,वशी-०५)

**विषय नं. ८७. शिधा सामुग्री मिळणेबाबत अॅड.माणिकराव मोरे, अध्यक्ष, अहमदनगर शहर बार असो. यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र. ६१६.**उपरोक्त विषयास अनुसरुन, खालील दर्शविलेल्या संस्थेने मा.डॉ.गोंदकर साहेब, विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थामार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | अॅड. माणिकराव मोरे, अध्यक्ष , अहमदनगर शहर बार असोसिएशन, अ.नगर, जि.अहमदागर | मा.उच्च न्यायालय, मुंबई व अहमद-नगर शहर व सर्व तालुका बार असो.यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२/०७ ते २३/०७/०६ रोजी संपन्न होणा-या वैकल्पिक वाद निवारण केंद्राच्या कार्यशाळेकामी शिधारुपी मदत. | शिधारुपी वा आर्थिक मदत मिळणेबाबत पत्र. | डॉ. गोंदकर यांचे शिफारस पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

दि.१६/०७/२००६ रोजी होणा-या सर्वसाधारण सभेमध्ये मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता ठेवणेबाबत मा.डॉ.गोंदकर, सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे पत्राद्वारे केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

मा.अध्यक्ष, यांचे आदेशाने मा.उच्च न्यायालय, मुंबई व अहमदनगर शहर व सर्व तालुका बार असोशिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२/०७ ते २३/०७/२००६ रोजी संपन्न होणा-या वैकल्पिक वाद निवारण केंद्राच्या कार्यशाळेकामी रु.५०,०००/- पर्यंतची शिधा स्वरुपातील मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाख,वशी-०५)

**विषय नं.८८.** **श्री.बढे,समस्त गावकरी मंडळ,रुई, सरपंच,ग्रामपंचायत कार्यालय,खळी ता.संगमनेर,श्री बी.व्ही. जावळे,सरपंच, सोनेवाडी ता.कोपरगांव, यांना अखंड हरिनाम सप्ताहाचे महाप्रसादासाठी देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र. ६१७.** उपरोक्त विषयास अनुसरुन, खाली दर्शविलेल्या समस्त गांवकरी मंडळ व ग्रामपंचायतीने मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री बढे, समस्त गांवकरी मंडळ, रुई, ता.कोपरगांव, जि.अहमदागर | सालाबादप्रमाणे रुई येथे दि.३१/७ ते दि.६/८/०६ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधारुपी मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०२. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खळी, ता.संगमनेर, जि.अहमदागर | मौजे खळी येथे दि.३०/०७ ते दि.०६/८/०६ पर्यंत हनुमान अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधारुपी मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०३. | श्री.बी.व्ही.जावळे, सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी कार्यालय, ता.कोपरगांव, जि.अहमदागर | मौजे नगदवाडी येथे दि.९/८ ते दि.१६/८/०६ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधारुपी मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०४. | श्री.बी.व्ही.जावळे, सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी कार्यालय, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर | सोनेवाडी येथे दि.३०/०७ ते दि.०६/८/०६ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधारुपी मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

अध्यक्ष, समस्त गांवकरी मंडळ, रुई यांना यापुर्वीही शिधा स्वरुपात मदत करण्यात आली होती. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खळी,यांनी मौजे खळी येथील हनुमान अखंड हरिनाम सप्ताहास, सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी, यांनी मौजे नगदवाडी व सोनेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहास संस्थानमार्फत महाप्रसादासाठी शिधारुपी मदत पहिल्यांदाच मागणी करीत आहेत.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

सदर कालावधीत मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचे मान्यतेने श्री बडे, अध्यक्ष, समस्त गांवकरी मंडळ, रुई येथे दि.३१/०७/२००६ ते दि.०६/०८/२००६ अखेर तसेच सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खळी येथे दि.३०/०७/२००६ ते दि.०६/०८/२००६ अखेर होणा-या दोन्ही अखंड हरिनाम सप्ताहासाठी अनुक्रमे रु. २५,०००/- व रु. ५,०००/-ची व श्री बी.व्ही.जावळे , सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी, येथील सोनेवाडी येथे दि.३०/०७/२००६ ते दि.०६/०८/२००६ अखेर तसेच मौजे नगदवाडी येथे दि.०९/०८/२००६ ते दि.१६/०८/२००६ अखेर होणा-या दोही अखंड हरिनाम सप्ताहासाठी रु. ११,०००/- ची महाप्रसादासाठी म्हणून शिधास्वरुपातील मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाख,वशी-०५)

**विषय नं. ८९.** **सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६१८.** उपरोक्त विषयास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२३/०५/२००६ रोजी शिर्डी येथे सर्व धर्मीय सामुदायीक विवाह सोहळा आयोजीत करण्याचे दि.०१/०४/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. २५, निर्णय क्र. २५१ ने मंजूर करण्यात आलेला आहे, सदरचे सामुदायीक विवाह सोहळयासाठी जागा, मंडप, वधूवरांना पोषाख, साई-चौघडा-वाजंत्री इ.चा खर्च साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांनी केलेला आहे. तसेच खालील कारणांसाठी संस्थानने खर्च केलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | तपशील | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | जनसंपर्क कार्यालय | बोर्ड, बॅार्स, जाहिराती इ. खर्च | ०४,७८,७२२.०० |
| ०२. | प्रसादालय विभाग | भोजन व्यवस्थेसाठी - धाधाय, कंत्राटी कामगार, मजुरी इ. खर्च | ०३,३८,०२६.०० |
| ०३. | खरेदी विभाग | मणीमंगळसुत्र, भांडी, टोप्या इ. खर्च | ०३,५४,७४१.०० |
| ०४. | ध्वनीक्षेपण विभाग | केबल नेटवर्क जाहिरात, मटेरीयल खरेदी, कंत्राटी कामगार इ. खर्च | ००,४१,१४९.०० |
| ०५. | वाहन विभाग | मिरवणुकीकरीता घोडे, ट्रॅक्टर, कंत्राटी कामगार इ. खर्च | ००,०७,०१९.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | बगीचा विभाग | हार, गुच्छ, इ. खर्च | ००,१४,०००.०० |
| ०७. | माहिती तंत्रज्ञान विभाग | मोबाईल खर्च | ००,२७,५००.०० |
| ०८. | मंदिर विभाग | वाजंत्री, फटाके आतीषबाजी, कलाकार , शॉल, कंत्राटी कामगार इ. खर्च | ०१,५६,३७६.०० |
| ०९. | कन्या विद्या मंदिर/ इं.मि.स्कुल, शिर्डी | अक्षता खर्च. | ००,१३,०४२.०० |
| १०. | संरक्षण विभाग | सुरक्षा गार्ड खर्च | ००,०६,८२९.०० |
| ११. | चौकशी कार्यालय | जादा कंत्राटी कामगार खर्च | ००,००,९१०.०० |
| १२. | स्वच्छता विभाग | जादा कंत्राटी कामगार खर्च | ००,११,१८३.०० |
| १३. | बांधकाम विभाग | बोर्ड लावणे व इतर किरकोळ खर्च | ००,११,८९४.०० |
| १४. | आय.टी.आय. | किरकोळ खर्च | ००,००,८२५.०० |
| | | **एकूण अंदाजीत खर्च -** | **१४,६२,२१६.००** |

उपरोक्तप्रमाणे साधारणतः सर्व धर्मीय सामुदायीक विवाह सोहळयासाठी संस्थानचा रु. १४,६२,२१६/- (अक्षरी रु. चौदा लाख बासष्ठ हजार दोनशे सोळा मात्र)इतका खर्च आलेला आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं. ९०. चप्पल स्टँण्डवर सुविधा मोफत पुरविणे बाबत.**

**निर्णय क्र. ६१९.**मा. श्री. शैलेश कुटे सो. विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी सदरचे पत्रात यांनी दि २६/०६/२००६ चे पत्र इकडेस पाठविले असून सदरचे पत्रात त्यांनी "शिरडी संस्थान मंदिर परिसरात साई दर्शनासाठी येणा-या भाविकांची चप्पल बुट ठेवण्याची जागेचे स्टॉलवर आपण एक रुपया चार्ज करतो ते योग्य नसून ती सेवा मोफत देण्यात यावी " असे म्हटलेले आहे.

संस्थानचे परिसरात श्री साईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि शिर्डी यांना क्लोकरुम व पादत्राणे लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर चालविणेकामी मुदतवाढ /परवानगी व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/०५/२००५ रोजी झालेल्या निर्णय क्रमांक २२७ प्रमाणे तीन वर्षासाठी देण्यात आलेली आहे त्यानुसार प्रथम वर्षासाठी जा.नं एसएसएस/वशी-०२/८२७६ / २००५ दिांक ०४/०८/२००५ अन्वये सदर क्लोकरुम व पादत्राणेगृह दिनांक ०१/०६/२००५ ते दि ३१/०५/२००६ अखेर देणेत आलेला आहे. याबाबत मासिक परवाना भाडे एकत्रित रुपये ३,२२१/- प्रमाणे पतपेढी करीत आहे. संस्थानचे परिसरात सोसायटी मार्फत सुरु असलेले क्लोकरुम व पादत्राणे गृह याची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.क्रं | सुविधेचे ाांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| २) | क्लोक रुम व पादत्राणे-<br>अ) सुलभ-क्लोकरुम<br>ब)भक्तनिवास-क्लोकरुम<br>क)साईप्रसाद-क्लोकरुम<br>ड)दर्शालाईन-पादत्राणे<br>ई) मुखदर्शन- पादत्राणे | ३,२२१/- | ०१/०६/२००५ ते ३१/०५/२००६ | सुलभ शौचालय इमारत- स्टॉल<br>भक्तािवास मेनगेटजवळ-स्टॉल<br>चौकशी कार्यालय शेजारी-स्टॉल<br>शांतीनिवास दर्शा लाइी गेट-<br>मो.जागा- मुख दर्शन गेट समोर -<br>मोकळी जागा |

दि.०१/०६/२००६ ते दिनांक ३१/०५/२००७ या कालावधीसाठी ठेका चालू ठेवणेबाबत मुदतवाढीबाबत पतपेढीकडून मागणी आलेली आहे. त्याबाबत पतपेढीशी पत्रव्यहार विचार विनिमय चालू आहे. प्रस्तुत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप,सोसायटी लिमि. शिर्डी यांचेकडून साईभक्तांकडून सामानाचे व पादत्राणाचे खालीलप्रमाणे दर आकारला जातो.

१) क्लोकरुम सामान ठेवणेसाठी - प्रत्येकी सामान/ सुटकेस साठी- रुपये १.०० प्रमाणे आकारला जातो.

२) पादत्राणेगृहामध्ये पादत्राणे ठेवणेसाठी बॅग/ पिशवी असून -प्रत्येकी बॅग/पिशवीसाठी- रुपये १.०० प्रमाणे आकारले जाते.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप,सोसायटी लिमिटेड. शिर्डी यांचे मार्फत पादत्राणगृहाची व्यवस्था चालू असनू त्यांना सदर स्टॉल लिव्ह ॲड लायसेन्स तत्वावर दिलेला आहे. त्यांचेकडून क्लोकरुम व पादत्राणे यांचे एकत्रित मासिक भाडे रुपये ३,२२१/- आकारणी करणेत येत आहे.

पादत्राणे सांभाळणेची व्यवस्था/ मोफत करणे असल्यास तसेच पतपेढीस कळवावे लागेल. परंतु पतपेढी ही सहकारी संस्था असल्यामुळे नोकरांचे पगार वगैरे बाबी विचारात घेता पतपेढी मार्फत प्रस्तुत मोफत सुविधेसह संमती मिळणेची शक्यता नाही ही बाब विचारात घेता (श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप,सोसायटी लिमि. शिर्डी ) ऐवजी संस्थान मार्फत प्रस्तुतचे पादत्राणे गृहाची व्यवस्था चालविणे व सदर व्यवस्था/ सेवा मोफत देणेस व पतपेढीचे पादत्राणेगृहाचे ठेक्याचे काम कमी केल्यास ३ क्लोकरुम व २ पादत्राणेगृह बाबत सध्याचे एकत्रित लायसेस फी रुपये ३,२२१/- ऐवजी

रुपये १९३३/-  आकारणेस  ( प्रतिवर्षी त्यामध्ये १० % वाढ )  करण्यास मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,  संस्थान तर्फे मोफत चप्पल स्टॅण्ड सुविधा पुरविण्यात यावी. तसेच पतपेढीकडून ३ क्लोकरुम व २ पादत्राणेगृह बाबत सध्याचे एकत्रित लायसेस फी  रुपये ३,२२१/- ऐवजी रुपये १९३३/-  ( प्रतिवर्षी त्यामध्ये १० % वाढ ) आकारणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी/संरक्षण अधिकारी/कॅंटीन विभागप्रमुख)

**विषय नं. ९१.   संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांना शैक्षणिक फीचा परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र. ६२०.** संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांचा ज्या त्या वर्षाचा फीचा परतावा गत मा.व्यवस्थापन मंडळाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वे / नियमावलीस अनुसरुन देण्यात येतो.

शासनाने विनाअनुदानीत महाविद्यालयांची शैक्षणिक फी ठरविण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची स्थापना केलेली आहे. सदरच्या समितीने ठरविलेल्या दराने विद्यार्थ्यांना फी भरावी लागते. शासनाने अनुदानीत महाविद्यालयांची ठरविलेली फी व समितीने त्याच अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानीत महाविद्यालयांकरीता ठरविलेल्या फी मध्ये मोठयाप्रमाणात तफावत आहे. संस्थानकडुन कर्मचा-यांना सन १९९६ व्यवस्थापन मंडळाचे  निर्णयाप्रमाणे फीचा परतावा दिला जातो. इंजिनिअरींग,वैद्यकीय,हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, बी.फार्मसी, बी.एस.सी.नर्सिंग वगैरे अभ्यासक्रमासाठी फीचा परतावा गुणवत्तेच्या निकषावर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यास आकारण्यात येणा-या शासकीय फीच्या मर्यादेपर्यंत देण्यात येतो. उदा.

| अ.नं | अभ्यासक्रमाचे नांव व पाल्यांनी भरलेली फी | शिक्षण शुल्क समितीने विनाअनुदानीत कॉलेजसाठी शिफारस केलेली फी | शासनाने शासकीय / अनुदानीत महाविद्यालयाकरीता निर्धारीत केलेली फी. | संस्थानकडुन कर्मचा-यांना पाल्यांची शासकीय दराने देत असलेली फी |
|---|---|---|---|---|
| १ | एम.बी.बी.एस. रु.२,२८,०००/- | रु.१,१४,०००/-ते रु.२,६७,४००/- | रु.१८,०००/- | रु.१८,०००/- |
| २ | बी.डी.एस.(दंत) रु.१,२०,०००/- | रु.५३,०००/- ते रु १,४१,०००/- | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- |
| ३ | बी.ए.एम.एस. रु.३४,९००/- | रु.२६,६००/- ते रु.९२,७००/- | रु.७,५००/- | रु.७,५००/- |
| ४ | बी.एस.सी.नर्सिंग रु.५०,०००/- | रु.५०,०००/- | रु.६,०००/- | रु.६,०००/- |
| ५ | इंजिनिअरींग रु.४०,४५७/- | रु.१६९००/- ते रु ५७०००/- | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- |
| ६ | बी.फार्मसी /हॉटेल मॅने. & केटरिंग टेक्नॉ | रु.१६०००/-ते रु. ३५०००/- | रु.८,०००/- | रु.८,०००/- |
| ७ | अभियांत्रीकी पदविका | रु.२०,०००/-ते रु.३०,०००/- | रु..६०००/- | रु..६०००/- |
| ८ | बी.एस्सी ॲग्री रु.२२,१३२/- | रु.२०,०००/- (विद्यापीठ) | रु.३,६००/- | रु.३,६००/- |

शिक्षण शुल्क समितीने फक्त महाराष्ट्रातील विनाअनुदानीत महाविद्यालयांची ते विद्यार्थ्यांना देत असलेल्या सुविधेनुसार एकाच अभ्यासक्रमाची प्रत्येक महाविद्यालयाची वेगवेगळी फी ठरविलेली आहे.

तथापी पाल्य ज्या अनुदानीत / विनाअनुदानीत खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत आहे. ती संस्था जी फी आकारीत आहे, त्या व इतर  पूर्ण रक्कमेचा परतावा मिळावा म्हणून फी परतावा नियमावलीत खालीलप्रमाणे बदल करावेत अशी मागणी कर्मचा-यांनी केलेली आहे :-

**०१)**  कर्मचा-यांचे सर्वच पाल्यांना गुणवत्तेच्या निकषावर शासकीय / अनुदानीत कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही. त्यामुळे त्यांना विनाअनुदानीत कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन शिक्षण शुल्क समितीने / विद्यापीठाने ठरविलेली फी भरावी लागते. अशा संपुर्ण फीचा परतावा मिळावा.

**०२)**  तसेच मा.व्य.मंडळाचे निर्णयानुसार विद्यार्थी एकदा नापास झाल्यानंतर त्याला पुढील कोणत्याही शिक्षणाच्या फीचा परतावा देण्यात येत नाही. त्यामुळे विद्यार्थी शिक्षण घेतांना एखाद्यावेळी नापास  झाल्यास त्याचा तेथून पुढे कायमस्वरुपी फीचा परतावा नाकारण्यात येतो. विद्यार्थी नापास झालेल्या वर्षापुरताच फीचा परतावा देण्यात येऊ नये. विद्यार्थी  पास होऊन पुढील वर्गात गेल्यास त्यानंतरचे शिक्षणाचा परतावा देण्यात यावा.

**०३)** काही पाल्ये  परराज्यात  किंवा परदेशात तेथील शासनाचे मान्यताप्राप्त शिक्षण घेत आहेत. अशा अभ्यासक्रमाची फी, महाराष्ट्रात खाजगी महाविद्यालयासाठी शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या कमीतकमी फीचे मर्यादेपर्यंत फीचा परतावा देण्यात यावा.

**०४)**  गेल्या काही वर्षात शासन तसेच विद्यापीठांचे अभ्यासक्रमांचे व्यतिरीक्त काही खाजगी संस्थांनी वेगवेगळे शासनमान्य अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. त्यांचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क त्यांनीच

निश्चित केलेले असते. अशा शासनमान्य अभ्यासक्रमास संस्थेने आकारलेल्या सर्वच शुल्काचा परतावा देण्यात यावा. उदा. एअर होस्टेस ट्रेनिंग,टॅक्सेशन लॉ, वेब मल्टी मेडिया,डी.एम.एल.टी., नर्सिंग, संगणकाचे वेगवेगळे कोर्स,वगैरे.

**०५)** कला,वाणिज्य व विज्ञान शाखेची प्रथम पदवी घेतनेनंतर फक्त दोन वर्षे कालावधीचे व्यावसायीक पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा फी परतावा देण्यात येतो.परंतु काही पाल्य व्यावसायीक शिक्षणाच्या पदवी अभ्यासक्रमानंतर सध्या आवश्यक असणारे पदव्यूत्तर शिक्षण घेत असतांना अशा सर्वच पदव्युत्तर शिक्षणाच्या फीचा परतावा देण्यात यावा.

**०६)** बदलानंतर सुधारीत दराने **सन २००३-२००४** पासुनचा फी परतावा देण्यात यावा. शैक्षणिक शुल्काचे परताव्याबाबत शासनाकडे चौकशी केली असता:- प्रत्येक जिल्हयातील, जिल्हा समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, विषेश मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काची प्रतीपुर्ती केली जाते. त्याबाबत अहमदनगर जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे माहीती प्राप्त झालेली आहे. शासन पत्र क्र.इबीसी-२००५/प्र.क्र.३७८/मावक-२,मंत्रालय मुंबई,दि.१९/१२/२००५ चे पत्रान्वये खाजगी महाविद्यालयात शासकीय कोटयातुन प्रवेश घेणा-या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मंजुरीबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**१)** आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.,बी.डी.एस.,बी.ए,एम.एस.,बी.यु.एम.एस. बी.एच. एम.एस.,बी.पी.टी.एच.,बी.ओ.टी.एच.व बी.एस्सी.नर्सिंग)चालविणा-या खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयात शासकीय कोटयातील ५० टक्के जागा मागासवर्गीयांच्या विविध गटसाठी आरक्षित आहेत. त्यापैकी अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व विषेश मागास प्रवर्गासाठी आरक्षित असणा-या जागांवर प्रवेश घेणा-या उमेद्वारांना शैक्षणिक शुल्क समितीने प्रमाणित केल्यानुसार विकास निधीसह शुल्काची प्रतिपुर्ती पूर्णतः देण्यात येईल.

**२)** इतर मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना संबंधीत खाजगी महाविद्यालयाचे जे शैक्षणिक शुल्क समितीने प्रमाणित केले आहे. त्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी रु.५०,०००/-, दंत अभ्यासक्रमासाठी रु.२५,०००/-,आयुर्वेद अभ्यासक्रमासाठी रु.१२,०००/- आणि होमिओपॅथी,युनानी,भौतिकोपचार-व्यवसायोपचार व बी.एस.सी.नर्सिंग अभ्यासक्रमासाठी रु.५,०००/- यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात शैक्षणिक शुल्काच्या काही अंशी प्रतिपुर्ती पोटी देण्यात येईल.

**३)** आर्थिकदृष्टया मागास असलेल्या उमेद्वारांना शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरण्यास वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु.६५,०००/- अशी लागु राहील. तसेच त्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार एकूण जागांपैकी १० टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनूसार शिष्यवृत्ती देण्यात येईल. उप संचालक,समाज कल्याण संचालनालय,म.रा.पुणे यांचे पत्र क्र.सकस/शिक्षण/ भासशि/ शुल्क /०१-०२/प्रक्र-१५ /का-४/७९८,दि.१४/०८/२००२ चे पत्रान्वये अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रीकी पदविका, औषध निर्माणशास्र,वास्तुशास्र,हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, व इतर पदविका अभ्यासक्रम करणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क रु.६०००/- किंवा रु.१४,०००/- मंजूर करण्यात यावेत. इंजिनीअरींगसाठी शिक्षण फी रु.१५,०००/-विकास शुल्क रु.५०००/- इतर शुल्क रु.४०००/- एकुण रुपये २४,०००/- शैक्षणिक शुल्क अदा केले जाते. शासन निर्णय क्र.टीसीएम १०९९/(१२४/९९)/माशि ४,मंत्रालय मुंबई,दि.१८/०७/२००१ अन्वये कायम विनाअनुदानित **डी.एड**.अभ्यासक्रमासाठी (१) शिक्षण शुल्क दरमहा रु.८००/-,(२) प्रती सत्र शुल्क रु.८००/-, (३) प्रवेश शुल्क रु.८००/- असे प्रथम व द्वितीय या दोन्ही वर्षासाठी सन २००१-२००२ पासुन लागु केलेले आहे.

शासन निर्णय क्र.एनजीसी २००१/बी.एड./)४४२/०१) मशि-३,मंत्रालय मुंबई, दि.२४/०५/२००२ अन्वये सोनवणे समितीने शिक्षण शुल्कामध्ये वाढ करण्यासंबंधी केलेल्या शिफारसीनुसार तसेच इतर शिफारसी विचारात घेऊन राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानित बी.एड.अभ्यासक्रमासाठी सन २००६-२००७ साठी शिक्षण शुल्क फ्री सीट करीता रु.१२,१५४/- व पेमेंट सीट करीता रु.३०,३३०/- त्याशिवाय इतर प्रवेश शुल्क रु.६०/-, ग्रंथालय शुल्क रु.१२०/-,जिमखाना शुल्क रु.१८०/-, प्रयोगशाळा शुल्क रु.२४०/- आकरणेबाबत निर्णय झालेला आहे. इत्यादी माहीती जिल्हा समाजकल्याण विभागाकडुन प्राप्त झालेली आहे.

**कर्मचा-यांच्या मागणीस अनुसरुन खालील मुद्यांवर विचार होऊन निर्णय होणेस विनंती.**

**अ)** खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयासाठी शिक्षण शुल्क समितीने /विद्यापीठाने /शासनाने इंजिनिअरींग, वैद्यकीय,हॉटेल मॅनेजमेंट & केटरींग टेक्नॉलॉजी,बी.फार्म,एम.बी.ए.बी.एस्सी.ॲग्री. या अभ्यासक्रमासाठी ठरविलेली फी द्यावी किंवा कसे?

**ब)** अनुत्तीर्ण झालेला पाल्य उत्तीर्ण झाल्यास त्याच्या पुढील शिक्षणाचा फी परतावा द्यावा किंवा कसे?

**क)** परराज्यात अगर परदेशात शिक्षण घेत असलेल्या पाल्यांचा फी परतावा द्यावा किंवा कसे? द्यावयाचा असल्यास किती रक्कमे पर्यंत कोणत्या देशाचा व कोणत्या अभ्यासक्रमाचा परतावा द्यावा.

(उदा.रशियातील-एम.बी.बी.एस.,आंध्रप्रदेशातील-.बी.डी.एस.,मध्यप्रदेशातील-एअर क्रॉफ्ट मेंटनन्स इंजिनिअरींग)

**ड)** खाजगी संस्थेने ठरविलेल्या फीचा परतावा द्यावा किंवा कसे ? (उदा.फोटोग्राफी,)

**इ)** इ.१२ वी नंतर बी.फॉर्म,बी.एस्सी नर्सिंग,बी.एस्सी ॲग्री यासारख्या अभ्यासक्रमाचा परतावा घेतल्यानंतर एम.फार्मसी,एम.एस्सी नर्सिंग,एम.एस्सी ॲग्री,एम.बी.ए, या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या फीचा परतावा द्यावा किंवा कसे? तसेच बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी.,चा परतावा घेतलेनंतर एम.ए, एम.कॉम, एम.एस्सी.या व यापूढील बी.एड,एम.एड,बी.पी.एड या पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचा परतावा द्यावा किंवा कसे?

**ई)** सन २००३-०४ पासुनचा परतावा द्यावा किंवा चालु वर्षापासुनचा परतावा द्यावा. सन २००३-२००४ पासुनचा परतावा द्यावयाचा झाल्यास पुर्वीच्या नियमावलीनुसार अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदारांचा परतावा द्यावा किंवा कसे?

**उ)** परदेशी मान्यतेचे अभ्यासक्रम महाराष्ट्रात खाजगी संस्थेमध्ये शिकविले जातात,त्यांची परीक्षा तेच घेत असतात. त्या अभ्यासक्रमाची फी ती संस्थाच ठरवित असते, अशा अभ्यासक्रमांची फी द्यावी किंवा कसे?

**ऊ)** इयत्ता १० वी, १२ वी नंतर १ किंवा २ वर्ष कालावधीचे इतर कोर्स करतात व पुन्हा महाविद्यालयीन शिक्षणास प्रवेश घेऊन त्या शिक्षणाच्या फीची मागणी करतात अशी फी द्यावी किंवा कसे ?

**प)** पाल्य शाळा,कॉलेज व इतर कोर्स करीत असतांना संगणकाचे व इतर हंगामी (पार्ट टाईम) कोर्स करतात व एकाच वर्षात पुर्णवेळ व हंगामी अशा दोन्ही अभ्यासक्रमाची फीची मागणी केली जाते अशा दोन्ही फीचा परतावा द्यावा किंवा कोणत्या एका अभ्यासक्रमाचा परतावा द्यावा ?

**फ)** शैक्षणिक बाबींकरीता आवश्यक असणा-या उदा.प्रवेश,शैक्षणिक,ग्रंथालय,प्रयोशाळा,परीक्षा, वर्कशॉप,ऑदर मिसलेनिअस,लॅब ॲण्ड ड्रग्ज,चर्चासत्र,ट्रेनिंग फुड,फी,गॅदरिंग,प्रत्यक्षिक फी,जिमखाना यासारख्या फीचा परतावा द्यावा किंवा कसे? तसेच होस्टेलच्या फीसह परतावा द्यावा किंवा कसे ? होस्टेल फीचा परतावा द्यावयाचा असल्यास किती रक्कमेपर्यंत द्यावा.

**सन २००५-२००६** या शैक्षणिक वर्षात **रु.५,०८,४८३**/-फीचा परतावा दिलेला आहे.कर्मचा-यांचे मागणीनुसार वरील बदल केल्यास एका वर्षात अंदाजे **रु.२३,४४,३५५**/- इतका परतावा द्यावा लागेल. सन २००३-२००४ पासून सन २००६-२००७ पर्यंतचा परतावा द्यावयाचा असल्यास प्रत्येक वर्षी अंदाजे रक्कम रु.२३ लाख याप्रमाणे एकूण अंदाजे **रुपये ९२ लाख** परतावा द्यावा लागेल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शैक्षणिक फी धोरणाबाबत शासनाचे शिक्षण स्कुल समितीने ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना शैक्षणिक फीचा परतावा देणेबाबत प्रस्ताव तयार करुन त्यास राज्य शासनाची मान्यता घेण्यात यावी. तोपर्यंत पूर्वीचेच प्रथेप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना शैक्षणिक फीचा परतावा देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०३)

**विषय नं. ९२. इंग्लिश स्पिकींग कोर्स आयोजन करणे बाबत**

**निर्णय क्र. ६२१.** एक्सलंट इंग्लीश स्पिकिंग इस्टीटयुट, श्रीरामपूर, मुख्य कार्यकारी, श्री.एस.ए.शेख यांनी इंग्लीश स्पिकिंग कोर्स संस्थान कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी सुरु करणे विषयक दि.०८-०४-२००६ रोजीचे पत्राने प्रस्ताव सादर केला आहे.

संस्थान कर्मचारी व अधिकारी तसेच डोनेशन काऊंटर्स, जनसंपर्क, मंदिर विभाग व रुग्णालयातील रिसेप्शन काऊंटर्स इ.ठिकाणच्या कर्मचा-यांसाठी सदरच्या कोर्सची गरज आहे. आवश्यक त्या कर्मचारी व स्टाफकरीता गटा गटाने सदरचा इंग्लीश स्पिकिंग कोर्स आयोजीत करता येईल. प्रथम गट नं. १ व २ मध्ये सर्व प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख, अधिक्षक अशा एकूण ३५ कर्मचा-यांचा समावेश करता येईल.

सदर कोर्स संदर्भात दि.१३-०७-२००६ रोजी श्री.शेख सर यांचेशी समक्ष चर्चा झालेली आहे. त्यांनी चर्चेअंती सदरचा कोर्स दि.२७-०६-२००६ पासनू सहा महीने कालावधीसाठी दर रविवारी स.९ ते दु.१ व दुपारी २ ते सायंकाळी ६-०० या वेळेत दोन बॅचमध्ये घेण्याचे मान्य केले आहे. यासाठी प्रति प्रशिक्षणार्थी, प्रतिमहीना रु.३००/- प्रमाणे मानधनाची त्यांनी मागणी केलेली आहे.

सदरच्या प्रस्तावानुसार प्रथम गट नं.१ व २ मधील प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख व अधिक्षक अशा एकूण ३५ प्रशिक्षणार्थींना दि.२७-०८-२००६ पासनू दर रविवारी या प्रमाणे सहा महीने कालावधीत प्रशिक्षण दयावयाचे झाल्यास, प्रशिक्षणासाठी (रु.३००x६ महीने= रु.१८००/-x ३५ प्रशिक्षणार्थी प्रमाणे) रु.६३,०००/- (अक्षरी रुपये त्रेसस्ट हजार) मात्र इतके मानधन अदा करावे लागेल. तसेच याव्यतिरिक्त उपरोक्तप्रमाणे उर्वरीत कर्मचा-यांकरीता रु.३००/- प्रती महीना, प्रती प्रशिक्षणार्थी याप्रमाणे मानधन अदा करावे लागेल.

सबब, उपरोक्तप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता इंग्लीश स्पिकींग कोर्स प्रशिक्षण आयोजीत करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकार)

**विषय नं. ९३. साईनाथ हॉस्पिटल कडील विविध पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत**

**निर्णय क्र. ६२२.** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकीय अधिकारी या पदावर नोकरी मिळणेकामी डॉ.विद्युत कुमार, (कार्डीयेक सर्जन),डॉ.मुकुंद आंबापुरकर,(फिजीशियन),डॉ.अजय भोसले (बालरोग तज्ञ), डॉ.मुकेश अग्रवाल (आर्थो),डॉ.स्वेता बंडोपाध्याय (आर.एम.ओ.) यांनी अर्ज सादर केले आहेत.

उपरोक्त अर्जदार वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती मा.डॉ.पी.एल.तिवारी साो.विश्वस्त तथा अध्यक्ष रुग्णालय निवड समिती यांनी घेतल्या असून त्यांना श्री साईबाबा रुग्णालयाकडे खालील प्रमाणे नेमणूका देणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | शैक्षणिक पात्रता | मा.डॉ.पी.एल.तिवारी साो. यांनी दिलेले अभिप्राय | अभिप्रायानुसार दिलेले पदनांम व मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१.. | डॉ.विद्युत कुमार, (कार्डीयेक सर्जन) | एम.एस./डी.एन.बी. एम.सी.एच. | To be appointed as full Time Cardiac Surgeon | पूर्णवेळ (कार्डीअॅक सर्जन) रु.३०,०००/- |
| ०२. | डॉ.मुकुंद आंबापुरकर, (फिजीशियन) | एम.डी.मेडीसिन | Appointed as a Associate Consultant (Physician) | असो.कंन्सलटंट(फिजीशियन) रु.३०,०००/- |
| ०३. | डॉ.अजय कुमार भोसले (बालरोग तज्ञ) | एम.बी.बी.एस. डी.सी.एच.,डी.एन.बी. | Appointed as a Associate Consultant (Paediatrics) | असो.कंन्सलटंट (बालरोग तज्ञ) रु.३०,०००/- |
| ०४. | डॉ.मुकेश अग्रवाल (अर्थोपेडीक) | एम.एस.आर्थोपेडीक | To be appointed as Hon. Surgeon | व्हिजीटींग कंन्सलटंट इंन आर्थोपेडीक |
| ०५. | डॉ.स्वेता बंडोपाध्याय (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस. डी.एन.बी.(अॅपीयर) | To be appointed as R.M.O.will work in Ophthl | वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) रु.१७,०००/- |
| ०६. | डॉ.अनिषा सा.टंडन, ज्यु.रेडीओलॉजीस्ट | एम.बी.बी.एस. डी.एम.आर.डी. | Appointed as a Consultant (Radiology) | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ ज्यु. रेडीओलॉजिस्ट) रु.२५,०००/- |
| ०७. | डॉ.शंतनु टंडन (इ.एन.टी.सर्जन) | एम.एस. | Appointed as a Surgeon (E.N.T.) | वैद्यकीय अधिकारी (इ.एन.टी.सर्जन)रु.३०,०००/- |
| ०८. | डॉ. पवन जे साहू (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस डी एन बी(डी आर्थो) | Appointed as a R.M.O. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ)रु.१७,०००/- |

मा.विश्वस्त डॉ.तिवारी व वैद्यकीय संचालक श्री साईबाबा रुग्णालय यांचे अभिप्रायानुसार वरिल अ.नं.०१ ते ०८ अर्जदारांना त्यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांची शैक्षणिक पात्रता व प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधातील पदनिहाय वेतनश्रेणीच्या अधीन राहून तसेच जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५/२००६ दि.०७/०१/२००६ रोजीचे आदेशात नमूद केलेल्या वेतनश्रेणीच्या मानकानुसार एकत्रीत मानधन देवून नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त अ.नं.०१ ते ०८ या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं. ९४. डॉ.राहूल पी.वैद्य, स्पीच अॅण्ड ऑडिओलॉजिस्ट यांचे मानद सेवेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. ६२३.** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३१ जुलै व ०१ ऑगष्ट २००४ च्या सभेतील निर्णय क्र.४०० नुसार संदर्भ क्र.०२ चे आदेशाने डॉ.राहूल पी.वैद्य यांची दि.०१/०८/२००४ पासून मानद "स्पीच अॅण्ड ऑडीओमेट्रीस्ट" म्हणून महिन्यातून एक व्हिजीट व एका व्हिजीटसाठी रु.१५००/- (अक्षरी रु.एक हजार पाचशे ) मात्र एकत्रीत मानधनावर पुढील आदेश होईपर्यंत नेमणूक करण्यात आलेली होती सदरचे कालावधीस दि.३१/०८/२००५ अखेर एक वर्षे पुर्ण झाल्यानंतर डॉ.वैद्य यांचेमुळे सदर कालावधीमध्ये ४०० रुग्णांना त्यांच्या सेवेचा लाभ झाल्यामुळे त्यांची वैद्यकीय अधिक्षिका व वरिष्ठ प्रशासक रुग्णालये यांनी डॉ.वैद्य यांची यापूर्वी दिलेल्या नेमणूक पत्रातील अटी-शर्ती कायम ठेवून महिन्यातून एक व्हिजीट व एका व्हिजीटसाठी रु.१५००/- (अक्षरी एक हजार पाचशे ) मात्र एकत्रीत मानधनावर दि.०१/०९/२००५ पासून एक वर्षासाठी मुदतवाढ करण्याची शिफारस केलेली होती त्यास अनुसरुन डॉ.वैद्य यांना संदर्भ क्र.०३ चे आदेशाने मुदतवाढ देण्यात आली होती सदरचे कालावधीची मुदत दि.३१/०८/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

आता,वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी यांनी दि.२६/०६/२००६ रोजी टिपणी सादर करुन त्यात," डॉ.राहूल वैद्य हे प्रत्येक महिन्याचे तिसऱ्या शनिवारी श्री साईनाथ रुग्णालयास व्हिजिट देतात,डॉ.वैद्य ऑडिओमिस्ट यांनी दि.१७/०६/२००६ चे अर्जान्वये दिनांक ०१/०९/२००६ ते ३१/०८/२००७ अखेर एक वर्षाकरीता मुदतवाढ मागितलेली आहे.तसेच त्यांनी रु.२२००/- मानधन देणेबाबत (म्हणजे सध्या त्यांना देत असलेल्या मानधनात रु.१५००/- मध्ये आणखी रु.७००/- वाढवून मागितले आहेत.) डॉ.वैद्य यांनी श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०९/२००५ ते १७/०६/२००६ अखेर व्हिजीट दिलेल्या असून आतायर्पंत (वर्षभरात) त्यांच्या सेवेचा ३०० रुग्णांना लाभ घेतलेला आहे.तरी डॉ.राहूल वैद्य ऑडिओमिस्ट रा.नाशिक यांची सेवा पुढे चालू ठेवून एक वर्षासाठी मुदतवाढ मिळावी तसेच मानधनात वाढ मिळावी."असे नमूद केलेले आहे.

तरी डॉ.राहुल वैद्य यांचेबाबत श्री साईनाथ रुग्णालयाचे दि.२६/०६/२००६ चे टिपणीतील वैद्यकीय अधिक्षिका यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ.वैद्य यांची पुर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.०१/०९/२००६ पासून पुढे दि.३१/०८/२००७ पर्यंत (एक वर्षाकरीता) मुदत व प्रति व्हिजीट प्रवासखर्चासहीत रु. १५००/- ऐवजी रु.२२००/-(दोन हजार दोनशे) मात्र अशी मानधनात वाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं. ९५. डॉ.संजय के.पटवर्धन, वैद्यकीय प्रशासक यांचा दिनांक २६.६.२००६ चे अर्जाबाबत**

**निर्णय क्र. ६२४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं. ९६. डॉ.राम नाईक (जनरल सर्जन) यांना जादा वेतनवाढी देणे बाबत**

**निर्णय क्र. ६२५.** वैद्यकीय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.०६/०६/२००६ रोजी टिपणी सादर करुन त्यात "श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ०२ फिजीशियन कार्यरत आहेत. डॉ.बी.बी.साबळे व डॉ.अमोल हरताळकर पैकी डॉ.हरताळकर यांनी दि.१५/०६/२००६ पासून त्यांचे पदाचा राजीनामा दिला आहे. तसेच डॉ.बी.बी.साबळे हे श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे काम करण्यास उत्सुक आहेत.त्यामुळे श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता डॉ.प्रफुल्ल पोरवाल यांना वेळोवेळी रात्री अपरात्री बोलविण्यात येते.तरी डॉ.पोरवाल यांचेकडे मेल मेडिकल वार्ड फिमेल मेडिकल वार्ड,तसेच स्पेशलवार्ड मधील पेशंट पाहणेबाबतची जबाबदारी असून तातडीच्या वेळेस आय.सी.सी.यु.मधील पेशंट पहाणेकरीता त्यांना बोलविण्यात येते. तसेच डॉ.पोरवाल यांची ओपीडी १५० पर्यंत असते.तरी डॉ.पोरवाल यांना या कामासाठी ४ वार्षिक वेतनवाढी वाढवून देणेत मान्यता असावी.

श्रीसाईनाथ रुग्णालयात सर्जनची ०३ पदे मंजूर असून डॉ.रितेश नायक,यांनी राजीनामा दिल्याने ०२ पदे रिक्त असून सध्या रुग्णालयात डॉ.रामप्रसन्ना नाईक हे एकमेव सर्जन आहेत.डॉ.नाईक यांची २५० पर्यंत ओपीडी असते.तसेच डॉ.नाईक यांचे दररोज २० पर्यंत ऑपरेशन असतात.तरी डॉ.नाईक यांचे कामाचा लोड पहाता डॉ.नाईक यांना ६ वार्षिक वेतनवाढ वाढवून देणेस मान्यता मिळावी."असे नमूद केलेले आहे.

डॉ.राम प्रसन्ना नाईक,एम.एस.जनरल सर्जन यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे रु.१०,००-१५,२००(+ एन.पी.ए.) या वेतनश्रेणीमध्ये रु.१०,०००/- मूळ वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार ते दि.०४/०३/२००२ पासून सदर पदावर कामावर हजर झालेले आहेत.कामावर हजर झ ाल्यापासून त्यांच्याबाबतीत कुठलीही तक्रार नसून आजपर्यंत संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये येणाऱ्या सर्जरी विषयक रुग्णांना सर्वयोग्य प्रकारे त्यांनी सेवा दिलेली असून संस्थानचे रुग्णालयाचे नावलौकीकात मोठया प्रमाणात चांगली भर पाडलेली आहे.डॉ.नाईक हे रुग्णालयात हजर झाल्यापासून डॉ.भारद्वाज,डॉ.रितेश नायक,डॉ.नेमीनाथ बी.पाटील (सर्व जनरल सर्जन) संस्थान सेवेत दाखल होवून व नंतर राजीनामा देवून निघून गेले आहेत.

सध्या संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाचे आस्थापनेवर जनरल सर्जनची तीन पदे मंजूर असून फक्त एकच म्हणजे डॉ.रामप्रसन्ना नाईक हे एकमेव काम पहात आहेत.त्यांची दैनंदिन ओ.पी.डी.२५० असून रोज २० ऑपरेशन असतात,उपरोक्त परिस्थीती पहाता एकत्रीत तीनही पदाचा कामाचा व्याप डॉ.नाईक यांचेवरच असल्याचे दिसून येते.

सध्या संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल हे नव्याने सुरु झालेले असल्याने त्याठिकाणी सर्व पदांवर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यांना मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने व प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधातील पदनिहाय वेतनश्रेणीच्या अधीन राहून तसेच जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५/२००६ दि.०७/०१/२००६ रोजीचे आदेशात नमूद केलेल्या वेतनश्रेणीच्या मानकानुसार एकत्रीत मानधन देवून नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.डॉ.रामनाईक यांचेप्रमाणेच शैक्षणिक व व्यावसायीक पात्रता धारण केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना एकत्रीत रु.३०,०००/- या मानधनावर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे नव्याने नेमणूका करण्यात आलेल्या अगदीच किमान पात्रता धारण केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.३०,०००/-मानधन व डॉ.नाईक हे संस्थान रुग्णालयामध्ये चार वर्षापासून काम करीत असून त्यांना मिळणारा पगार रु.२४,७४८/- इतका म्हणजेच दोन्हीमध्ये बरीच मोठी तफावत आढळून येते.

तरी ते करीत असलेल्या कामाच्या स्वरुपानुसार त्यांना किमान रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीतील रु.३२५/- च्या एकूण सात वार्षीक पगारवाढी दिल्यास त्यांचा एकूण पगार आज दिनांक रोजी रु.२९,६१३/- ऐवढा होईल व सदरच्या पगारवाढी त्यांना दिल्यास श्री साईबाबा हॉस्पीटलमधील नव्याने नेमणूका करण्यात आलेले जनरल सर्जन व डॉ.नाईक यांचे पगारातील तफावत कमी होवून त्यांना त्याचा फायदा होईल व ते आज रोजी करत असलेल्या कामाचा मोबदला त्यांना मिळून त्यांचे कार्यक्षमतेत आणखी वाढ होईल.यापुर्वी संस्थान रुग्णालयामध्ये नव्याने हजर झालेल्या श्रीमती ईरा

भारद्वाज, वैद्यकीय अधिकारी पॅथालॉजी,यांना १५ वेतनवाढी,वैद्यकीय अधिक्षिका श्रीमती ए.एस.पेंडसे तसेच श्री बोलशेट्टी भांडारपाल यांना पाच वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत.

तरी वैद्यकीय अधिक्षिका यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार डॉ.राम नाईक,जनरल सर्जन यांना रु.१०,०००-३२५-१५,२०० या वेतनश्रेणीमधील रु.३२५ च्या सात वेतनवाढी देणे मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.राम नाईक यांना श्री साईबाबा हॉस्पिटल कडील समकक्ष वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं. ९७. निश्चित मासिक वेतन मिळणेबाबत सर्वश्री अजय शिवराम पांडे व इतर ४ कंत्राटी सेवेंत असलेल्या कनिष्ठ अभियंते यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. ६२६.** सर्वश्री अजय शिवराम पांडे, गिरिष एकनाथ चोळके, मधुकर परशराम गव्हाणे, गंगाधर शंकर जाधव व स्वप्नील बाबासाहे गायकवाड अशा एकूण ५ कंत्राटी सेवेत असलेल्या कनिष्ठ अभियंते (बांधकाम) यांनी दिनांक २९.६.२००६ रोजी अर्ज सदर करुन त्यात "आम्ही खाली स्वाक्षरी करणार अभियंते बांधकाम विभागात गेली सात वर्षे रुपये १०० प्रतीदिन वेतनावर काम करीत आहोत. बाजारातील महागाई गेल्या सात वर्षात दुप्पट्टीने वाढली परंतू आमचे वेतन मात्र रुपये १०० प्रतीदिनप इतकेच राहीले. याबाबत वेळोवेळी विनंती अर्ज करुनही परिस्थितीत बदल झाला नाही.परंतू जानेवारी,२००६ मध्ये आम्ही केलेल्या विनंती अर्जावर दिनांक ४.२२००६ चे सभेत मा.व्यवस्थापन समितीने सकारात्मक निर्णय घेऊन आम्हाला निश्चित मासिक वेतन देऊन संस्थान सेवेत घेण्याबाबत निर्णय घेतला आहे. याबाबत आम्ही मा.व्यवस्थापन समितीचे ऋणी आहोत. परंतू सदर निर्णयास दिनांक ४.३.२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत तूर्त स्थगिती देण्यात आली. तरी आपण आमचे केलेल्या कामाचे स्वरुप जबाबदाऱ्या आजपर्यंत केलेली संस्थानची सेवा, शैक्षणिक पात्रता अनुभव या सर्व बाबींचा विचार करुन आम्हाला निश्चित मासिक वेतन द्यावे" अशी विनंती केलेली आहे.

त्यावर मा.उपाध्यक्ष महोदय यांनी दिनांक ६.७.२००६ रोजीचे सभेत विषय सादर करावा असा अभिप्राय दिलेला आहे.

अर्जदार यांचेबाबत विषय दिनांक ४.२.२००६ रोजीचे सभेत निर्णयासाठी सादर करण्यातयेऊन त्यात निर्णय क्रमांक ९० नुसार सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत संस्थानचे बांधकाम विभागाकडील श्री.अजय शिवराम पांडे व इतर ४ स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधारक यांची दरमहा एकत्रित रुपये ७,०००/- या मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक द्यावी, असा निर्णय घेण्यात आला व सदरचा घेण्यात आलेला निर्णय दिनांक ४.३.२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कायम करणेसाठी सादर करण्यात आल्यानंतर सदर निर्णय क्र.९० तहकूब करण्यात आला होता.

तरी उपरोक्त बांधकाम विभागाकडे कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले श्री.अजय शिवराम पांडे व इतर चार इंजिनिअर्स, तसेच प्रसादालय विभागामध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले श्री.अमृत गंगाधर जगताप यांनाही मेंन्टेनन्स इंजिनिअर म्हणून दरमहा रुपये ७०००/- एकत्रित निश्चित मानधनावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,

यावर सविस्तर चर्चा होऊन, पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ कंत्राटी सेवा झालेल्या सर्वश्री अजय शिवराम पांडे, गिरिष एकनाथ चोळके, मधुकर परशराम गव्हाणे (बांधकाम)व प्रसादालय विभागामध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले श्री.अमृत गंगाधर जगताप यांनाही मेंन्टेनन्स इंजिनिअर यांना दरमहा रुपये ७,०००/- एकत्रित निश्चित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. ९८. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये ए.सी. टेक्नीशियन नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ६२७.** श्री.डांगे गोकुळ रंगनाथ,(प्रासंगिक कर्मचारी ) विद्युत विभाग यांनी दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या अर्जात नमूद केले आहे की, "मी श्रीसाईबाबा संस्थान येथे विद्युत विभागात सन १९९९ पासनू आजपावेतो ए.सी. टेक्निशियन (प्रासंगिक कर्मचारी ) म्हणनू प्रामाणिकपणे काम करत असून त्यांची सदर पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी पास असून त्यानंतर २ वर्षाचा Refrigeration & A/c Mech. आय.टी.आय. हा कोर्स केलेला असून त्यांचे कागदपत्रे सोबत जोडलेले आहेत.

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आवश्यक असणाऱ्या पदांवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे काम चालू आहे. सदर रुग्णालयामध्ये पुर्णपणे सेंट्रल ए.सी. यंत्रणा तसेच इतरही पुर्णपणे ए.सी. यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे. त्या अनुषंगाने श्री साईबाबा हॉस्पीटलच्या स्टाफ पॅटर्नला शासनाने मान्यता दिलेली असल्या कारणाने सदर स्टाफ पॅटर्नमध्ये ए.सी.टेक्निशिया हे पद भरावयाचे शिल्लक आहे.

मी अद्यापपर्यंत संस्थानच्या विविध इमारतींमध्ये अनेक ठिकाणी बसविलेल्या ए.सी.यंत्रणा अतिशय प्रामाणिकपणे मेटेंनन्स ठेवनू विद्युत विभागामार्फत काम करत आहे. तरी आपण उपरोक्त

सुपरस्पेशालिटी रुग्णालयाकडील आवश्यक असलेल्या ए.सी.टेक्निशियन या पदावर माझी नियुक्ती होण्यासाठी योग्य ती कार्यवाही करुन आजपावेतो मी श्री साईबाबांची प्रासंगिक कर्मचारी म्हणून करत असलेल्या सेवेस प्रमाण देऊन सदर पदावर माझी नियुक्ती करावी ", असे अर्जात नमूद केले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणी उदा. साईनिवास नं.१ मिटींग हॉल ( जनसंपर्क कार्यालय ) शेजारी व साईनिवास मिटींग हॉल अतिथीगृह ,मंदीर ,मा.हुजूर साहेब कक्ष,प्र.अधिकारी कक्ष, साईबाबा नविन भक्तनिवासस्थान ,श्री साईबाबा हॉस्पीटल इ.ठिकाणी एअरकंडिशनर बसविलेले आहे.या सर्वाची देखभाल दुरुस्ती ही संस्थानचे विद्युत विभागा अंतर्गत येते.याकामी आवश्यक ते कुशल रोजंदारी कर्मचारी लावणेत आलेले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे नविन आकृतिबंधात ३ व संस्थानचे आकृतिबंधात २ अशी एकुण ५ ए.सी. टेक्निशियन पदे आहेत. याकामी पूर्वीपासनू रोजंदारी कर्मचारी सेवेत आहेत.मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत झालेल्या चर्चेनुसार संस्थानचे विविध विभागात , विविध पदांवर जे कर्मचारी सन २००० चे पूर्वीपासनू कंत्राटी पध्दतीने सेवेत आहेत,त्यांना संस्थान सेवेत कायम घेणेकामी कामगार विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

उपरोक्त अर्जदार श्री गोकुळ रंगनाथ डांगे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. तसेच एकूण ५ टेक्निशिअन्सची आवश्यकता आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील काम मोठया स्वरुपाचे असल्याने तेथील देखभालीसाठी, शासनाकडील रोजंदारी प्रस्तावास तसेच हॉस्पीटल पॅटर्नला मान्यता येईपर्यंत,किमान १ ते २ ए.सी. टेक्निशिअन्स तंत्रज्ञ नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान सेवेत सन २००० पर्यन्त काम केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत सामवून घेणेबाबत निर्णय झालेला आहे त्यावेळेस श्री गोकूळ रंगनाथ डांगे यांचा विचार करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. ९९. श्री.लक्ष्मीकान्त आंबादास चोळके, औद्योगिक प्रशिक्षण संस्थात निदेशक म्हणून नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ६२८.** श्री.लक्ष्मिकांत अंबादास चोळके,मु.पो.अस्तगांव ता.राहाता हे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था,शिर्डी या विभागात गटनिदेशक, म्हणून दि.१२/०५/१९९३ पासून सेवेत होते. त्यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/४४२३ दि.२७/०४/१९९३ चे नेमणून पत्रान्वये असुधारीत वेतनश्रेणी रुपये १६४०-६०-२६००-ईबी-७५-२९०० या वेतनश्रेणीत मुळवेतन रुपये १६४०+ अनुज्ञेय भत्ते दरमहा वेतनावर सहा महिन्याचे परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणूक करणेत आली होती.परिवीक्षाधीन कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक असल्यामुळे त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि.१२/११/१९९३ ते दि.११/०५/१९९५ अखेर वेळोवेळी सहा-सहा महिन्यांनी वाढविण्यात आला होता. तथापी, मुळ व वाढीव परिवीक्षाधीन कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आढळून आलेले नसल्यामुळे श्री.चोळके यांना जा.नं. एसएसएस/वशी-१/४९८८/१९९५ दि.११/०५/१९९५ चे आदेशान्वये संस्थान सेवेतून बडतर्फ करणेत आले. त्यानंतर श्री.चोळके यांनी संस्थान सेवेतून बडतर्फ करणेत आले संदर्भात दि.११/०५/१९९५ रोजीचा आदेश बेकायदेशीर ठरवून व मागील काळातील वेतनासह सेवेत पुर्ववत रुजू करुन घेणेत यावे या मागणीसाठी संस्थान विरुध्द मा.अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण,सोलापुर येथे अपिल क्र.४४/१९९८ दाखल केले होते. सदरचे अपील अतिरिक्त शाळा न्यायाधीरकरण, सोलापूर यांनी दि.०८/०३/१९९९ रोजीचे जज्जमेंट/आदेशान्वये डिसमीस करुन निकाली काढले. मा.अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण,सोलापूर यांनी दि.०८/०३/१९९९ रोजी दिलेला आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा व दरम्यानचे काळात स्थगिती मिळावी या मागणीसाठी श्री.चोळके यांनी संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.३१७१/१९९९ दाखल केलेले आहे. सदरचे रिट पिटीशन मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे प्रलंबीत असून न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.लक्ष्मीकांत अंबादास चोळके यांनी संस्थान सेवेत सामावून घेणे संदर्भात दि.२३/०६/ २००६ रोजीचा अर्ज मा.श्री.विखे सो.,विश्वस्त यांचेकडे सादर केला आहे. सदरचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला असून त्यात त्यांनी " मी संस्थानचे आय.टी.आय.विभागात दि.१२-०५-१९९३ ते दि.११-०५-१९९५ पर्यंत गट निदेशक यापदावर काम केलेले होते. सदर प्रकरण सद्या मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे प्रलंबीत आहे. या प्रकरणाची तडजोड चालू आहे. यापुर्वी मी काम करत असलेले पद सद्या रिक्त नसून पुढे भविष्यात निर्माण होण्याची शक्यता आहे. सद्या अभियांत्रिकी चित्रकला निदेशक हे पद रिक्त आहे. तथापी, तांत्रिक अडचणींमुळे माझे पद निर्माण होईपर्यंत अभियांत्रिकी चित्रकला, निदेशक या पदावर काम करण्यास मी तयार आहे. मात्र गट निदेशक पद निर्माण होताच मला माझे पदावर कायम स्वरुपी घेण्यात येण्याचा हक्क अबाधीत ठेवून मी चित्रकला निदेशक हे पद दिल्यास स्विकारण्यास तयार आहे. सदर पदाची वेतनश्रेणी गट निदेशक या पदापेक्षा कमी असल्याने दरम्यानच्या काळातील वेतनवाढी हिशोबात घेऊन मला वेतन द्यावे. मी मागील काळातील सर्व वेतन तडजोडी अंती सोडून देत आहे. त्यामुळे मला वर मागणी केल्याप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी. याबाबतीत आपण जो निर्णय घ्याल तो मला सर्वस्वी मान्य राहील ही नम्र विनंती " असे म्हटलेले आहे.

श्री.लक्ष्मीकांत अंबादास चोळके यांना इतर कर्मचा-यांसमवेत त्यांचे कोर्ट केस संदर्भात तडजोडी कामी दि.२५/१२/२००४ रोजी उपस्थित राहणे संदर्भात कळविणेत आले होते.त्याप्रमाणे श्री.चोळके दि.२५/१२/२००४ रोजी त्यांचे कोर्ट केस संदर्भात साईनिवास सभागृह येथे उपस्थित राहीले. परंतु त्यावेळी ट्रेनिंग मॅन्युअल व स्टाफिंग पॅटर्न प्रमाणे आय.टी.आय.विभागाकडे गट निदेशक अथवा निदेशक हे पद रिक्त नसल्यामुळे त्यांचे कोर्टकेसचे तडजोडी संदर्भात निर्णय होवू शकला नाही. त्यामुळे श्री.चोळके यांनी पुन्हा दि.२३-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये सद्या गटनिदेशक पद रिक्त नसल्यामुळे व सदरचे पद निर्माण होईपर्यंत सध्या रिक्त असलेल्या अभियांत्रिकी, चित्रकला निदेशक या पदावर काम करणेची त्यांनी तयारी दर्शविली आहे.

सदर प्रकरणासंदर्भात प्राचार्य, आय.टी.आय.विभाग यांचा लेखी अहवाल मागविणेत आला होता. त्याप्रमाणे प्राचार्य, आय.टी.आय.विभाग यांनी दि.०८-०६-२००६ रोजीचा लेखी अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी, " संस्थेत सद्या २० व्यवसाय तुकडया कार्यरत असून सर्व तुकडयांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची कायम संलग्नता आहे. केंद्र शासनाचे ट्रेनिंग मॅन्युअल फॉर आय.टी.आय (२००२ ) मधील धारा ५० (अ )६ नुसार आठ व्यवसाय तुकडयांसाठी एक गटनिदेशक पद ग्राहय ( Admissible ) आहे. सद्या संस्थेमध्ये दोन गटनिदेशक पदे मंजूर असून त्यापदांवर श्री.आर.डी.चौधरी व श्री.डी.एन.जांभूळकर यांची नियुक्ती झालेली असून ते सेवेत कायम आहेत. सद्या संस्थेत अभियांत्रिकी चित्रकला निदेशक हे पद रिक्त असून यापदाच्या अर्हतेपैकी अभियांत्रिकी पदविका ही अर्हता श्री.चोळके यांचेकडे असून यापदावर रुजू करुन घेण्याची तडजोड करावयाची झाल्यास त्याबाबत विचार व्हावा. मात्र श्री.चोळके यांना या पदाची उर्वरीत अर्हता ए.टी.आय किंवा टी.टी.टी.आय.त्यासाठी पुर्ण करावी लागेल " असे म्हटलेले आहे.

श्री.लक्ष्मीकांत अंबादास चोळके यांनी संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिटपिटीशन क्र.३१७१/१९९९ संदर्भात तडजोड करावयाची झाल्यास गटनिदेशक हे पद आय.टी.आय.मध्ये रिक्त नसल्यामुळे सदर पद निर्माण होईपर्यंत श्री.चोळके यांना सद्या रिक्त असलेल्या निदेशक- अभियांत्रिकी चित्रकला या पदावर रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीमध्ये सुरुवातीचे मुळवेतन रु.५५००(अक्षरी रुपये पाच हजार पाचशे) + महागाई वेतन + महागाई भत्ता व इतर अनुज्ञेय भत्ते याप्रमाणे नविन नेमणूक द्यावी लागेल. त्यांचे अर्जात मागणी केल्याप्रमाणे दरम्यानचे काळातील वेतनवाढी हिशोबात घेऊन वेतन देता येणार नाही. श्री.चोळके यांना नेमणूक दिलेनंतर त्यांनी अभियांत्रिकी चित्रकला निदेशक या पदाची उर्वरीत अर्हता ए.टी.आय.किंवा टी.टी.टी.आय.पुर्ण करणे त्यांचेवर बंधनकारक राहील. श्री.चोळके हे मागील कालावधीतील/ भुतकाळातील संस्थान सेवेतील कोणतेही वेतन (बॅकवेजेस), इतर आर्थिक फायदे, रजा,सुट्टया,सानुग्रह अनुदान इत्यादी मिळणेस पात्र राहणार नाहीत. तसेच श्री.चोळके यांना नेमणूकपत्र देणेपुर्वी त्यांनी संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेली व सद्या न्यायप्रविष्ठ असलेली कोर्टकेस/रिटपिटीशन क्र.३१७१/१९९९ विनाअट मा.उच्च न्यायालयातून काढून घेणे (Withdraw करणे ) श्री.चोळके यांचेवर बंधनकारक राहील.

सबब, श्री.लक्ष्मीकांत अंबादास चोळके,माजी गटनिदेशक,आय.टी.आय.विभाग यांचे संस्थान सेवेत सामावून घेणे संदर्भात दि.२३-०६-२००६ रोजीचे अर्जाबाबत मानवतेच्या दृष्टीकोनातून सहानुभुतीपुर्वक विचार होऊन श्री चोळके यांना नविन नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री लक्ष्मीकांत अंबादास चोळके यांना संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेली व सद्या न्यायप्रविष्ठ असलेली कोर्टकेस/रिटपिटीशन क्र.३१७१/१९९९ विनाअट मा.उच्च न्यायालयातून काढून घेणे (Withdraw करणे ) या अटीवर सद्या रिक्त असलेल्या निदेशक- अभियांत्रिकी चित्रकला या पदावर रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीमध्ये सुरुवातीचे मुळवेतन रु.५५००(अक्षरी रुपये पाच हजार पाचशे) + महागाई वेतन + महागाई भत्ता व इतर अनुज्ञेय भत्ते याप्रमाणे नविन नेमणूक देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-कामगार अधिकारी/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १००. श्री निवृत्ती उर्फ सुरेश माधवराव कांगुणे, श्रीरामपूर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. ६२९.** श्री निवृत्ती ऊर्फ सुरेश माधवराव कांगुणे,यांनी दि.२७/१०/२००५ रोजी अर्ज सादर करुन त्यात,"मी दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात वरिष्ठ उपसंपादक म्हणून ९ वर्षे नोकरीस होतो.त्यानंतर माझी मालेगांव येथे बदली झाल्यामुळे मी राजीनामा दिला आहे.मला लिखानाची आवड असून माझे अनेक लेख प्रसिध्द झालेले आहेत काही पुस्तकांचे संपादक म्हणून मी काम केलेले आहे.

तरी मला आपल्या साईबाबा संस्थानतर्फे प्रसिध्द होणाऱ्या " साईलिला " या मासिकात सहाय्यक अथवा कोणतेही काम मिळावे अशी विनंती आहे.आपण मला नोकरी दिल्यास माझा उदारनिर्वाह त्याचबरोबर साईबाबांची सेवाही घडेल.तरी माझ्या अर्जाचा विचार करुन मला नोकरी मिळावी." अशी विनंती केलेली आहे.

**श्री कांगुणे यांची वैयक्तीक माहिती व शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे**

नांव :- श्री निवृत्ती ऊर्फ सुरेश माधवराव कांगुणे
जन्मतारीख :- २७/०९/१९६२.
शिक्षण :- १० वी नापास ( शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन )

अर्जासोबत दैनिक सार्वमत मध्ये वरिष्ठ उपसंपादक म्हणून १९९१ ते २००० पर्यंत काम केल्याचे श्री देशमुख,संपादक सार्वमत यांचे शिफारस पत्र जोडलेले आहे श्री साईलिला मासिक मुंबई कार्यालय शिर्डी येथे स्थलातरीत करण्याचे ठरले आहे.या कार्यालयात श्री कांगुणे यांना त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार काम देता येईल.

तरी श्री कांगुणे यांचे शैक्षणिक पात्रता व कामाबाबतचा इतर अनुभव विचारात घेवून त्यांना प्रतिमहा रु.३०००/- एकत्रीत मानधनावर प्रथमत: सहा महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०१. श्री रामराव शेळके व इतर यांचे वेतनश्रेणीबाबत**

**निर्णय क्र. ६३०.** श्री रामराव शेळके व इतर यांचे वेतनश्रेणीबाबत उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०२. अ) प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी व जीव रसायन शास्त्रज्ञ या पदनामाबाबत.**
**ब) श्री.आर.डी.चौधरी यांना जादा पाच वेतनवाढी मजूंर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६३१.** श्री सुभाष रंगनाथ भागवत, प्रयोग शाळा तंत्रज्ञ ,श्री साईनाथ रुग्णालय व श्री आर.डी चौधरी, (माजी प्र.प्राचार्य) ,श्री साईबाबा औद्योगीक प्रशिक्षण संस्था,शिरडी यांना जादा वेतनवाढी मंजूरीबाबत उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०३. श्री.सुरेंद्रकुमार पांडे, अकौटंट श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.६३२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/ वशी-०१/२२८९/२००६ दि.१७/०२/२००६ अन्वये श्री सुरेंद्रकुमार पांडे यांची एकत्रीत रु.५,०००/- मात्रचे मानधनावर सहा महिन्यांकरीता अकौटंट या पदावर श्री साईबाबा हॉस्पीटलकडे तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०४/११/२००५ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

त्यांची सदरची मुदत दि.०३/०५/२००६ अखेर संपुष्टात आलेली असल्याने त्यांच्या मुदतवाढीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०६/२००६ रोजीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७३२/२००६ दि.२६/०६/२००६ अन्वये त्यांना दि.१७/०२/२००६ रोजी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीच्या अधीन राहून त्यांच्या तात्पुरत्या नेमणूकीची मुदत दि.०४/०५/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी (दि.०३/११/२००६ अखेर ) वाढविण्यात आलेली आहे.

मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सो.यांनी श्री पांडे यांना वेतनश्रेणी दवून त्यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कायम स्वरुपी नेमणूक करणेबाबत सूचविलेले आहे.

मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या श्री साईबाबा हॉस्पीटल सेवक आकृतीबंधामध्ये लिपीक वर्गीय स्टाफ या शिर्षकाखाली वित्त Finance लेखा Accountants या पदासाठी रु.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी नमूद केलेली आहे.

श्री.पांडे यांना यापूर्वी रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीमध्ये एकत्रीत मानधन रु.५,०००/- देवून त्यांची श्री साईबाबा रुग्णालयाकडे लेखापाल या पदावर सहा महिन्यांसाठी नेमणूक केलेली आहे.सदरची मुदत संपल्यानंतर त्यांची मुदत सहा महिन्यांसाठी आहे त्याच मानधनावर वाढविण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त मा.विश्वस्त पी.एल.तिवारी सो.यांचे अभिप्रायानुसार वजा सूचनेनुसार श्री पांडे यांना रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीमध्ये शासन मान्यतेच्या अधीन राहून मान्यता येईपर्यंत इतरांचे प्रमाणेच एकत्रीत मानधन रु.५,०००/- देवून त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कायम स्वरुपी नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०४. कु.मृणालिनी मिलींद गायकवाड यांची पॅथोलॉजी टेक्निशियन म्हणून तसेच श्री.अनिल जनार्दन गायकवाड यांच्या नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.६३३.** वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी त्यांचे दि.०४/०७/२००६ रोजीचे टिपणीत मा.विश्वस्त तिवारी सो.यांनी दूरध्वनीवरुन खालील प्रमाणे कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.

**अ.** श्री अनिल गायकवाड यांना त्वरीत कॅथ लॅब ओ.टी.मध्ये ई.सी.जी.ऑपरेटर किंवा वार्डबॉय म्हणून कामावर रुजू करुन घ्यावे असे समक्ष तोंडी आदेश देवून त्यांची मुलाखत त्यांनी बॉम्बे हॉस्पीटल येथे घेतली असलेचे सांगितल्याने त्यांना दि.०६/०५/२००६ पासून कॅथलॅब ओ.टी.मध्ये वार्डबॉय काम देणे सुरु केले आहे.

**ब.** कु.मृणालिनी गायकवाड यांनाही मा.विश्वस्त डॉ.पि.एल.तिवारी यांनी स्वतःचे लेटरहेडवर सादर उमेदवारांस पॅथालॉजी टेक्निशियन म्हणून नियुक्ती करावी.असे कळवून कामावर हजर करुन घेण्याचे ओदश दिल्याने त्यांना दि.२३/०५/२००६ पासून प्रयोगशाळा विभागात कामावर रुजू करुन घेतले आहे.

**अर्जदार अ) श्री अनिल जनार्दन गायकवाड,यांची वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे**

पत्ता :- सम्राट अशोकनगर,बारोला गोवंडी,प्रेरणामित्रता मंडळ,मुंबई

जन्मतारीख :- ३०/०६/१९९७७ ,

शिक्षण :- एच.एस.सी.ॲपीअर, डिप्लोमा इन एक्स-रे ॲन्ड इ.सी.जी टेक्नॉलॉजी.

अनुभव :- ०१) एक वर्षे ओजास्मित एन्टरप्रायझेस मध्ये सुपरवायझर म्हणून दिनांक ०१/०१/१९९८ ते ३१/१२/१९९९ डॉ.अभय पॉलीटेक्निकल,दिनांक ०३/०१/२००० पासून एप्रिल २००६ पर्यंत डॉ.अनिल कुमार बॉम्बे हॉस्पीटल यांचेकडे शिपाई.

**ब) कु.मृणालिनी मिलींद गायकवाड,यांची वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे**

पत्ता :- मु.पो.गोरेगांव तालुका मानगांव जि.रायगड

जन्मतारीख :- ०७/०६/१९९८३.

शिक्षण :- एच.एस.सी.डी.एम.एल.टी.

अनुभव :- ०१) श्रुती पॅथॉलॉजीकल लॅब पुणे येथे दि.०१/०७/२००४ ते दि.३१/१२/२००४ अखेर टेक्निशियन म्हणून ०२) विकास पॅथालॉजीकल लॅब लोणेरे येथे टेक्निशियन

माहितीसाठी तथा पुढील योग्य त्या मार्गदर्शनास्तव सविनय सादर,असे वैद्यकिय संचालक यांनी दि.०१/०६/२००६ रोजी कळविले आहे.

अं.नं. **अ-** मधील श्री अनिल गायकवाड हे आजही सदर हॉस्पीटलचे कॅथ लॅब मध्ये वार्डबॉय म्हणून कामावर आहेत.

**ब** मधील कु.मृणालिनी गायकवाड ह्या सध्या श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळेत काम करीत आहेत.

तरी " **अ** " व " **ब** " यांचे बाबतीत मर्जीनुरुप पुढील आदेश व्हावेत ही विनंती.असे कळविले आहे.

यापूर्वी ई.सी.जी.टेक्निशियन व लॅब टेक्निशियन या पदासाठी जाहीरात देऊन मुलाखत घेऊन पात्र उमेदवारांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे आकृतीबंधानुसार रिक्त जागा नाही. करीता सदर पदावर श्री अनिल गायकवाड यांची नेमणूक करणे अडचणीचे आहे.तसेच वार्डबॉय म्हणून नेमणूक करावायाची झाल्यास एकटयाची नेमणूक करणे अडचणीचे आहे.तथापि साईनाथ रुग्णालयात क्ष-किरण परिचर पद रिक्त आहेत.या पदावर श्री गायकवाड यांची विहीत पध्दतीने रु.२५५०-३२०० या वेतनश्रेणीमध्ये यापूर्वी नेमणूका करण्यात आलेल्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार मानधन देवून नेमणूक करणेबाबत विचार करता येईल.

तसेच,लॅब टेक्निशियन पदासाठी बी.एस्सी.डी.एम.एल.टी.,शैक्षणिक अर्हता व नामांकित विद्यापिठाचा डिप्लोमा व ३०० खाटांचा हॉस्पीटलमधील ०५ वर्षांचा अनुभव अशी जाहीरातीत पात्रता दर्शविलेली होती.

कु.मृणालिनी गायकवाड यांची शैक्षणिक पात्रता बी.एस्सी.नसून, फक्त इयत्ता १२ वी आहे. त्यांना विहीत पध्दतीने श्री साईनाथ रुग्णालयाकडे लॅब असिस्टंट या पदावर रु.२५५०-३२०० या वेतनश्रेणीमध्ये यापूर्वी नेमणूका करण्यात आलेल्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार एकत्रीत मानधन देवून नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१. श्री सुरेश तान्हाजी हुसळे यांची व्याजाची सवलत पुनःश्च सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.६३४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२. संस्थानकडे उपलब्ध असलेल्या शुध्द सोने व चांदीपासून भक्तांना नाणी /लॉकेटस उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.६३५.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्तांकडून देणगीरुपाने सोने-चांदीचे अलंकार, वस्तू अर्पण केल्या जातात. तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाचे दिनांक २१ जुलै, २००१ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ३३८ अन्वये देणगीव्दारे प्राप्त झालेले सोने-चांदी वस्तु अलंकार वितळविणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. देणगीरुपाने प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तू अलंकारांपैकी अगदी अपवादात्मक अशा अत्युत्कृष्ट कलाकुसरीच्या व सदैव जतन करुन ठेवण्या योग्यच अशा वस्तू बाजूला काढून इतर वस्तू अलंकार वितळविणेसाठी रिफायनरीत नेण्यात येत असत. वितळविण्यात आलेल्या अशुध्द धातूंच्या (

Sample After Melting) प्रत्येक लगडीचे शुध्दतेची तपासणी इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेडून प्रमाणित करुन घेण्यात येत असे. शुध्दीकरणानंतरच्या ९९% शुध्द लगडीपासून वेळोवेळी आवश्यकते नुसार, मा. विश्वस्त मंडळाचे मान्यतेने, श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५,१० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येत होती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर सोने-चांदी वस्तूं अलंकाराचा जाहीर लिलाव करवा, व उर्वरीत वस्तु वितळविणे या कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे शासनाची स्थायी मा-न्यताकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांनी पत्र क्रमांक सासंवि २००५ / ४०७ /(६४) का.सोळा दिनांक ११ आक्टोबर, २००५ अन्वये, वस्तु-अलंकारांचे शासन मान्यताप्राप्त परवानाधारक अधिका-यांकडून मूल्याकन केले किंवा कसे ? तसेच वस्तु-अलंकारांची (Off-Set Value) ठरविण्यात आली आहे काय ? याबाबत विचारणा केलेली आहे. उपरोक्त पत्रानुसार नासिक व पुणे येथील प्रत्येकी दोन शासनमान्य मुल्यांकनकारांची निवड करण्यात आलेली असून सर्व सोने-चांदी वस्तु , खडे अलंकारांचे मुल्यांकन (Off-Set Value) ठरविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे मुल्यांकन (Off-Set Value ) करण्याची कार्यवाहीस दोन-तीन महीने कालावधी लागणार आहे. पंरतु अनेक साईभक्त प्रत्यक्ष तसेच फोन वरुन नाणी विक्री संदर्भात चौकशी / मागणी करीत आहे.

(अ) संस्थानकडे सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, दादर येथील लॉकरमध्ये ६,६८०.०० ग्रॅम व शिरडी येथील स्ट्रॉगरुम मध्ये २,४६१.४०० ग्रॅम असे एकुण ९,१४१.४०० ग्रॅम शुध्द ९९ % सोने शिल्लक आहे.

(ब) सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, दादर येथील लॉकरमध्ये एकुण १३६,६३२.००० ग्रॅम शुध्द ९९ % चांदी शिल्लक आहे. यापुर्वी शुध्द चांदीपासुन २० ग्रॅम वजनाची नाणी उपलब्ध करुन देण्यात आलेली होती व त्यास साईभक्तांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळलेला होता.

तरी या उपलब्ध असलेल्या शुध्द ९९% सोने व चांदी पासुन मे. नॅशनल रिफायनरी प्रा.लि.मुंबई यांचे कडून पुर्वीप्रमाणे मजुरीचे दर (डबीसह) घेऊन सोन्याची नाणी (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) तसेच चांदीची (२० ग्रॅम) वजनाची नाणी तयार करुन भक्तांना उपलब्ध करुन घेता येतील. तसेच तयार झालेली नाणी / लॉकेट चे मुल्य वेळोवेळी बाजारभावातील होणा-या चढ-उतारानुसार विक्री करुन या विषयीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी नियमितपणे सादर करण्यात येईल.

तरी शिल्लक असलेल्या शुध्द सोने वजन एकुण ९,१४१.४०० ग्रॅम व चांदी शुध्द वजन एकुण १३६६३२.००० ग्रॅम ची नाणी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे भक्तांना उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत गव्हर्नमेंट मिंटचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते, त्यांनी तयार केलेली नाणी सभेस दाखविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तप्रमाणे शिल्लक सोने राखून ठेवावे. गव्हर्नमेंट मिंट कडून आवश्यकतेनुसार नाणी तयार करुन घेण्यात यावी असे मा.अध्यक्ष महोदय व मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांनी सुचित केले. तथापि सोने विकत घेणेसाठी आयकर कायदा १९६१ च्या कलम १०(२३)(सी) खाली संस्थानला मिळणाऱ्या सवलतीस बाधा येऊ नये म्हणून श्री एस.एस.गणपूले, संस्थान आयकर सल्लागार, मुंबई यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. माहे ऑगस्ट-सप्टेंबर,२००६ अखेर उपलब्ध रकमांच्या गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे**

**निर्णय क्र.६३६.** माहे ऑगस्ट- सप्टेंबर,२००६ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | युनियन बॅंक ऑफ इंडिया, राहाता | ०५/०९/२००६ | १,४९,४५,२२७.०० |
| ०२. | स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर, | ०८/०९/२००६ | १,१९,५६,१८२.०० |
| ०३. | पंजाब नॅशनल बॅंक, अहमदनगर | ०८/०९/२००६ | २९,७२,२८५.०० |
| ०४. | पंजाब नॅशनल बॅंक, अहमदनगर | ०८/०९/२००६ | १८,०७०.०० |
| ०५. | आयसीआयसीआय बॅंक, नासिक | ०९/०९/२००६ | १,७०,०६,७०४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १३/०९/२००६ | १,०७,२३,७९०.०० |
| ०७. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २०/०९/२००६ | ८२,४६,४७६.०० |
| ०८. | देना बँक, गुहा | २६/०९/२००६ | १,५०,५५,०००.०० |
| ०९. | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | २७/०९/२००६ | २३,७३,६२७.०० |
| १० | बँक ऑफ बरोडा, नासिक ( F/Ex) | २९/०९/२००६ | १,०८,००,००२.०० |
| ११. | किसान विकास पत्र, कोपरगांव | ३०/०९/२००६ | ५०,००,०००.०० |
| १२. | माहे ऑगस्ट,२००६ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | २,००,००,०००.०० |
| १३ | माहे सप्टेबर,२००६ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | २,००,००,०००.०० |
| | | **एकूण :-** | **१३,९०,९७,३६३.००** |

उपरोक्त तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. १४** कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. सध्या कुठल्याही राष्ट्रीयीकृत बँकेपेक्षा आर.बी.आय.बॉण्डस् वरील व्याजदर हा (८.००%) अधिक आहे. अद्यापपर्यंत या बॉण्डस् मध्ये रु.१०२/-कोटींची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. संस्थानला स्थानिक (शिर्डी, राहाता, कोपरगांव, श्रीरामपूर) व नासिक येथील राष्ट्रीयीकृत बँकेकडून मोठया प्रमाणावरील आवश्यकतेनुसार सेवा मिळत आहे. गुंतवणूकीसाठी उपलब्ध असलेल्या रकमेची गुंतवणूक ही अशा सेवा देणा-या बँकांकडे झाल्यास संस्थानला पुढील कालावधीत चांगल्या प्रकारच्या सेवा त्यांचेकडून मिळत राहतील.

अ.नं. १,२,७,९, व १० यांचेकडे गुंतविण्यात आलेल्या रकमेची मुदत उपरोक्तप्रमाणे तपशीलात नमुद केलेल्या तारखेस पूर्ण होत आहे. या बँकांकडे त्यांचेकडील जास्तीतजास्त व्याजदराने पूनर्गुंतवणूक करावी असे नम्र मत आहे. त्यामुळे संस्थानला अधिक चांगल्या प्रकारे सेवा त्यांच्याकडून प्राप्त होतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. १४ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपरोक्तप्रमाणे प्राप्त होणारी रक्कम पुनर्गंतवणूक करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०४.** **मौजे नांदुर्खी बु ।। ता.राहाता येथील गावच्या मालकीची ४२ एकर जमीन विनामुल्य संस्थाना देणे बाबत.**
**निर्णय क्र.६३७.** मा.आ.राधाकृष्ण विखे पा., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक १९०८/८५/२००६, दिनांक ११ जून, २००६ रोजीच्या पत्राने मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील ग्रामस्थांच्या वतीने श्री. अर्जुनराव विष्णु चौधरी व इतर ११ ग्रामस्थांनी सदर जमिनी संस्थानकडे हस्तांतरीत करणेबाबत विनंती केली आहे, असे कळविले आहे.

मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील जमिनीचे ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | गट नंबर | मालकाचे नांव | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | आकार रुपये पैसे | इतर हक्क व पिक पहाणी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३३१ | समस्त गांवकरी | १३-७६-००<br>००-६०-०० पोख<br>१४-३६-०० | २१=३५ | इतर हक्कात पुर्नवसन कायदा लागू.<br>पिक पहाणीत समस्त गांवकरी<br>कळवड १०-०० बाजरी २-००<br>मका ०-५० तळेपड १-२६ |
| ०२ | ४४६ | समस्त गांवकरी | ०२-७२-००<br>००-७९-०० पोख<br>०३-५१-०० | ०२=५० | इतर हक्कात काही नाही.<br>पिक पहाणीत समस्त गांवकरी<br>तळेपड २-७२ |
| ०३ | ४२७ | समस्त गांवकरी | ००-४२-००<br>००-०६-०० पोख<br>००-४८-०० | ०=४५ | इतर हक्कात पुर्नवसन कायदा लागू<br>पिक पहाणीत समस्त गांवकरी<br>पडीत ०-४२ |

एकुण १६ हेक्टर ९० आर ०० चौमी
०१ हेक्टर ४५ आर ०० चौमी पोटखराबा
**१८ हेक्टर ३५ आर ०० चौमी**

वर नमुद केलेल्या जमिनीबाबत खालीलप्रमाणे इतर हक्कात व पिक पहाणीस उल्लेख आहे :
०१. गट नंबर ३३१ व ४२७ च्या इतर हक्कांत " पुर्नवसन कायदा लागू " असा शेरा आहे. याचा अर्थ सदरची जमीन प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांच्या पुर्नवसनासाठी राखीव आहे. त्यामुळे या दोन्हीही जमीन घेता येणार नाही.
०२. गट नंबर ४४६ च्या पिक पहाणीमध्ये " तळेपड ०२ हे ७२ आर " असा उल्लेख आहे. याचा अर्थ त्या ठिकाणी तळे (पाझर तलाव) आहे. त्यामुळे ही जमीन घेता येणार नाही.

मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील जमिनीबाबत उपरोक्त वस्तुस्थिती असल्याने ह्या तिन्हीही जमीनी सकृतदर्शनी घेता येणार नाही. याबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन अशी परवानगी मिळाली तर उपरोक्त तिन्हीही जमीनी संस्थानला घेता येतील.

तरी मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील समस्त गांवकरी यांच्या मालकीची गट नंबर ३३१ क्षेत्र १४ हे ३६ आर, गट नंबर ४४६ क्षेत्र ०३ हे ५१ आर व गट नंबर ४२७ क्षेत्र ०० हे ४८ आर या जमीनी संस्थानच्या शैक्षणिक संकुलासाठी, साईभक्तांच्या मुलभूत सेवा-सुविधा तसेच विविध लोकोपयोगी कामांचे बांधकामासाठी मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेशी मा. कार्यकारी अधिकारी यांनी पत्रव्यवहार करावा. अशी परवानगी मिळालेनंतर उपरोक्त जमीनी विनामुल्य संस्थानला स्वीकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. जमीन मोजणी व सर्वेक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन यंत्र खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.६३८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६. मुंबई शिर्डी पालखी रस्त्याबाबत.**

**निर्णय क्र.६३९.** मुंबई येथून मोठ्या प्रमाणात पदयात्री पायी शिर्डीस श्री साईबाबांचे दर्शनासाठी येतात. त्यांचेकरीता पालखीमार्ग बनविणेसाठी दिनांक १०.०४.२००६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.मंत्री (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली मा.मंत्री,सा.बां.(सा.उ.) यांच्या उपस्थितीत मुंबई-शिर्डी पालखी मार्ग या विषयाबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

सदर बैठकीस खालील पदाधिकारी/ अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री.जयंतराव ससाणे, विधानसभा सदस्य
२. मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विधानसभा सदस्य
३. मा.भा.रा.वाक्चौरे, कार्यकारी अधिकारी,शिर्डी संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
४. मा.व्ही.बी.बोरगे,सचिव (रस्ते),सा.बां.विभाग, मंत्रालय
५. श्री.डी.जी.मराठे,सचिव (बांधकामे),सा.बां.विभाग, मंत्रालय
६. श्री.डी.व्ही.धवड, मुख्य अभियंता,सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक
७. श्री.पी.डी.ममदापुरे,उपसचिव (खा.र.१),सा.बां.विभाग, मंत्रालय
८. श्री.ना.वा.मेढेकर,अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, ठाणे
९. श्री.अ.रो.बनसोडे,अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ,अहमदनगर
१०. श्री.सु.म.लोलगे,कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,नाशिक
११. श्री.रा.सा.राहणे,कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,संगमनेर
१२. श्री.एफ.पी.विधाते,कार्यकारी अभियंता,म.रा.र.वि.महामंडळ,नाशिक
१३. श्री.आर.बी.आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता, शिर्डी संस्थान, शिर्डी

सर्व प्रथम मा.मंत्री (सा.बां.),मा.श्री.जयंतराव ससाणे व मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुंबईहून दरवर्षी असंख्य साईभक्त नेमाने शिर्डी येथे पायी जात असतात. सर्व भाविकांच्या सुरक्षिततेकरीता व सुविधेकरीता रस्त्याच्या बाजुने स्वतंत्र मार्गिकेची आवश्यकता असल्याचे सांगितले व त्यामुळे भाविकांना व महामार्गावरील वाहतुकीची कोणतीही अडचण होणार नाही. तसेच सा.बां.विभागाने पूर्वी भाविकांच्या सोयीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला अशाप्रकारचे पालखी मार्ग बांधलेले असल्याचे उपस्थितांचे निदर्शनास आणले.

शिर्डीला जाणाऱ्या भाविकांसोबत त्यांना साहित्य पूरवठा करण्यासाठी लहान गाड्याही असतात. म्हणून या गाड्या जाऊ शकतील असा ४.०० मीटर रुंदीचा कर्ब स्टोन लावून मूळ रस्त्यापासून पूर्णतः वेगळा दिसणार असा मार्ग बांधण्याचे सूचविले व याकरीता शिर्डी संस्थान आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देईल असे मा.श्री.जयंतराव ससाणे यांनी स्पष्ट केले.

या तरतुदीचा सी.आर.एफ.मधून प्रस्तावित करावयाच्या सिन्नर ते शिर्डी या रस्त्याच्या कामाच्या अंदाजपत्रकात समावेश करणे शक्य आहे का अशी मा.मंत्री (सा.बां.) यांनी विचारणा केली असता, सदर प्रस्तावित काम सी.आर.एफ.च्या मानकाप्रमाणे नसल्याने सी.आर.एफ. अंतर्गत प्रस्तावित अंदाजपत्रकात त्याचा समावेश करता येणार नाही असे सचिव (बांधकामे ) यांनी स्पष्ट केले.

याबाबत मुख्य अभियंता,सा.बां.प्रा.विभाग,नाशिक यांनी तयार केलेला प्रस्तावाबाबत माहिती दिली. यात मुख्य रस्त्याच्या एका बाजूस चार मीटर रुंदीची स्वतंत्र मार्गिका तयार करण्याचे प्रस्तावित होते व त्याचा पृष्ठभागाकरीता दोन पर्याय सुचविण्यात आले होते. एक मुरमी पृष्ठभाग व दुसरा डांबरी पुष्ठभाग तसेच याकारीता संभाव्य खर्च अनुक्रमे रु. ९.०० लक्ष प्रती कि.मी. व रु. १५.०० लक्ष प्रती कि.मी.येईल.असे मुख्य अभियंता,नाशिक यांनी निदर्शनास आणले तसेच यामध्ये दर १० कि.मी. अंतरावर पाण्याच्या सोईसाठी बोरअवेल व दर २० कि.मी. अंतरावर विश्रांती करण्याकरीता बांधकाम करण्याची तरतूद समाविष्ट असल्याचे सांगितले.

पायी चालणाऱ्या भाविकांसाठी कोणत्या प्रकारचा रस्त्याचा पृष्ठभाग असावा याबाबत अधिक चर्चा झ ाली असता मा.मंत्री,सा.बां,(सा.उ.) यांनी मुरमाचा पृष्ठभाग ठेवल्यास दरवर्षी तो खराब होईल व त्यामुळे त्याची दरवर्षी दुरुस्ती करावी लागेल हे स्पष्ट केले. तसेच चर्चेच्या दरम्यान इतर पर्यायी पृष्ठभागाबाबत चर्चा झाली असता कॉंक्रीटचा पृष्ठभाग व पेव्हरब्लॉक पृष्ठभाग हे दोन पर्याय उपलब्ध असल्याचे मा.मंत्री (सा.बां.) यांनी सुचित केले.

मा.मंत्री (सा.बां.) यांनी याकरीता उपलब्ध असलेल्या पर्यायांचा आर्थिक अंदाज अजमावण्यासाठी खालील प्रकारच्या चार पर्यायांकरीता प्रती कि.मी.चे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना मुख्य अभियंता,सा.बां.प्रादेशिक विभाग,नाशिक यांना दिल्या.

०१) कॉंक्रीट पृष्ठभाग
०२) कॉंक्रीट पेव्हरब्लॉकचा पृष्ठभाग
०३) डांबरी पृष्ठभाग
०४) मुरुमी पृष्ठभाग

सचिव (बांधकामे ) यांनी मुंबई ते घोटी हा रस्ता रा.म.क्र.३ असून सध्या N.H.A.I.मार्फत त्याचे चौपदरीकरणाचे काम चालू असल्याने त्यालगत पालखी मार्गाची सुविधा बांधणे शक्य नसल्याचे तसेच सिन्नर ते घोटी या रस्त्याचे काम म.रा.र.वि. महामंडळामार्फत सध्या प्रगतीपथावर असलेले काम जवळजवळ पुर्णत्वाच्या मार्गावर असल्यामुळे रस्त्याच्या एवढ्या लांबीत पालखी मार्गाची व इतर प्रस्तावित सोईसुविधा उपलब्ध करुन देणे शक्य आहे असे स्पष्ट केले.

शेवटी मा.मंत्री (सा.बां.) यांनी सी.आर.एफ मधून करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे व वर उल्लेख केल्याप्रमाणे चार प्रकारच्या पृष्ठभागाचे अंदाजपत्रक तयार करुन ते शिर्डी संस्थान यांचेकडे पाठविण्याच्या सूचना दिल्या. तसेच या पालखी मार्गाची काही कामे अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात यावीत अशा सूचना दिल्या.

यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी जा.क्र./प्रशा-४/९७४२/२००६ दि.०२/०८/२००६ अन्वये पालखी मार्गाचे पृष्ठभाग करण्याचे प्रति कि.मी. येणाऱ्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे दरपृथ्थकरण दिलेले आहे. त्यानुसार ठाणे ते शिर्डी यामार्गाकरीता अंदाजे खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **प्रस्तावित पृष्ठभाग** | **प्रती किमी. अंदाजीत किमंत रु.** | **शिर्डी ते ठाण्यापर्यंत २५० किमी. साठी येणारा खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | कॉंक्रिट पृष्ठभाग | २२.०० लक्ष / किमी. | ५५.०० कोटी |
| ०२ | कॉंक्रिट पेव्हरब्लॉकचा पृष्ठभागासाठी | २८.७५ लक्ष / किमी | ७१.८७५ कोटी |
| ०३ | डांबरी पृष्ठभाग | १५.०० लक्ष / किमी | ३७.५० कोटी |
| ०४ | मुरुमी पृष्ठभाग | ९.०० लक्ष / किमी | २२.५० कोटी |

तरी मुंबई ते शिर्डी पालखी मार्ग तयार करणेसाठी उपरोक्त पर्यायापैकी एका पर्यायानुसार पालखी मार्ग तयार करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पहिल्या टप्प्यात ५० कि.मी. पालखी मार्गाचे काम हाती घेण्यात यावे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर काम करण्यात यावे त्यासाठी आवश्यक निधी, करारनामा करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावा. याकमी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०७. विविध ठिकाणी साई भक्तांच्या सोयीसाठी स्वागत कमान उभारणे बाबत.**

**निर्णय क्र.६४०.** सदरहू विषयाबाबत वर निर्णय क्र.५४७ मध्ये चर्चा झालेली आहे.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०८. श्री वेणूनाथ सुर्यभान गोंदकर,शिडी यांची सर्व्हे नं. १४७/१ व सर्व्हे नं. १४७/२ एकूण क्षेत्र १ हेक्टर १८ आर जमीन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.६४१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०९. श्री जगन्नाथ सुर्यभान गोंदकर,शिर्डी यांची सर्व्हे नं. १४७/३ क्षेत्र ०० हेक्टर ४२ आर जमीन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.६४२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १०. मशिनरी /उपकरणे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.६४३.** श्री साईबाबा रुग्णालय हे दिनांक १५.५.२००६ पासून कार्यान्वीत झालेले आहे. रुग्णालयात आतापर्यन्त खरेदी केलेली मशिनरी, उपकरणे फर्निचर हे सर्व ऑपरेशन थिएटर्स, वॉर्ड इत्यादी ठिकाणी देण्यात आलेले आहेत. परंतू प्रत्यक्षात कामकाज चालू झाल्यानंतर बऱ्याचशा मशिनरी/उपकरणांची अजून आवश्यकता लागणार आहेत. त्यामूळे सर्व वॉर्ड व ऑपरेशन थिएटर्सची मागणी एकत्रित तयार करुन यादी तयार करण्यात येऊन सदरची यादी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांना दाखवून मान्य करुन घेण्यात आली आहे. या यादीनुसार सदरहू मशिनरी,उपकरणे,फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये

९९,६२,५००.०० खर्च अपेक्षित असून सदरहू खरेदी विहती पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. अहमदनगर जिल्हा परिषद यांना पुरग्रस्त गावात साथीचे आजार पसरु नये म्हणून साथ रोग नियंत्रणासाठी औषधाची मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.६४४.** अहमदनगर जिल्हा परिषद अहमदनगर यांनी त्याचे दि.१२/०८/२००६ चे पत्रान्वये माहे ऑगस्ट महिन्याचे प्रथम सप्ताहामध्ये राज्यात व जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात पाऊस पडलेला आहे. अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर , राहाता , कोपरगांव , श्रीरामपुर, नेवासा, शेवगांव , कर्जत , श्रीगोंदा व राहुरी या नऊ तालुक्यामध्ये गोदावरी , प्रवरा, भिमा व मुळा या नद्यांना अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे पुरपरिस्थिती निर्माण झालेली आहे. पुर ओसरल्या नंतर लगेचच या पुरग्रस्त भागामध्ये जलजन्य आजाराच्या व त्यानंतर किटकजन्य आजाराच्या साथी उदभवु शकतात. या साथींचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून खालील प्रमाणे औषधांची संस्थानकडे मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Drug | Rate | Unit | Qty. | Amount | Firm | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | A.S.V.S. | 296.40 | Per Vial | 2000 | 592800.00 | HBPCL | Govt. |
| 2 | Inj.Ceftriazone 250mg | 9.50 | Per Vial | 6000 | 57000.00 | Alkem Lab | DMER |
| 3 | Inj. Cefurozime 250mg | 23.00 | Per Vial | 2000 | 46000.00 | --,,-- | --,,-- |
| 4 | inj.Gentamycin 80mg /2ml | 04.73 | Per Vial | 10000 | 47300.00 | KAPL | Govt. |
| 5 | Inj.B Complex | 5.89 | Per Vial | 20000 | 117800.00 | --,,-- | --,,-- |
| 6 | Inj.Paracetamol | 1.20 | Per Amp. | 20000 | 24000.00 | Hasseb Pha. | DMER |
| 7 | Inj.Zintac | 1.10 | Per Amp. | 20000 | 22000.00 | --,,-- | --,,-- |
| 8 | Inj.Cefotaxim 500mg | 18.38 | Per Vial | 20000 | 367600.00 | KAPL | Govt. |
| 9 | Cap.Ampicillin 250mg | 661.00 | per 1000 cap | 200000 | 132200.00 | Zim Lab | --,,-- |
| 10 | Cap.Amoxycillim 250mg | 830.16 | per 1000 cap | 200000 | 166032.00 | Noble Drugs | --,,-- |
| 11 | Cap.Tetracyclline 250mg | 359.00 | per 1000 cap | 500000 | 179500.00 | Ajanta Phar. | --,,-- |
| 12 | Cap.Cephadroxyl 250mg | 116.00 | per 10 x 10 | 100000. | 116000.00 | Lincoln Phar | --,,-- |
| 13 | Cap.Cephelaxine 250mg | 74.00 | per 10 x 4 cap | 100000 | 185000.00 | Hindustan Antibiotic | Govt. |
| 14 | Cap.Omeperazole 20mg | 40.00 | per 10 x 10 | 100000 | 40000.00 | Ajanta Pharm | DMER |
| 15 | Cap.Doxycycline 100mg | 4.00 | per 5 Cap. | 200000 | 160000.00 | Micron Phar | --,,-- |
| 16 | Tab.Norflox 400mg | 139.20 | per 10 x 10 | 100000 | 139200.00 | Lincolin Phar | --,,-- |
| 17 | Tab Furazolodine 100 mg | 64.62 | per 1000 | 1000000 | 64620.00 | HAPL | Govt. |
| 18 | Tab Ibuprofen + Para | 20.80 | per 10 | 100000 | 208000.00 | RDPL | ESIS |
| 19 | Tab Norflox + TZ | 20.80 | per 10 | 100000 | 208000.00 | RDPL/KAPL | ESIS |
| 20 | Tab Ciprofloxacin 500mg | 158.00 | per 10 * 10 | 100000 | 158000.00 | Micron Phar | DMER |
| 21 | Tab Gatifloxcin 400mg | 15.37 | per 5 tab | 50000 | 153712.00 | Ajanta pharm | ESIS |
| 22 | Tab Dicyclomine 10 mg | 44.44 | per 1000 tab | 100000 | 44440.00 | HAPL | Govt. |
| 23 | Tab Nimusilide 100mg | 128.35 | per 10 x 10 | 200000 | 256700.00 | KAPL | Govt |
| 24 | Tab Citrizine 20 mg | 20.18 | per 10 x 10 | 500000 | 100900.00 | Hab Pharm | DMER |
| 25 | Tab Metronidazole 400mg | 4.25 | per 10 Tab. | 300000 | 127500.00 | ODCL | ESIS |
| 26 | Tab Ofloxacin | 3.36 | per 4 tab | 50000 | 42000.00 | Zim Lab | ESIS |
| 27 | Co-Trimoxazole Sup | 7.96 | per 50 ml btl | 10000 btl | 79600.00 | KAPL | ESIS |
| 28 | Furazolodine Sup | 6.21 | per 60 ml | 20000 | 124200.00 | Hindu. Lab. | DMER |
| 29 | Amoxycilline Sup. | 15.60 | per 60ml | 10000 | 156000.00 | KAPL/RDPL | ESIS |
| 30 | Syr.Nimusulide + para | 19.40 | per 60 ml | 10000 | 194000.00 | --,,-- | ESIS |
| 31 | Syr.Paracetamol | 5.85 | per 60 ml | 20000 | 117000.00 | Hindu.Lab | DMER |
| 32 | Cough Expectorant | 11.40 | per 10 ml | 10000 btl | 114000.00 | --,,-- | --,,-- |
| 33 | Metronidazole Sup. | 6.00 | per 50 ml | 10000 btl | 60000.00 | --,,-- | --,,-- |
| 34 | Nalidixc Acid Oral Sup | 14.65 | per 30 ml | 10000 | 146500.00 | --,,-- | --,,-- |
| 35 | Ibuprofen Sup | 5.40 | per 60 ml | 10000 | 54000.00 | --,,-- | --,,-- |
| 36 | Norflox + TZ Sup | 24.62 | per 30 ml | 5000 | 123100.00 | Symbiosis | Govt. |
| 37 | Mebendazole Sup | 5.92 | per 60 ml | 10000 | 56200.00 | Hindus.lab | Dmer |
| 38 | Domaperdone sup | 21.64 | per 30 ml | 5000 | 108200.00 | Symbosis | Govt. |
| 39 | ORS (WHO formula ) | 1.89 | per pkt | 100000 | 189000.00 | Ajanta Phar | DMER |
| 40 | Mediclor – M Liq. | 16.50 | per 100 ml Btl | 25000 | 412500.00 | MSSITC | Govt. |
| | | | | | 5100804.00 | | |

वरील औषधे खरेदीकामी त्यांनी महाराष्ट्र शासनाकडे रेट कॉन्ट्रॅक्टवर असलेल्या कंपन्याचे दर दिलेले आहे व त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.५६,९३,६०४.०० इतका खर्च येणार आहे. परंतू या पुर्वी आपण त्यांना चिकन गुण्यांचे आजारासाठी जी औषधे दिली होती ती औषधे आपण इतर अधिकृत विक्रेते यांचेकडुन कोटेशन मागवुन त्यांचे दर व रेट कॉन्ट्रॅक्ट चे दर यांचेशी तुलनाकरुन त्यामध्ये ज्यांचे दर निम्नतम असतील त्यांचे दराने खरेदी केली होती. त्याच पध्दतीने खरेदी करुन देता येईल. त्यामुळे वरील औषधे खरेदीकामी अंदाजे रु. ५० ते ५५ लाखापर्यंत खर्च असे मत आहे. असा प्रस्ताव कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यावर चर्चा होऊन असे ठरले की जिल्हा परिषद अहदमनगर यांना सध्या फक्त रु.२५ लाखापर्यंतची औषधे ही सन २००६-२००७ या वर्षा करीता प्राप्त झालेल्या निविदेतील निम्नतम दरानुसार खरेदी करुन द्यावे असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कोपरगांव नगरपालिकेस औषधे देणेबाबतचे पत्राबाबत**

**निर्णय क्र.६४५.** निवासी जिल्हयाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी त्यांचे कडील पत्र क. टंचाई५ र्या-१९-९४९-२००६ दि. १३/०८/२००६ चे पत्रान्वये दि. ०७/०८/२००६ ते १०/०८/२००६ या कालावधीमध्ये कोपरगाव शहरामध्ये पुरस्थिती निर्माण झालेली होती. आता पुर ओसरला असल्याने साथीचे रोग प्रतीप्रंबध उपचार करणेकामी कोपरगाव नगरपरीषदेकडे असलल्या तुटपुंज्या साधन सामुग्रीच्या अधारे त्यांना या उपाययोजना शक्य नाही.

तेंव्हा त्यांना संस्थानकडुन खालील औषधे पुरवठा करुन या मानवतावादी कार्यात मदत करावी अशी विनंती केलेली आहे.

| Sr.No. | Name of Medicines | Qty. | App. Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Tab. Paracetamol | 50000 | 0.13 | 6300.00 |
| 2 | Tab. Antacid | 50000 | 0.10 | 5000.00 |
| 3 | Tab. Domperidom | 10000 | 0.25 | 2500.00 |
| 4 | Tab. Ranitidine 150 | 10000 | 0.15 | 1500.00 |
| 5 | Tab. Metrogyl 400 mg | 5000 | 0.16 | 800.00 |
| 6 | Tab. Norflox 400 mg | 5000 | 0.84 | 4200.00 |
| 7 | Tab. Ciprofloxacin 500 | 5000 | 1.50 | 7500.00 |
| 8 | Tab. Tetracycline 250 | 10000 | 0.40 | 4000.00 |
| 9 | Inj.. Perinorm | 200 | 1.85 | 370.00 |
| 10 | Inj. Taxim 1 gm | 200 | 18.00 | 3600.00 |
| 11 | Inj. Ciprobid | 300 | 10.00 | 3000.00 |
| 12 | I/V Metrogyl | 300 | 8.80 | 2640.00 |
| 13 | I/V Ringer Lactate 500 | 500 | 17.50 | 8750.00 |
| 14 | I/V Normal Saline | 500 | 14.00 | 7000.00 |
| 15 | I/V Dextrose 5% | 500 | 14.00 | 7000.00 |
| 16 | Saline Set | 1000 | 2.89 | 2890.00 |
| 17 | Scalp Vein Set No. 23 (each 500) | 500 | 9.50 | 4750.00 |
| 18 | O.R.S. | 2000 | 3.15 | 6300.00 |
| 19 | Liq. Anatacid | 500 | 15.00 | 7500.00 |
| 20 | Sup Septran (Cotramaxazole) | 500 | 5.50 | 2750.00 |
| 21 | Sup Metronidorole | 500 | 6.00 | 3000.00 |
| 22 | Sup Paracetamol | 500 | 6.17 | 3085.00 |
| 23 | Medichlor (100ml) | 2000 | 30.00 | 60000.00 |
| 24 | Tab. Deriphylline | 5000 | 0.20 | 1000.00 |
| 25 | Inj. ASV | 50 | 296.00 | 14800.00 |
| 26 | Inj. Rabipur | 100 | 325.00 | 32500.00 |
| 27 | Inj. Voveron | 500 | 1.54 | 770.00 |
| 28 | I/V Mannitol 300ml | 25 | 56.00 | 1400.00 |
| 29 | Tab Voveron 50 Mg | 10000 | 0.30 | 3000.00 |
| 30 | Tab Nise 100 Mg | 10000 | 0.10 | 1000.00 |
| 31 | Tab. Combiflam | 10000 | 0.40 | 4000.00 |
| | | | **Total -** | **212905.00** |

वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी अंदाजे रु. २,१२,९०५/- इतका खर्च येणार आहे. त्यांनी मागणी केलेली औषधे शिल्लक नसल्यामुळे ती त्यांना खरेदी करुन देणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये २,१२,९०५.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. वैद्यकीय उपचारासाठी ॲडव्हॉन्स देणेबाबत श्रीमती सिंधुबाई पुंडलिक बढे,स्त्री मदतनीस प्रसादालय यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.६४६.** श्रीमती सिंधुबाई पुंडलिक बढे, स्त्री मदतनिस (प्रसादालय विभाग) यांचा मुलगा श्री. विष्णु पुंडलिक बढे, वय वर्षे २५ याचा दि. १९.०७.२००६ रोजी नगर-मनमाड रोडवर अपघात झाला होता. त्यास उपचारासाठी संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालयात प्रथम दाखविण्यात आले होते. तेथे त्यांचेवर उपचार करणेत येऊन पुढील उपचारासाठी प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे पाठविण्यात आले होते. परंतु तेथील रुग्णालयातील डॉक्टरांनी आमचेकडे उपचार होत नाहीत म्हणून पुढील उपचारासाठी लाईफ लाईन हॉस्पिटल, नाशिक येथे पाठविले. सध्या श्री. बढे हे लाईफ लाईन हॉस्पिटल, नाशिक येथे उपचार घेत आहेत.

त्यांचा आई श्रीमती बढे यांनी दि. २४.०७.२००६ चे अर्जान्वये मुलाच्या उपचारासाठी रु. ३,००,०००/- इतका खर्च येणार असून श्रीमती बढे यांनी रु. २ लाख ॲडव्हान्स मिळावे अशी विनंती केली आहे. वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ नुसार श्रीमती बढे यांचा मुलगा हा त्यांचेवर अवलंबित होत नाही. त्यामुळे त्यांना वैद्यकिय देखभाल नियमावली नुसार वैद्यकिय बीलाचा परतावा मिळणार नाही. श्रीमती बढे हया वर्ग ४ च्याकर्मचारी असून त्यांना इतका खर्च करण्याची त्यांची आर्थिक कुवत नाही. श्रीमती बढे यांची संस्थान सेवा फक्त १२ वर्षे शिल्लक असून त्यांना सध्या निव्वळ पगार फक्त रु. २२८२ इतका मिळत आहे. सबब श्रीमती बढे यांना तुर्त पगारापोटी रु. १.५० लाख मात्र बिनव्याजी ॲडव्हान्स म्हणून द्यावा व त्याची वसुली त्यांचे पगारातून दरमहा रु. १०००/- प्रतीमहा वसुल करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा रुग्णालय/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४.** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता यु.पी.एस खरेदी बाबत**

**निर्णय क्र.६४७.** श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे सहा यु.पी.एस. खरेदीकामी उपसमिती सभा दि.२४.०६.२००६ चे सभेत खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ३,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इकडील पत्र क्र. ८६७३, दि.०४.०७.२००६ अन्वये दि.१५.०७.२००६ अखेर एकूण १८ उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यापैकी खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१. कन्सोल कन्सोलीडेटेड प्रा. लि., मुंबई (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले).

०२. श्रीनिवास मार्केटिंग, पुणे (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले).

०३. जयश्री एंटरप्रायजेस, अहमदनगर (बंद पाकिटात).

०४.भवानी डिजीटल सिस्टीम, मुंबई.

०५. आर-एम इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि., पुणे.

श्री साईबाबा रुग्णालयातील ब्लड गॅस ॲनालायझर मशिन हे सध्या यु.पी.एस. नसल्यामुळे वापर करता येत नाही. यु.पी.एस. शिवाय मशिन वापरल्यास मशिनची मोठी हानी होऊ शकते. त्यामुळे वरील एक बंद कोटेशन हे मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता. तो खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Make/Specification (Qty 6 Nos) | Rate per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | M/s Jayshree Ent.A.Nagar | Champaion-2KVA (15to 20 Min. Back UP)Battery-7AHx8 | 39,500.00 | 2,37,000.00 |
| 02. | M/s Bhavani Digital sy.Mumbai | 1KVA (App.30 Min. Back UP) | 22,360.00 | 1,34,160.00 |
| 03.. | M/s Aar-em Electronics Pvt. Pune | Champaion True-2KVA (15to 20 Min. Back UP) | 41,080.00 | 2,46,480.00 |
| 04. | M/s Consul Consolidated Pvt.Ltd,Mumbai | Consul 2KVA (30min Back-Up) | 32,240.00 | 1,93,440.00 |
| 05. | M/s Shreeniwas Marketing Pune | Progressive/Opal 2KVA (30min Back-Up) | 57,250.00 | 3,43,500.00 |

उपरोक्त तक्त्यामध्ये २ केव्हीएचे यु.पी.एस. साठी चार कोटेशनधारकांनी दर दिलेले आहेत. मे. भवानी डिजीटल सिस्टीम, मुंबई यांनी १ केव्हीए च्या यु.पी.एस.साठीचे दर दिलेले असल्यामुळे त्याचा विचार करण्यात आलेला नाही.

या तक्त्यातील २ केव्हीए च्या यु.पी.एस. साठी मे. कन्सोल कन्सोलीडेटेड प्रा. लि., मुंबई यांचे दर रु. ३२,२४०/- प्रती नग सर्व करांसह निम्नतम असून त्यांच्या यु.पी.एस.ला ३० मिनीटाचा बॅकअप दिलेला आहे. मे. कन्सोल कन्सोलीडेटेड प्रा. लि., मुंबई यांचेकडून एकूण ६ नग यु.पी.एस. खरेदीकामी रु.१,९३,४४०/- इतका खर्च येणार आहे. सदर ६ यु.पी.एस. पैकी १ यु.पी.एस. प्रयोगशाळा विभागातील ब्लड गॅस ॲनालायझर मशिनसाठी अत्यंत तातडीनेआवश्यक असल्याने १ नगाचा पुरवठा आदेश मे. कन्सोल कन्सोलीडेटेड प्रा. लि., मुंबई यांना देण्यात आलेला आहे. उर्वरित ५ यु.पी.एस.चा पुरवठा आदेश मे. कन्सोल कन्सोलीडेटेड प्रा. लि., मुंबई यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५.** **श्री.साईबाबा हॉस्पिटलमधील स्टाफ नर्सचे गणवेश व इतर कापड खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६४८.** श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५/५/२००६ रोजी कार्यान्वित झाले असुन हॉस्पिटलमधील इतर विभागही सुरु झाले आहेत. हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स,व नर्सेस व इतर स्टाफच्या नियुक्त्याही करणेत आल्या आहेत. परंतु नर्सेस स्टाफच्या गणवेशाबाबत खरेदी झालेली नाही दिनांक २०/०७/२००६ च्या मा.व्यवस्थापन उपसमितीपुढे झालेल्या निर्णयानुसार नर्सेस स्टाफला फिक्कट गुलाबी रंगाचे पॅन्ट/शर्ट असा गणवेश असावा, असे ठरले आहे. हॉस्पिटलमधील नर्सेसच्या गणवेशाकरीता साधारणत: २००० मीटर शुटींगचा कपडा लागणार आहे.

तसेच डॉक्टर्स स्टाफला सफेद रंगाचे ४०० मीटर कापड व टेक्निशिअन्स, फार्मासिस्ट यांचेकरीता फिक्कट आकाशी रंगाचे (स्काय ब्ल्यू) ॲपरन देणेच ठरले आहेत व त्याकरीता ४०० मीटर कापड, तसेच लिनन विभागात ५७५ नग पांढरे बेडशीट शिवून घेणेत आले होते, ते सर्व वॉर्ड तथा ऑपरेशन थिएटरला त्यांचेकडील मागणीप्रमाणे वेळोवेळी गरजेप्रमाणे दिले असून सध्या बेडशीट

शिल्लक नाहीत, त्याकरीता ४०० नग बेडशीटसाठी साधारणतः १००० मीटर पांढ-या रंगाचे कापडाची आवश्यकता आहे.

सदर कापड विमल,रेमंड,किंवा इतर नामांकित कंपनीचे खरेदी करणे झाल्यास त्या कापडाची किंमत कमीतकमी रु.१५०/-प्रती मी. पर्यंत असू शकते याप्रमाणे उपरोक्त कापड कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.११,४०,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी ब्लँकेट खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६४९.** श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झाले असून हॉस्पिटलसाठी श्री अल्पेशभाई, रा.सुरत यांचेकडून दिनांक ५/१२/२००५ रोजी देणगी पा.नं.२७४७७ अन्वये ३०० नग ब्लँकेट देणगी स्वरुपात आलेले आहेत. सदर ब्लँकेट इकडील सर्व वॉर्डला व ऑपरेशन थिएटरला वेळोवेळी त्यांच्या मागणीनुसार देणेत आलेले आहेत. परंतु, ते ब्लँकेट वापरल्यानंतर असे दिसून येते की, देणगी स्वरुपात आलेले ब्लँकेट अतिशय हलक्या दर्जाचे असल्याने त्या ब्लँकेटची पेशंटला पुरेशी उब मिळत नाही, व एकदाच ब्लँकेट धुतले असता त्याचे दोरे निघून ते लूज पडले आहेत.

सबब हॉस्पिटलकरीता ४०० नग वुलन ब्लँकेट चांगल्या प्रतीचे (चारही बाजूंनी कडा बंद असलेले) व चांगल्या कंपन्यांचे (उदा.ओसवाल,रेमंड, नवदुर्गा) खरेदी करावे लागतील चांगल्या दर्जाचे ब्लॅकेटची किंमत साधारणतः रु.३००/- पर्यंत असु शकते म्हणून सदर खरेदीस साधारणतः रु.१,२०,०००/- (एकलाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा हॉस्पिटल मधील रुग्णांसाठी आवश्यक असणारे ४०० नग वुलन ब्लँकेट ओसवाल,रेमंड,नवदुर्गा या नामांकित कंपनीचे खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यात यावीत. याकामी येणारे अंदाजे रुपये १,२०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. कापड खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६५०.** श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५/०५/२००६ रोजी सुरु झाले असून हॉस्पिटलकरीता लागणारे लिननची खरेदी मे.सेंच्युरी टेक्सटाईल मिल्स लि.,मुंबई यांचेकडून करण्यात आलेली असून त्याचे लिनन शिवून घेणेत आले आहे.

तथापि, पेशंटला शिवण्यात आलेले ड्रेसचे कापड संपलेले असून लेडीज पेशंटला पेटीकोट शिवून घेणे गरजेचे आहे. त्याकरीता AJP B-८. Exibith No.३ हया प्रकारचे कापड रु. ४४.६५/- या दराने मे.सेंच्युरी मिल्स देणेस तयार आहे. त्यामुळे १००० मीटर कापड सेंच्युरी मिलकडून खरेदी करुन मिळणेस मान्यता असावी. सदर खरेदीस साधारणतः रु.४४६५०/-पुर्णांकित रुपये ५०,०००/-खर्च अपेक्षीत असुन त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. शिलाई मशिन व धुलाई मशिन खरेदी करुन मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६५१.** श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५.५.२००६ रोजी सुरु झाले असून हॉस्पिटलमध्ये काही विभाग कार्यान्वीत झालेले आहे. तसेच लिनन विभागही सुरु झालेला आहे. हॉस्पिटलकरीता लागणारे लिनन शिवून घेतलेले आहे.

परंतू काही वेळेस कमी पडणारे वेगवेगळ्या प्रकारचे कपडे अचानक शिवून घ्यावे लागतात. प्रत्येक वेळेस बाहेरील टेलरला बोलावून दर ठरवून लिनन शिवून घ्यावे लागतात. टेलर वेळेवर लिनन शिवून देत नाही त्यामूळे अडचण निर्माण होते.

हॉस्पिटलच्या लिनन विभागात कापड शिल्लक आहे. त्याकरीता कमी पडणारे लिनन शिवून घेणेकरीता दोन नगर शिलाई मशिन (मोटारीसह) खरेदी करणे गरजेचे आहे. त्याकरीता साधारणतः रुपये १५,०००.०० खर्च अपेक्षित आहे.

तसेच हॉस्पिटलचे लिनन लॉन्ड्री विभागात धुण्यासाठी जाते, परंतु काही वेळेस कपडे लवकरात लवकर धुवून मिळत नाही. त्यामुळे फार अडचणी येतात. हॉस्पिटलकरिता एक धुलाई मशिन (ड्रायरसह) २० kg क्षमता असलेली खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता साधारण रु.२५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी शिलाई मशिन व धुलाई मशिन कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ४०,०००/- मात्र (अक्षरी रुपये चाळीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. रोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी औषधांची मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.६५२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. पुरग्रस्तांना पुरविण्यात आलेल्या अन्नपाकिटांबाबत.**

**निर्णय क्र.६५३.** दिनांक ५.८.२००६ ते दिनांक १२.८.२००६ अखेर संपुर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने नद्यांना महापुर आलेले होते. प्रामुख्याने शिर्डी परिसरालगत गोदावरी,प्रवरा व मुळा या नद्यांना महापुर आल्याने नदीकाठची शहरे/गावे/वाड्या व वस्त्यांमध्ये महापुराचे पाणी शिरल्यामुळे तेथील रहिवाशांवर मोठी आपत्ती निर्माण झाली. त्यामुळे तेथील स्थानिक प्रशासनाने त्यांना सुरक्षित स्थळी हलविले. अशा पुरग्रस्तांचा जेवणाचा बिकट प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे त्या-त्या परिसरातील लोकप्रतिनिधींनी संस्थानकडे अन्नपाकिटे पुरविणेबाबत मदतीची तोंडी मागणी केली असता, मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार संस्थानचे प्रसादालयातून कोपरगाव,श्रीरामपूर,राहूरी, लोणी, पुणतांबा व शिंगवे या पुरग्रस्त भागात अन्नपाकिटे तयार करुन पुरविण्यात आलेले आहेत. याकामी रुपये १०,९३,७९५/- इतका खर्च आला असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

++

**विषय नं.२१. श्री साई मंदिर सुरक्षिततेबाबत**

**निर्णय क्र.६५४.** दिनांक २२ जुलै,२००६ रोजी मा.श्री.संजय दयाळ, अतिरिक्त पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.अंकुश धनविजय, विशेष पोलिस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, मा.श्री.रामानंद, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी श्रीसाई मंदिर व मंदिर परिसराची सुरक्षिततेच्या दृष्टीने पहाणी करुन सुरक्षिततेच्या संदर्भात केलेल्या कार्यवाही बद्दल समाधान व्यक्त करुन सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील बाबींची पुर्तता करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

०१. मंदिर परिसरातील कास्ट आयर्नचे कम्पाऊंडला आतून बारिक जाळी बसविणे, तसेच कम्पाऊंडचे वरिल बाजुने लोखंडी अँगल रस्त्याच्या बाजुला झुकलेले बसवून त्यावर काटेरी तार लावावी जेणेकरुन कम्पाऊंडवरुन आत येता येणार नाही.

०२. जनसंपर्क कार्यालयाजवळील महाद्वाराच्या बाजूचे रिलींगची तसचे लेंडीबागेच्या (दक्षिण बाजु) बाजुचे लोखंडी रिलींगची उंची वाढवावी.

०३. चारही महाद्वांरावर चप्पल स्टँडची व्यवस्था करावी.

०४. मंदिराला दक्षिणेकडून असलेल्या प्रवेशद्वारांना कायमस्वरुपी गेट बसवून सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद ठेवावे.

वरिल गोष्टींची तात्काळ अंमलबजावणी करावी असे सांगितले, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. श्री.विकास मेहता,दिल्ली लिखित "एक फकीर की पाठशाला" चित्रांकित पुस्तक प्रकाशनाबाबत**

**निर्णय क्र.६५५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. साथीचे रोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी मदत मिळणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे पत्राबाबत**

**निर्णय क्र.६५६.** मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी दिनांक १३.८.२००६ चे पत्रान्वये संस्थानमार्फत ७५ फॉगींग मशिन्सचा पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहे. पैकी २५ मशिन्सचा पुरवठा झालेला आहे. फॉगीग मशिन्स वापरण्यास सुरुवात झाली असून त्यासाठी लागणारे पायरेथ्रम हे रसायन कमी पडले आहे. तरी २००० लिटर पायरेथ्रम रसायन मिळणेस विनंती केली असून याकामी अंदाजे रुपये ७,५६,०००.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद अहमदनगर यांना ५०० लिटर पायरेथ्रम रसायन खरेदी करुन देण्यात यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. महाराष्ट्रातील अपंगांना तीन चाकी सायकली देणे बाबत.**

**निर्णय क्र.६५७.** मा.आमदार श्री सुधीर मुनगंटीवार,चंद्रपूर यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचे नांवे पाठविलेल्या दि.०६/०६/२००६ व दि.३०/०६/२००६ चे पत्रान्वये "आपणाशी झालेल्या चर्चेनुसार मी पायाने अपंग असलेल्या २५ व्यक्तींची यादी आपणाकडे पाठवित आहे. सदर व्यक्तींना श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या माध्यमातुन तीन चाकी सायकली उपलब्ध करुन द्याव्यात," अशी विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२००६ रोजीचे सभेतील विषय नं.१२ व निर्णय क्र.८७. अन्वये अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३ हजार सायकलचे वाटपास मान्यता दिलेली आहे. तसेच दि.०३/०६/२००६ चे सभेतील निर्णय क्र.३९४ अन्वये अहमदनगर जिल्हयातील अपंगांना सायकली वाटपास मान्यता दिलेली आहे. त्यास विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.२९/०६/२००६ चे पत्रान्वये अहमदनगर जिल्हयातील अपंगांना तीन चाकी सायकलचे वाटप करण्यास मान्यता दिलेली असुन नियमावली मान्यतेसाठी शासनास पाठविणे,अर्जदारांची यादी व अर्जासोबतचे कागदपत्र शासनास पाठविणेचे सांगितलेले आहे.

तरी मा.आमदार श्री सुधीर मुनगंटीवार,चंद्रपूर यांचे मागणीनुसार अपंगास सायकली वाटपास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शासनाने अहमदनगर जिल्हयात सायकल वाटापास मान्यता दिलेली असल्याने व मा.आमदार श्री मुनगंटीवार यांची मागणी अहमदनगर जिल्हयाबाहेरील असल्यामुळे त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही -प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. शिधा सामुग्री मिळणेबाबत सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगांव (को) ता.राहाता यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.६५८.** खाली दर्शविलेल्या समस्त गांवकरी मंडळ यांनी मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगांव(को) ता.राहाता, जि. अ.नगर, दहेगांव(को) ग्रामस्थ व भजनी मंडळ, माऊली मंदिर, चौफूली, | अखंड हरिनाम सप्ताह, दि.13/08 ते दि.20/08/06 अखेर होणार असून सप्ताहासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.10,000/- | मा. डॉ. गोंदकर |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगांव(को) ता.राहाता, जि.अहमदनगर यांना यापुर्वीही शिधा स्वरुपात मदत करण्यात आली होती.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.सदर कालावधीत मा.व्यवस्थापन समितीची सभा नाही.

तरी उपरोक्त सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगांव(को) ता.राहाता, जि. अ.नगर, दहेगांव(को) ग्रामस्थ व भजनी मंडळ, माऊली मंदिर, चौफूली, यांना अखंड हरिनाम सप्ताह, दि.१३/०८ ते दि.२०/०८/०६ अखेर होणार असून सप्ताहासाठी रु. १०,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६. श्री अर्जूनराव विष्णू चौधरी, सप्ताह कमिटी मेंबर्स नांदूर्खी, अध्यक्ष, श्री संत सेना महाराज नाभिक मंडळ,राहाता, सौ.शकुंतला बाळासाहेब आढाव, सरपंच ग्रामपंचायत, मानोरी, श्री बाबासाहेब शिवाजी तुरकणे, पिंपळवाडी ता.राहाता यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.६५९.** खाली दर्शविलेल्या समस्त गांवकरी मंडळ यांनी श्री विखेपाटील, मा. अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अर्जुनराव विष्णु चौधरी, सप्ताह | सालाबादप्रमाणे नांदुर्खी बु. येथे | महाप्रसादासाठी शिधारुपी | रु.२५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कमेटी मेंबर्स, नांदुर्खी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर | दि.९/८ ते दि.१६/८/०६ पर्यंत श्री गोपाळकृष्ण जन्म सप्ताहासाठी . | मदत मिळणेबाबत पत्र. | |
| ०२. | अध्यक्ष, श्री संत सेना महाराज नाभिक मंडळ, राहाता , जिल्हा-अहमदनगर | दि.२०/०८/२००६ रोजीचे श्री संत सेना महाराज पूण्यतिथी सोहळयासाठी शिधास्वरुपात मदत. | तांदुळ, साखर, रवा, मठ, तुरडाळ, मुगडाळ, तुपडबा, तेल, पत्रावळी इ. शिधा मिळणेबाबत पत्र | रु.०६,०००/- |
| ०३. | सौ.शकुंतला बाळासाहेब आढाव, सरपंच, ग्रामपंचायत मानोरी, ता.राहुरी, जि. अहमदनगर | मानोरी येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, दि.१३/०८ ते दि.२०/०८/०६ अखेर होणार असून सप्ताहासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. | रु.२५,०००/- |
| ०४. | श्री बाबासाहेब शिवाजी तुरकणे, अध्यक्ष, अखंड हरिनाम सप्ताह कमिटी, पिंपळवाडी, ता.राहाता, जि.अहमदनगर | पिंपळवाडी येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, दि.०९/०८ ते दि.१६/०८/०६ अखेर होणार असून सप्ताहासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. | रु.२५,०००/- |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

सप्ताह कमेटी मेंबर्स, नांदुर्खी बु., अध्यक्ष, श्री संत सेना महाराज नाभिक मडळ, राहाता , सौ.शकुंतला बाळासाहेब आढाव, सरपंच, ग्रामपंचायत मानोरी, ता.राहुरी, जि. अहमदनगर व श्री बाबासाहेब शिवाजी तुरकणे,

अध्यक्ष, अखंड हरिनाम सप्ताह कमिटी, पिंपळवाडी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना यापुर्वीही शिधा स्वरुपात मदत करण्यात आली होती.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

सदर कालावधीत मा.व्यवस्थापन समितीची सभा नाही.

तरी उपरोक्त अ.नं.०१, ०२, ०३, ०४ व ०५ मधील शे-यात दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे रु. २५,०००/-, ०६,०००/-, २५,०००/- व रु. २५,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. श्री योगेश आसाराम चव्हाण व इतर १६ वर्ग -४ चे कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**निर्णय क्र.६६०.** सर्वश्री.१)योगेश आसाराम चव्हाण,२) गुरुप्रसाद अरुण कापरे,३) साईप्रसाद सुरेश जोरी,४) बाळासाहेब दत्तात्रय तुरकणे,५) साईनाथ दिलीप जगताप,६) भाऊ अंतवन धिवर, ७) महेश विठ्ठल गोंदकर,८) अरुण गणपत जाधव,०९) सुभेदार नशिर शेख १०) भिका पांडुरंग आव्हाड ११) राजेंद्र किसन भालेराव १२) नवनाथ किसन बनकर १३) अनिल बाबासाहेब कोते १४) विजय रमेश साळवे १५) प्रफुल्ल गिताराम नागपुरे १६) सागरसिंग भिमसिंग परदेशी १७) राजेंद्र किसन गोंदकर,यांच्या संस्थानच्या विविध विभागामध्ये वर्ग-४ कर्मचारी या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी प्रथम दरमहा रु.२०००/-नियत वेतनावर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार संस्थान नियमाप्रमाणे त्यांना पहिल्या वर्षी दरमहा प्रत्येकी रु.२०००/-एकत्रित नियतवेतन देण्यात आलेले आहे.त्यांनी त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण केल्यानंतर दुसरे वर्षी त्यांना दरमहा रु.२५००/-एकत्रित नियत वेतन देण्यात येत आहे.त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे असून त्यांचा दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी त्यांच्या नावांसमोर दर्शविल्या तारखेस संपुष्ठात येत आहे.

| अ.नं | कर्मचा-याचे नांव | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. योगेश आसाराम चव्हाण मदतनीस प्रसादालय | ०६ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०२. | श्री. गुरुप्रसाद अरुण कापरे मदतनीस,मंदिर विभाग | १२ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०३ | श्री. साईप्रसाद सुरेश जोरी मदतनीस,माहिती तंत्रज्ञान विभाग | १२ वी सायन्स B.C.S.(App) | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | श्री.बाळासाहेब दत्तात्रय तुरकणे<br>मदतनीस,रेकॉर्ड विभाग | १२वी पास | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०५ | श्री.साईनाथ दिलीप जगताप<br>मदतनीस,श्री.सा.भ.नि.विभाग | बी.कॉम | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०६ | श्री.भाऊ अंतवन धिवर<br>मदतनीस पाणीपुरवठा | ०८ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०७ | श्री.महेश विठ्ठल गोंदकर<br>मदतनीस विद्युत विभाग | आय.टी.आय. | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०८ | श्री.अरुण गणपत जाधव<br>मदतनीस विद्युत विभाग | आय.टी.आय. | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ०९ | श्री.सुभेदार नशिर शेख<br>मदतनीस स्वच्छता विभाग | ०४ थी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १० | श्री. भिका पांडुरंग आव्हाड<br>मदतनीस स्वच्छता विभाग | ०३ री | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| ११ | श्री.राजेंद्र किसन भालेराव<br>मदतनीस स्वच्छता विभाग | ०५ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १२ | श्री.नवनाथ किसन बनकर<br>मदतनीस संरक्षण विभाग | ०४ थी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १३ | श्री.विजय रमेश साळवे<br>मदतनीस संरक्षण विभाग | ०४ थी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १४ | श्री.अनिल बाबासाहेब कोते<br>मदतनीस संरक्षण विभाग | ०९ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १५ | श्री.प्रफुल्ल गिताराम नागपुरे<br>मदतनीस, वाहन विभाग | आय.टी.आय. | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १६ | श्री.राजेंद्र अशोक गोंदकर<br>मदतनीस,कॅन्टीन विभाग | ०६ वी | ०६/०८/०४ | ०५/०८/२००६ |
| १७ | श्री.सागरसिंग भिमसिंग परदेशी<br>मदतनीस आय.टी.आय. | १० वी | २३/०८/०४ | २२/०८/२००६ |

उपरोक्त अ.नं. १ ते १२ व १४ ते १७ वरिल वर्ग-०४ कर्मचा-यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असून,ते हुकमाप्रमाणे कामे करतात,ते प्रामाणिक असून त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय त्यांचे संबंधीत अधिक्षक / विभाग प्रमुख यांनी दिलेले आहेत.

तसेच उपरोक्त अ.नं.१३ वरील कर्मचारी श्री विजय रमेश साळवे यांचेबाबत संरक्षण अधिकारी यांनी,"परिवीक्षाधीन कालावधीमध्ये दि.२२/०५/२००६ रोजी केलेल्या गैरवर्तनाबाबत रिपोर्ट सादर केला असून,कामगार विभागामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.असून त्यांचे बाबत प्रकरण चालू आहे." असे कळविले असून सदर बाबत," जा.नं.एसएसएस/वशी-०१/२१८८/ २००६ दि.११/०८/२००६ अन्वये संरक्षण अधिकारी यांचा गोपनीय अहवाल मागविणेत आला असून तो प्राप्त न झाल्याने श्री साळवे यांचे प्रकरण प्रलंबीत आहे." असे कामगार अधिकारी यांनी अभिप्राय दिलेले आहेत.

श्री साळवे यांचेबाबत संरक्षण अधिकारी व कामगार अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेवून, त्यांचे गैरवर्तनाबाबत खातेचौकशी पूर्ण होवून अहवाल प्राप्त हाईपर्यंत त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी वाढविता येईल तसेच होणाऱ्या निर्णयानुसार श्री साळवे यांचेबाबत कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त अ.नं. १ ते १२ व १४ ते १७ वरिल वर्ग-०४ कर्मचा-यांचे बाबत संबंधीत अधिक्षक / विभागप्रमुख व प्रशासकिय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखे (परिवीक्षाधीन कालावधी संपलेचे तारखेअखेर ) पासून रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० वेतनश्रेणी देऊन त्यांना संस्थान सेवेत कायम करणेस, तसेच श्री साळवे यांचेबाबत संरक्षण अधिकारी व कामगार अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेवून, त्यांचे गैरवर्तनाबाबत खातेचौकशी पूर्ण होवून अहवाल प्राप्त हाईपर्यंत त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी आहे त्याच नियतवेतनावर (रु.२५००/-) वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८. श्री कोते मिनानाथ भाऊसाहेब यांचा प्रयोगशाळा सहाय्यक पदावर नेमणूक मिळणेबाबतचा अर्ज.**
**निर्णय क्र.६६१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९. श्रींचे समाधी मंदीरातील व्ही.आय.पी.कक्षातील श्रीसाईबाबांचे फोटोस चांदी फ्रेम बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.६६२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०.** **श्रीसाईबाबांचे मूर्तीसाठी सुवर्ण सिंहासन बनविणेबाबत.**

**निर्णय क्र.६६३.** श्रीसाईबाबांचे मंदीरातील मूर्तीसाठी असणारे सिंहासन हे चांदीचे आहे. सदरचे सिंहासन सोन्याचे असावे यासाठी "सुवर्ण सिंहासन निधी" या नावाने रोख रक्कम स्वीकारणेसाठी स्वतंत्र अकौंटमध्ये निधी जमा करण्याची व्यवस्था करावी, तसेच सुवर्ण सिंहासन डिझाईन तयार करुन घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आर्किटेक्टकडून निविदा मागविण्यात याव्यात असे दि.१६.७.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५०५ अन्वये ठरले आहे.

त्यानुसार सोन्याचे सिंहासन तयार करणेकामी स्वतंत्र निधी सुरु केले आहे. याबाबत जाणकार व अनुभवी असलेले नामांकित सुवर्ण पेढ्या यांचेकडून सोन्याच्या सिंहासनाची डिझाईन (संकल्पना चित्र) तसेच त्यासाठी एकूण लागणारे सोने व मजूरी आकारण्याची पद्धत जाणून घेणेसाठी व सोन्याचे सिंहासन बनविण्याचे काम हे मोठ्या खर्चाचे असल्याने व एकदाच होणार असल्याने त्यावर चांगल्या प्रकारचे नक्षीकाम व दिखाऊपणा आवश्यक आहे म्हणून सुवर्णकार व्यतिरिक्त खालील काही नामांकित चित्रकार/डिझाईन यांनाही दूरध्वनीद्वारे आजचे सभेत समक्ष बोलविण्यात आले आहे.

| अ.नं. | नाव | तपशील |
|---|---|---|
| ०१ | श्री.प्रमोद कांबळी, अहमदनगर | चित्रकार |
| ०२ | श्रीमती हेमा राजेशिर्के | चित्रकार/ डिझाईनर |
| ०३ | मे.पु.ना.गाडगीळ ॲण्ड सन्स, पुणे | सुवर्णकार |
| ०४ | मे.रांका ज्वेलर्स, पुणे | सुवर्णकार |
| ०५ | मे.आडगांवकर सराफ प्रा.लि.,नाशिक | सुवर्णकार |
| ०६. | श्री.टकले सराफ, नाशिक | सुवर्णकार |
| ०७. | श्री.एम.व्ही.वाघाडकर ॲण्ड सन्स ज्वेलर्स, मुंबई | सुवर्णकार |
| ०८. | श्री.कायगांवकर सराफ, अहमदनगर | सुवर्णकार |

उपरोक्तप्रमाणे चित्रकार/डिझाईनर/ सुवर्णकार यांना समक्ष दूरध्वनीवरुन सांगण्यात आले असून, दैनिक सकाळ व दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात दिनांक १४.८.२००६ व १७.८.२००६ रोजी जाहिरात देण्यात आलेली होती.

वरीलप्रमाणे सुवर्ण सिंहासन बनविणेबाबतचा आराखडा मान्य झालेनंतर हे काम कशा पद्धतीने व कोठे करण्यात यावे याचे धोरण निश्चित करुन त्यासाठी लागणारे सोने/मजूरी व बनविण्याचा कालावधी त्या अनुषंगाने कायदेशीर बाबी विचारात घेऊन यापुर्वी तयार केलेले चांदीचे सिंहासनासाठी ज्या पद्धतीने टेंडर तयार करण्यात आले होते त्याच पद्धतीने टेंडर तयार करावे लागेल तसेच यासाठी एका तज्ञाची नियुक्ती करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्त बोलविण्यात आलेल्या पैकी खालीलप्रमाणे चित्रकार/डिझाईनर/ सुवर्णकार आजचे सभेत समक्ष उपस्थित होते.

| अ.नं. | नाव | तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.प्रमोद कांबळी, अहमदनगर | चित्रकार | प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी हजर नव्हते |
| ०२ | श्रीमती हेमा राजेशिर्के | चित्रकार/डिझाईनर | चर्चेला हजर |
| ०३ | मे.पु.ना.गाडगीळ ॲण्ड सन्स, पुणे | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०४ | मे.रांका ज्वेलर्स, पुणे | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०५ | मे.आडगांवकर सराफ प्रा.लि.,नाशिक | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०६. | श्री.टकले सराफ, नाशिक | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०७. | श्री.एम.व्ही.वाघाडकर ॲण्ड सन्स ज्वेलर्स, मुंबई | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०८. | श्री.कायगांवकर सराफ, अहमदनगर | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ०९. | श्री.नितीन करडे,पुणे | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| १०. | मे.रमाकांत ब्रदर्स ॲण्ड सन्स, पुणे | सुवर्णकार | चर्चेला हजर |
| ११. | मे.एस.व्ही.शिरोडकर, मुंबई | सुवर्णकार | चर्चेला हजर |

उपस्थित चित्रकार/डिझाईनर/ सुवर्णकार यांचेशी समक्ष सखोल विचारविनीमय-तथा-चर्चा करण्यात येऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

सुवर्णकार, चित्रकार व डिझाईनर यांनी आपले संकल्पना चित्र (छोटे मॉडेल), याकामी लागणारे सोने, मजूरी व याकामासाठी लागणारा कालावधी याबाबतचा सविस्तर अहवाल एक महिन्यात तयार करावा. श्रीमती हेमा राजेशिर्के (डिझाईनर),मुंबई यांनी यापुर्वी समाधी मंदीरातील चांदीकाम डिझाईन तयार केलेले आहे, त्यापद्धतीने सुवर्णकामाचे संकल्पना चित्र तयार करावे. तसेच इतर संकल्पना चित्रात (मॉडेलमध्ये) काही त्रुटी आढळल्यास किंवा माहिती लागल्यास त्याबाबत मार्गदर्शन करावे अशा सूचना मा.अध्यक्ष महोदय व मा. विश्वस्त श्री. विखेपाटील यांनी दिल्या.

वरीलप्रमाणे सुवर्ण सिंहासन बनविणेबाबत विचार-विनिमय करणेकामी व्यवस्थापन समितीची स्वतंत्र सभा बोलविण्यात यावी व उपरोक्त सर्व सुवर्णकार, चित्रकार व डिझाईनर यांना मॉडेल्स, थ्रीडी मॉडेल्स व सविस्तर अहवालासह या सभेस आमंत्रित करण्यात यावे. असे ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/आय.टी. विभाग प्रमुख/अधिक्षक, मंदिर विभाग/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१. श्री.बाळासाहेब सु.लबडे,अध्यक्ष, श्रीमहादेव मंदीर देवस्थान ट्रस्ट,गोंधवणी व श्री.सुनिल जगन्नाथ खैरनार,गोकर्ण गणेश मंदीर जीर्णोद्धार समिती, कोपरगाव यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६४.** खाली दर्शविलेल्या समिती व ट्रस्ट यांनी मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | श्री बाळासाहेब सु लबडे, अध्यक्ष, श्री महादेव मंदिर देवस्थान ट्रस्ट, गोंधवणी, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर | गोंधवणी येथे महादेव मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, दि.13/08 ते दि.20/08/06 अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.25,000/- | मा. अध्यक्ष यांची शिफारस . |
| 02. | श्री सुनिल जगन्नाथ खैरनार, गोकर्ण गणेश मंदिर जीर्णोध्दार समिती, कोपरगांव, जि.अहमदनगर | कोपरगांव येथे गोकर्ण गणेश मंदिर जीर्णोध्दार कार्यक्रम दि.18/08 ते दि.20/08/06. महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.50,000/-ची मागणी. | मा.श्री.अशोक खांबेकर यांनी रु.30,000/- पर्यंत शिधा मदत |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री बाळासाहेब सु लबडे, अध्यक्ष, श्री महादेव मंदिर देवस्थान ट्रस्ट, गोंधवणी, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना यापुर्वीही रु. २५,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत करण्यात आली होती. श्री सुनिल जगन्नाथ खैरनार, गोकर्ण गणेश मंदिर जीर्णोध्दार समिती, कोपरगांव, यांनी पहिल्यांदाच शिधास्वरुपाची मदत मागितलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे. तरी उपरोक्त अ.नं. ०१ व ०२ यांना अखंड हरिनाम सप्ताह, दि.१३/०८ ते दि.२०/०८/०६ अखेर होणार असून सप्ताहासाठी व कोपरगांव येथे गोकर्ण गणेश मंदिर जीर्णोध्दार कार्यक्रम दि.१८/०८ ते दि.२०/०८/०६. महाप्रसादासाठी अनुक्रमे रु. २५,०००/- व रु. २५,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२. कै.तात्या पा.कोते यांचे समाधीवर चांदीच्या पादुका बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.६६५.** कै. तात्या पा. कोते हे श्री साईबाबांचे निःस्सिम भक्त होते. श्रींचे हयातीमध्ये त्यांनी बाबांची सेवा केलेली आहे. त्यांचे महानिर्वाणानंतर त्यांची समाधी संस्थान परिसरामध्ये उभारण्यात आलेली आहे. त्याची देखरेख, देखभाल व दैनदिन पुजाअर्चा संस्थान मार्फत करण्यात येते. त्यांचे नातू, श्री. मुकूंदराव बाजीराव पा. कोते, शिरडी यांनी दि.१२.०८.२००६ च्या पत्राने कै. तात्या पा. कोते यांचे समाधीवर असलेल्या दगडी पादुकांवर स्वखर्चाने तयार करुन आणलल्या चांदीच्या पादुका बसविण्याची इच्छा प्रर्दशित केली आहे. सदर पादुकांचे वजन ८०० ग्रॅम (टंच-८०) असून त्यांची किंमत रु. ११,५००/- इतकी आहे. सदर चांदीच्या पादुका संस्थानकडे जमा केलेल्या असून त्याची देणगी पावती नं. ८०४४ अन्वये दि. १८.०८.२००६ रोजी केलली आहे.

संस्थान हद्दीमध्ये असलेल्या इतर भक्तांचे समाधीवर कुठेही चांदीच्या पादुका बसविलेल्या नाहीत. तथापी, श्री. मुकूंदराव बाजीराव पा. कोते, शिरडी यांचें विनंतीनुसार कै. तात्या पा. कोते यांचे समाधीवर चांदीच्या पादुका बसविणेस त्यांना परवानगी देता येईल. तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३. नेत्र शिबीरातील रुग्णांच्या पुढील उपचाराबाबत.**

**निर्णय क्र.६६६.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील नेत्र विभागाचा शुभारंभ मा. डॉ. एस. नटराजन, मुंबई यांच्या शुभहस्ते दि. १८ ऑगस्ट २००६ रोजी संपन्न झाला आहे. त्यानिमित्ताने मोफत नेत्र चिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीर दि.१८/०८/२००६ ते २०/०८/२००६ याकालावधीत आयोजित केलेले आहे. शिबीरात नमूद केल्याप्रमाणे मोती

बिंदू, डायबेटीक रेटेनोपथी, रेटायनल डिचॅटमेंट, तिरळेपणा इ. आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्याचे अवाहन करण्यात आले आहे.

शिबीरास अनुसरून पहिल्या दिवशी जवळजवळ ९०० रूग्णांनी नेत्र तपासणीसाठी नावे नोंदणी केली आहे व त्यापैकी ४७० रूग्णांची तपासणी होउन ७५ रूग्णांना ॲडमिट करून त्यांच्यावर उपचार करण्यास सुरूवात झाली आहे त्यापैकी १९ शस्त्रक्रिया पूर्ण झालेल्या आहेत. अशाचप्रकारचा प्रतिसाद राहिल्यास नियोजित तीन दिवसांच्या कालावधीमध्ये सर्व रूग्णांवर उपचार करणे शक्य होणार नाही. शिबीर कालावधीत चिकित्सा होउन तातडीने उपचार व शस्त्रक्रिया करणे गरजेचे असलेल्या रूग्णांना शिबीर कालावधीनंतर दि. ३१ ऑगस्ट २००६ पर्यंत शिबीरांत चिकित्सा झालेल्या व वेळेअभावी उपचार व शस्त्रक्रिया न झालेल्या रूग्णांस मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस संस्थानचे रुग्णालयात दर शनिवार व रविवारी डोळ्याचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात यावे. त्यासाठी मुंबईच्या नेत्रज्योती रुग्णालयाचे सहकार्य घेण्यात यावे. या शिबीरात सहभागी होणाऱ्या रुग्णांस व त्याचे नातेवाईकास मोफत चहा व जेवण देण्यात यावे. तसेच रुग्णांचे शस्त्रक्रियेपोटी फक्त रुपये १००/- आकारण्यात यावे. तसेच संस्थानमार्फत कॅन्सर युनिट सुरु करुन या युनिटमध्ये ग्रामिण भागातील स्त्रियांना होणारे गर्भाशयाचे व स्तनाचे कॅन्सरचे दर शनिवार व रविवारी मोफत निदान करण्यात यावे . याकामी दोन व्हॅन विकत घेण्यात याव्यात.

त्याचप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल हे नगर-मनमाड या राजमार्गावर आहे. या मार्गावर वारंवार अपघात होतात. अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर उपचार झाल्यास त्यांचे प्राण वाचवू शकते. या करीता संस्थानमार्फत ट्रामा युनिट सेंटर सुरु करणेबाबत केंद्रशासनास प्रस्ताव सादर करावा अशा सुचना मा.अध्यक्ष महोदय यांनी दिल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल व वैद्यकीय अधिक्षका, यांनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापूढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल/वैद्यकिय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४. अकोले तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधीत लोकांना मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६७.**मा.श्री.मधुकरराव का.पिचड, विधानसभा सदस्य, अकोले यांनी दि. १८.०८.२००६ चे पत्रान्वये अकोले तालुक्यात या वर्षी अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे शेती, जनावरे, घरे, शाळा, रस्ते यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

आज या लोकांना गरज आहे ती रग, चादर, चटई व धान्याची तरी प्रत्येक कुटूंबाला १ क्विंटल (ज्वारी, बाजरी, गहू), १ रग, १ सोलापूर चादर, १ चटई अशाप्रकारची मदत करण्यात यावी. तसेच २०० घरांचे कौल उडून गेलेले असल्यामुळे त्यांना छत म्हणून ताडपत्र्या देण्यात याव्यात. सदरची मदत मा. तहसिलदार यांचे मार्फत बाधीत कुटूंबांना वाटप करण्यात येईल, असे कळविले आहे. बाधीत कुटूंबाचे यादीमध्ये कुटूंब संख्या १७,५९७ दर्शविलेली आहे. छत उडालेले घरांची संख्या २०० दर्शविलेली आहे.

**मागणी केलेल्या वस्तूंचा अंदाजे खर्च खालीलप्रमाणे:-**

| अ.नं. | वस्तूचे नाव | मागणी संख्या | प्रती नग अंदाजे किंमत | एकूण अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | धान्य | १७५९७ | रु. १०००/- (एक क्विंटल) | रु. १,७५,९७,०००/- |
| २ | रग | १७५९७ | रु. १५०/- प्रत्येकी | रु. २६,३९,५५०/- |
| ३ | चादर | १७५९७ | रु. १५०/- प्रत्येकी | रु. २६,३९,५५०/- |
| ४ | चटई | १७५९७ | रु. १००/- प्रत्येकी | रु. १७,५९,७००/- |
| ५ | ताडपत्री | २०० | रु. १०००/- प्रत्येकी | रु. २,००,०००/- |
| अंदाजे खर्च- दोन कोटी आठ्ठेचाळीस लाख पस्तीस हजार आठशे मात्र | | | | रु. २,४८,३५,८००/- |

वरीलप्रमाणे वस्तु द्यावयाच्या असल्यास रु. २,४८,३५,८००/- (रुपये दोन कोटी आठ्ठेचाळीस लाख पस्तीस हजार आठशे मात्र) अंदाजे खर्च येणार असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तरचर्चा होऊन, दिनांक ५.८.२००६ ते दिनांक १२.८.२००६ अखेर संपुर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने नद्यांना महापुर आलेले होते. प्रामुख्याने शिर्डी परिसरालगत गोदावरी, प्रवरा व मुळा या नद्यांना महापुर आल्याने नदीकाठची शहरे/गावे/वाड्या व वस्त्यांमध्ये महापुराचे पाणी शिरल्यामुळे तेथील रहिवाशांवर मोठी आपत्ती निर्माण झाली. त्यामुळे तेथील स्थानिक प्रशासनाने त्यांना सुरक्षित स्थळी हलविले.

अहमदनगर जिल्ह्यातील अशा पुरग्रस्त कुटूंबाला प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण १ लाख सोलापूरी चादरी संस्थानने खरेदी करुन द्याव्यात. सदरचे खरेदीकामी मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी अंतिम निर्णय घ्यावा. बाधित कुटूंबाची यादी मा. जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५. मुंबई खंडपीठ औरंगाबाद रिट नंबर ३९५१/२००५ उत्तमराव रंभाजी शेळके अर्जदार विरुद्ध दि स्टेट ऑफ महाराष्ट्र इत्यादी**

**निर्णय क्र.६६८.** उपरोक्त रिटपिटीशनचे कामकाज उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरगांबाद येथे चालू आहे जि.प.प्राथमिक शाळा संस्थानचे साईउद्यान इमारतीमध्ये स्थानांतरास करणेस यापूर्वी मनाई हुकूम देणेत आला होता. सदर मनाई उठविण्यात आली आहे. मुळ रिटपिटीशन अद्याप हायकोर्टात चालू आहे मुळ रिटपिटीशनमध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांना संस्थानसाठी पक्षकार केलेले आहे नव्याने दुरुस्ती अर्ज दाखल करुन संस्थानचे मा. विश्वस्ताना ही प्रतिवादी केले असून नव्याने काही मुद्यांचा समोवश केला आहे. तसेच प्रतिवादी ९ ते २० सन्माननीय विश्वस्तांना पक्षकार केले आहे.रिट पिटीशनरचे थोडक्यात खालीलप्रमाणे मुद्दे अर्जदाराने नमुद केलेले आहेत.

१) श्री साईबाबा संस्थानचे आद्य कर्तव्य साईभक्तांसाठी मुलभूत सोई सवलती ,पिण्यासाठी पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छता इ. व्यवस्था करण्याऐवजी संस्थान त्यांचे आर्थिक निधीतून शाळेची इमारत व दुकानदारांचे पुनर्वसन करण्यावर खर्च करीत आहे.

०२) मंदिराजवळ सध्या असलेल्या जि. पं. प्राथमिक शाळेत १२०० विद्यार्थी असून २१ वर्ग व २० तुकडा आहेत. तेथून शाळा शिर्डी येथील आरक्षित क्रं. ८ मध्ये शाळा हलविण्यात येणार असून शाळेच्या जागेवर व्यापारी संकूल उभारुन दुकानदारांचे पुर्नवसन करण्यात येणार आहे.

१६ x २० आणि ८ x २० फुटांच्या ४० खोल्या बांधण्यास शासकीय मंजूरी देण्यात आली आहे श्री साईबाबा संस्थान शाळेसाठी बांधकाम करीत आहे. त्याचप्रमाणे दुकान संकुलाचे काम करीत आहे.

०३) शिर्डी येथील सध्याचे जिल्हा परिषद शाळेचे स्थलांतर आरक्षण क्रमांक ८ मध्ये करुन प्रस्तुत जागेवर दुकान केंद्र करणेचे नियोजन आहे.

०४) शासन निर्णयाप्रमाणे शाळेसाठी ४० खोल्यांचे बांधकामास परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे पूर्तता करणेसाठी कार्यवाही चालू झाली असून भक्तांचे योजनेस मात्र फाटा दिलेला आहे. टपरीधारकाचे व्यवस्था करणेसाठी मा. व्यवस्थापन कमिटीने निर्णय घेतलेला आहे अतिशय जलदगगतीने व संबंधिताची परवानगी न घेता ही कार्यवाही चालू आहे.

०५) दि ०१/०९/२००४ चे सभेत याबाबत निर्णय घेणेत आलेला आहे त्याप्रमाणे जिल्हा परिषद शाळेचे स्थलांतर साईउद्यान इमारतीमध्ये करणेबाबतचा मा. श्री विखे पाटील यांचेकडून निर्णय झालेला आहे. रिटपिटीशनर अर्जदारास याबाबत कायदेशीर नोटीस पाठविणे भाग पाडले आहे.

०६) त्यानंतर संस्थानने मा. कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेने शाळेचे स्थलांतर करणेसाठी व दुकान बांधकाम करणेसाठी करारनामा केला आहे.

दिनांक १४/०८/२००२ व दिनांक १२/०४/२००५ चे शासन निर्णय प्रस्तुतचे रिट पिटीशनमध्ये दाखल करणेत आले असून सदर निर्णयास आवाहन दिले आहे.त्याचप्रमाणे संस्थानचे निर्णय क्र.४४७ दिनांक ३-५/१०/२००३ देखील दाखल असून त्यास अवाहन केले आहे.

संस्थानचे कायद्याप्रमाणे सेक्शन १७ (२) (१) चा विचार करता संस्थानचे योग्य ते कारभाराचे व्यवस्थापनाकडे लक्ष देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तसेच कलम १७ (१) प्रमाणे संस्थानची मालमत्ता शासनाचे परवानगी शिवाय १ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी भाडेपटयाने, विक्रीने अगर इतर प्रकारे संक्रमित करता येणार नाही अशी तरतुद आहे. परंतु दिनांक १२/०४/२००५ चा ठराव करतानाही याबाबत प्रकिया पाळणेत आलेली नाही अशा प्रकारचे रिट पिटीशनमध्ये मुद्ये नमूद केलेले आहेत.

संस्थानतर्फे आरक्षण क्रमांक ८ मध्ये शाळेचे बांधकाम हाती घेतले असून ८० % बांधकाम पूर्ण झाले आहे. जिल्हा परिषद अहमदनगर मार्फत दि १२/०७/२००६ रोजी बांधकामाची पहाणी देखील करणेत आलेली आहे. सदर इमारत जिल्हा परिषदेस हस्तांतर करणेसाठी शासनाकडे परवानगी मागणेत आलेली आहे. अद्याप प्रस्तुत परवानगी प्राप्त होणेवर आहे. नगरपंचायत , संस्थान व जिल्हा परिषद यांचे दरम्यान प्रस्तुत प्रकराी मिळकतीचे संदर्भात करारनामा व इतर पूर्तता मा. व्यवस्थापन मंडळाचे निर्णयाप्रमाणे होईल. अशी माहिती संस्थानचे ॲडव्होकेट मार्फत मा. कोर्टासमोर दाखल करता येईल असा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्त प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन, तसेच रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने जे दुरुस्ती परिच्छेद इत्यादी नमूद केला आहे. त्यावर मा. श्री. जंयत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा. श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा. श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांचे समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे दिनांक १६.०७.२००६ रोजीचे सभेत ठरले आहे.

उपरोक्त रिट पिटीशनचे संदर्भात काही मा. विश्वस्तांनी मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले असल्याचे समजले वरून सदर शपथपत्रांची प्रत प्राप्त करून घेणेत आली आहे. सदर शपथपत्र मा.श्री. डॉ एकनाथ भागचंद गोंदकर ,रिटपिटीशनमधील सामनेवाले क्रं. १९ रा. शिर्डी यांनी दाखल

कलेले असून रिस्पॉन्डट क्रमांक ११, १४, १९ यांचेही वतीने शपथपत्र केलेचे दिसून येते. सामनेवाले क्रमांक ११ श्री. प्रकाश रामचंद्र काळे, सामनेवाले क्रमांक १४ श्री. शैलेश श्रीहरी कुटे यांचे आहेत.

प्रस्तुतचे शपथपत्रामध्ये थोडक्यात खालील बाबी नमूद करणेत आलेल्या आहेत.

१) प्रस्तुत प्रकरणांत मा. कोर्टाचे आदेशाप्रमाणे विश्वस्तांना पक्षकार केलेले आहे. त्यामुळे केसचे स्पष्टतेसाठी शपथपत्र दाखल करणेत येत असल्याचे शपथपत्रात नमूद आहे.

२) शपथपत्र देणार हे रिट पिटीशनमध्ये पक्षकार असल्यामुळे संस्थानचे हिताचे दृष्टीने शपथपत्र केले आहे.

३) शासनाचे दिनांक १४/०८/२००४ तसेच दिनांक १२/०४/२००५ चे निर्णय रद्य करण्यासाठी तसेच प्रतिवादी नं ७ चा दिनांक ०१/०९/२००४ चा ठराव रद्य करणेसाठी रिट पिटीशन दाखल आहे.

४) शासनाचे दिनांक १४/०८/२००२ चा ठराव योग्य आहे संस्थानचे हिताची जपणूक त्यामुळे झालेली आहे. सदर निर्णयाप्रमाणे संस्थानने मोठी रक्कम खर्च करुन आरक्षण क्रमांक ८ मध्ये प्राथमिक शाळेचे बांधकाम केलेले आहे. त्याबाबतचा नकाशा रिट पिटीशन नं ४५ वर आहे परंतु संस्थानचे नावाने जिल्हा परिषद शाळेचा ठराव संस्थान हिताचा आहे. हस्तांतराचे काम झालेले नाही दिनांक १४/०८/२००५ त्याची बजावणी सक्त रितीने व्हावी. सध्याचे जिल्हा परिषदेची शाळा भक्तांचे हिताचे दृष्टीने संस्थानचे ताब्यात मिळाले शिवाय नव्याने बांधण्यात आलेल्या जागेत जिल्हा परिषद शाळेचे हस्तांतर होणे न्याय नाही.

५) योग्य ते कायदेशीर कार्यपध्दतीचे पालन केल्याशिवाय जिल्हा परिषद शाळेचे नगरपंचायतीकडे हस्तांतर करता येणार नाही. जिल्हा परिषद शाळेसाठी संस्थानचा निधी वापरता येणार नाही.

६) आरक्षण क्रंमाक ८ मधील काही भू संपादन होणार आहे. रस्त्यावर अतिक्रमण आहे दिनांक ०५/०१/२००६ रोजी श्री. वामन गोंदकर यांना भू संपादनाचे नोटीस प्राप्त झाली आहे. त्यामुळे तिथे जिल्हा परिषद शाळा सुरु करणे अवघड आहे.

०७) संस्थानचे विश्वस्त नात्याने प्रस्तुतची परिस्थिती संस्थानचे निदर्शनास आणलेली आहे. डॉ. ए.बी. गोंदकर यांनी या संदर्भात मा. अध्यक्ष यांना १२/०३/२००५ चे पत्राची प्रत निशाणी नं आर १ म्हणून जोडली आहे.

०८) सध्या सर्व जगातून शिर्डी येथे साईभक्त येत असतात. दिवसेंदिवस भक्तांचे संख्येत वाढ होत आहे. संस्थान भक्तांचे सेवेसाठी मोकळया जागा विकत घेत आहे. याबाबतचा विचार केल्यास आरक्षण क्रमांक ९, १० मधील मंदिराचे जवळची जागा संस्थानला शासनाचे १४/०८/२००२ चे निर्णयाप्रमाणे दिलेस भक्तांचे फायद्याचे व सुरक्षिततेचे होईल. सध्याचे जिल्हा परिषदेचे जागेशिवाय दुसरी जागा पुढील विकासाचे दृष्टीने नाही.

०९) सध्या सिमी संघटनेने पत्र पाठवून संस्थानला त्यांचे गुन्हेगारी कारवाई बाबत धमकी दिली आहे. सुरक्षा यंत्रणेची वाढ केली आहे. याबाबतचा विचार करता आरक्षण क्रमांक ९, १० जागा ( सध्याचे जिल्हा परिषदेची ) रिकामी ठेवणे योग्य आहे.

संस्थानचे हिताचे दृष्टीने जिल्हा परिषदेची शाळा संस्थानकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. संस्थानचे विश्वस्त समितीचे संरक्षण असल्यामुळे त्यांचे हिताचे रक्षण व्हावे असे शपथपत्रात शेवटी म्हटलेले आहे.

दिनांक १६ /०७/२००६ रोजी उपरोक्त रिट पिटीशनचे संदर्भात चर्चा होऊन तसेच रिट पिटीशनमधील अर्जदारांने केलेल्या दुरुस्तीचे संदर्भात ( परिच्छेद ८ मधील दुरुस्ती ) यावर चर्चा होऊन मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा. श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा. श्री . राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांचे समितीने अंतिम निर्णय घ्यावा अशा आशयाची चर्चा झालेली आहे.

आता संस्थानचे मा. डॉ. गोंदकर, विश्वस्त यांनी तपशिलात दिलेले शपथपत्र दाखल केलेले आहे.

संस्थानने भक्तांचे सोईसाठी निवासी खोल्या, प्रसादालय इमारत,रथपालखी रस्ता असे कामे घेतली आहे. आरक्षण क्रमांक ८ मध्ये प्राथमिक शाळेचे काम जवळजवळ पूर्णत्वास आले आहे. आज रोजी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या जागेवर कोणत्याही बांधकामासाठी खर्च करण्याचा संस्थानचा प्रस्ताव नाही, शाळेचे बांधकाम करण्यापूर्वी मा. सहाय्यक धर्मादाय, आयुक्त मुंबई यांची परवानगी संस्थानने घेतली आहे. तसेच प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मत्रांलय ,मुंबई यांचेकडे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद शाळा हस्तांतरीत करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. इ. बाबी विचारात घेऊन प्रकरणी यापूर्वीच्या ठरावाप्रमाणे प्रकरणी नेमण्यात आलेल्या मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष व मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांचे समितीमार्फत अंतिम निर्णय घेता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६.** **Lap Top खरेदीबाबत**

**निर्णय क्र.६६९.** दि.०३.०६.२००६ रोजी आयोजित मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२ मधील निर्णय क्र.३२८/ १२ अन्वये मा.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांचेकरिता लॅपटॉप खरेदी

करणेकामी रु.७५,०००/- मात्र चे खर्चास मान्यता मिळून सदर लॅपटॉप मशीन (संपूर्ण संचासह) खरेदी करणेकामी कोटेशन्सची मागणी केली होती, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे पाच कोटेशन्स प्राप्त झाली होती.

01. Sai Seva Services, Shirdi.
02. Hi-Tech Computer Services, Aurangabad.
03. Real Computer, Shirdi.
04. Allied Digital Services Ltd., Mumbai.
05. Sai Info System, Ahmedabad.

सदर कोटेशन्स दि.०९.०८.२००६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात समक्ष उघडली असता कोटेशन्स धारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | किंमत (रु.) |
|---|---|---|
| 1 | Sai Seva Services, Shirdi. | 69,000/- |
| 2 | Hi-Tech Computer Services, Aurangabad. | 56,000/- |
| 3 | Real Computer, Shirdi. | 61,300/- |
| 4 | Allied Digital Services Ltd., Mumbai. | 64,580/- |
| 5 | Sai Info System, Ahmedabad. | 69,000/- |

उपरोक्त कोटेशनमध्ये आपले मागणीप्रमाणे आयबीएम कंपनीचे अद्ययावत P४ किंवा त्यापेक्षा वरील आवृत्तीचे लॅपटॉप मशीन Allied Digital Services Ltd., Mumbai. या कंपनीने पुरविणेची तयारी दाखवुन त्यात पुढीलप्रमाणे मशीनबाबतची माहिती सविस्तरपणे विशद केलेली आहे.

Make Lenovo 3000 N 100 (06895KA IBM)
Intel Cenrino 1.66 GHz, 2Mb L2 Cache, 667 Mhz
FSB Duo Processor, Intel 945 Gm Chipset +
DVD CD/RW Combo Drive
512 MB PC2 5300 DDR II SDRAM @ 667 MHz
80 GB Sata 5400 rpm HDD
14.1 WXGA TFT

Interated Wireless Connection
802.11 a/b/g
4-in-1 media card reader, 6 cell
battery, Integrated finger print
reader, Integrated Camera,
Bluetooth, Windows XP Home

असे तपशिलवार विवरण इतर कोणत्याही कोटेशन्स धारकांनी आपले कोटेशनमध्ये दिलेले नाही तसेच सदर लॅपटॉप बरोबर असलेले साहित्य अंदाजे रु.१५,०००/- किमतीइतके आहे. यापुर्वीही Allied Digital Services Ltd., Mumbai ही कंपनी आपल्याला योग्य सेवा देत आहे, असे समजते. या कंपनीद्वारेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नेटवर्किंग, संगणक संच व इतर साहित्याची खरेदी केलेली आहे.

इतर कंपनीचे संगणक तपशील हया कंपनीच्या तपशिलापेक्षा कमी व असता तरी आपणाला पाहिजे असे लॅपटॉप Allied Digital Services Ltd., Mumbai हया कंपनीचे आहे. तसेच त्याची यापुर्वी संस्थानला दिलेली/ देत असलेली सेवा समाधानकारक असल्याने या कंपनीकडून सदर मशीन खेरदीचा पुरवठा आदेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख/वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३७.** **संस्थानचे मंदीर परिसरातील एस.टी. अॅडव्हान्स तिकीट बुकींग काऊंटर मंदीर परिसराच्या बाहेर हलविणेबाबत व इतर ठिकाणी एस.टी.अॅडव्हान्स तिकीट बुकींग कामी गाळा देणेबाबत.**

**निर्णय क्र.६७०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३८.** **संस्थानने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या मौजे निमगांव - कोऱ्हाळे ता. राहाता हद्दीतील जमिनीसाठी रस्ते विकसीत करणेसाठी निधी वर्ग करणेबाबत.**

**निर्णय क्र.६७१.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) यांनी मौजे निमगांव ता. राहाता हद्दीतील ४५ हे ७९ आर जमिनीचा ताबा महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून भूसंपादनाचे माध्यमातून घेतला आहे. सदर जमिनीवर संस्थान उपयोगी विविध विकास प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावीत आहे. याकारीता सदरहू परिसरातील रस्ते विकसीत करणे अत्यंत आवश्यक होते.

उपरोक्त रस्ते विकसीत करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४ मधिल कलम २१, पोट कलम (२) अन्वये शासनाची पूर्व मंजुरी/ मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/बांधकाम/१०५४७/२००५ दि. २२/०९/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००६/१३९/ (१३)/ का.१६ मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक ०३/०८/२००६ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी ) अधिनियम, २००४ मधील कलम २१ (२) (क) व २१ (२) (ग) मधील तरतुदी नुसार तसेच खालील अटींस अधीन राहून एक विशेष बाब म्हणून शासनाने खालीलप्रमाणे एमूण रुपये १,०४,०२,८९७.०० मात्र इतक्या रकमेच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नांव | अंदाजित खर्च रुपये |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी निमगांव शीव रस्ता नगर-मनमाड रस्ता ते<br>गट नं. ८७-८८ | ६,८४,१२३/- |
| ०२ | नगर-मनमाड ते् गोदावरी उजवा कालवा चारी नं.११ लगतचा रस्ता | ३१,८४,८४२/- |
| ०३ | नगर-मनमाड ते गोदावरी उजवा कालवा गट नं. २२१ व २४५ लगतचा रस्ता | ३५,७१,४१४/- |
| ०४ | शिर्डी - कनकुरी ते चर रस्ता<br>(गट नं. १९८,१९९,२०० व २०१ लगत ) | २९,६२,५१८/- |
| | एकूण रुपये | **१,०४,०२,८९७/-** |

(अक्षरी रुपये एक कोटी चार लक्ष दोन हजार आठशे सत्त्याण्णव फक्त )

०१)उपरोक्त काम अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजीत खर्चापेक्षा जास्त न होण्याची, दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर बांधकाम, संबधीत सार्वजनीक बांधकाम विभागामार्फत करवून घेण्यात यावे.

०२)सदर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या सन २००६-०७ च्या विश्वस्तनिधीतून खर्ची टाकण्यात यावा व याचा तपशिल त्या वर्षीच्या वार्षिक अहवालात देण्यात यावा.

०३)उपरोक्त नमूद कामे विहीत मुदतीत पूर्ण होतील हे संस्थानचे कार्यकारी अधिकारी यांनी पहावे तसेच त्यांनी याबाबतचा प्रगती अहवाल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडून प्राप्त करुन शासनास पाठविण्यात यावा.

वरील प्रस्तावित चार रस्त्यांपैकी अ.नं.१ आणि अ.नं.३ अशा दोन रस्त्यालगत संस्थानचे अनुक्रमे नविन प्रसादालय आणि वर्ग-४ कर्मचारी निवासस्थाने या इमारतींची कामे प्रगतीपथावर आहेत. सध्या पावसाळ्यामुळे या रस्त्यावर चिखल झालेला आहे. सदरहू साईटवर ठेकेदार यांना स्टील, वाळु, खडी, सिमेंट इत्यादी अवजड मटेरीयलची ने-आण करण्यासाठी अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीची बाब म्हणून सदर रस्त्यांचे काम दि.०३/०६/२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.४०४ नुसार प्रस्तावित चार रस्त्यांचे कामापैकी वरीलप्रमाणे दोन रस्त्यांची कामे ठेकेदार मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव यांचेकडून त्यांचे मंजुर निविदादरानुसार डांबरीकरण करुन घेणेस व त्यासाठी येणारे योग्य खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/बांधकाम/९०४६/२००६ दि.१०/०७/२००६ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| S. No. | Description of Roads | Estimated Cost (Rs) |
|---|---|---|
| 01 | Nagar- Manmad road to Gut No. 87 & 88.<br>Length- 440.00M. Width- 3.70M | 6,84,123.00 |
| 02 | Nagar- Manmad road to Canal road<br>(along char- Sai Prasad Hsg. Socy. Road)<br>Length- 495.00M. Width- 3.70M | 7,56,965.00 |
| | **Total Rs.** | **14,41,088.00** |
| | **Less tender percentage 0.07% below** | **1,009.00** |
| | **Contract value Rs.** | **14,40,079.00** |

सदर रस्त्यांपैकी शिर्डी-निमगांव शिव रस्त्यावर मुरुम फिलींगचे काम झाले आहे आणि पुढील काम सध्या बंद आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार ठेकेदार मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव यांना झालेल्या कामाचे बिल अदा करुन त्यांचा कार्यादेश रद्द करता येईल व रु.१,०४,०२,८९७/- या रकमेतून ठेकेदार यांचे झालेल्या बिलाची रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम शासन निर्णयानुसार मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडे वर्ग करता येईल.

**अथवा**

मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव यांना दिलेल्या कार्यादेशानुसार वरीलप्रमाणे दोन रस्त्यांची कामे ठेकेदार यांचेकडून करुन घेवून रु.१,०४,०२,८९७/- या मंजुर रकमेतून ठेकेदार यांचे झालेल्या बिलाची रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, अहमदनगर यांचेकडे वर्ग करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे.पॅसो इंजिनिअर्स,ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांनी केलेल्या मुरुम फिलींगचे कामासाठी झालेले सुमारे रुपये ७४,६५७.०० मात्र खर्चाचे बिल त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच ठेकेदार यांनी उपरोक्त रस्त्यांचे कामासाठी संस्थानकडे जमा केलेली बयाणा रक्कम त्यांना परत करुन उर्वरित कामाचा कार्यादेश रद्द करणेत यावा असे ठरले. त्याप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रस्तावित रस्त्यांची कामे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करुन घेणेसाठी अंदाजित खर्चाचा निधी एकूण रुपये १,०४,०२,८९७.०० मात्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९. श्री रावसाहेब मल्हारी सोनवणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, को-हाळे,ता.राहाता यांचा शिधा मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.६७२.** खाली दर्शविलेल्या ग्रामपंचायतीने मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी याना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री रावसाहेब मल्हारी सोनवणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, को-हाळे, ता. राहाता,जिल्हा अहमदनगर | मौजे को-हाळे भांबारे मळा येथे अखंड हरिनाम सप्ताह, दि.१७/०८ ते दि.२४/०८/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.१०,०००/- | मा.अध्यक्ष यांची शिफारस. |

आजतागायत संस्थान मार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री रावसाहेब मल्हारी सोनवणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, को-हाळे, ता. राहाता , जिल्हा-अहमदागर यांनी पहिल्यांदाच शिधास्वरुपाची मदत मागितलेली आहे.प्रस्तावित प्रकरण " ग्रॅंट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधियिम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे. तरी श्री रावसाहेब मल्हारी सोनवणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, को-हाळे, ता. राहाता , जिल्हा-अहमदनगर यांचे मौजे को-हाळे भांबारे मळा येथे अखंड हरिनाम सप्ताह, दि.१७/०८ ते दि.२४/०८/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी रु. १०,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही -प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मदत व पुनर्वसन पथकाची स्थापना करणेबाबत.**

**निर्णय क्र.६७३.** मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक १८.८.२००६ चे पत्रान्वये नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मदत व पुनर्वसन पथकाची स्थापना करणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर केला होता.

त्याची दखल घेऊन, आपत्ती निवारण कक्षाच्या स्थापनेची रुपरेषा अद्याप निश्चित झालेली नसली, तरी पुरात अडकलेली माणसे बाहेर काढणेकरिता परिसमन मंडळ, जिल्हाधिकारी व लष्करी केंद्र यांचे मार्गदर्शनाखाली अशा आपत्तीवेळी मदतीसाठी संस्थान कर्मचाऱ्यांना खास प्रशिक्षण देऊन दोन मोटार बोटी, दोन फायबर बोटी व इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१. टेम्पल मिट घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६७४.** देशातील सर्व देवस्थानांचे टेंम्पलमिंट सिध्दी विनायक ट्रस्ट, मुंबई यांचे वतीने गेल्या वर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर संस्थानचे वतीने सर्व देवस्थानांचे टेम्पलमींट येत्या डिसेंबर,२००६ मध्ये शिर्डी येथे भरविण्यात यावे. तसेच सर्व साईभक्तांचे भव्य संमेलन शिवाजीपार्क दादर येथे भरविण्यात यावे. त्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट ग्रुपची नेमणूक करण्यात यावी. याकामी संस्थानचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करुन समितीने आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले . (कार्यवाही-सर्व प्रशासकीय अधिकारी/मंदिर विभागप्रमुख/आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२. सर्व्हे नंबर ५४ पै व सर्व्हे नंबर ५५ पै मधील जमिनी खरेदीबाबत**

**निर्णय क्र.६७५.** ०१.मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक १०८ अन्वये सौ. पूजा प्रतापराव जगताप, सौ. कमल गोपीनाथ म्हस्के, श्री. सोमनाथ म्हाळू काटकर, श्री. भाऊसाहेब म्हाळू काटकर व इतर खातेदारांच्या जमिनी खरेदीबाबत निर्णय झालेला आहे.

०२.मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयांन्वये, सौ. जगताप, सौ. म्हस्के, श्री. सोमनाथ काटकर व श्री.भाऊसाहेब काटकर यांचे जमिनी खरेदीबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली. दरम्यानचे काळात, सर्व्हे नंबर ५४ पै मधील खातेदारांनी उपरोक्त जमिनीतून जाणे-येणेसाठी रस्ता मिळावा, म्हणून दिनांक १८ जुलै, २००७ रोजी अर्ज केलेला आहे. तसेच सर्व्हे नंबर ५५ पै मधील खातेदारांनी दिनांक ११ ऑगष्ट, २००६ रोजी वकिलामार्फत नोटीस पाठविलेली आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | रोहिणी भाऊसाहेब तुरकणे | ५४/३५ | ००-०२-०० |
| ०२ | मंगेश भाऊलाल राजपूत | ५४/३५ | ००-०१-०० |
| ०३ | संतोष धरमसिंग मेहर | ५४/३५ | ००-०१-०० |
| ०४ | मंदा सुकदेव गुजर | ५४/३५ | ००-०१-५० |
| ०५ | पोपट अंबादास काटे | ५४/३५ | ००-००-५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | चित्रा उर्फ वृषाली विश्वनाथ गायकवाड | ५४/३५ | ००-०१-०० |
| ०७ | विमल छगनराव कुमावत | ५४/३५ | ००-०१-०० |
| ०८ | जमना कैलास रजपूत | ५४/३५ | ००-००-५० |
| ०९ | सरला मंगलसिंग रजपूत | ५४/३५ | ००-०१-०० |
| १० | भाऊसाहेब चांगदेव कोकाटे | ५५/१५ | ००-०२-०० |
| ११ | संजय शंकर देशमुख | ५५/१५ | ००-०२-०० |
| १२ | वसंत आनंदराव घुगे<br>पुष्पलता अशोकराव आव्हाड | ५५/१५ | ००-०४-०० |
| १३ | नंदु पोपटराव जाधव<br>सदाशिव निवृत्ती केदार<br>सुभाषचंद्र भिकचंद लोढा<br>सयालाल भिकचंद लोढा | ५५/१५ | ००-०५-०० |

सर्व्हे नंबर ५४ पै व ५५ पै मधील सौ. जगताप व इतर ३ यार्चे खरेदीखत करणेपुर्वी उपरोक्त खातेदारांनी केलेल्या अर्जानुसार, रस्त्याचा प्रश्न सोडविणे आवश्यक असल्याने संबंधीत खातेदारांची बैठक दिनांक १६ ऑगष्ट, २००६ रोजी दुपारी ०१ वाजता मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बोलविण्यात आली होती.

०३. मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात झालेल्या या बैठकीस संस्थान अधिकारी, संस्थान वकील ॲड. जे.के.गोंदकर, मूळ जमीनमालक श्री. सोमनाथ काटकर, श्री. भाऊसाहेब काटकर, सौ. जगताप, सौ.म्हस्के यांचे प्रतिनिधी श्री. प्रतापराव जगताप, श्री. गणपत गोंदकर तसेच उपरोक्त संबंधीत सर्व खातेदार उपस्थित होते.

०४. उपरोक्त खातेदारांपैकी फक्त ०४ खातेदारांनीच त्याचे जमिनीत घरे बांधलेली आहेत. त्याचा तपशील पुढील प्रमाणे :

०१. मंदा सुकदेव गुजर ०२. सरला मंगलसिंग रजपूत

०३. संतोष धरमसिंग मेहर ०४. पोपट अंबादास काटे

०५. बैठकीत सर्वप्रथम मा.कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त सर्व्हे नंबर मधील जमीन बेघरांसाठी घरे व क्रिडांगणासाठी आरक्षित असल्याचे सांगितले. संस्थान प्रसादालयाजवळील लक्ष्मीनगर वसाहतीची जागा विकास कामांसाठी घेणार असल्याने, या वसाहतीतील बेघर होणारे नागरीकांसाठी घरे बांधणेकामी उपरोक्त सर्व्हे नंबर ५४ व ५५ मधील जागा विकत घेत आहे, असे स्पष्ट केले. तसेच सर्व्हे नंबर ५४ मध्ये बेघरांसाठी घरे यासाठीच आरक्षीत असल्याने त्याच कामासाठी त्या जमिनीचा उपयोग होणार आहे. भविष्यात या जागी संस्थानमार्फत घरांचे बांधकाम होणार असल्याने, अंतर्गत रस्ते तयार होणार आहेत. त्यामुळे या सर्व्हे नंबर मधील इतर खातेदारांना आपोआप त्यांचे जागेत जाणेसाठी, वापरासाठी मिळणार आहेत, असे स्पष्ट केले.

०६. तसेच, श्री. गणपत कारभारी गोंदकर यांचे सर्व्हे नंबर ५५/३ व ५५/८ मधील ५६ आर क्षेत्रही खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्याअनुषंगाने, श्री. गणपत कारभारी गोंदकर यांनी या क्षेत्रात त्यांचा पारंपारिक व्यवसाय (पिठाची गिरणी) असल्याने, व्यवसायासाठी ०५ आर जागा ठेवावी असा अर्ज केला होता. परंतु ०५ आर जागा श्री. गोंदकर यांना ठेऊन, उर्वरित क्षेत्राचा व्यवहार तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यामुळे करता येणार नाही, संपूर्ण क्षेत्र संस्थानला खरेदी द्यावे लागेल, असे त्यांना कळविणेत आले होते. त्यानंतर श्री. गोंदकर यांनी श्री. काटकर, सौ. जगताप, सौ. म्हस्के यांचेशी तडजोड करुन, श्री. काटकर यांचे सर्व्हे नंबर ५५/१३ मधील ०१ आर जागा पारंपारीक व्यवसायासाठी (पिठाची गिरणी) विकत घेण्याचे ठरवून, त्यानुसार त्या जागेचे साठेखत व ताबा घेतलेला आहे. मात्र या जागेत जाणेसाठी संस्थान त्यांचेकडून खरेदी करणार असलेल्या सर्व्हे नंबर ५५/८ या क्षेत्रातून त्यांचे सर्व्हे नंबर ५५/१३ मधील क्षेत्रात जाणे-येणेसाठी वाग मिळावा, असे त्यांनी चर्चेत सांगितले. त्यानुसार त्यांना संस्थान खरेदी करणार असलेल्या क्षेत्रातून, वर निर्देशीत केल्याप्रमाणे, जे अंतर्गत रस्ते तयार होणार आहेत त्यावरुन जाणे-येणेस काही हरकत नाही, असे स्पष्ट केले.

खालील बाबतीत निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

०१. श्रीमती रोहिणी भाऊसाहेब तुरकणे व इतर १२ खातेदारांनी सर्व्हे नंबर ५४ व ५५ मध्ये जागा विकत घेतलेली आहे. त्यांना पिंपळवाडी रस्त्याला जाणे-येण्यासाठी संस्थान विकत घेत असलेल्या सर्व्हे नंबर ५४ व ५५ ( आरक्षण क्रमांक २३ व २५चा ) ले-आऊट करुन जे अंतर्गत रस्ते राहतील ते सार्वजनिक रस्ते असतील त्यामुळे सदर रस्त्याचा उपभोग सर्वांसाठी खुला राहिल.

०२. श्री. गणपत कारभारी गोंदकर यांना सर्व्हे नंबर ५५/१३ मध्ये जाणे-येणेसाठी सर्व्हे नंबर ५५/८ मधुन वाग देणेस हरकत नाही. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३. भूसंपादनाबाबत.**

**निर्णय क्र.६७६.** **(अ)**मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट क्रमांक ८० पैकी, ८९, ९०, ९७ ते ११७, १६४ ते १६८ पैकी, १७४ ते १७९, १८२, १८५, १८७, १९५ ते १९७, २०२ ते २०६ या विविध गट क्रमाकांतील अंदाजे एकुण क्षेत्र ७५ हेक्टर २० आर जमीन भू-संपादनाने घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता

दिनांक ०१ एप्रिल, २००६ चे सभेतील निर्णय क्रमांक २३३ नुसार मिळालेली आहे. त्यानुसार भूसंपादन प्रस्तावासाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे संकलित करण्यात आलेली आहेत.

आता, मौजे निमगांव को-हाळे येथील उपरोक्त गट क्रमांकांचा भू संपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे सादर करावयाचा असून, त्यात भूसंपादन ज्या प्रयोजनार्थ, कारणासाठी करावयाचे आहे, ते नमूद करणे आवश्यक आहे.

उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार, मौजे निमगांव को-हाळे, तालुका राहाता येथील जमीनीचे भूसंपादन साईभक्तांसाठी निवासस्थाने, संस्थान कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, बहुउद्देशीय प्रेक्षागृह, म्युझियम, आध्यात्मिक ध्यानकेंद्र, वृध्दाश्रम, भोजनालयासाठी वाहनतळ, भक्तासांठी उद्याने व इतर मुलभूत सेवा-सुविधा निर्माण करणेच्या प्रयोजनार्थ करण्यात यावे, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जुन, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४०७ अन्वये श्री.प्रताप शंकरराव जगताप व धनंजय शंकरराव जगताप,शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील स.नं. १५४,१५५,१५६ व १५८ भू क्षेत्र ८ हेक्टर ९० आर जमिन भू-संपादनाने घेणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे.

" .. .. .. मौजे शिर्डी येथील श्री. प्रताप शंकरराव जगताप व श्री. धनंजय शंकरराव जगताप, त्यांच्या जमिनी सर्व्हे नं. १५४/१, १५६/८, १५८/२, १५५ व १५६/७ क्षेत्र ८ हे. ९० आर. जमीनी हया संस्थानच्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, साईभक्तांच्या सोयीसाठी तसेच संस्थानच्या विविध लोकोपयागी कामासाठी उपयुक्त असल्याने भुसंपादनाच्या माध्यमातून कन्सेंट अॅवार्डने घेणेत यावी, असें ठरलें."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे :**

" .. .. .. मौजे शिर्डी येथील श्री. प्रताप शंकरराव जगताप व श्री. धनंजय शंकरराव जगताप, त्यांच्या जमिनी सर्व्हे नं. १५४/१, १५६/८, १५८/२, १५५, १५६/७ व १५८/१ क्षेत्र ८ हे. ९० आर जमीनी हया संस्थानच्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, साईभक्तांच्या सोयीसाठी तसेच संस्थानच्या विविध लोकोपयागी कामासाठी उपयुक्त असल्याने भुसंपादनाच्या माध्यमातून कन्सेंट अॅवार्डने घेणेत यावी, असें ठरलें."

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४. मौजे वावी, तालुका सिन्नर येथे पालखी थांब्यासाठी जमीन घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७७.(अ)**मा.सरपंच, ग्रामपंचायत वावी यांनी दिनांक २२ जून , २००६ रोजी वावी येथे श्री साई भक्तांच्या पालखी थांब्यासाठी ०१ एकर ३७ गुंठे जागा देणार आहोत असे समक्ष सांगितले आहे. सदरची जागा दिनांक २७-०६-२००६ रोजी श्री एस.के.जगताप, प्रशासकिय अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी पाहिलेली आहे. जागा बक्षिसपत्राने घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी, नाशिक / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची परवानगी घेणेत येत आहे.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. मौजे वावी येथील मिळकत वावी ग्रामपंचायत नंबर २२१ मधील १ एकर ३७ गुंठे जागा बक्षिस पत्राने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

०२. सदर जागा बक्षिसपत्राने मिळविणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी, नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेशी तसेच सरपंच वावी यांचेशी पत्रव्यवहार करणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

०३. सक्षम अधिकाऱ्याची परवानगी मिळाल्यानंतर, संस्थान वकिलांकडून बक्षिसपत्र तयार करुन घेणेस, बक्षिसपत्र नोंदणी करणेबाबत मुद्रांक व नोंदणी शुल्क, बक्षिस पत्र व इतर कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मंजुरीचा निर्णय होणेस विनंती.

**(ब)** श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा, रा. वावी यांनी खाली नमुद केलेल्या जमिनीपैकी त्यांचे हिश्श्याची एक एकर जमीन विकत देणेबाबत दिनांक १७ ऑगष्ट, २००६ रोजी प्रस्ताव दिलेला आहे.

| अ.नं. | खातेदाराचे नांव | गट नंबर | एकूण क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | अर्जदाराच्या हिश्श्याचे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा | ७१६ | ००-५१-००<br>००-१६-०० पोटखराबा | ००-२६-००<br>००-०८-०० पोटखराबा |
| | | | ००-६७-०० | ००-३४-०० |
| ०२ | श्री. कन्हैयालाल लक्ष्मीनारायण भुतडा<br>श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा | ७०९ | ०१-५६-००<br>००-०२-०० पोटखराबा | ००-७८-००<br>००-०१-०० पोटखराबा |
| | | | ०१-५८-०० | ००-७९-०० |

सदर जमीनीची पाहणी श्री. सु.कि.जगताप, प्रशासकीय अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी केलेली आहे. वर नमुद केलेल्या जमिनीच्या ७/१२ चे अवलोकन केल्यावर खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

०१. गट नंबर ७१६ मध्ये इतर हक्कात, (१) सोसायटीचा बोजा आहे.

(२) महार लोकांस पाणी पिण्याकरीता विहीर आहे.

चेअरमन, वावी वि.का.सोसायटी यांचेकडून कर्जाबाबत माहिती मागविण्यांत येत आहे. तसेच महार लोकांस पाणी पिण्याकरीता विहीर असा शेरा आहे. पिक पहाणीत सदर विहीरीची नोंद रामदास मल्हारी यांच्या नांवासमोर दिसते. यावरुन श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा यांचा संबंध दिसत नाही. तथापी याबाबत खात्री करुन घेण्यात येत आहे.

०२. गट नंबर ७०९ मध्ये इतर हक्कात, (१) सोसायटीचा बोजा आहे.

सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर श्री. कन्हैयालाल लक्ष्मीनारायण भुतडा व श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा यांच्या सामायिक मालकीची आहे. जमिन खरेदी करतांना श्री. कन्हैयालाल लक्ष्मीनारायण भुतडा व श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा या दोघांची संमती आवश्यक आहे, मात्र श्री. कन्हैयालाल लक्ष्मीनारायण भुतडा यांचा अर्ज नाही.

सदरची जागा मुंबईवरुन शिर्डी येथे पदयात्री साईभक्तांकरीता पालखी थांबा बांधणेसाठी उपयुक्त आहे.

श्री.राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा यांनी दोन्ही गट मिळून (गट नंबर ७०९ व ७१६) ४० आर जमीन विकत देणार आहेत, असे अर्जात नमुद केले आहे. म्हणजे गट नंबर ७१६ मधील ३४ आर व गट नंबर ७०९ मधील ०६ आर जमीन मिळून ४० आर जमीन देणार आहे, असे दिसते. गट नंबर ७०९ मधील ०६ आर जमिनीबाबत तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द व्यवहार होत असल्याने त्याचे खरेदीखत मा.दुय्यम निबंधक, सिन्नर हे नोंदविणार नाहीत. त्यामुळे ०६ आर जमीन खरेदी करता येणार नाही. गट नंबर ७०९ ही जमीन बागायत असल्याने २० आर जमीन विकत घ्यावी लागणार आहे.

गट नंबर ७०९ व गट नंबर ७१६ मधील अर्जदाराची जागेची पाहणी करुन त्या संलग्न आहेत किंवा कसे याबाबत संस्थानच्या मोजणीदारांमार्फत मोजणी करुन खात्री करण्यात येत आहे.

मौजे वावी येथील गट नंबर ७०९ किंवा गट नंबर ७१६ या मधील कमीत कमी ४० आर जमीन खरेदी करणे इष्ट राहील.

अर्जदार यांनी ४० आरला रक्कम रुपये ३,००,००/- (अक्षरी तीन लाख मात्र) मागणी केलेली आहे. याबाबत वाटाघाटीने जमिनीची किंमत ठरविणे आवश्यक राहील.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. मौजे वावी येथील गट नंबर ७१६ किंवा ७०९ मधील श्री. राजेंद्र लक्ष्मीनारायण भुतडा यांची जमीन ०० हेक्टर ४० आर खरेदी करणे.

०२. गट नंबर ७०९ मधील ४० आर जमीन खरेदी करतांना संयुक्त खातेदार श्री. कन्हैयालाल लक्ष्मीनारायण भुतडा यांची संमती घेऊन जमीन खरेदी करणे.

०३. जमीन खरेदीबाबत निर्णय झाल्यास, मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेपुढे जमिनीच्या किंमती वाटाघाटीने ठरविणसाठी अर्जदारांना बोलविणेबाबत.

०४. उपरोक्त जमिनीच्या खरेदीबाबत मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क यासह सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणेस येणारा खर्च संस्थानमार्फत करणेस मान्यता मिळणेबाबत.

**(क)** (१)श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे उपाध्यक्ष मा.श्री. शंकररावजी कोल्हे साो. यांनी त्यांचेकडील दिनांक १२ जुलै,२००६ रोजीच्या पत्राने श्री.ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर यांची मौजे वावी येथील गट नंबर १६/१ मधील क्षेत्र ०१ हेक्टर ७४ आर विकत घेणेबाबत फेरविचार करणेबाबत कळविलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७२ खालीलप्रमाणे झालेला आहे :

".. क) वावी येथील श्री.ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर आज सभेपुढे उपस्थित होते. त्यांना दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली. शासकीय मूल्यांकनाचे दर फारच कमी आहेत. रु.११.०० लक्ष इतक्या रक्कमेस सदर जागेची मागणी दुसऱ्या ग्राहकांनी केली आहे. परंतू संस्थानला आग्रक्रमाने जागा देत आहोत असे सांगितले.

याबाबत साधक-बाधक चर्चा होऊन, सदर जागा रुपये ११.०० लक्ष इतक्या किमतीस खरेदी करणेचे ठरलें. "

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १८० खालीलप्रमाणे झालेले आहे :

".. (०३) निर्णय क्र.१७२ (क) मध्ये -क) वावी येथील श्री.ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर आज सभेपुढे उपस्थित होते. त्यांना दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली. शासकीय मूल्यांकनाचे दर फारच कमी आहेत. रु.११.०० लक्ष इतक्या रक्कमेस सदर जागेची मागणी दुसऱ्या ग्राहकांनी केली आहे. परंतू संस्थानला अग्रक्रमाने जागा देत आहोत असे सांगितले.

याबाबत साधक-बाधक चर्चा होऊन, सदर जागा रुपये ११.०० लक्ष इतक्या किमतीस खरेदी करणेचे ठरलें.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

क) वावी येथील श्री.ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर आज सभेपुढे उपस्थित होते. त्यांना दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली. शासकीय मूल्यांकनाचे दर फारच कमी आहेत. रु.११.०० लक्ष इतक्या रक्कमेस सदर जागेची मागणी दुसऱ्या ग्राहकांनी केली आहे. परंतू संस्थानला आग्रक्रमाने जागा देत आहोत असे सांगितले.

याबाबत साधक-बाधक चर्चा होऊन, सदर जागा खरेदी करण्यात येऊ नये असें ठरले.

(२) श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर यांचा दिनांक २१ फेब्रुवारी, २००६ रोजीच्या अर्जाचे तसेच गट नंबर १६/१ च्या उताऱ्याच्या तसेच त्यासोबत विशेष भूमी संपादन अधिकारी क्रमांक ०२ नाशिक यांचेकडील दिनांक ०९ ऑगष्ट, २००२ च्या नोटीशीचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

गट नंबर १६/१ चे क्षेत्र ०१ हे ७२ आर आहे. इतर हक्कात वावी सोसायटीचा बोजा अशी नोंद आहे. त्यातून सिन्नर घोटी रस्त्यासाठी ०० हेक्टर ०८ आर जमीन संपादीत होत आहे. संपादित होणारी ०० हेक्टर ०८ आर जमीन वजा जाता ०१ हेक्टर ६६ आर जमीन शिल्लक रहात आहे.

त्यापैकी ०१ हेक्टर ६० आर क्षेत्र ते संस्थानला विकत द्यावयास तयार आहे. गट नंबर १६/१ ची पिकपहाणीत जमीन पडीत आहे. यावरुन सदर जमीन जिरायत आहे. तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यानुसार ०० हेक्टर ४० आर जमीन शिल्लक राहणे आवश्यक आहे. श्री. खांबेकर यांनी पत्रात नमुद केल्याप्रमाणे ०१ हेक्टर ६० आर जमीन खरेदी केली तर ०० हेक्टर ०६ आर जमीन शिल्लक राहते. अशा रितीने होणारा व्यवहार हा तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द होणार असल्याने तो मा.दुय्यम निबंधक, सिन्नर यांच्या कार्यालयात नोंदविला जाणार नाही. तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याचा विचार करता ०१ हेक्टर २० आर जमीन खरेदी करणे इष्ट राहील.

०१. श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर यांची जमीन घेणेबाबत निर्णय झाल्यास त्यांना त्यांनी नमुद केल्याप्रमाणे ०१ हेक्टर ६० आर जमीन विकत न घेता ०१ हेक्टर २० आर जमीन विकत घेणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

०२. श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर यांनी जमिनीची किंमत ११ लाख रुपये मागितली आहे. मात्र मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेत ०१ हेक्टर ६० आर क्षेत्र रुपये ११ लक्ष रुपयांस घेणेबाबत निर्णय झालेला होता. ( श्री. खांबेकर यांचे ०१ हेक्टर ६० आर क्षेत्राला रुपये ११ लाख मात्र या प्रमाणे प्रत्येक एकराला रुपये २,७५,०००/- मात्र दर येत आहे.) आता त्यापेक्षा कमी क्षेत्र ०१ हेक्टर २० आर घ्यावयाचे आहे. त्याचा विचार करता वाटाघाटीने किंमत ठरविणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

उपरोक्तप्रमाणे परिच्छेद अ, ब व क मध्ये नमुद केल्याप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता. यावर साधकबाधक चर्चा होऊन, वावी ग्रामपंचायत हे बक्षिसपत्राने देऊ करीत असलेल्या जागेची, श्री.भुतडा अथवा इतर खाजगी जमीनमालकांची जागेची समक्ष पहाणी करुन, त्यापैकी योग्य असलेल्या जागेची निवड करुन ती जागा खरेदी करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात यावी. त्यानंतर अशा प्राप्त होणाऱ्या जमिनीवर पालखी थांबा उभारण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४५. शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प ...**

**निर्णय क्र.६७८. (अ)**शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ एप्रिल, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २६३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

" .. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेत येऊन संस्थानतर्फे यापूर्वी शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले सात रस्ते व इतर डी. पी. रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून टप्प्या टप्प्याने विकसीत करणेस मान्यता देणेत आली. सदर रस्ते भू-संपादनसह विकसीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेतर्फे निधी देणेत यावा. सदर प्रकल्पाबाबत रस्ते विकास महामंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा. प्रकल्पाचे टप्प्यानुसार खर्चाचे दहा टक्के रक्कम करारनामा झालेनंतर रस्ते विकास महामंडळा यांना आदा करणेत यावी. उर्वरित रक्कम कामाचे प्रगतीनुसार आदा करावी, असे ठरले.

याकामी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी. "

**(ब)** उपरोक्त परिच्छेदातील निर्णयांस अनुसरुन, मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., कॅम्प - पुणे यांना जा.क्र. ८९१६/२००६, दिनांक ०७ जुलै, २००६ रोजी पत्र देण्यात

येऊन, प्रथमतः सदर प्रकल्पाबाबत करावयाच्या करारनाम्याचा मसुदा व प्रकल्प अहवाल इकडील कार्यालयास सत्वर पाठविणेविषयी व त्यानंतर प्रकल्पाच्या टप्प्यानुसार खर्चाची रक्कम व इतर आवश्यक कार्यवाही पुर्ण करण्यात येईल, असे कळविण्यांत आले होते.

**(क)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., कॅम्प पुणे यांनी दिनांक २५ जुलै, २००६ रोजीचे फॅक्सपत्रानुसार उपरोक्त प्रकल्प अहवालासाठी प्रारुप मसुदा करारनामा तयार करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत सुरु असून, या संदर्भान्वये मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ०३ जुलै, २००६ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत संस्थानची संमती असलेबाबत त्वरीत कळविणेस सांगितले आहे.

०१. नगरपंचायत, शिर्डी यांनी ठराव दिनांक ०८ मे,२००६ अन्वये पंचायतीने कामांच्या प्राधान्य याद्या (प्राधान्य क्र. १, २ व ३) या कार्यालयास पाठविल्याआहेत तथापी या प्राधान्य क्रमास संस्थानची संमती अद्याप कळविलेली नाही. तेव्हा सदर प्राधान्य याद्यास संस्थानची संमती त्वरीत या कार्यालयास कळवावी.

०२. नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत शिर्डी शहरासाठी मलनिस्साःरण योजना तयार करण्यात आली आहे व सदर योजनेचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रस्त्याच्या कामाबरोबर करण्यासाठी या योजनेचा वरील प्रकल्पामध्ये समावेश करण्याचे दिनांक ०३.०७.२००६ रोजी मंत्रालयामध्ये झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले आहे. याबद्दल आपली संमती या कार्यालयास कळवावी. या योजनेसाठी सुध्दा खर्च संस्थान सोसणार असल्याचे स्पष्ट करावे.

**(ड)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., कॅम्प पुणे यांचेमार्फत करुन घेण्यात येणाऱ्या रस्ते विकास प्रकल्पातील प्रथम प्राधान्य गटात खालील ११ रस्त्यांचा समावेश असावा, असे मा.मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. बांध/कावि०५/३१०/२००६, दिनांक ०४ जुलै,२००६ रोजी कळविले आहे.

**प्रथम प्राधान्य गट**

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| ०१ | शिर्डी निमगांव शीव रस्ता (न.म. रोड ते पुर्वेस ०१ किमी) रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०२ | शिर्डी रुई दक्षिणोत्तर रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शीव रस्ता) खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०३ | नांदुर्खी रस्ता (२०० रुम्स ते नांदुर्खी शीव रस्ता) रुंदीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०४ | कनकुरी रस्ता (न.म.रस्ता ते पुनमनगरपर्यन्त - १००० मीटर ) रुंदीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा (आरक्षण क्रमांक ३१ चा दक्षिण-पश्चिम कोपरा ते नाला क्रमांक ३४ पर्यन्त) यांना जोडणारा १३८० मीटर लांबीचा रस्ता. |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा ( नवीन पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रिंग रस्त्यापर्यन्त, आरक्षण क्रमांक ३१ पोहच ) ६०० मीटर लांबीचा रस्ता. |
| ०७ | विकास योजनेतील २४ मीटर वळणरस्ता ( नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचा रस्ता) यांना जोडणारा ४५० मीटर लांबीचा रस्ता. |
| ०८ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर (पिंपळवाडी रस्ता - निमगांव शीव रस्ता) ४५० मीटर लांबीचा रस्ता. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता ( नगर मनमाड रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता पर्यन्त) ८०० मीटर लांबीचा पुर्व - पश्चिम रस्ता. |
| १० | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील व्दारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यन्त ०९ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर ७५ मीटर लांबीचा रस्ता. |
| ११ | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ०६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर ( पालखी रस्ता ते नवीन पिंपळवाडी रस्ता ) ३० मीटर लांबीचा रस्ता. |

तसेच व्दितीय प्राधान्य गट व तृतीय प्राधान्य गटांमध्ये पुढील रस्त्यांचा समावेश असावा, असे मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे पत्र जा.क्र. नपं/बांध/कावि०५/१५४/२००६, दिनांक ३१ मे, २००६ नुसार (नगरपंचायत सभा दिनांक ०८ मे,२००६ ठराव क्रमांक ११ नुसार) खालीलप्रमाणे कळविलेले आहेत :

**व्दितीय प्राधान्य गट**

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| ०१ | नाला रस्ता (लुटे वस्ती ते साई बंधाऱ्यापर्यन्त) २००० मीटर लांबीचा रस्ता डांबरीकरण करणे. |
| ०२ | बिरेगांव रस्ता ( शिर्डी ते चौफुली ते बिरोबा मंदिर रस्ता) ३१०० मीटर लांबीचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०३ | चारी क्रमांक १२ पुढील रस्ता (नांदुर्खी शीवेपर्यन्त) ८०० मीटर लांबीचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०४ | नांदुर्खी रस्ता ते कनकुरी रस्ता २०० मीटर लांबीचा रस्ता. |
| ०५ | जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शीव (हॉटेल गोरडीया समोरील) रस्ता - २०० मीटर लांबीचा |
| ०६ | आरक्षण क्रमांक ०८ मधील नवीन जिल्हा परिषद शाळेस जोडणारे १२ मीटर रुंदीचे दोन रस्ते - २०० मीटर लांबीचे |

**तृतीय प्राधान्य गट**

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| ०१ | शिर्डी बन रस्ता (काँक्रिटीकरणाच्या पुढे बिरोबा मंदिरापर्यन्त) - २००० मीटर लांबीचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे |
| ०२ | पिंपळवाडी रस्ता ते चौफुली पर्यन्तचा रस्ता ( जुना पिंपळवाडी रस्ता ते बिरोबा मंदिराकडे जाणारा रस्ता) १२०० मीटर |

| | |
|---|---|
| | लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०३ | शिर्डी - निमगांव शीव रस्ता ( पश्चिम बाजु सितानगरकडे जाणारा रस्ता) १००० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०४ | शिर्डी - रुई शीव रस्ता (कंपोष्ट डेपोकडे जाणारा, पुर्व पश्चिम रस्ता) १५०० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०५ | कंपोष्ट डेपो रस्ता ( जुना पिंपळवाडी रस्ता ते कंपोष्ट डेपो रस्ता दक्षिणोत्तर रस्ता) ९०० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०६ | स्वामी रिसॉर्टलगतचा रस्ता (नगरमनमाड रस्ता ते पानमळा रस्ता) ५०० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०७ | शिर्डी - साकुरी शीव रस्ता (पुर्व व पश्चिम बाजु) रुंदीकरणातर्गत २८०० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०८ | पुनमनगर ते कोते वस्ती रस्ता ( गणेश बंधाऱ्यालगतचा रस्ता) १००० मीटर लांबीचा खडीकरण व डांबरीकरण करणे. |

उपरोक्त प्रथम, व्दितीय व तृतीय प्राधान्य गटांतील रस्तांचा समावेश महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्पात समावेश करुन, त्याबाबतचा करारनामा करण्यात यावा, असे नम्र मत आहे.

**(इ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ एप्रिल, २००४ चे सभेतील निर्णय क्रमांक २६३ अन्वये शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेबाबत तत्वत: मान्यता मिळालेली आहेच, परंतु प्रथम प्राधान्य गटातील वर नमूद केलेले ११ रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कॅम्प पुणे यांचेमार्फत विकसीत करण्यासाठी संस्थानची संमती कळविणे आहे. याबाबत दिनांक ०३ ऑगष्ट, २००६ रोजी शिर्डी येथे मा.अध्यक्षसो. यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी चर्चा केली. त्यावेळी मा.नगराध्यक्ष उपस्थित होते. सदर चर्चेमध्ये उपरोक्त ११ रस्त्यांबाबत म.रा.रस्ते विकास महामंडळ यांना संस्थानची सहमती कळवावी, असे मा.अध्यक्षसो. यांनी निर्देश दिले आहेत.

त्यानुसार, मा.अधिक्षक अभियंता, मरारविमं, कॅम्प पुणे यांना इकडील पत्र जा.क्र. १०६४९/२००६, दिनांक ०९ ऑगष्ट, २००६ अन्वये उपरोक्त ११ रस्ते विकसीत करण्यांस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांची मंजुरी प्राप्त होण्याचे अटीवर संस्थानची संमती कळविणेत आलेली आहे.

**(ई)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., कॅम्प पुणे यांनी दिनांक २५ जुलै, २००६ रोजीचे फॅक्सपत्रात शिर्डी शहरासाठी तयार करण्यात आलेल्या मलनि:स्सारण योजनेचा समावेश या प्रकल्पात करण्यात यावा, तसेच योजनेसाठी करावयाचा खर्च संस्थानमार्फत करण्यात येईल, त्यास संस्थानची संमती असलेबाबत कळविणेबाबत सांगितले आहे. याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून मलनिस्सा:रण योजनेचा तपशील, खर्च याबाबत सविस्तर प्रस्ताव घेणे आवश्यक आहे. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर याबाबतची संमती मरारविम, कॅम्प पुणे यांना कळविता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे सविस्तर तपशीलवार विवेचनानुसार, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे :

०१. **<u>परिच्छेद क</u>** मध्ये नमूद केलेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय प्राधान्य गटातील रस्त्यांचा (अंदाजे एकुण २४७३५ मीटर लांबीच्या रस्त्यांचा) समावेश मरारविमं, कॅम्प पुणे यांचेशी करावयाच्या करारनाम्यात करण्यात यावा किंवा कसे ?

०२. मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २४ एप्रिल, २००६ चे निर्णय क्रमांक २६३ अन्वये, सदर प्रकल्पाबाबत रस्ते विकास महामंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा, प्रकल्पाचे टप्प्यानुसार खर्चाचे दहा टक्के रक्कम करारनामा झालेनंतर रस्ते विकास महामंडळास अदा करण्यात यावी व उर्वरित रक्कम कामाचे प्रगतीनुसार अदा करावी, असे ठरलेले आहे. त्यानुसार प्रथम प्राधान्य गटाचे अंदाजित खर्चाचे रक्कमेच्या १० टक्के इतकी रक्कम मरारविम, कॅम्प पुणे यांना आगाऊ रक्कम म्हणून अदा करण्यात यावी किंवा कसे ?

०३. **<u>परिच्छेद इ</u>** मध्ये नमुद केल्यानुसार, प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्तांचा विकास मरारविमं, कॅम्प पुणे यांचेमार्फत करणेबाबत कळविण्यात आलेले आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत.

०४. **<u>परिच्छेद ई</u>** मध्ये नमुद केल्यानुसार, शिर्डी गांवासाठी तयार करण्यात आलेल्या मलनि:स्सारण योजनेचा समावेश मरारविमं, कॅम्प पुणे यांच्या प्रकल्पात करण्यात यावा किंवा कसे ? मलनि:स्सारण योजनेचा समावेश करावयाचा झाल्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून या योजनेचा तपशीलवार योजना, आराखडा व त्याबाबतचा अंदाजित खर्च याबाबतची माहिती मागविणेस मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर, साधकबाधक चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :

०१. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दिनांक ०८ मे, २००६ रोजीचे सभेत ठराव क्रमांक ११ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय प्राधान्य गटातील रस्तांचा (अंदाजे एकुण २४७३५ मीटर लांबीच्या रस्त्यांचा) समावेश मरारविमं, कॅम्प पुणे यांचेशी करण्यात याव्याच्या करारनाम्यात करण्यात यावा.

०२. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कॅम्प पुणे ही महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असलेली एक शासकीय संस्थाच आहे. या संस्थेशी करावयाच्या करारनाम्यास अजून काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे, दरम्यानच्या काळात प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसित करावयाचे कामांस चालना मिळावी या उद्देशाने व मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६३ अन्वये ठरल्यानुसार, प्रथम प्राधान्य गटातील विकसीत करावयाच्या रस्त्याच्या अंदाजित खर्चाच्या १० टक्के रक्कम लवकरात लवकर अदा करणेत यावी. उर्वरित रक्कम कामाच्या प्रगतीनुसार अदा करणेत यावी. व्दितीय व तृतीय प्राधान्य गटातील रस्त्यांबाबतच्या अदा करावयाच्या रक्कमांबाबत यथावकाश मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

०३.	मरारविमं, कॅम्प पुणे यांचेशी करावयाचा करारनाम्याचा प्रारुप मसुदा लवकरात लवकर तयार करुन, या प्रारुप करारनाम्याचा मसुदा मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. याबाबत संस्थान वकिलांचा कायदेशीर अभिप्राय घेण्यात यावा. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

०४.	परिच्छेद इ मध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

०५.	शिर्डी गावासाठी तयार करण्यात आलेल्या मलनिःस्सारण योजनेचा मरारविमं, कॅम्प पुणे यांचे प्रकल्पात व करण्यात यावयाच्या करारनाम्यात समावेश करण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र. ५३१ ते ६७८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी